दीपावली विशेषांक २०१४

# छात्रप्रबोधन

वर्ष १५ । अंक २ * सौर कार्तिक । शके १९३६

मूल्य ₹ ६०




ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक !

# संवाद



**मोठ्ठं होऊ इच्छिणाऱ्या, सहकार्यशील प्रबोधकांनो,**

महाराष्ट्र अन् गोवा मिळून या अंकाची आतुरतेनं वाट बघणाऱ्या लाखभर विद्यार्थ्यांना, त्यांच्या कुटुंबीयांना, मित्र-मैत्रिणी अन् शिक्षकांना ही दिवाळी अन् नूतन संवत्सराच्या भरभरून शुभेच्छा! 'छात्र प्रबोधन'चा हा दिवाळी अंक म्हणजे या शुभेच्छांचं मूर्तरूपच होय... विविध रंग-रसांनी भरलेलं !

तुमचं मनोरंजन करणारं, तुमच्या ज्ञानात भर घालणारं, तुम्हाला विचार करायला लावणारं, सुंदर कलाकृती करायला सुचवणारं आणि 'खऱ्या अर्थानं मोठ्ठं' होण्याची प्रेरणा वाढवणारं पुष्कळ काही या अंकात तुम्हाला सापडेल. ते चवीचवीनं वाचा अन् अनेकांबरोबर यातील लेखांबाबत गप्पा मारा, चर्चा करा, वाचून दाखवा, लिहून कळवा, या अंकाचा खूप वेगवेगळ्या पद्धतीनं तुम्ही उपयोग करून घ्या. मला खात्री आहे, हा अंक तुम्हाला सर्वार्थानं समृद्ध करेल!

तुम्हाला निव्वळ कुतूहल शमविण्यापलीकडचे प्रश्न कधी पडतात का हो? खरंतर, आपल्या प्रत्येकाला अनेक छोट्या मोठ्या प्रश्नांना, समस्यांना रोज सामोरं जावं लागतं; पण आपल्यातला प्रत्येकजण खूप वेगवेगळ्या पद्धतीनं या समस्यांकडे पाहतो, त्यांना सामोरं जातो. काही जणांना समस्या जाणवतच नाहीत. जाणवल्या, तरी त्या स्वतःच्या नाहीत असं म्हणून; ते त्याच्याकडे दुर्लक्ष करतात. काहींना समस्या जाणवतात; पण त्या 'आपण सोडवू शकणार नाही' असं त्यांना वाटतं. त्यामुळे ते हात-पाय गाळून बसतात. त्यांना समस्या म्हणजे संकट वाटतं. ते त्या समस्येपासून लांब पळतात किंवा समस्या आपोआप सुटेल किंवा कोणीतरी ती समस्या सोडवेल म्हणून वाट बघत बसतात. काहीजण या समस्या 'माझ्याच वाट्याला का आल्या' असं म्हणून नशिबाला, परिस्थितीला, दुसऱ्यांना दोष देत बसतात, तर काहीजण सततच समस्या सहन करतात, सोशीकपणे. स्वतःला जुळवून घेत, किरकिरत, अतिसामान्य आयुष्य जगत राहतात; पण काहीजण असेही असतात, की जे समस्यांना भिडतात. स्वतःच्या क्षमता अजमावण्याची संधी म्हणून ते समस्यांकडे पाहतात. समस्या यशस्वीरितीनं सोडविण्याची विविध तंत्रे आणि पद्धती शिकून घेतात. त्यांचा सराव करतात. बुद्धीच्या जोरावर योग्य उत्तर शोधून काढतात आणि जिद्दीनं ती उत्तरे प्रत्यक्षात आणतात. ती माणसे पराक्रम करून दाखवतात, खऱ्या अर्थानं मोठ्ठी होतात !

तुम्ही सर्वांनी पराक्रमी व्हावं, मोठ्ठं व्हावं असं मला मनापासून वाटतं! तुम्हालाही वाटतं ना? मग प्रश्नांकडे, समस्यांकडे पाठ फिरवू नका. त्यांना सामोरं जा. त्यांच्यावर स्वार व्हा! तुम्ही प्रश्न 'निर्माण करणारे' न होता प्रश्न 'सोडविणारे' व्हावं यासाठी, या अंकातील 'समस्या परिहार' या विभागातील लेख व पुढे वर्षभर चालणारी लेखमाला तुम्हाला उपयोगी पडेल.

सध्याचं युग हे जसं माहिती-तंत्रज्ञानाचं युग आहे, तसंच ते गटांत काम करण्याचं, सहकार्याचं युग आहे. नवनवीन तंत्रज्ञानावर हुकमत तर मिळवायला हवीच (पण त्यांच्या आहारी जायचं नाही बरं का !), त्यांची निर्मितीही करायला हवी; पण त्याचबरोबर जोडी-जोडीने, गटागटात कामही करता यायला हवं. दीर्घकाळ एकत्र काम केलेल्या तीन वेगवेगळ्या क्षेत्रातील जोडींचे अनुभव या अंकात तुम्ही वाचाल. त्यातून जोडीनं यशस्वीरित्या काम करण्याची काही सूत्रे तुम्हाला सापडतील. परस्परांना समजून घेणं, प्रतिसाद देणं, सांभाळून घेणं, मदतीला धावून जाणं, स्वतःच्या स्वभावात गरजेनुसार बदल घडवून आणणं, प्रसंगी आपले मान-अपमान बाजूला ठेवता येणं, यशाचं श्रेय दुसऱ्याला देता येणं, परस्परांना पूरक होणं, मोठ्ठं ध्येय गाठण्यासाठी परस्परांमधील भांडणं-मतभेद विसरता येणं, हातचं न राखता झोकून देणं, मनात एक - ओठात एक असं नसणं, परस्परांवर विश्वास अन् मैत्रीभाव असणं यांसारख्या गोष्टी जोडीनं गटात काम यशस्वी करायला तुम्हाला मदत करतील. तुमच्या रोजच्या आयुष्यात तुम्हाला या गोष्टींचा जाणीवपूर्वक सराव करता येईल का? यासाठी आवर्जून जोडी-जोडीनं, गटागटानं काम करण्याची संधी घ्या. 'छात्र प्रबोधन'तर्फे आयोजित विविध स्पर्धा, जोडीकार्य उपक्रम, शिबिरे त्यासाठी तुम्हाला नक्कीच उपयोगी पडतील.



तुमच्यात असलेल्या क्षमतांची तुम्हाला जाणीव करून देण्यासाठी, त्या बळकट करण्यासाठी अन त्याआधारे आकाशात उंच भरारी घेण्यासाठी, अनेकांच्या आयुष्यात प्रकाश पेरण्यासाठी 'छात्र प्रबोधन' सतत तुमच्या सोबत आहे. मित्र म्हणूनही अन् मार्गदर्शक म्हणूनही! खूप खूप शुभेच्छांसह...

तुमचा दादा,

[signature]

**(महेन्द्र सेठिया)**



# दीपावली विशेषांक २०१४

# छात्र प्रबोधन

वर्ष १५ । अंक २ । सौर कार्तिक । शके १९३६

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात



## कथा


१३. म्हंजे म्हंजे वाघाचे पंजेऽऽ – क्षितिज देसाई
४१. पंख असलेला माणूस! – भारत सासणे
६५. रणफंदीची जात आमुची...! – निनाद बेडेकर
१०७. एक नूर आदमी...! – मंगला गोडबोले
१४१. भूक मायेची – अनु. अंजनी नरवणे
१५१. जादू की झप्पी ! – डॉ. प्रदीप आवटे






## ललित


७१. कॉफी, कॅमेरा आणि काहीबाही – प्रसाद सांडभोर
७८. चित्रलीला – गोपाळ नांदूरकर
११३. आली दिवाळी दिवाळी... – डॉ. नीलिमा गुंडी
११७. दगड – श्रीनिवास शारंगपाणी
१४७. वक्तृत्वाची पहिली पाठशाळा – प्रवीण दवणे




## व्यक्तिविकसनपर लेख


७. न मळलेली वाट – सुप्रिया वाकणकर
४९. निर्णयाच्या अवघड वळणावर... – उमेश झिरपे
९३. गुण – दोषांतील सीमारेषा – शैलजा देशमुख




## ज्ञान विज्ञान माहितीपर


३३. समुद्र जीवाणूंपासून प्रतिजैविके – डॉ. सुनीति गोरे
८६. गाऊ 'मंगल' गान – संकलित
८७. निसर्गातील मूलभूत बले – डॉ. निवास पाटील




## कलाकृती – विज्ञान प्रयोग


११. विज्ञान प्रयोग
– हवा न भरता (?) फुगा फुगवा! – डॉ. कांचनगंगा गंधे
१९. आगळेवेगळे दागिने – डॉ. कांचनगंगा गंधे
७०. कागदी परडी – ज्योत्स्ना सुतवणी
११२. फुलदाणी – रोहित कोकीळ
१५५. चौफुला सुशोभन – जयश्री मांडके
ट्रेसिंग पेपरची फुले – अपर्णा म्हात्रे
दिवाळी भेटीविषयी अन्य कल्पना – रोहित कोकीळ






## दिवाळी भेट

मलपृष्ठाच्या आतील पानावर

संकल्पना–निर्मिती
रोहित कोकीळ

### मासिकाविषयी...

प्रकाशन दिनांक : राष्ट्रीय सौर १८ आश्विन शके १९३६,(१० ऑक्टोबर २०१४)
**या अंकाची किंमत** : ₹ ६०/- , **नोंदणी क्र.** : (RNINO.) MAHMAR/2000/5636
**वर्गणी-वार्षिक** : ₹ १८०, **द्वैवार्षिक** : ₹ ३४०, **त्रैवार्षिक** : ₹ ५००, **दशवार्षिक** : ₹ १५००
(पुण्याबाहेरील धनादेशासाठी ₹ २० व घरपोच दिवाळी अंकासाठी ₹ ४० जादा.)
**संपर्क पत्ता** - छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे 411 030. ☎: (०२०)२४२०७१७४/१७९
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org संकेतस्थळ : www.chhatraprabodhan.org

# अंतरंग



## कविता


१२. निबंधन् – आसावरी काकडे
३९. प्रवासाच्या खिडकीतून – आश्लेषा महाजन
६३. यशाचा सुगंध – डॉ. सुमन नवलकर
७४. इटुक इवली कळी – मृणालिनी कानिटकर–जोशी
७७. एक ससा लाल डोळ्यांचा – अनु. मेघना पळशीकर
११६. मी कुमार होतो... – किशोर पाठक




## विशेष लेखमाला – जोडीने केलेला ध्येयप्रवास...


२२. समृद्ध सहजीवन – डॉ. रवींद्र कोल्हे
२५. सर्जनशील सहप्रवास – सुनील सुकथनकर
२८. जोडी जमली रे!! – सुभाष देशपांडे




## समस्या परिहार – विशेष विभाग


१२१. हीच खरी समस्या...!! – रामचंद्र डिंबळे
१२३. समस्या आणि समस्या परिहार – डॉ. उर्मिला सडोलीकर
१२५. 'झोजिला'चे युद्धनाट्य! – राहुल कोकीळ
१३३. समस्या परिहारातील अडथळे – डॉ. वसुधा कुलकर्णी
१३७. उत्तरांची दिशा – मल्हार अरणकल्ले




## मुलांचे पान


५७. एका भूमिकेचा प्रवास – कु. मैथिली सेवेकरी
५९. सण/उत्सव दिवाळी – कु.भावना आगळे
६१. माझी पहिली प्रसिद्धी – कु. प्रतीक भिडे
६२. वाचलेच पाहिजे असे काही...– कु. नीरजा भिडे


## संकीर्ण


१८. दोस्ती संगणकाशी, शब्द शब्द जुळवुनी..., ३०. पक्षी जगत, ३१. ज्ञान प्रबोधिनीची संग्राह्य पुस्तके, ३२. दूरचित्रवाणी लोकप्रियता गुणांक (TRP), थोडीशी गंमत – वैजनाथ दुलंगे/मधुजा पारगावकर, ३७. शेवाळ्यामध्ये अनेक घड्याळे?, ५३. प्रबोधिनी सर्वांची... सर्वांसाठी, ५५. मास्टर शेफ व्हा! – डॉ. कांचनगंगा गंधे, १०५.अंकातील कलाकृती फोटो, १३५. विनोद – अरविंद गाडेकर, १५७. केंद्रप्रमुखांचे अभिनंदन, वैयक्तिक स्पर्धा – सफर दिवाळी विशेषांकाची, १५८. राज्यस्तरीय स्पर्धा निवेदन.


**तळटीपेच्या माहितीपर ओळी –** आंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेते भारतीय, भौगोलिक आश्चर्ये, राष्ट्रीय शैक्षणिक संस्था, जगावर परिणाम करणारे क्रांतिकारी शोध, वर्षभरात दिवंगत झालेल्या काही मान्यवर व्यक्तींना श्रद्धांजली.

## मुखपृष्ठाविषयी

एक प्रसन्न दुपार. झाडावर पिवळा फुलोरा फुलला आहे. खाली पक्ष्यांचा थवा दाखवला आहे. ॲक्रेलिक रंग माध्यमातील हे चित्र आहे. या चित्रशैलीला बिंदूवादी शैली असे म्हणतात. बारकाईने हे चित्र पाहिल्यास समान अंतरावर एकसारखे बिंदू काढले आहेत. त्यातून ज्या रेषा तयार होतात त्यांचा वापर करून एका प्रसन्न दुपारचे चित्र चितारले आहे. छात्र प्रबोधन परिवाराला व सर्व वाचकांना शुभ दीपावली !

**– रवी परांजपे**


या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे.
परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.



**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**संपादक मंडळ**
शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर, डॉ. कांचनगंगा गंधे, आश्लेषा महाजन

**कार्यकारी संपादक**
शिल्पा कुलकर्णी

**संपादन साहाय्य**
चारुता परांजपे

**अक्षर जुळणी**
माधवी दाते

**शीर्षक लेखन**
बाबू उडुपी

**ई– मुद्रित शोधन**
उदय हर्षे, सुनीला गोंधळेकर

**जाहिरात संकलन**
वेदा भागवत, सुलभा कुलकर्णी

**प्रचार व वितरण**
रवींद्र भोसले

**मुखपृष्ठ**
रवी परांजपे

**मांडणी/सजावट**
रोहित कोकीळ

**चित्रकार**
सचिन जोशी, राहुल देशपांडे, गिरीश सहस्रबुद्धे, ऋजुता घाटे, अंजली पुरंदरे, प्रियाल मोटे, कुडल हिरेमठ,सौरभ उपळेकर

# ज्ञान प्रबोधिनी

स्वामी विवेकनंदांच्या विचारांना मूर्तरूप देणारी अभिनव संस्था ! देशातील सुप्त मनुष्यशक्तीचा आत्मसन्मान वाढवणारी गतिशील संघटना ! प्रत्येकाच्या बुद्धिमत्तेला विकासाची, नेतृत्वाची व सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देणारी चळवळ !

## ज्ञान प्रबोधिनीच्या कार्याचा पाया असलेले तत्त्वसप्तक

**उत्तमता, विज्ञानाभिमुखता, संघटना, विकास, जनी जनार्दन ऐसा भाव, हिंदू जीवनदृष्टी, समाजसंस्थापना**

## । उत्तमता ।

### गुणवत्तेचा परमोच्च बिंदू म्हणजे उत्तमता !

उत्तमतेचे बहिरंग आणि अंतरंग हातात हात घालून गेले पाहिजेत. तो प्रबोधिनीतील उपक्रमांचा, प्रकल्पांचा, विभागांचा, केंद्रांचा व सर्व कार्यकर्त्यांचा आणि सहभागी सदस्यांचा स्थायीभाव व्हायला हवा, असा प्रबोधिनीचा आग्रह असतो.

✻ **उत्तमतेचे बहिरंग :** नेटकेपणा, प्रमाणबद्धता, अचूकता, सौंदर्य, गतिशीलता, तत्परता, प्रयोगशीलता, तपशीलवार नियोजन, नावीन्य, कुशलता, भव्यता

✻ **उत्तमतेचे अंतरंग :** निर्भेळ शुद्धता, प्रयोजन व हेतूंची सुनिश्चितता, आशयपूर्णता, अभिनवता, प्रभावकारिता, सर्वसमावेशकता, सातत्य, उत्स्फूर्तता, स्वदेशी बाणा, नीतिमत्ता

### प्रबोधिनीतील उत्तमतेचे बहिरंग व अंतरंग... काही उदाहरणे

✻ शालेय ते पदव्युत्तर स्पर्धात्मक परीक्षांमधील अत्युच्च यश संपादन हे उत्तमतेचे बहिरंग तर सामाजिक जाणीव व राष्ट्रीय वृत्तीच्या जोपासनेसाठी शिक्षण प्रणालीची निर्मिती हे उत्तम शिक्षणाचे अंतरंग !

✻ ५०,००० विद्यार्थ्यांपर्यंत दर्जेदार साहित्य अन् आकर्षक छपाईसह पोहोचणारे छात्र प्रबोधनचे दिवाळी अंक हे उत्तमतेचे बहिरंग तर अंकाच्या वाचकांना कृतिशील करण्यासाठी स्पर्धा, मेळावे, शिबिरे व उपक्रम यांद्वारा व्यक्तिमत्त्व विकसनाची चळवळ हे उत्तम मासिकाचे अंतरंग !

✻ विहिरी/शेततळी/बंधारे यांची उत्तम तांत्रिक दर्जासह पूर्तता हे प्रदेश विकसनातील बहिरंग तर त्यासाठी लोक सहभाग व श्रमदान यांचा आग्रह हे उत्तम कामाचे अंतरंग !

✻ १००० खाटांची क्षमता असलेले सुपर स्पेशालिटी दीनानाथ रुग्णालयाचे व्यवस्थापन हे उत्तमतेचे बहिरंग, नीतिमान वैद्यकीय सेवा हे अंतरंग !

✻ आधुनिक तंत्रज्ञानाद्वारा संस्कार विधींचा जगभर प्रसार हे उत्तमतेचे बहिरंग तर सार्थ व सामूहिक संस्कारांसाठी सर्व जातींमधील स्त्री–पुरुषांना पौरोहित्याचे प्रशिक्षण हे त्याच्या उत्तमतेचे अंतरंग !

***उत्तमता ही प्रत्येकाची वृत्ती होण्यासाठी उत्स्फूर्तता, अभ्यासशीलता, प्रयोगशीलता, कल्पकता आवश्यकतेनुसार स्वत:ला बदलण्याचा लवचिकपणा, कठोर परिश्रम, स्वीकृत ध्येयाचा अपरंपार ध्यास, विजिगीषू प्रेरणा, इ. गुणांची जोपासना करण्याचा आग्रह हे प्रबोधिनीपण !***

### संस्थात्मक व संघटनात्मक कामाची क्षेत्रे

शिक्षण । संशोधन । ग्रामविकसन । आरोग्य । नेतृत्व विकसन । स्त्रीशक्ती प्रबोधन । राष्ट्रीय एकात्मता

मुख्य कार्यालय : ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, ०२०–२४२०७००० www.jnanaprabodhini.org

व्यक्तिविकसन

# न मळलेली वाट

सुप्रिया वाकणकर

आई-बाबा दोन दिवसांकरिता बाहेरगावी जाण्यास निघाले होते. बऱ्याच दिवसांनी त्या दोघांच्या चेहऱ्यावर एक वेगळंच समाधान व निश्चिती जाणवली. मलाही खूप छान, मोकळं वाटत होतं.

कालच माझा *MIT Design Institute* च्या प्रवेश परीक्षेचा निकाल लागला आणि त्यात मी निवडला गेलो होतो. बारावीनंतर ज्या चार नामांकित *Design Institute* मध्ये मी प्रवेशपरीक्षा दिल्या होत्या, त्यांपैकी तीनमध्ये पहिल्याच फेरीत माझी निवड झाली होती; त्यामुळे *Design college* मधील शिक्षण तर निश्चित झालंच होतं; पण ज्या प्रथितयश राष्ट्रीय डिझाईन संस्थेमधून शिक्षण घेण्याची माझी इच्छा होती त्या *NID*, अहमदाबाद येथील संस्थेचा निकाल अजून लागायचा होता. खरं तर निकालाचा निश्चित दिवस त्यांच्या *website* वरूही समजला नव्हता; त्यामुळे त्याची वाट पाहात बसण्याशिवाय माझ्याजवळ पर्याय नव्हता.

आई-बाबांना निरोप देऊन मी घरात वळलो. एकीकडे मनाला थोडासा दिलासा मिळाला असला, तरी एक अनामिक हुरहूर अस्वस्थ करत होती. आता अगदी एकटाच बसलो असताना गेल्या तीन-चार वर्षांतला माझा या वाटेवरचा प्रवास डोळ्यांसमोर तरळू लागला...

माझी दहावीची परीक्षा संपली आणि एका मोठ्या *रोलरकोस्टर राईडवरून* उतरल्यावर जशी अवस्था होते, तशी माझी अवस्था झाली. मन हलकं झालं. 'आता आपण वेगळ्याच विश्वात प्रवेश करणार', या विचारानं खूप छान वाटत होतं. शाळेतले मित्र आणि त्यांच्याबरोबर अनुभवलेल्या आंबट, गोड गाभुळलेल्या आठवणी जरी शिदोरीला होत्या



*दहावी-बारावीची परीक्षा होते आणि आपल्यातले बरेच जण 'मेडिकल', 'इंजिनिअरिंग' फार फार तर 'सी. ए.' अशा राजमार्गाने पुढच्या शिक्षणाकडे वळतात. 'मला काय आवडतंय? काय व्हायचंय? का?' याचा विचारच आपण करत नाही. मग वेगळा, स्वत:चा निर्णय घेणं, ही तर दूरची गोष्ट!*

*थोडा वेगळा विचार करायला धाडस लागतं. त्याच्याशी चिकटून राहायला, स्वत:ला सिद्ध करावं लागतं. प्रसंगी विरोधही सहन करावा लागतो.. हे आणि असं बरंच काही...*

*असा निर्णय घेणारा, वेगळ्या वाटेने करियर करणारा 'यश' कोणत्या मानसिक, भावनिक आंदोलनातून गेला, याचं चित्रण तुम्हालाही अंतर्मुख करून जाईल...*

*प्रत्येकाचे आपले-आपले, वेगवेगळे आकाश।*
*प्रत्येकाची भूमी वेगळी, वेगळा स्वतंत्र प्रकाश।।*

वार्षिक पान प्रायोजक - श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे

तरी 'शाळा सुटली' याचं बारीकसं दु:ख मनात सलत होतं.

या दरम्यान हमखास विचारला जाणारा ''आता पुढं काय?'' हा प्रश्न मला मात्र, अजिबात गोंधळात पाडत नव्हता; कारण नववीत असतानाच माझं शिक्षणक्षेत्र मी निश्चित केलं होतं. ज्या विषयात मन रमणार नाही, अशा विषयात केवळ पैसा, नाव, लौकिक मिळवण्यासाठी *करियर* करणं मला मान्य नव्हतं; उलट कितीही काम केलं तरी मनाचा उत्साह टिकून राहील अशा क्षेत्राचीच *करियर* म्हणून निवड करायची ,असा माझा विचार होता. मला *Animator* बनायचं होतं.

आठवीच्या उन्हाळी सुट्टीत मी एका व्यक्तिमत्त्व विकास शिबिरासाठी गेलो होतो. दहा दिवसांच्या त्या कार्यशाळेनं माझ्या छोट्याशा १४ वर्षांच्या आयुष्याला एक दिशा दिली. त्या शिबिरातल्या अनेक उपक्रमांपैकी *Goal setting* विषयांतर्गत आम्हाला एक *Goal-Book* बनवायचं होतं. खरं तर १३-१४ वर्षांच्या त्या कुमारवयात आयुष्यातलं 'लक्ष्य' कितीजणांना सापडलेलं असतं? पण उत्साहानं तयार केलेल्या त्या *Goal-Book* मध्ये मी अगदी सहजपणे लिहून गेलो...

''मला *Animator* व्हायचं आहे !'' माझ्या निवडलेल्या *Goal* विषयी स्पष्टीकरण लिहिताना मी दूरस्थ 'लक्ष्य' म्हणून लिहिले होते. *Walt Disney* हा मी माझा आदर्श मानतो. त्यांच्याच *Disney Animation Company* मध्ये एक उत्कृष्ट animator होणं हेच माझं लक्ष्य राहील.

इतर सर्वांसाठी त्या शिबिरातला तो केवळ एक उपक्रम असेल; पण माझ्यासाठी मात्र, मी मलाच ऐकवलेला तो 'आतला' आवाज होता.

या क्षेत्रात *करीयर* करण्याच्या माझ्या निर्णयाबाबत खूप वेगवेगळी मते मला अनुभवायला मिळाली. ज्यांना माझी चित्रकलेची आवड माहीत होती, त्यांनी एकीकडे नवीन वाट चोखाळल्याबद्दल कौतुक केलं, तर कलाक्षेत्राला आपल्याकडे मिळणारी दुय्यम वागणूक बघता काहींनी चिंताही व्यक्त केली. माझ्यावर खूपखूप प्रेम करणारे आणि वेळोवेळी प्रोत्साहन देणारे माझे चित्रकलेचे सरही, क्षणभर जेव्हा माझ्या या निर्णयाने नि:शब्द झाले; तेव्हा मी किंचितसा अस्वस्थ झालो. गेली अनेक वर्षे त्यांना या क्षेत्रात खूप मेहनत घेताना मी पाहत आलो आहे. कलेला आपल्याकडे म्हणावं तितकं मोल मिळत नाही, याची खंत त्यांच्याकडे पाहून मला नेहमी जाणवे. पण एकदा का चित्र काढायला बसले की, सरांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद मला दिसत असे. बहुतेकांचे म्हणणे असे होते की, कोणत्याही प्रथितयश शिक्षणक्रमातील एक पदवी हातात घेऊन, मगच छंद म्हणून मी या क्षेत्राकडे वळावे.

माझ्या विज्ञान आणि गणिताच्या शिक्षकांचं तर माझ्याबद्दल खूपच वाईट मत झालं होतं. दहावीत मिळालेल्या चांगल्या गुणांनी हुरळून जाऊन हा मुलगा आता मात्र, फुकट गेला, असा काहीसा त्यांचा माझ्याबद्दल ग्रह झाला आहे; असं मला त्यांच्या नजरेतून जाणवे.

सगळ्यांनाच मी अधिक अभ्यास करावा, *Engineer* किंवा *Architecture* सारख्या क्षेत्रात प्रवेश





**भेट द्या : राष्ट्रीय शैक्षणिक संस्था - NIO** (एकूण शाखा - ६)
(National Institute of Oceanography) सागर विज्ञान

**वार्षिक पान प्रायोजक – श्री. सुरेंद्र कापसे, प्रिस्टन, अमेरिका**

घ्यावा आणि लौकिकार्थाने यश-कीर्ती-पैसा 'हमखास' देणाऱ्या त्या घिश्यापिट्या मार्गावरून ऊर फुटेस्तोवर धावावे, अशी काहीशी अपेक्षा असावी.

पण मला मात्र, हे कधीच मान्य नव्हते. *Robert Frost* या कवीची *'The Road Not Taken'* ही कविता, मला माझ्या विचारांची बैठक पक्की करायला मदत करीत होती. माझा स्वत:वर, माझ्या स्वप्नांवर आणि माझ्या कलेवर ठाम विश्वास होता.

दहावी चांगल्या गुणांनी मी उत्तीर्ण झालो होतो. बारावीपर्यंत विज्ञान घ्यायचं ठरलं होतं. बारावीचा टप्पा पार करून माझ्या आवडत्या क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी मी आतुर झालो होतो; पण ते एवढं सोपं निश्चितच नव्हतं.

या क्षेत्राबद्दल आपल्याकडे असलेली अनभिज्ञता, प्रवेश परीक्षेसाठी नक्की कशी तयारी करावी याबाबतचे अपुरे मार्गदर्शन, एकीकडे अकरावी-बारावी विज्ञानाच्या अभ्यासातून होणारी वेळेची ओढाताण, त्यातच सगळ्यांची बारावीत चांगल्या मार्कांची अपेक्षा; यांमुळे आपण घेत असलेल्या निर्णयाबाबत मी कधीकधी साशंक होई. भारतातील *Design* क्षेत्रात सर्वोत्तम समजल्या जाणाऱ्या *NID* या संस्थेतून *Animation* चे शिक्षण घेणं हे जरी माझं ध्येय असलं, तरी देशभरातील हजारो विद्यार्थ्यांसाठी असलेल्या केवळ शंभर जागांमध्ये आपली वर्णी लागणं खूप कठीण आहे, हे मला जाणवत असे.

शेवटी इंजिनिअरिंग प्रवेशपरीक्षा न देण्याचा मी ठाम निर्णय घेतला. *NID* अधिक समजून घेण्यासाठी अहमदाबादला गेलो. माझ्यासाठी ही भेट खूप महत्त्वाची ठरली. तिथले वातावरण विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेसाठी खूपच पोषक असल्याचं मला जाणवलं. तिथल्या काही




*मनी तरंग आनंदाचे, नवे स्वप्न साकाराया।*
*उत्साह जोम पंखात, गवसणी नभा घालाया।।*

वार्षिक पान प्रायोजक – श्री. अतुल कुलकर्णी, पुणे

विद्यार्थ्यांशी बोललो आणि माझी खात्री झाली- मला इथेच यायचं आहे.

दरम्यान, बारावी चालूच होती. विज्ञानाच्या पुस्तकात मन रमत नव्हतं. पण *NID* प्रवेशासाठी हा टप्पा निदान ५०% मार्क मिळवून पार करणंही अपरिहार्य होतं. रोज चित्रकलेचा सरावही चालू होता. दर दिवशी कुणी ना कुणीतरी आम्हाला 'या संस्थेत प्रवेश मिळवणं किती कठीण आहे' याविषयी सांगत असे; त्यामुळे आपण घेतलेल्या ध्यासाविषयी मन कधीकधी कच खाई.

त्या काळातली ती घालमेल मी कधीच विसरू शकत नाही. माझ्या मनातली आंदोलनं खरं तर कुणालाच समजत नव्हती. कधीकधी मन निराशेनं भरून जायचं. वेळोवेळी चित्रकलेला प्रोत्साहन देणारी आईही मला कधीकधी अस्वस्थ दिसायची. प्रवाहाविरुद्ध जाण्याच्या निर्णयावर ठाम राहताना, आसपासच्या विरोधाला न जुमानता टिकून राहताना, किती दमछाक होते, हे मी अनुभवलं. कधीकधी खूप एकटं वाटायचं; पण त्या काळात माझ्या चित्रांनीच मला मोलाची साथ दिली. आशेचा किरण दाखवला, या मार्गावर टिकून राहण्याची शक्ती दिली.

याच दरम्यान अगदी अवचितपणे मला माझे गुरू भेटले - 'कोतवाल सर.' *NID* चे माजी विद्यार्थी, या क्षेत्राचा अनेक वर्षांचा अनुभव असलेले, अनेक दिग्गजांबरोबर काम केलेले आणि मुख्य म्हणजे एका कलाकाराला उत्तमपणे समजून घेणारे !

त्यांच्या संपर्कात आल्यावर मला उभारी मिळाली. त्यांनी माझ्या विचारांना योग्य ती दिशा दिलीच; पण त्याचबरोबर निरीक्षणकौशल्य वाढवण्यासाठी, कल्पनाशक्तीला फुलवण्यासाठी गरजेचे असलेले बुद्धीचे प्रयोगही सांगितले. 'सर्जनशीलता'हा या क्षेत्रातला महत्त्वाचा गुण आहे आणि चौकटीत बांधून ठेवलेले मन सर्जक बनू शकत नाही, हे त्यांनी मला समजावले. सर्वात महत्त्वाचं म्हणजे स्वतःची शैली स्वतःच विकसित करण्याचा त्यांनी सल्ला दिला. इथंच मला माझा मार्ग सापडल्याची जाणीव झाली. गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आता मला त्रास देईनासे झाले. आसपासच्या साशंक नजरा बोचेनाशा झाल्या. आईच्या चेहऱ्यावरची काळजीची छटाही मला अस्वस्थ करेनाशी झाली. मी मुक्त मनानं, मला माझ्या कामात गुंतवून ठेवू लागलो.

वर्षाअखेरीस एकंदरीत चार प्रथितयश *Design Institute* मध्ये प्रवेश अर्ज भरले. यथावकाश सगळ्या परीक्षा झाल्या. बारावीही झाली. एकएक करत निकालही लागले. चारपैकी तीन संस्थांमध्ये पहिल्याच फेरीत माझी वर्णी लागली; त्यामुळे मी योग्य क्षेत्राची निवड केली आहे, याची मला खात्री पटली. मी खूश होतो; पण आता सारे लक्ष *NID* च्या निकालाकडे लागले होते. आठवडाभरात तो लागण्याची शक्यता वर्तवली जात होती.

...आज आई-बाबांच्या चेहऱ्यावरचं समाधान पाहून इतकं छान वाटत होतं म्हणून सांगू ! गेली तीन वर्षं माझ्याबरोबर तेही या अस्वस्थतेतून जात असल्याचं, मला जाणवत होतं. हा निर्णय सर्वस्वी माझा असला, तरी त्यांनी त्याला विरोध केला नाही. मात्र, स्वतःच्या निर्णयाकडे डोळसपणे पाहायला ते मला प्रवृत्त करत होते. ते किती मोलाचं होतं, हे आज मला कळतंय. विचारचक्रात असताना रात्रीचे नऊ कधी वाजले कळलेच नाही. आई-बाबा मुक्कामी पोहोचले असतील अशा विचारात असतानाच मित्राचा *मेसेज* आला.

*NID Results are out !* बापरे ! काय वाचतो आहे मी हे ! *Oh My God !!* ज्या क्षणाची आतुरतेनं वाट पाहत होतो, तो क्षण असा... इतका अचानक... अवेळी!!

हात-पाय थरथरू लागले... दीर्घ श्वास घेऊन *Laptop* उघडला. आज माझी खरी कसोटी होती. जगाच्या दृष्टीनं स्वतःला सिद्ध करणारी एक पावती! गेली दोन वर्षे ज्या गोष्टीसाठी अनेक प्रतिक्रिया पचवल्या, त्या सामन्याचा कदाचित शेवट!

*Oh My God !* वेबसाईट उघडली. कानांतून गरम वाफा निघाल्याची जाणीव, डोळ्यांच्या कडा किंचित ओल्या... प्राण कंठाशी आलेले... माझा क्रमांक थरथरत्या बोटांनी feed केला... आणि समोर अक्षरे उमटली...

***You are selected !!***

**– सुप्रिया वाकणकर**
*सी-१०१, पाटे संस्कृती,*
*सहकारनगर क्र. २, पुणे 411009*

*चित्रकार : ऋजुता घाटे*



**भेट द्या : राष्ट्रीय शैक्षणिक संस्था - ISI** (एकूण शाखा ५)
(Indian Statistical Institute) संख्याशास्त्र अभ्यासासाठी

**वार्षिक पान प्रायोजक – कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे**

# हवा न भरता(?) फुगा फुगवा !



रंगीबेरंगी फुगे कोणाला आवडत नाहीत? तोंडाने फुगे फुगवायला किती त्रास पडतो, हे तुम्हाला माहिती आहेच! फुगेवाला त्याच्याकडच्या हातपंपानी चटकन् फुगा फुगवतो. पण पंपानी किंवा तोंडानी हवा न भरता दुसऱ्या पद्धतीने फुगा फुगवला तर? हां ! 'हे कसं शक्य आहे?' असं तुम्ही म्हणाल! पण ते शक्य आहे.

हा प्रयोग करा अन् हवा न भरता फुगवा फुगा !

**साहित्य -** १ पाकीट यीस्ट पावडर (बाजारात मिळते), १ चमचा कोमट/गरम पाणी, साखर, प्लास्टिकच्या बाटल्या (उदा. सोड्याची रिकामी बाटली) २-३ फुगे (प्रत्येक बाटलीसाठी १ फुगा), एक मोठा वाडगा.

**कृती -** १) प्लॅस्टिकच्या बाटलीत पाकिटातली यीस्ट पावडर ओता. २) पाव बाटली कोमट पाण्याने भरा. ३)एक चमचा साखर त्या बाटलीत घालून, बाटली जोरात हलवा. ४) हे द्रावण स्थिर होऊ द्या. ५) बाटलीच्या तोंडावर फुगा ताणून बसवा. कोठेही फट राहणार नाही, याची काळजी घ्या.६) वाडग्यात गरम पाणी (उकळते नको) घेऊन फुगा लावलेली बाटली एका वाडग्यात ठेवा किंवा खिडकीत कडकडीत ऊन येत असेल तर तिथे बाटली ठेवा.

**काय दिसेल? -** १५-२० मिनिटांनी बाटलीच्या तोंडावर लावलेला फुगा हळूहळू फुगायला लागेल आणि फुगा पूर्ण फुगला, की तो आपोआपच उडून जाईल! आहे की नाही जादू?

**असं का होतं? -** साखर मिश्रित यीस्ट कोमट पाण्यात वेगाने वाढतं! एका यीस्टचे अनेक यीस्ट तयार होतात. त्याच्या पुनरुत्पादनाचा वेग खूप असतो. यीस्ट वाढताना कर्बद्वीप्राणिल वायू तयार होतो. तो बाटलीच्या तोंडापाशी येतो, त्यावर फुगा असल्यामुळे ह्या वायुला दुसरीकडे जायला जागाच नसते, त्यामुळे तो फुग्यात शिरतो आणि फुगा फुगतो आणि नंतर उडतो. यीस्टच्या वाढीच्या व पुनरुत्पादनाच्या क्रियेला पाण्यातली साखर मदत करते.

**तर काय होईल? -** १. साखरेत थोडं व्हिनेगार मिसळलं! २. साखरेचा संपृक्त द्राव केला तर क्रिया जलद गतीने घडेल का? ३. बाटलीत कोमट पाण्याऐवजी गरम पाणी टाकलं! ४. यीस्टऐवजी बेकिंग सोडा किंवा इनो टाकला ! ५. साखरेऐवजी मीठ टाकलं! ह्या सगळ्यांची उत्तरं शोधण्यासाठी प्रयोग करा म्हणजे उत्तरं नक्की सापडतील.

**अजून कोणती माहिती मिळवाल?**

१. यीस्टचे शास्त्रीय नाव आणि त्याच्या किती जाती, प्रजाती आहेत? त्याचं पुनरुत्पादन कसं होतं?

२. यीस्ट वापरून केलेले विविध खाद्य पदार्थ.

३. कोणत्या टाकाऊ पदार्थांवर यीस्ट वाढवून त्यावर प्रक्रिया केली जाते आणि ते कशासाठी करतात?

४. आजकाल, यीस्ट मुख्यत्वेकरून कशासाठी आणि का वापरतात? ५. यीस्टमध्ये अन्नद्रव्ये आहेत का? असल्यास कोणती?

**उत्तरं शोधायला थोडी मदत-**

१. यीस्ट (एक पेशीय बुरशी) सजीव आहे.

२. व्हिनेगार सौम्य, ॲसेटिक ॲसिड आहे.

**डॉ. कांचनगंगा गंधे,**
४१/६६७, लोकमान्यनगर, पुणे 411030

*चित्रकार : सौरभ उपळेकर*

*प्रयोगशाळेमध्ये रमुनि, शोध लावूया नवे नवे।*
*प्राचीन शास्त्रे विज्ञानाचे, पुनरुज्जीवन आम्हा हवे।।*

**वार्षिक पान प्रायोजक –श्री. विद्याधर जोगळेकर, पुणे**

# निबंधन

कविता



चित्रकार : ऋजुता घाटे

आजोबा रिटायर होताच आजीनंही जाहीर केलं,
आजपासून तीही रिटायर होणार !
सगळेजण अवाक् झाले. म्हणाले,
म्हणजे नक्की तू काय करणार?

तुला कुठे होती नोकरी,
आठ-दहा तासांची बांधिलकी?
रोज जाण्या-येण्याची धावपळ
आणि वरिष्ठांच्या कटकटी?

खरं आहे रे बाबांनो,
नव्हती मला नोकरी-बिकरी.
नुसती घरातच तर होते मी
बिनपगारी फुल अधिकारी !

तरी आता, हवी मला विश्रांती
त्याच त्या अनमोल-बिनमोल कामातून !
कंटाळून गेले मी अगदी
घाण्याच्या बैलासारखी फिरून फिरून !

एक आठवडा झाला जेमतेम
आजीला रिटायर होऊन.
अस्ताव्यस्त झालं सगळं घर
प्रत्येकजण गेला वैतागून.

केव्हाचा विचार करतो आहे मी
आजोबा रिटायर झाले, काही नाही बिनसलं.
आजी रिटायर झाली मात्र,
आणि सगळं कसं विस्कटून गेलं?

लिहायचा होता निबंध- घरकामाचं मोल.
अर्थच कळत नव्हता, काय लिहावं सुरुवातीला?
मात्र घरातलं चित्र पाहून अर्थ कळला त्याचा.
तेच सगळं लिहिलं अन् पहिला नंबर पटकावला !

– *आसावरी काकडे*
*१/३ सेतु डी, स्टेटबँकनगर, कर्वेनगर, पुणे 411052*



**भेट द्या : राष्ट्रीय शैक्षणिक संस्था : IIIT** (एकूण शाखा ११)
(Indian Institute of Information Technology) माहिती तंत्रज्ञानातील अभ्यासक्रम

**वार्षिक पान प्रायोजक – श्री. क्षेत्रपालेश्वर टुरिस्ट, पुणे, ☎ ०२०- २४४५०९७५**

कथा

# म्हंजे म्हंजे वाघाचे पंजे ऽऽ

क्षितिज देसाई



अंधारी व्याघ्र अभयारण्यातील पळसगाव *लॅब* तशी फार चर्चेचा विषय नव्हती. फक्त पर्यावरणप्रेमी आणि वन्यजीवप्रेमींमध्ये त्याची कुजबूज चाले. ताडोबा- अंधारी परिसरातली सगळी गावं स्थलांतरित झाल्यावर सरकारने तिथे ही *लॅब* बांधली होती म्हणे. प्रयोगासाठी.

इथे काम करणाऱ्या डॉ. सोहोनींची मुलाखत घेऊन या प्रकल्पावर दहा मिनिटांचा माहितीपट करण्यासाठी हुसेन आणि विश्वास आले होते. अभयारण्यातील काही ठरावीक भागात आणि *लॅबमध्येही* फक्त दुसऱ्या मजल्यावरच्या *कॉन्फरन्स रूममध्ये* चित्रण करण्याची परवानगी मिळाली होती. *लॅबची* इमारत झकास होती. तीन मजल्यांची इमारत. इमारतीभोवती पुरेशी मोकळी जागा सोडून कुंपण म्हणून मोठी तीस फुटी पांढरीशुभ्र भिंत. कोणा वन्यप्राण्याने आत शिरू नये म्हणून वर जाळी. या तीस फुटी कुंपणाला लोखंडी गेट. गेटवर एक सुरक्षारक्षक आणि इमारतीच्या गेटवर देखील सुरक्षारक्षक. हुसेनने मुलाखतीची तयारी पूर्ण केली.

''*ओ. के.* विश्वास, *स्टार्ट*'' त्याने *कॅमेरामनला* सूचना दिली.

''नमस्कार. आज आपण आहोत, ताडोबा - अंधारी व्याघ्र अभयारण्यात. गेल्या काही वर्षांपासून येथील प्रयोगशाळेत व्याघ्र संवर्धन क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावणारे डॉ. सोहोनी आपल्यासोबत आहेत... डॉक्टर या *लॅबमध्ये* चालू असणाऱ्या *'ट्रिपल टी'* अर्थात *टेस्ट ट्यूब टायगर* या प्रयोगाविषयी काय सांगाल?''

**खिडकीतून दिसणारं दृश्य भयंकर होतं. चक्रवर्तींच्या मागे–पुढे अभयारण्यातील सगळे वाघही संथ पण दमदार पावलं टाकत येत होते. रात्रीच्या वेळेस इमारतीतील दिव्यांच्या तुटपुंज्या प्रकाशात ते दृश्य आणखीनच भयावह वाटत होतं...**

**... मात्र काही तासांनंतर खिडकीतून दिसणारं दृश्य बदललं. सगळे वाघ एका जागी जमून व्हिडिओ पाहात होते. कुणी खाली बसून, कोणी फक्त मागचे पाय टेकवून... पण एकटक. व्हिडिओवर मोजक्याच क्लिप पुन्हा पुन्हा लावल्या जात होत्या. दारावरच्या धडका तर बंदच झाल्या होत्या...**

**ही किमया कशी घडली? जाणून घ्यायचंय? मग वाचा सोबतची उत्कंठावर्धक विज्ञान कथा.**

*शास्त्रांचा अभ्यास हवा।*
*परी मानव्याचा ध्यास हवा॥*

**वार्षिक पान प्रायोजक – श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे**

डॉक्टर हसले,

''काय आहे, भारतात वाघांची संख्या भलतीच घटल्यानंतर गेल्या काही दशकात 'सेव्ह द टायगर्स' *कॅम्पेन* बऱ्याच ठिकाणी सुरू झालं. पण यावर जैवशास्त्रज्ञ आधीपासूनच विचार करत होते. २०१२ मध्ये डॉक्टर क्रेग व्हेण्टर यांच्या संस्थेने कृत्रिम सजीव बनवला. त्याआधारे वाघांची संख्या वाढवण्यासाठी विज्ञानाची कशी मदत घेता येईल याच्या अनेक शक्यता तपासल्या जात होत्या. त्यातलाच हा आमचा यशस्वी प्रयोग आहे. अगदी सोप्या भाषेत सांगायचं तर वाघाचा जन्म आम्ही प्रयोगशाळेत घडवून आणला. पण हे वाघ कृत्रिम नाहीत. बरं का! वाघिणीच्या पोटी जन्मलेले खरेखुरे वाघ आहेत हे.''

''डॉक्टर तुम्ही आता उल्लेख केलात 'यशस्वी प्रयोग.' तर हा प्रयोग कितपत यशस्वी झाला?''

''शंभर टक्के! आम्हाला हेच तपासायचं होतं की, हे वाघ व्यवस्थित वाढतात का... शिकार करू शकतात का... पहिली दोन-अडीच वर्षे त्यांच्या माता वाघिणी त्यांच्या सोबतच असायच्या. त्यानंतर मातांना पुन्हा आधीच्या जागेवर स्थलांतरित केलं आम्ही. या वाघांची अतिशय उत्तम वाढ झालेली आहे. त्यांना लावलेल्या *कॉलर बॅण्डमुळे* त्यांची रोजची हालचालही आम्ही टिपत आहोत.''

''एकूण किती वाघांना अशा प्रकारे जन्म मिळाला?''

''एकूण बारा वाघ आहेत. त्यातल्या आठ वाघिणी... वाघिणींची संख्या जास्तच ठेवली; जेणेकरून पुढच्या पिढ्यांची संख्या वाढत जाईल.''

''तर वाघ वाचवण्याच्या दिशेने तुम्ही एक मैलाचा दगड उभारलात''

''*सॉरी,* मध्ये बोलल्याबद्दल; पण हे काम माझं एकट्याचं नाही. डॉक्टर काशेळकर आणि हे आमचे सगळे सहकारी या सर्वांचीच मेहनत आहे त्यामागे.''

मग विश्वासने तिथे उभ्या असलेल्या सहकाऱ्यांना कॅमेऱ्यात टिपलं. त्यांच्या मागच्या भिंतीवर लावलेल्या *'नॅशनल टायगर कॉन्झर्वेशन ॲथॉरिटी'च्या* चिन्हातल्या वाघाच्या चेहऱ्यावर *क्लोज-अप* घेतला आणि कॅमेरा स्थिरावला. हुसेन आणि विश्वास आवराआवर करायला लागले.

''कशी झाली मुलाखत?'' डॉक्टरांनी विचारलं.

''अरे! एकदम *फॅन्टॅस्टिक* सर.''

''पण तुम्ही निघालात कुठे? अंधार पडायला आला. आज *गेस्ट हाउसमध्ये* मुक्काम करा. उद्या जा.''

''मलाही आवडलं असतं अगदी. पण उद्या एका परिसंवादाचं निमंत्रण आहे.'' हुसेन म्हणाला.

चहा-फराळ होत असताना त्यांच्या गप्पा सुरूच होत्या.

तेव्हाच, लांबून मोठ्याने हाक ऐकू आली, 'सोहोनीSS'

डॉक्टर ताडकन उभे राहिले.

''माझा एक सहकारी चक्रवर्तीचा आवाज आहे हा!'' पुन्हा हाक ऐकू आली.

डॉक्टर भराभर धावत निघाले. त्यांच्या मागे सहकाऱ्यांपैकी काहीजण निघाले... आणि न राहवून हुसेन आणि विश्वासही. विश्वासने ही सुवर्णसंधी आहे असे वाटून पटकन् कॅमेरा चालू केला.

''चक्रवर्ती हाका का मारताहेत... वॉकी-टॉकी बंद पडला की काय त्यांचा? विश्वास तो कॅमेरा कृपया बंद कर,'' सोहोनी इमारतीतून बाहेर पडत म्हणाले.

''पंडित, चक्रवर्ती सर कधी बाहेर पडले?'' मोठ्या गेटजवळच्या रखवालदाराला त्यांनी विचारलं.

''एक तास झाला असेल साहेब. काय *प्रॉब्लेम* झालाय, हाक का मारत आहेत ते?''

''माहीत नाही. तू थांब इथेच! आम्ही जातो.''

डॉक्टर आणि त्यांच्या मागोमाग सर्वजण आवाजाच्या दिशेने निघाले. गर्द झाडीतून वाट काढत छोट्या पाणवठ्याजवळ पोहोचल्यावर अनपेक्षित दृश्य त्यांच्या नजरेस पडलं.

डॉ. चक्रवर्ती खाली बसले होते. त्यांच्या बाजूलाच एक वाघ बसला होता. त्याच्या उजव्या पंजाच्या थोडं वर जखम होऊन रक्ताची धार लागली होती. चक्रवर्ती त्याचं डोकं थोपटत होते. त्यांनी जखमेवर रुमाल बांधलेला दिसत होता. पण एवढासा रुमाल किती पुरणार?



**राष्ट्रीय शैक्षणिक संस्था : NIPER** (एकूण शाखा ६)
(National Institute of Pharmaceutical Education and Research) औषध विज्ञान
**वार्षिक पान प्रायोजक – सौ. गितांजली हेमंत जोशी, वाशी, नवी मुंबई**

''सोहोनी, *मेडिसिन्स... क्वीक!''* चक्रवर्ती म्हणाले.

सोहोनींनी दोघा सहकाऱ्यांना *लॅबमधून* औषध आणायला पिटाळलं.

''काय झालं हॉब्सला?'' त्यांनी पुढे जात विचारलं.

''*डोन्ट नो.* डॉक्टर, पत्रा वगैरे लागल्यासारखी खूण आहे.'' चक्रवर्ती चिंतीत होत उत्तरले.

''इथे कुठे आला पत्रा? आणि तुम्ही हाका का मारत होतात? वॉकी-टॉकी कुठे गेला?''

''ते सांगतो नंतर. आधी औषधांचं बघू या.''

सोहोनी वाकून जखम पाहायला लागले. हॉब्स त्यांच्याकडे रोखून पाहू लागला. त्यांनी पंजावरून हात फिरवण्याचा प्रयत्न केला तर गुरकावलाच अंगावर.

''गप ए!'' सोहोनी लाडाने त्याच्या डोक्यात टप्पू देत म्हणाले. तसा तो आणखी गुरगुरला.

एव्हाना अंधार पडला होता. सहकारी तोपर्यंत *मेडिकल किट* घेऊन आले. सोहोनी मलमपट्टी करायला गेले; तसं हॉब्स पुन्हा गुरगुरू लागला. पण त्यांनी त्याच्या आवाजाकडे लक्षच दिलं नाही. सहकाऱ्यांच्या मदतीने साहोनींनी त्याचा पंजा पकडून, जखम लवकर भरून येणारी पावडर त्याच्या जखमेवर शिंपडली.

''काय झालं याला?'' सोहोनी वैतागत म्हणाले आणि तेवढ्यात त्यांचं लक्ष समोर गेलं. भीतीची शिरशिरी त्यांच्या सर्वांगातून गेली. समोर लांबवर झाडीत, एका झाडाच्या बाजूला उरलेले सगळे वाघ जमा झाले होते. एका रांगेत, शिस्तीत थांबल्यासारखे ते उभे होते. सगळेजण सोहोनींकडे एकटक, अक्षरशः रोखून पाहात होते !

''बाप रे!'' सोहोनी उभे राहात म्हणाले.

त्यांचे उद्‌गार ऐकून हुसेन, विश्वास आणि बाकीचेही समोर पाहू लागले. त्यांचीही तीच अवस्था झाली.

''पळा... सगळ्यांनी लवकर *लॅबमध्ये* पळा,'' सोहोनी म्हणाले. तसे सगळेजण *लॅबच्या* दिशेने धावत गेले.

''चला चक्रवर्ती, मला या वाघांची लक्षणं ठीक दिसत नाहीयेत.''

''त्यांची लक्षणं अगदी योग्य आहेत सोहोनी,'' चक्रवर्ती थंड सुरात उत्तरले.

सोहोनींनी चमकून त्यांच्याकडे पाहिलं. चक्रवर्तींच्या ओठांवर आसुरी हास्य होतं. अगदी तसंच! पंधरा वर्षांपूर्वी सारखं. बरंच काही सोहोनींच्या लक्षात आलं. दुसऱ्याच क्षणी ते भराभर *लॅबकडे* यायला निघाले. *लॅबच्या* दिशेने धावताना, बारा वर्षांपूर्वीच्या घटना भरधावपणे त्यांच्या डोळ्यांसमोर सरकून गेल्या.

...तेव्हा ते डॉ. च्रकवर्तींच्या हाताखाली प्राण्यांची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याच्या प्रयोगावर दुसऱ्या एका सरकारी प्रयोगशाळेत काम करत होते. सोहोनींच्या लक्षात आलं की, तिथे च्रकवर्ती त्यांच्या खाजगी प्रयोगात आणि तेही बंदी असलेल्या प्रयोगात जास्त वेळ घालवतात. कुत्र्यांच्या मेंदूत पेशी प्रत्यारोपणाचा त्यांचा प्रयोग चाललेला होता. 'माणसाच्या आणि इतर प्राण्यांच्या प्रगतीत एवढी तफावत का?', अशी चर्चाही करायचे ते सोहोनींशी. 'माणसाने गेल्या काही शतकांत काहीच्या काहीच प्रगती केली. प्राणी मात्र आहेत तिथे तसेच आहेत. सोहोनींनी त्यावेळी ही बाब हसण्यावारी नेली. पण जेव्हा चक्रवर्तींनी कुत्रा आक्रमक झाल्याचं कारण देऊन प्रयोगशाळेतल्या दोन कुत्र्यांना गोळी घातली तेव्हा मात्र, सोहोनींनी रीतसर तक्रार दाखल केली. मग अवैध प्रयोग केल्याचा ठपका ठेवून चक्रवर्तींची चौकशी करण्यात आली होती. चक्रवर्तींनी आपण होऊन कामाचा राजीनामा दिला होता. काही काळानंतर या प्रकरणाचा धुरळा खाली बसला. सोहोनींना व्याघ्र प्रकल्पात वाघांची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी तज्ज्ञ व्यक्ती हवी होती. डॉ. चक्रवर्ती यांचे त्या विषयातील ज्ञान वादातीत होते. त्यांनी चक्रवर्तींना या कामात मदत करण्याची विनंती केली. त्यांच्यातला दुरावाही आता कमी झाला होता; त्यामुळे डॉ. चक्रवर्ती उत्साहाने या कामावर रुजू झाले.

...आणि आज हे असं घडलं.

सोहोनी मोठ्या भिंतीच्या गेटजवळ पोचले. पंडित त्यांची वाटच पाहात होता.

''पंडित, चक्रवर्ती सर आले तरी

*पुस्तकातुनी सांगितले ते, जडबुद्धीने मानू नका।*
*जिज्ञासेने अनुभव घेऊनी, खरे शास्त्र हो तुम्ही शिका।।*

**वार्षिक पान प्रायोजक – सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे**



त्यांना आत घेऊ नकोस आणि तू पण चल आतमध्ये.'' ते म्हणाले.

''ओके सर!'' पंडित म्हणाला आणि त्याने बाहेरचा खटका ओढला. लोखंडी दार उघडलं गेलं. शांत्या आणि पंडितला त्यांनी खालीच थांबायला सांगितलं. सोहोनी *कॉन्फरन्सरूममध्ये* शिरले.

''काय झालं डॉक्टर?'' एक सहकारी त्यांना विचारती झाली.

''चक्रवर्तींनी काहीतरी भयानक प्रयोग केलेला आहे.'' ते *टेलिफोनच्या* दिशेने जात म्हणाले. *लॅब* परिसरात *जॅमर* लावलेला होता; त्यामुळे मोबाईल चालत नसत. आपसात बोलायला *वॉकी-टॉकी* आणि बाहेर बोलायला *टेलिफोन.*

**भेट द्या : राष्ट्रीय शैक्षणिक संस्था- AIIMS** (एकूण शाखा ११)
(All India Institutes of Medical Sciences) वैद्यकीय शास्त्र

**वार्षिक पान प्रायोजक – श्री. राहुल भिडे, पुणे**

मात्र, हा *टेलिफोनही* मोजक्याच क्रमांकांशी जोडला होता.

''काय चावटपणा आहे हा!'' सोहोनी *रिसिव्हर* आदळत म्हणाले. फोनही बंद होता आणि वॉकी-टॉकीदेखील.

''डॉक्टर ते बघा!'' खिडकीशी उभा असलेला सहकारी भयचकीत आवाजात म्हणाला. तसं डॉ. सोहोनी, हुसेन आणि बाकीचे सगळेच त्या खिडकीकडे धावले.

भयंकरच दृश्य होतं. चक्रवर्तीसर इमारतीच्या दिशेने चालत येत होते. आणि त्यांच्या मागे-पुढे सगळे वाघही संथ, पण दमदार पावलं टाकत येत होते... जणू काही चक्रवर्ती त्यांचा नेता आहे! रात्रीच्या वेळी, इमारतीत लावलेल्या दिव्यांचा तुटपुंजा प्रकाश त्यांच्यावर पडल्याने ते दृश्य आणखी भयावह वाटत होतं.

सोहोनी खिडकीतून बाहेर पाहात जवळजवळ ओरडले, ''पंडित, सांगितलेलं लक्षात ठेव. चक्रवर्तींना आत येऊ देऊ नका.''

शांत्या आणि पंडितने नुसती मान डोलवली. बाहेर काय चालू आहे, ते त्यांना दिसत नव्हतं.

चक्रवर्तीसर दाराजवळ पोचले. त्यांनी बाहेरचा खटका ओढल्याबरोबर दार उघडलं गेलं. समोरचं दृश्य पाहून पंडित आणि शांत्या गांगरले. चक्रवर्ती सरांच्या मागे वाघांची फौज दिसत होती त्यांना. चक्रवर्ती आत आले आणि आतला खटका ओढत त्यांनी दार बंद केलं. वाघ बाहेरच थांबले होते.

''हे बघा माझं तुमच्याशी काही शत्रुत्व नाही,'' चक्रवर्ती त्यांना म्हणाले.

''चक्रवर्तींना पकडून वर आणा!'' सोहोनी ओरडले.

तसा पंडित भानावर आला. त्याने आणि शांत्याने मिळून चक्रवर्तींना धरलं आणि त्यांना वर न्यायला लागले. अनपेक्षितपणे चक्रवर्ती मोठ्याने किंचाळू लागले. त्यांना इमारतीच्या दारात नेईपर्यंत त्यांचं किंचाळणं चालूच होतं.

- आणि त्याच वेळी बाहेर अशा घटना घडल्या ज्या पाहून वरच्या खिडकीशी जमा झालेल्या लोकांचा डोळ्यांवर विश्वास बसेना !

चक्रवर्तींचं किंचाळणं ऐकून वाघांनी कान टवकारले. एक-दोन वाघ गुरगुरू लागले. त्यांच्यात पुढे उभी असलेली वाघीण लिलीने गेट उघडण्याच्या खटक्यावर झेप घेतली. लोखंडी गेट उघडलं गेलं. सगळे वाघ आत शिरले.

चक्रवर्तींना घेऊन इमारतीच्या दारापर्यंत पोचलेल्या पंडित आणि शांत्याची भीतीने गाळण उडाली. झटकन इमारतीत शिरून त्यांनी दार गच्च लावून घेतलं. लिली दोन उड्यांत तिथे पोचली आणि दारावर धडका देऊ लागली.

चक्रवर्तींना घेऊन या लोकांनी *कॉन्फरन्स रूममध्ये* प्रवेश करताच तिथल्या सहकाऱ्यांनी त्यांचा ताबा घेतला. खुर्चीत बसवून, नायलॉन रस्सी, *डक्ट टेप* जे मिळेल त्या वस्तूंनी त्यांना खुर्चीत जखडलं.

''हा काय फालतूपणा आहे चक्रवर्ती? वाघ *गेट* उघडून आत कसे आले?'', सोहोनींनी दात-ओठ खात त्यांची कॉलर पकडली.

*''रिलॅक्स!''* चक्रवर्ती शांतपणे म्हणाले.

''वाघ फक्त अनुकरण करताहेत. मी आत येताना त्यांनी पाहिलं ना, खटका कसा ओढायचा... तसंच करून ते आत आले असणार.''

''अनुकरण करायची अक्कल त्यांना आली कशी?'' सोहोनी रागात होते.

''माझा पूर्वी अर्धवट राहिलेला प्रयोग पूर्ण केला मी !'' चक्रवर्ती छद्मी हसत म्हणाले.

''मेंदूत पेशी प्रत्यारोपणाचा? शक्यच नाही ! वाघांची *सर्जरी* कुठे केली?'' सोहोनी अचंबित होऊन म्हणाले.

यावर चक्रवर्ती हसायला लागले. खाली दारावर धडका दिल्याचा आवाज येत होता.

''तुझ्या अज्ञानाची कीव करावीशी वाटते सोहोनी,'' चक्रवर्ती म्हणाले. आत्मप्रौढीच्या ओघात चक्रवर्तींनी त्यांचा प्रयोग सर्वांना सांगितला.

या प्रकल्पात जेव्हा वाघांच्या निर्मितीचं काम चालू होतं, तेव्हाच चक्रवर्तींनी त्या प्रत्येक वाघाच्या नैसर्गिक आणि संदर्भासाठी वापरण्यात येणाऱ्या कृत्रिम डी.एन.ए. चे नमुने मिळवले. त्यातली माहिती *डिजिटल* स्वरूपात आणली.

**(पान क्रमांक ९८ वर पुढे चालू.)**

*लाभले जरी हो, विज्ञानाचे दान।*
*मनी अक्षय ठेवा, माणुसकीचे भान।।*

**वार्षिक पान प्रायोजक –श्रीमती उमा परांजपे, पुणे**

## संगणकाशी दोस्ती

धम्माल कृती

मित्रांनो, तुम्हाला माहीतच आहे की, माऊसद्वारे करता येणाऱ्या बहुतेक गोष्टी संगणकाच्या *कीबोर्डवरील शॉर्टकट कीज* वापरून देखील आपण करू शकतो. आजच्या कोड्यात तुम्हाला काही कृती आणि त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या *शॉर्टकट कीज* यांच्या जोड्या लावायच्या आहेत. हे शॉर्टकटस् विंडोज आणि लिनक्स या ऑपरेटिंग सिस्टीम्सवर मुख्यतः वापरले जातात.

शॉर्टकट कीज - Ctrl + S , Ctrl+V, Ctrl +P , Ctrl +I, Ctrl +U, Ctrl +A, Ctrl +B, Ctrl +Z, Ctrl +O, Shift+Delete, Ctrl +C, Ctrl +f

१. डॉक्युमेंटमधील संपूर्ण 'टेक्स्ट सिलेक्ट' करण्यासाठी...
२. एखादा घटक 'कॉपी 'करण्यासाठी...
३. फाईल 'सेव्ह' करण्यासाठी...
४. डॉक्युमेंटमधील एखादा 'शब्द शोधण्यासाठी...'
५. डॉक्युमेंटमधील 'सिलेक्ट केलेले टेक्स्ट अंडरलाईन' करण्यासाठी...
६. डेस्कटॉपवरील एखादा 'फोल्डर कायमस्वरूपी डिलीट' करण्यासाठी...
७. 'शेवटची कृती अन्डू' करण्यासाठी...
८. 'प्रिंट विंडो' उघडण्यासाठी...
९. डॉक्युमेंटमधील 'सिलेक्ट केलेले टेक्स्ट बोल्ड' करण्यासाठी...
१०. डॉक्युमेंटमधील 'सिलेक्ट केलेले टेक्स्ट इटॅलिक' करण्यासाठी...
११. एखादा घटक 'पेस्ट' करण्यासाठी...
१२. डॉक्युमेंट उघडण्यासाठी 'डायलॉग बॉक्स उघडण्यासाठी...'



त्याचबरोबर Android वर चालणाऱ्या *टॅब्लेटस्* व *मोबाईल फोन्सवर* काय *शॉर्टकट* आहेत, हे तुम्ही शोधून काढा. ते आमच्याकडे पाठवायला विसरू नका.

**– मनाली रानडे, ठाणे**
manaliranade84@gmail.com

## शब्द-शब्द जुळवुनी...

पुढे दिलेल्या शब्दांपैकी जास्तीत जास्त शब्द वापरून एकच वाक्य तयार करा.

**उदा. दिलेले शब्द – पाखरू, खिडकी, शांतता, साद, मुलगा, वारा, उडणे, संध्याकाळ, पाहाणे, तरंगणे, क्षितिज, आकाश, दिसणे, ढग**

**वाक्य – संध्याकाळी शांततेत खिडकीतून क्षितिजाकडे पाहणाऱ्या मुलाला आकाशात तरंगणाऱ्या पाखराने साद घातली.**

दिलेल्या शब्दांपासून अशा एकाचप्रकारे वाक्य करता येईल असे नाही. तुम्ही ते शब्द वापरून वेगवेगळी वाक्ये रचण्याचा प्रयत्न करा. तसेच खाली काही शब्द दिले आहेत त्यांचा वापर करून अर्थपूर्ण वाक्ये तयार करा.

**शब्द –** फूल, खिडकी, शांतता, सकाळ, मुलगी, वारा, डोलणे, पाहणे, सुगंध, दरवळणे, आसमंत.



**भेट द्या : राष्ट्रीय शैक्षणिक संस्था - NID** (एकूण शाखा ३)
(National Institute of Design) डिझायनिंग अभ्यासक्रम

**वार्षिक पान प्रायोजक – प्रतिभा इलेक्ट्रिकल्स, पुणे**


बांदीयान



गुलमोहोर, गुंज यांच्या बिया



# आगळेवेगळे दागिने

डॉ. कांचनगंगा गंधे


विंचवी फळं

*सोनं, चांदी, पोवळं, मोती, हिरे, नवरत्न, तांबं, प्लॅटिनम यांचे दागिने आपल्या परिचयाचे आहेत. शिंपला, पक्ष्यांची पिसं, काही प्राण्यांची हाडं, पंजे यांच्यापासून केलेले दागिने घालण्याची पद्धत आदिमानवाच्या काळापासून आहे. पण वाळलेल्या बिया, फळं, पानं यांच्यापासून ब्रेसलेट, नेकलेस, अँकलेट, इअररिंग्ज, चिंचपेटी तयार करता येते. काय आश्चर्य वाटलं ना... तर मग वाचा हा लेख...*

दागिने आणि वनस्पतींपासून? जरा विचित्र वाटतंय ना? कसं शक्य आहे, असंही वाटत असेल? पण ते खरं आहे आणि तुम्हाला स्वत:ला ते करणंही शक्य आहे. फक्त निसर्गात फिरताना डोळे उघडे ठेवा आणि बरोबर चार पाच कागदी पिशव्या बरोबर ठेवा. फळं, बिया, झाडाची वाळलेली साल, वाळलेली फुलं, पाकळ्या असं बरंच काही तुम्हाला दिसेल ते गोळा करा. शक्यतो खाली पडलेलं वाळलेलं तेवढच घ्या. झाडांना ओरबाडू नका. पर्यावरणाला धोका पोहोचेल, असं तर मुळीच वागू नका.

पावसाळ्यात उगवणाऱ्या वनस्पतींना आतापर्यंत फळं लागली असतील, काहींची तर पक्वही झाली असतील. त्यापैकी 'विंचवी' हे एक झाड! ह्याचे फळ इतर फळांपेक्षा वेगळंच आहे. त्याला वाकलेले काटे असतात, शिवाय त्याच्या टरफलावर छान नक्षी असते. त्याला बारीक तार लावून कानातले डूल *(इंअरिंग्ज)* करा.

भेंडी जर झाडावरच वाळली तर देठासकट ती तोडा आणि देठाला भोक पाडून त्यातून दोरा ओवा. झालं तुमचं गळ्यातलं पदक *(पेन्डन्ट)* तयार!

'गारबीच्या (एन्टाडा) बिया, मेंढशिंगीचं फळ, मसाल्यात वापरतात ते बांदियान (चांदणीसारखा आकार) अशा प्रकारच्या बीया, फळे वापरून गळ्यातलं पदक *(पेन्डन्ट)* करता येईल. **'जारुल'** किंवा **'तामण'** यांची फळं गोल असताना आणि उमलल्यानंतर कमळासारखी दिसत असल्यामुळे त्याचं *पेन्डन्ट* करायला काहीच हरकत नाही.

काही झाडांच्या बियांना नैसर्गिकच चकाकी असते. त्यामुळे त्यांचे *नेकलेस, ब्रेसलेट* केले तर सुंदर दिसते. रतनगुंजेच्या, खऱ्या गुंजेच्या लालभडक बिया, पांगाऱ्याची चटक्याची बी, तपकिरी बिया, राखट रंगाचा सागरगोटा, पांढरा सागरगोटा, लिचीच्या गडद तपकीरी बिया, खाज खुजलीच्या तपकीरी रंगाच्या काळी जाड रेघ असलेल्या बिया (ह्या बिया हरणाच्या डोळ्यासारख्या दिसतात); सुबाभूळ,

*का? कसे? प्रश्न पडू द्या, सोडवू या कोडे।*
*निरीक्षणाचा छंद जडू दे, उकलूया गुढे ॥*

वार्षिक पान प्रायोजक – कु. स्पृहा विजय कुलकर्णी, पुणे



सागरगोटा

गुलमोहोर, सुबाभुळ, लांबट मटकी, छोटा राजमा



महॉगनी, खाया फळांची एकेक साल आणि बिया

गुलमोहोर, खरबूज, टरबूज, चिंच अशा अनेक झाडांच्या बिया तुम्हाला नेकलेससाठी वापरता येतील. रानजोंधळा फळ, दिवी रुद्राक्ष, बकाणा निंब यांपासून तुम्ही गळ्यातले दागिने सहज करू शकता. रिठ्याच्या बियांना नैसर्गिकच भोकं असल्यामुळे ती दोऱ्यात ओवणं सहज शक्य होतं. भोपळा, कर्दळ, आपटा, चामेल, कॅशियाच्या बिया कपड्यात घालून घासल्या की, चकचकीत दिसतात. त्याचाही वापर गळ्यातला दागिना करण्यासाठी होतो.

महॉगनीच्या पंखाच्या बिया, दालचिनीचे तुकडे, ताग, बांबू यांची पोकळ, बॉटल पामची नरफुलं, 'पाम' जातीतल्या सगळ्याच झाडांची फळं, जाळीचं पिंपळ पान हायड्रॅनजियाचा झाडावरच वाळलेल्या गुच्छामधल्या फुलांच्या पाकळ्या, लवंगा, जायपत्री, गव्हाच्या, तांदूळाच्या लोंब्यामधले सालासकट दाणे असे वनस्पतींचे भाग वापरून तुम्ही दागिने तयार करू शकता. केळीची सोपट वाळवून, त्याच्या लांब पट्ट्या काढून त्या एकमेकात गुंतवून चटईसारखं दिसणारं हातातलं कडं *(ब्रेसलेट)*ही तुम्हाला तयार करता येईल.

बिया किंवा फळं कडक असतील, तर त्या थोडावेळ कोमट पाण्यात भिजत घाला; म्हणजे त्याची टरफलं मऊ होतील. त्यांना लगेच भोकं पाडून घ्या. त्यामुळे बियातून दोरा, तार घालता येईल. मात्र, पाण्यात जास्त वेळ ठेऊ नका, नाहीतर वरचं साल निघून जाईल. बारीक असलेल्या बिया पुठ्ठ्यावर, जाड कापडावर चिकटवा म्हणजे त्यांना आधार मिळेल. अंबाडीच्या खोडापासून जो धागा निघतो तो खूप चिवट असतो, तो धागा जर दागिने करताना वापरला तर दागिने बरेच दिवस टिकतात. वनस्पतींपासून केलेले दागिने टिकवण्यासाठी त्यात नॅपथॅलिन बॉल्स (डांबराच्या गोळ्या) घालून ठेवले तर त्यामध्ये कीड, अळ्या होणार नाहीत. या दागिन्यांची फारशी काळजी घ्यावी लागत नाही, शिवाय ते फारसे महागही नसतात.

मित्र-मैत्रिणींच्या पार्टीत जरा 'हटके' दिसायला पाहिजे ना? तर मग चला लागा दागिने तयार करायला!

**– डॉ. कांचनगंगा गंधे**

*४१/६६७ लोकमान्यनगर, पुणे ४११०३०*



**भेट द्या : राष्ट्रीय शैक्षणिक संस्था - NSD,** नवी दिल्ली

(National School of Drama) नाट्यशास्त्र

**वार्षिक पान प्रायोजक – सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे**

कार्ये केवळ सदिच्छेने आणि मेहनतीने सिद्धीस जात नाहीत;
त्यासाठी सहयोगाने काम करावे लागते.
वेदांनी हेच सांगितले आहे -
'समानी व आकूतिः समाना हृदयानि वः ।'
सहकार्याने एकत्र काम करण्याची पहिली पायरी
म्हणजे जोडीने केलेले काम!
त्यासाठी जोडीतील दोघांची मने लवचीक,
जुळवून घेणारी, परस्परांना विश्वासाने बांधणारी,
आणि कोणत्याही कारणासाठी
परस्परांपासून न तुटणारी अशी हवीत.
प्रसंगी 'स्व' विसरावा लागतो.
एकमेकांच्या मताचा आदर करावा लागतो.
एकमेकांची बलस्थानं ओळखून,
कामाची विभागणी करून, एकमेकांच्या साथीने
ध्येयाकडे वाटचाल करावी लागते.
असे घडले तर पाहातापाहाता
जोडीकार्यातून भव्य रचनात्मक काम
उभे राहते;
कधी मोठे व्यवसाय,
वेगळे प्रकल्प उभे राहतात;
कधी प्रतिभाशाली
कलाकृती निर्माण होतात.
अशाच जोडीने काम करणाऱ्या
काही व्यक्तींचे अनुभव
आपण वाचणार आहोत
या लेखमालेत !

लेखमाला

# जोडीने केलेला ध्येयप्रवास...

*उत्साहाने कार्य करावे, निश्चय दृढ ठेवा।*
*आपुल्या हाती खचितच यावा, सुयशाचा ठेवा॥*

वार्षिक पान प्रायोजक- श्री. अजित भिडे(डायरेक्टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. ☎ २५३८०४०६) पुणे

# समृद्ध सहजीवन



डॉ. स्मिता व डॉ. रवींद्र  कोल्हे

***मेळघाटातील बैरागड या अतिदुर्गम भागात जाऊन वैद्यकीय क्षेत्रात काम. तेथील आदिवासींचे समाजिक आर्थिक प्रश्न जाणून घेऊन, ते सोडवण्यासाठी अवघे जीवन समर्पित.***

***डॉ. रवींद्र कोल्हे***

**एम.**बी.बी.एस. झाल्यावर दुर्गम भागांत जिथं डॉक्टर पोचलेला नाही अशा भागांत जाऊन काम करण्याचं मी ठरवलं. त्यापूर्वी सुमारे ३७ सेवाभावी संस्थांना भेट देऊन त्यांच्या कार्यपद्धतीचा मी बारकाईनं अभ्यास केला. मगच आपली स्वतःची कोणतीही संस्था न काढता 'गरिबातल्या गरीब माणसाला वैद्यकीय सेवा द्यायची', या निश्चयानं मेळघाटातील सातपुडा पर्वतामध्ये वसलेल्या बैरागड या गावाची निवड केली. तेथील आदिवासी आपल्याला स्वीकारतील की नाही अशी शंका मनात होती; कारण औषधांपेक्षा जडीबुटींवर त्यांचा अधिक विश्वास असतो, असं ऐकलं होतं. परंतु पहिल्या दिवसापासून रुग्णांचा ओघ सुरू झाला. उलट्या, जुलाब, डांग्या खोकला, क्षय, धनुर्वात, बैलाच्या शिंगामुळे झालेल्या गंभीर जखमा किंवा सुरुंगस्फोटात हाताच्या झालेल्या चिंध्या अशा रुग्णांवर मी उपचार करत होतो.

दीड वर्षानंतर मला नागपूर मेडिकल कॉलेजमध्ये एम.डी. करण्यासाठी प्रवेश मिळाल्यामुळे मी नागपूरला परतलो. १९८७ साली एम.डी.ची परीक्षा दिल्यानंतर लग्न करून बैरागडला जायचं मी ठरवलं. माझ्या भावी पत्नीकडून असलेल्या अपेक्षांमुळे माझ्याशी लग्न करायला तयार कोण होणार याची सर्वांनाच काळजी होती. माझ्या अटी वेगळ्याच होत्या. मुलीने ४०० रुपयात महिनाभर घर चालवायला हवे, रानावनात भरपूर चालायची तयारी हवी, विवाह नोंदणी पद्धतीने करायचा आणि सामाजिक काम करायचे असल्याने दुसऱ्यापुढे झोळी पसरण्याची तयारी हवी. या अटी ऐकून अनेक मुलींकडून नकार येत होते. तशातच कुणीतरी स्मिता मांजरे ही मुलगी सुचवली. तिला भेटायला मी तिच्या दवाखान्यात गेलो. स्मितानं बोलायला सुरुवात केली आणि आमच्या गप्पा चांगल्या दोन तास रंगल्या. विचारांचा धागा जुळतो आहे याची आम्हाला जाणीव झाली. स्मिताचं राहणीमान जरी उच्चभ्रू स्तरात मोडणारं असलं तरी सामाजिक कामात तिला असलेला रस तिच्या बोलण्यातून व्यक्त होत होता. आम्ही पूर्ण विचारांती लग्नाचा निर्णय घेतला. आणि २ डिसेंबर ८८ रोजी आम्ही विवाहबद्ध झालो.

यापूर्वीचं सगळं आयुष्य नागपूरसारख्या शहरात गेलेल्या स्मितानं बैरागडचं कच्चं झोपडीवजा घर, शेणानं जमीन सारवणं, विहिरीवरून पाणी आणणं, शिवाय वीज नाही, फोन नाही अशा अपरिचित आयुष्याशी काही दिवसांत जुळवून घेतलं. लग्नाआधी ती मला म्हणाली होती, ''मी कधी चूल पेटवली नाही, मला चहासुद्धा करता येत नाही.'' तेव्हा मी तिला दिलासा दिला होता की, काही हरकत नाही. मला पुरणा-वरणाचा स्वयंपाक करता येतो. हे खरंही होतं; पण बैरागडला आल्यावर रुग्णांची जी रीघ सुरू झाली त्यामध्ये तिला स्वयंपाकात मदत करायची गोष्ट तर राहोच, वेळच्या वेळी मला पोळी-भाजी खायला वेळ मिळणं कठीण व्हायला लागलं.



भेट द्या : राष्ट्रीय शैक्षणिक संस्था : NSNIS, पतियाला
(Netaji Subhash National Institute of Sports) क्रीडाशास्त्र

वार्षिक पान प्रायोजक – सौ. रंजना सतीश कुलकर्णी, सातारा

पावसाळा सुरू झाला आणि तिच्या दृष्टीनं एक नवंच संकट उभं राहिलं. पाऊस सुरू झाल्यावर साप, विंचू, बेडूक आणि नानाविध कीटक, कधीकधी तर अजगरही घरात घुसू लागले. मला त्याची सवय होती. घरातलं हे प्राणिसंग्रहालय पाहून तिची प्रचंड चिडचिड होई. 'मला हे बिलकूल आवडत नाही रवी', हे वाक्य मला दिवसातून दहा वेळा ऐकायला लागे. एकदा मी तिला गंमतीनं म्हणालो, ''स्मिता, तू असा का नाही विचार करत की, हे जंगल त्यांचं आहे. आपण त्यांच्या जागेवर अतिक्रमण केलं आहे.'' यावर ती हसून सोडून देत असे. पुढे आमची मुले साप पकडायला शिकली. त्यांच्या बरोबरीने स्मिता साप-नाग पकडून जंगलात सोडून द्यायला लागली.

नागपूरमध्ये होमिओपॅथिक डॉक्टर म्हणून स्मितानं नाव कमावलं होतं. इथे आल्यावरही माझ्या कामात मदत करायची तिची इच्छा होती. पण माझा स्वतःचा होमिओपॅथिक उपचार पद्धतीवर फारसा विश्वास नव्हता. ॲलोपॅथी उपचार पद्धतीतील उपयुक्त ठरतील अशा गोष्टी शिकायची तिची तयारी होती; पण मला वेळ नव्हता. बाळंतपणात बाई अडली तर माझ्या अनुपस्थितीत स्मिता तिचा जीव वाचवू शकेल याची मला खात्री होती. आमच्या लग्नाचं नक्की झाल्यावर माझ्या सांगण्यावरून नागपूरच्या मातृसेवा संघात जाऊन तिनं बाळंतपण कसं करायचं हे शिकून घेतलं होतं. मीही तिला अनुभव मिळावा म्हणून बाळंतपणाची केस आली की, आवर्जून बरोबर घेऊन जात असे. पण गाववाल्यांना मात्र ती डॉक्टर आहे हे पटत नसे. 'एक स्त्री डॉक्टर असू शकते' हे त्या समाजाच्या पचनी पडण्यासारखं नव्हतं. त्यांच्या दृष्टीनं ती फार तर नर्सबाई होती.

एकदा 'किडनी स्टोन'ची महिला रुग्ण दवाखान्यात आली. माझ्या मते तिच्यावर शस्त्रक्रियेशिवाय दुसरा उपाय नव्हता; जी तिथे करणं शक्य नव्हतं. स्मितानं माझ्या परवानगीनं तिला होमिओपॅथीची औषधं दिली आणि बघताबघता तिच्या वेदना थांबल्या. एकदा उलट्या-जुलाबाने हैराण झालेल्या रुग्णाबाबत हाच अनुभव आला. तेव्हा माझाही होमिओपॅथीवर विश्वास बसला. जंगलात शिकारीला गेलेला असताना वाघाशी झालेल्या झटापटीत रक्तबंबाळ झालेल्या रुग्णाला स्मितानं चारशे टाके घालून त्याचा जीव वाचवला. पाणीही न पिता आठ-दहा तास ती काम करत होती. ते पाहून गावकऱ्यांचा तिच्या वैद्यकीय ज्ञानावर विश्वास बसला आणि मग मात्र, ती नर्सबाईची डॉक्टर झाली.

हळूहळू गावातल्या लोकांचा आमच्यावर खूपच विश्वास बसला, आम्हाला वैद्यकीय विषयातील कळतं, म्हणजे सर्वच विषयांतील कळत, असणार असं, गृहीत धरून घरगुती भांडणापासून शेतीविषयक अडचणींपर्यंत अनेक विषयांवर सल्ला घेण्यासाठी ते आमच्याकडे येत. अशा वेळी फक्त कुंपणावर बसून सल्ला देणं आम्हाला दोघांनाही जमलं नाही. आम्ही शेतीविषयक प्रयोग करायचं ठरवल्यावर शेतातले अवजड दगड उचलतानाही स्मिता कधी मागे राहिली नाही. माझ्या बरोबरीनं अंगमेहनतीची कामे तिनं केली; त्यामुळेच यशस्वीपणे शेती करून शेती फायद्यात होऊ शकते हे आम्ही दाखवून देऊ शकलो. आमच्या येथील मेळाव्यात बळी दिले जाणारे प्राणी पाहून माझ्याप्रमाणे स्मिताही अस्वस्थ झाली. ते दृश्य पाहून तिनं मांसाहार सोडून दिला. बळीची प्रथा बंद होण्यासाठी गावकऱ्यांना हाताशी धरून आम्ही दोघांनी अथक प्रयत्न केले. त्यालाही यश आलं.

१९९१ साली आमच्या गावातल्या कुवारसा नावाच्या आदिवासी मुलाचं धर्मांतर करण्यात आलं. ही गोष्ट स्मिताच्या कानावर गेल्यावर त्याला परत हिंदू करून घेण्यासाठी आपण प्रयत्न करायला पाहिजेत, असं तिला वाटू लागलं. मला हे पटत नव्हतं. कारण धर्म, जातपात हा भेदभाव मी मानत नाही. त्याहून महत्त्वाचं म्हणजे मला वाटत होतं की, आपण इथे डॉक्टर म्हणून काम करत आहोत. धर्मांतराच्या प्रश्नामध्ये आपण घुसलो की, आपल्या प्रतिमेला तडा जाईल आणि मुस्लीम लोकांच्या मनात आपल्याबद्दल शंका निर्माण होईल. या मुद्द्यावरून आमच्या दोघांत प्रचंड वाद झाला. अखेर स्मिताचं म्हणणं मला पटलं. कारण कुवारसा हा सज्ञान नव्हता. त्याचे सक्तीने

*या जन्माचे व्रत ऐसे की, दीप उजळता मनी रहावा।*
*चौबाजूंच्या अंधारातून आपण आपुला मार्ग पाहावा।।*

**वार्षिक पान प्रायोजक – डॉ. विनायक देसूरकर, पुणे**

धर्मांतर झाले होते. त्याने परत हिंदू व्हावे, अशी त्याच्या आई-वडिलांचीही इच्छा होती. याबाबत अनेकजणांचा सल्ला घेऊन आम्ही त्याला परत हिंदू करून घेतले. याचा परिणाम म्हणजे बैरागडमध्ये बहुसंख्य लोक मुस्लीम असल्यामुळे संपूर्ण गावाने आमच्यावर बहिष्कार टाकला. आम्हाला मारण्याच्या धमक्या दिल्या. पण कुणालाही न घाबरता बैरागड न सोडण्याचा निर्णय आम्ही दोघांनी घेतला. त्याचे दोन परिणाम झाले. एक म्हणजे कुवारसाच्या आधी पंधरा जणांचे धर्मांतर झाले होते. त्यानंतर एकाचेही धर्मांतर झाले नाही. दुसरी गोष्ट म्हणजे अन्याय सहन करायचा नाही, ही जाणीव विशेषत: स्त्रियांमध्ये निर्माण झाली.

अनेक स्त्री-पुरुष पुढे येऊन गावातल्या स्त्रियांची कशी टिंगलटवाळी केली जाते, घरात घुसून त्यांच्यावर कशी जबरदस्ती केली जाते, याविषयी तक्रारी सांगू लागले. स्त्रियांच्या व्यथा-वेदना ऐकताना आम्हाला जाणवलं की, आतापर्यंत आम्ही फक्त शारीरिक आजार दूर करणारे डॉक्टर होतो. पण आज पहिल्यांदा गावकऱ्यांनी त्यांच्या मनातल्या वेदना बोलून दाखवल्या होत्या. त्यानंतर स्त्री अत्याचार, मेळघाटातील कुपोषण, बालमृत्यू, सरकारी कामकाजातील भ्रष्टाचार, वनतस्करी अशा एक ना अनेक समस्या घेऊन गावकरी समोर आले, तेव्हा त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील राहिलो. त्यासाठी असंख्य वेळा कोर्ट-कचेऱ्या केल्या. पण एक-दोन अपवाद वगळता, आम्हाला तिथेही कधी न्याय मिळाला नाही. आम्ही अवलंबिलेला ध्येयवाद आणि सत्यावरची निष्ठा सहन न होऊन कुणी आमचं घर पेटवलं, कुणी जीवावर उठलं. अशा प्रसंगांना सामोरे जाताना आमच्या दोघांतही खूप वेळा मतभेद झाले. कधीकधी तर मनातले राग-उद्वेग टोकाला गेले. कारण आम्ही दोघंही मनस्वी, दोघंही आग्रही.

बैरागडचा धबाबा पाऊस. साप-विंचवांचा सहवास. पैशाची चणचण. आमच्या दोघांच्या वाट्याला आलेली आजारपणं नि अपघात. रोजचं जगणं आव्हान ठरावं असं वास्तव स्वीकारताना एका क्षणी आम्ही ठरवलं की, दोघांनी उभं केलेलं घर दोघांनी मिळून सावरायचं आहे. एखाद्या प्रश्नाकडे बघण्याचा प्रत्येकाचा दृष्टिकोन भिन्न असतो, हे दोघांनीही समजून घेतलं. नुसतं समजून घेतलं नाही, तर एकमेकांच्या मतांचा आदर करत ते पुढे आचरणात आणलं. म्हणूनच दोघांमधील नातं दृढ होत गेलं. एकमेकांना साथ देणारे पति-पत्नी असतील तर त्यांची ताकद दुप्पट नाही तर चौपट होते याचा अनुभव मला कायमच आला.

२०१३ साली आमच्या लग्नाला पंचवीस वर्षे पूर्ण झाली. लग्न करताना मी चार अटी घातल्या होत्या. त्या शहरी आयुष्यापेक्षा सर्वस्वी वेगळं आणि कष्टप्रद असं आयुष्य जगण्याची मुलीची तयारी असावी म्हणून. स्मितानं हे आयुष्य हसतमुखानं स्वीकारलं. फक्त स्वीकारलं नाही तर त्यात झोकून दिलं. म्हणूनच एकमेकांच्या सहवासात जगण्याचे वेगवेगळे आयाम आम्ही समजून घेऊ शकलो. आजही आम्ही कच्च्या घरात राहतो. दर पावसाळ्यात दोघं मिळून घर शाकारतो. शेणानं जमीन सारवतो. चुलीवर स्वयंपाक करतो; त्यामुळे गरिबातल्या गरीब आदिवासी माणसाला आम्ही आपले वाटतो.

गेल्या २५-३० वर्षांमध्ये मेळघाटात पक्के रस्ते झाले. एस.टी.ची वाहतूक सुरू झाली आहे. तरीही उर्वरित महाराष्ट्रापासून असलेलं त्याचं तुटलेपण अजून संपलेलं नाही. हे तुटलेपण फक्त भौगोलिक नाही; तर मानसिक आहे. भावनिक आहे. जेवढी जास्तीतजास्त माणसं मेळघाटात येतील, इथल्या लोकांशी संवाद साधतील, त्यांच्या जवळ असलेलं तंत्रज्ञान आणि कौशल्यं यांची ओळख तेथील आदिवासीं करून देतील तेव्हाच मेळघाटाचं नातं महाराष्ट्राशी नाही तर जगाशी जोडलं जाईल. हे आम्ही दोघंही समजून आहोत. म्हणूनच इथे येणाऱ्या कुणाही व्यक्तीसाठी कड्या-कुलपं नसलेले आमच्या घराचे दरवाजे सदैव उघडे आहेत.

**– डॉ. रवींद्र व स्मिता कोल्हे**

*बैरागड, ता. धारणी, जि. अमरावती 444702*

*शब्दांकन – मृणालिनी चितळे*

**जरूर वाचा : मेळघाटातील मोहर**

लेखिका - मृणालिनी चितळे, राजहंस प्रकाशन



**भेट द्या : राष्ट्रीय शैक्षणिक संस्था - TISS** (एकूण शाखा ४)
(Tata Institute of Social Sciences) समाजशास्त्र

**वार्षिक पान प्रायोजक – श्री. निनाद रामचंद्र कात्रे, डोंबिवली**

# सर्जनशील सहप्रवास

***चित्रपट क्षेत्रात निर्मितीक्षम आणि कलात्मक भागिदारी. दोघी, १० वी फ, वास्तुपुरुष, देवराई, नितळ यांसरख्या १३ प्रसिद्ध चित्रपटांची व सुमारे ४० लघुपटांची निर्मिती, ६ राष्ट्रीय पुरस्कार, ४५ पेक्षा जास्त राज्य पातळीवरील आणि इतर पुरस्कार. सामाजिक जाणिवेतून आलेल्या, कथात्मक, वास्तववादी चित्रपटांच्या परंपरेत मोलाची भर...***

*सुनील सुकथनकर*



**श्री. सुनील सुकथनकर व सुमित्रा भावे**

परवाच एका समारंभात कोणीतरी सुमित्रा भावेंची ओळख करून देताना 'सुमित्राताईंचे चित्रपट' असा उल्लेख केला.... मी प्रेक्षकात होतो. आमच्या एका सहकाऱ्यानं मला विचारलं...''सर, तुम्हाला हे खटकत नाही का हो ?'' मी जराही विचार न करता म्हटलं,

'' नाही... खरं तर असं इतक्या वेळा घडतं, की त्याचं काही वाटत नाही.....''

अशाच एका कार्यक्रमात कुणीतरी विधान केलं..' गेली अनेक वर्षं हे दिग्दर्शकद्वय चित्रपट बनवत आहे..'... तेव्हा मी मनाशी गणित करून पाहिलं आणि स्वतःच स्तिमित झालो... कारण तो आकडा होता-तीस वर्षं...!! आमची तीस वर्षांची -*क्रिएटिव्ह पार्टनरशिप*- निर्मितिक्षम किंवा कलात्मक भागीदारी हा अनेकांच्या दृष्टीनं अचंब्याचा विषय आहे....

खरंच , कसं सुरू झालं हे नातं आणि कसं टिकलं...?

सन १९८३ ची गोष्ट. सुमित्रा भावे या प्रशिक्षित समाजसंशोधक मध्यमवयीन स्त्रीला शब्दांच्या माध्यमांची एकप्रकारे मर्यादा जाणवू लागली... प्रत्यक्ष समाजकार्य आणि समाज संशोधन या क्षेत्रात घेतलेल्या अनुभवांच्या आणि या अभ्यासातून निघणाऱ्या महत्त्वपूर्ण वैचारिक निष्कर्षांच्या 'गोष्टी' तिला सुचू लागल्या... तेव्हा तिनं जीवनानुभवाच्या जास्तीत जास्त जवळ जाणारं सादरीकरणाचं माध्यम शोधायचं ठरवलं... तेव्हा 'चित्रपट माध्यमा'चाच विचार तिच्या मनात पक्का होत गेला... अनेकांनी तिची ही कल्पना धुडकावून लावून तिला समजुतीचे सल्ले दिले. तिच्या या वेडेपणात सामील व्हायला तयार होती - चार तरूण पोरं... नाटकवेडी, स्थिरचित्रण आणि पत्रकारिता यांची आवड असणारी... एकाच अडाणीपणातून या सर्वांचा एक नवा गट तयार झाला आणि त्यांनी स्वतः अभ्यास करत- अगदी त्याकाळाच्या परिस्थितीनुसार *टी.व्ही.* आणि *व्ही. सी. आर.* भाड्यानं आणून, चित्रपट पाहून- माध्यमाची समजूत वाढवत, चित्रपटांच्या दुनियेतल्या काही समजूतदार तंत्रज्ञांची साथ मिळवत पहिला लघुपट बनवला- 'बाई'. बाई चित्रपटाला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला आणि असंख्य महिलांनी - खेडोपाडी, शहरात, मंडळांमध्ये, झोपडवस्त्यांमध्ये- तो पाहिला... माध्यमाची अपार ताकद या सर्वांच्या लक्षात आली आणि त्यातले काही या क्षेत्रात- कलात्मक ओढीनं आणि पुढे तर पूर्ण वेळ व्यवसाय म्हणून रमून गेले...

या प्रक्रियेत आणखीही काही गोष्टी घडत गेल्या. आम्ही सगळेच एका नव्या शिक्षणाच्या पहिल्या इयत्तेत होतो. सगळे मिळून चित्रपट माध्यम शिकत होतो. त्यामुळे सर्व जण एका पातळीवर आहोत अशी एक वेगळीच मानसिकता तयार झाली. आम्ही चार-पाच जण सुमित्रा भावे या आमच्या आईच्या वयाच्या मावशीला 'सुमित्रा' म्हणू लागलो. हे अगं-तुगं करणं सोपं नक्कीच नव्हतं..पण

*दोघांच्याही मनात , चित्रकृतींचं ( चित्रपट ) गाव आहे।*
*कलेच्या या गावाचं , मैत्री असं नाव आहे ।।*

**वार्षिक पान प्रायोजक – श्री. जगजित कुलकर्णी, चिंचवड –पुणे**

हळूहळू अंगवळणी पडलं... हे विस्तारानं सांगण्याचं कारण असं, की या कलात्मक भागीदारीची सुरुवातच लोकशाहीच्या, दोस्तीच्या आणि बरोबरीच्या वातावरणात झाली.

'बाई' लघुपटाचं काम करता करता हे लक्षात आलंच होतं, की चित्रपट माध्यम ताकदवान तर आहेच; पण अवघडही आहे. आपल्याला 'जे म्हणायचंय ते मांडायचं असेल' तर माध्यमावर पकड हवी.. त्याची आतून समजूत असली तरी तंत्रावरही हुकूमत गाजवता यायला हवी. सुमित्रा म्हणाली- ''मी या वयातही चित्रपटाचं शिक्षण घ्यायला जाईन; पण नोकरी आणि मुलीसकट घर चालवणं हे सोडून, ते चाळीशीमध्ये करणं कठीण आहे...'' मग मी आणि आणखी एका सहकाऱ्यानं पुण्यातल्या *फिल्म अँन्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटमध्ये* (F.T.I.I.) शिक्षण घ्यायचं ठरवलं. त्या कठीण प्रवेश परीक्षेतून आम्ही उत्तीर्णही झालो. मी दिग्दर्शनाचा अभ्यासक्रम निवडला.

F.T.I.I.मध्ये शिकताना दोन गोष्टी घडत गेल्या. एक म्हणजे- आम्ही सहजस्फूर्तपणे चित्रपटाचं जे प्रशिक्षण स्वतःला दिलं होतं ते योग्य होतं, हे मला उमगलं. त्यामुळे नवं शास्त्रशुद्ध शिक्षण घेण्याची उमेद आणि आत्मविश्वास वाढला. आणि दुसरी गोष्ट म्हणजे- सुमित्रा माझ्या बरोबरीनं हे शिक्षण घेऊ लागली- एकलव्याप्रमाणे; त्या शाळेत न जाता, पण माझ्या माध्यमातून...चित्रपट दिग्दर्शन शिकू लागली... माझ्या सर्वच प्रकल्पांमध्ये मी तिचा सहभाग गृहीत धरू लागलो. विशेषतः संहितालेखनामध्ये... कारण मूळ कथानक मला सुचत नसे... एकदा गोष्ट तयार झाली की, माझं डोकं हालू लागे-चालू लागे.. अगदी संवाद लिहिणं किंवा खऱ्या अर्थानं दिग्दर्शकीय दृष्टिकोनातून ते कथानक घडवण्यासाठी चित्रपटाच्या परिभाषेत विचार करणं अशा गोष्टीत माझ्या संवेदना जाग्या होत... अजूनही तसंच होतं...

त्यामुळे मी F.T.I.I. मध्ये तयार केलेल्या अभ्यासक्रमांतर्गत लघुपटांच्या संहितांमध्ये (आणि काही प्रमाणात वेशभूषा-कला दिग्दर्शन या अंगांमध्ये) मी सुमित्राची मदत घेत राहिलो... सामाजिक जाणिवेतून आलेले, अभ्यासपूर्ण, तरीही कथात्मक, प्रेक्षकाला रंजक वाटतील असे, पण त्यांचा खोटा अनुनय न करणारे, पलायनवादी किंवा स्वप्नरंजनवादीही (लार्जर दॅन लाईफ) नसणारे असे चित्रपट बनवण्याचं काम बाहेर पडून करायचं आहे, अशी निःसंदिग्ध भूमिका F.T.I.I. मध्ये शिकत असतानाच माझ्या मनात पक्की झाली होती. त्यामुळेच माझे F.T.I.I. प्रकल्प ही आमची नंतरच्या कामाची रंगीत तालीमच होती, असं आता जाणवतंय...

गेल्या तीस वर्षात आम्ही १४ *फीचर फिल्म्स* (पूर्ण लांबीचे चित्रपट), सुमारे ५० च्या वर लघुपट, ४ *टेलिफिल्म्स,* ३ दूरदर्शन मालिका दिग्दर्शित केल्या. या कलाकृतींना मिळणारे मान-सन्मान, त्यावर होणारी टीका-टिप्पणी, कौतुकं, समीक्षा, मिळणारा प्रतिसाद- या सर्वच गोष्टी एकत्र अनुभवल्या. मुख्य म्हणजे अनेक सहकाऱ्यांसोबत आणि कलावंत, तंत्रज्ञांबरोबर चित्रपट तयार करण्याची, जादूसारखी बघता बघता उलगडत जाणारी जगावेगळी निर्मितीची प्रक्रिया एकत्र जगलो... ही दृष्टी सुमित्राने मला दिली होती. चित्रपट महोत्सवांच्या निमित्तानं जगातल्या १०-१२ देशांमध्ये एकत्र प्रवासही केला.

अगदी पहिल्या लघुपटापासून ते आजपर्यंत आमच्या चित्रपटांची संहिता (कथा-पटकथा-संवाद) सुमित्राच लिहीत आली आहे..तिची लिखाणाची पद्धत एकसंध असते. जणू तो चित्रपट तयारच समोर दिसतो आहे अशा पद्धतीनं ती कथा-पटकथा-संवादांसहित, अगदी दिग्दर्शकीय तपशिलांसकट सांगू लागते.. आणि बऱ्याचदा मीच ते उतरवून घेतो...त्यामुळे तिथूनच दोघांच्या डोळ्यांसमोर चित्रपट दृग्गोचर करण्याच्या प्रक्रियेला (व्हिज्युअलायझेशनला) एकत्र सुरुवात होते. मग ते कथानक कुठे घडेल ते लोकेशन-ठिकाण, तिथल्या वस्तूनवस्तूंची निवड, सजावट, रंगसंगती-कला दिग्दर्शन, पात्रांसाठी योग्य त्या कलाकारांची निवड, वेशभूषा या सर्वच आघाड्या आम्ही सुमित्राच्या मानतो....मग त्या पात्रांच्या हालचाली, संवाद बोलताना- न बोलताना...घडत जाणाऱ्या घटना आम्ही दोघं मिळून पक्क्या करतो. त्या घटना टिपण्यासाठी घेण्याचे शॉट्स-दृश्यांचे तुकडे, त्यानुसार कॅमेऱ्याची मांडणी, छाया-प्रकाश यांचा विचार करून मी चित्रं काढतो आणि पुन्हा दोघं त्याचं निश्चितीकरण करतो. ध्वनिचित्र कसं असावं याचाही विचार माझ्यापेक्षा सुमित्रा अधिक करते. आम्ही कलाकारांच्या तालमी घेतो. ती



**भेट द्या : राष्ट्रीय शैक्षणिक संस्था - TIFR** (एकूण शाखा ४)
(Tata Institute of Fundamental Research) मुलभूत संशोधन
**वार्षिक पान प्रायोजक – श्री. सौरभ सुधीर दप्तरदार, पुणे**

जबाबदारी माझी असते. सुमित्राशी वैचारिक चर्चा करून तो अभिनय प्रत्यक्षात आणण्यासाठीचे प्रयत्न पडताळून पाहायला ते माझ्याकडे येतात. प्रत्यक्ष चित्रीकरणाच्या वेळीही अभिनय करवून घेणं, कॅमेरामन आणि ध्वनिलेखक यांना समजावून देणं हे काम माझं, तर साऱ्या घटकांसहित *फायनल शॉट* योग्य लागलाय ना हे सांगणारा शेवटचा शब्द सुमित्राचाच असतो. संकलन करता करता एक प्रकारे कथानक पुनर्जन्म घेतं... त्याला लय सापडते... त्यामुळे तिथे पुन्हा सुमित्रा जास्त पुढाकार घेते... तर संगीत, पार्श्व-संगीत यात माझं डोकं जास्त चालतं. गेली १२-१३ वर्षं आमच्या चित्रपटांची गीतं मी लिहीत आलो आहे. त्यामुळेही संगीताची जबाबदारी माझ्यावर अधिक पडते. अशी आमच्या भागिदारीची वाटणी असते !

आता कुणी म्हणेल, 'हे असं इतकं आखीव-रेखीवपणे कसं होईल ?'

खरंय... नाहीच होत.. वाद होतात, मतभेद होतात.... एकमेकांचं *व्हिजुअलायझेशन* एकमेकांना कधी समजत नाही, कधी पटत नाही तर कधी आवडत नाही...! अशा वेळी मी एक अलिखित नियम घालून घेतलाय..तो म्हणजे- मूळ संहिता सुमित्राच्या डोक्यातून निघाली असल्यामुळे शेवटचा शब्द तिचाच असेल.त्यामुळे मतभेदांचा शेवट निश्चित होऊन जातो !! अर्थात अनेकदा मला माझ्या मनातली गोष्ट निकराचा लढा देऊन पटवून सांगायचा मोहही होतो !! मतभेदाचं मूळ कारणही (बऱ्याचदा) एकच असतं...सुमित्राला घडणारी घटना वास्तवाच्या निकषांवर शक्याशक्यतेच्या कसोटीवर उतरायला हवी असते.. मग त्याचं दृकश्राव्य सादरीकरण कसं करायचं ते ठरवता येईल- असं तिला वाटतं...! तर दृकश्राव्य मांडणीच्या दृष्टिकोनातून घटना अशी-अशी घडवू या असं माझं डोकं चालतं...! मग आलाच मतभेदाचा मुद्दा...

आणखी एक महत्त्वाचा दृष्टिकोनाचा फरक म्हणजे- वितरण- जाहिरात आदि गोष्टींबद्दलच्या आग्रहाचा..! आपली कलाकृती आपल्या प्रेक्षकांपर्यंत पोचावी ही स्वाभाविक भावना दोघांच्याही मनात असते. पण चित्रपट तयार झाला की आपलं निर्मिकाचं काम संपलं असं मानून पुढच्या गोष्टींच्या बाबतीत सुमित्राचा निराग्रही, स्थितप्रज्ञ दृष्टिकोन असतो. तर न आवडणाऱ्या सध्याच्या मार्केटिंगच्या जमान्यात आपली कलाकृती विरून तर जाणार नाही ना या विचारानं माझा जीव कासावीस होत असतो...!!

आमच्या निर्मिती संस्थेचं काम एखाद्या कुटुंबासारखं चालतं. त्यात कुटुंबप्रमुखाची भूमिका सुमित्राची असते. परंपरेनं पुरुषाला जसं कठोर, शिस्तप्रिय, थोडा दरारा निर्माण करणारा बनवलंय तसं सुमित्राला असावं लागतं आणि आई मागे लपणाऱ्या पोरांप्रमाणे आमचे सहकारी त्यांच्या चुका माझ्यामागे दडवू पाहातात...!! पण आम्हां दोघांच्या या स्वभाववैशिष्ट्यांमुळे कारभार सुरळीत चालतो.. कारण तो बेशिस्तही होत नाही आणि सामंजस्यानं पारही पडतो.

एक स्त्री-पुरुष- समाजानं निश्चित केलेल्या कुठल्याही नात्यांनी बांधलेले नसताना आणि शिवाय त्यांच्या वयांमध्ये पिढीचं अंतर असताना, सहज सलगतेनं काम कसे करू शकतात? हा एक प्रश्न अनेकांना पडतो. पुरुष म्हणून अहंकार बाळगावा असं मला वाटत नाही आणि वयाची अरेरावी करावी असं तिला वाटत नाही... वयामुळे *जनेरेशन गॅप* तयार होते असं दोघांनाही वाटत नाही..

'या बाईंकडे मी उमेदवारी केली, आता तो त्याचं काहीतरी का निर्माण करत नाही ?'

'खरं म्हणजे सगळं दिग्दर्शन हाच करत असणार, या बाई फक्त नाव लावतात..!'

हा पुरुष असल्यामुळे तांत्रिक गोष्टी यालाच कळणार.... बाईंना इतर कलात्मक अंग कळत असतील..!

हे स्त्रीमनाची भावना मांडणारं गाणं खरंतर ताईंनीच लिहिलं असेल, पण प्रेमानं याला क्रेडिट देताहेत...!

अशा शंका आणि आरोपांकडे दुर्लक्ष करण्यापलिकडे काय करणार ? कारण त्यात तथ्य नाही. समाजातल्या पूर्वग्रहांचं हे फलित आहे; ही गोष्ट आम्ही आणि आमच्या बरोबरीनं काम करणारे जाणून आहोत !

शेवटी एका अत्यंत महत्त्वाच्या अशा मतभेदाविषयी सांगितल्यावाचून मला थांबता येणार नाही... ते म्हणजे सुमित्राचं धाडस आणि पहिलं पाऊल उचलण्याची धडाडी आणि माझा अतिसावध, चालढकलीचा स्वभाव ! मुळात या क्षेत्रात पडण्यापासून ते स्वतः संकलनाचं यंत्र चालवायला शिकणं, स्वतः छायाचित्रण करण्याचा निर्णय घेणं, कमी वेळात एखादी जबाबदारी पुरी करण्याचं आव्हान स्वीकारणं,

*निखळ मैत्रीत नसते, हेव्यादाव्याला स्थान।*
*निखळ मैत्रीतून मिळते, आयुष्याचे भान।।*
**वार्षिक पान प्रायोजक – डॉ. प्रियदर्शी सावंत, बोरीवली**

फार कशाला कर्जबाजारी होऊन ‘पाणी’, ‘१०वी फ’, ‘बाधा’ आणि ‘हा भारत माझा’ या चित्रपटांची स्वतः निर्मिती करण्याचा घाट घालणं- सारंच मला अचंबित करतं. तिच्या धडाडीशिवाय हे घडलं नसतं... आणि हाही गंमतीचा भाग आहे की प्रथम घाबरणारा मी; या निर्णयांमध्ये एकदा झोकून दिल्यावर न कचरता ती कार्ये सक्षमपणे सिद्धीस नेतो आहे...!

असा हा एक स्त्री वय ४० आणि एक पुरुष वय १७ ते आज एक स्त्री वय ७१ आणि एक पुरुष वय ४८ यांचा प्रवास. शिकणं, अनुभवणं, समजून घेणं आणि समृद्ध होणं अशा अव्याहत चक्रातून चाललेला...!!

**सुनील सुकथनकर, सुमित्रा भावे**
vichitranirmiti@gmail.com

# जोडी जमली रे !!


सुभाष देशपांडे


रामचंद्र डिंबळे

*शिवगंगा खोरे (पुणे) येथील खेड्यांच्या विकासाच्या कार्यक्रमात तसेच खांडसरी साखर कारखाना उभारणीत दोघांचा एकत्र सहभाग.*
*सुभाष देशपांडे हे ज्ञान प्रबोधिनी संस्थेच्या माध्यमातून शिक्षण, संशोधन, ग्रामविकसन, युवा संघटन या क्षेत्रांमध्ये कार्यरत. व्यवस्थापन क्षेत्रातील अग्रगण्य सल्लागार.*
*रामचंद्र डिंबळे हे संस्कृत विषयाचे तज्ञ, प्राध्यापक म्हणून काही काळ कार्यरत, ज्ञान प्रबोधिनीच्या माध्यमातून ग्रामविकसन कार्यक्रमात महत्त्वपूर्ण योगदान. ग्रामीण युवकांसाठी विशेष मार्गदर्शनाचे कार्यक्रम.* MES शिक्षणसंस्थेचे पदाधिकारी, शीघ्र कवी, वाचनाचा व्यासंग, प्रभावी वक्तृत्व !

*सुभाष देशपांडे*

प्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते प्रा. रामभाऊ डिंबळे आणि मी, गेली ४९ वर्षे एकत्र काम करीत आहोत. १९६५ मध्ये मी प्रबोधिनीच्या सायंकालीन प्रबोध शाळेला इयत्ता आठवीत आलो. त्यावेळी राम स. प. महाविद्यालयात पहिल्या वर्षाला शिकत होता. तो सिंहगड पायथ्याच्या कल्याण गावचा. अशिक्षित घरातून आलेला आणि तरीही संस्कृतमध्ये भरपूर गुण मिळवणारा म्हणून तर त्याची कीर्ती होतीच; पण प्रबोधिनीच्या संस्थापकांच्या, म्हणजे ती. आप्पासाहेब पेंडसे यांच्या थेट घरी राहणारा तडफदार विद्यार्थी, म्हणूनही आम्हा विद्यार्थ्यांना त्याच्याबद्दल विशेष ओढ असे.

१९६८ च्या मे महिन्यात कल्याण गावात एक दगडी बंधारा बांधण्याचे प्रबोधिनीने ठरवले. त्यासाठी गावकऱ्यांना श्रमदानास प्रवृत्त करण्याचे काम रामकडे होते. आमची सगळी *बॅच* त्या बंधाऱ्यावर श्रमदानाला आठवडाभर गेली होती. तेव्हा रामच्या जुन्या कुडाच्या, कौलारू घराची, दारात बांधलेल्या म्हशींची माझ्यावर विशेष मोहिनी पडली. एके दिवशी रामच्या आईने मला पेला भरून धारोष्ण दूध दिले. तो दिवस मला अजून



**भेट द्या : राष्ट्रीय शैक्षणिक संस्था - NDA, पुणे**
(National Defence Academy) सैन्यात अधिकारी होण्यासाठीचा अभ्यासक्रम
**वार्षिक पान प्रायोजक – श्री. निखिल धारवाडकर, बंगलोर**

आठवतो. त्यावेळी ग्रामीण जीवनाची माझी सुप्त ओढ जागी झाली असावी. आम्ही तसे मुळशी तालुक्यातील; पण कूळ कायद्यात जमीन गेलेले शेतकरी. आता शहरवासी; पण मन खेड्याकडे ओढ घेणारे. नंतरही सायकलवरून किंवा एस.टी.ने पुण्यापासून ३५ किलोमीटरवर असणाऱ्या कल्याणला अनेक वेळा जाण्याचा योग आला. तेथून कल्याण दरवाजाने चढून सिंहगडावर जाण्याचा प्रघात होता. एकीकडे रामशी मैत्री वाढतच गेली. मध्यंतरीच्या काळात मलाही बरे शैक्षणिक यश मिळत गेल्यामुळे सुभाषचा 'सुभाषराव' झाला आणि तशाच चढत्या कमानीमुळे तो रामचा 'रामभाऊ' झाला. बोलण्यात 'अहो-जाहो' येऊ लागले, तरी सौहार्द वाढत गेले.

सुरुवातीला दोघांची कार्यक्षेत्रे वेगवेगळी होती. रामभाऊ प्रबोधिनीची शिवगंगा खोरे विकास योजना पाहात होते, तर मी पुण्यातला विद्युतधारक विभाग.

वेगवेगळ्या प्रकारची कामे करणाऱ्या आम्हा दोघांना पुन्हा एकत्र आणले ते एका नाटकाने. सुप्रसिद्ध दिग्दर्शक यशवंत पेठकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबोधिनीतील कार्यकर्त्यांनी महाभारतातल्या एकलव्याच्या जीवनावर नाटक बसविले होते. रामभाऊ अंगाने धिप्पाड; त्यामुळे त्यांच्याकडे भिल्लांच्या राजाची भूमिका आली. मी किडकिडीत. माझ्याकडे द्रोणाचार्यांची भूमिका आली. अर्जुनावरच्या प्रेमापोटी मी गुरुदक्षिणा म्हणून एकलव्याचा अंगठा मागतो, असा प्रसंग होता; त्यावेळी भिल्ल रामभाऊंनी वटारलेले डोळे मला अजूनही आठवतात.

त्यावेळी आणखी एक गंमत झाली. ऐटदारपणे संवाद फेकताना माझ्या, म्हणजे द्रोणाचार्यांच्या डोक्यावरचा कृत्रिम पांढऱ्या केसांचा 'विग' थोडा मागे सरकला आणि माझे त्यावेळी मुळचे काळे असलेले केस दिसू लागले. प्रेक्षकांमध्ये एकच खसखस पिकली. एवढा गंभीर प्रसंग अन् माझे संवादाचे पाठांतर व्यवस्थित असतानाही प्रेक्षक का हसताहेत, ते मला कळेना. रामभाऊंनी बाका प्रसंग ओळखला. त्यांनी विंगेतल्या कार्यकर्त्याला खूण केली. जणू नाटकाच्या दिग्दर्शनातला तो भाग असावा अशा थाटात रंगमंचावरील दिवे त्याने मंद केले. मग 'द्रोणाचार्य' आपला केसांचा टोप सावरत धीरोदात्तपणे आत गेले आणि अखेर माझा जीव भांड्यात पडला ! असे एकमेकांना सांभाळून घेत आलो आम्ही.

१९७८ मध्ये एकत्र काम करण्याचा योग आला तो प्रबोधिनीच्या खांडसरी साखर उद्योगावर. त्या ३-४ वर्षांत रात्रंदिवस एकदिलाने जे काम झाले, त्यातून आमची दीर्घकाळाची जोडी जमली. मग तो ऊसतोडीचा फड असो की, साखर कारागीरांची मनधरणी असो... आमचे दोघांचे स्वभाव तसे विरुद्ध; त्यामुळेच ते पूरक व्हायचे. रामभाऊ धाडसी आणि कामावर तुटून पडणारे, तर मी कागदकामातला, नियोजनातला भोक्ता.

समान संकटामुळे ही मैत्री आणखी दृढ झाली. १९७८ मध्ये गांधी जयंतीला रामभाऊंनी शिवापूर परिसरात दारूबंदी अभियान छेडले. गावठी दारूच्या व्यसनाने तरुण वाहत जात होते. नेहमीच्या प्रथेप्रमाणे पोलीस चक्क हातभट्टीवाल्यांना सामील झाले आणि आम्ही २२ तरुण आंदोलनकर्ते ३ दिवस गजाआड गेलो. तुरुंगात रामभाऊंनी सगळ्यांचे मनोधैर्य उत्तम राखले. पुढे कोर्टात खटला चालला. आम्ही सगळेजण निर्दोष सुटलो. गावकऱ्यांनी आमची सर्वांची मिरवणूक काढली. मैत्री आणखी वाढली.

१९७८ ते १९८५ या वर्षांमध्ये कामासाठी आम्ही दोघांनी एका वाहनावरून अनेक ठिकाणी प्रवास केला. कधी त्यांची मोटरसायकल, तर कधी माझी स्कूटर. एका पावसाळ्यात मी स्कूटर चालवीत होतो, ते मागे बसले होते. चिखलाच्या रस्त्यावर आम्ही चांगलीच आपटी खाल्ली. त्यांच्या खांद्याला बरेच लागले. त्यांचा मोठेपणा असा की, माझ्या वाहनकौशल्याला दूषणे न देता, त्यांनी हसतहसत तो प्रसंग निभावून नेला.

पुढे आम्ही 'पाणी' या विषयावर एकत्र काम करू लागलो. महाराष्ट्र व केंद्र शासनाच्या अनेक प्रकल्पांच्या निमित्ताने राज्यात अनेक खेडेगावांमध्ये आणि देशात अनेक प्रांतांमध्ये एकत्र प्रवास झाला. रामभाऊंनी चारचाकी वाहन चालविताना कधी पेट्रोल संपले, तर मी कॅन घेऊन पंप शोधण्यासाठी आनंदाने पायपीट करीत असे. माझ्या भुकेच्या वेळी रामभाऊ अचानकपणे

*मैत्रीच्या जोडीत असतो, विश्वास अन् त्याग।*
*ठेच एकास लागता, दुःख होते दुसऱ्यास ।।*

वार्षिक पान प्रायोजक – श्री. अजित कानिटकर, पुणे

एखादी संत्र्याची करंडी घेऊन अवतरत असत. अशी ही आमची शब्दाविना मैत्री.

रामभाऊंनी जसा त्यांचा संस्कृतचा व्यासंग वाढवला तसेच ते अगदी वेगळ्या म्हणजे जमीन खरेदी-विक्रीच्या व्यवहारातही उतरले. दोन्ही प्रांत माझे नव्हते. मी उद्योग समूहांमध्ये व्यवस्थापन प्रशिक्षण घेऊ लागलो. जेव्हा जेव्हा आम्हाला एकत्र काम करण्याची संधी मिळाली, तेव्हा तेव्हा हक्काने आम्ही एकमेकांना बोलावले. रामभाऊ प्रसंगोचित कविताही फार सुंदर रचतात आणि मोठ्या समुदायापुढे भाषण करीत, हास्यरसाची कारंजी उडवतात. मी आर्थिक ताळेबंदामध्ये डोके खुपसून बसलो, तरी त्याबद्दल ते तक्रार करत नाहीत.

१९८८ मध्ये आम्ही १० कार्यकर्त्यांनी मिळून प्रबोध उद्योग समूहाची स्थापना केली. त्यात ते अग्रेसर होते. या उद्योगाला गेल्या वर्षी २५ वर्षे पूर्ण झाली. मी हळूहळू पूर्ण वेळ प्रबोधिनीच्या सामाजिक कामांकडे वळलो. तेही 'स्वरूपवर्धिनी', 'म. ए. सोसायटी' यांसारख्या संस्थांमध्ये पुष्कळ वेळ देऊ लागले. प्रबोधिनीच्या शिवप्रदेश न्यासाचे ते उपकार्याध्यक्ष आहेत.

आजही आमचे वैचारिक आदान-प्रदान नेहमी चालू असते. 'समाजात काय घडले पाहिजे', यावर अजूनही रात्री उशिरापर्यंत आमच्या चर्चा रंगतात. जवळजवळ ५० वर्षांच्या ध्येय-प्रवासात कशीकशी एकत्र वाटचाल झाली याच्या आठवणीही कधीकधी निघतात.

'ग्रामीण विकास' हा दोघांचा आस्थाविषय. मध्यंतरीच्या काळात वेगवेगळ्या क्षेत्रांत व्यावहारिक कामे झाली, तरी प्रबोधिनी हा संदर्भ आला की, ती नाळ पुन्हा जुळते. जुन्या शिबिरांच्या, एकत्र म्हटलेल्या पद्यांच्या आठवणी ताज्या होतात. रामभाऊ स्वत: उत्तम कवी असल्यामुळे प्रबोधिनीची अनेक पद्ये त्यांनी रचली आहेत. प्रबोधिनीत पद्याच्या खाली व्यक्तीचे नाव लिहिण्याची पद्धत नसल्याने बाहेरच्या वर्तुळात रामभाऊंचे काव्यसौष्ठव माहीत असेलच असे नाही. त्यातले,

'एकजीव उमदे व्हावे
जनजीवन गावोगावी ।
या माझ्या भारतदेशी
सुखस्वप्ने फुलून यावी ।।'

हे पद्य तर माझेही जीवनगाणे झाले आहे.

दरवर्षी दिवाळीच्या भेटकार्डावर काही चारोळीवजा कविता मीही जुळवतो, तेव्हा काना-मात्रांमध्ये मला अडखळायला होते. अशावेळी मी ती कविता रामभाऊंकडे सोपवतो. ते तिच्यामध्ये शुद्धता आणि लालित्य आणतात. कवितेखाली माझे नाव मात्र उगाच छापले जाते. बहुधा त्यामुळेच आमच्या जोडीतील काव्याची गोडी आजवर टिकून आहे.

**– सुभाष देशपांडे, रामचंद्र डिंबळे**
*ज्ञान प्रबोधिनी,*
*५१० सदाशिव पेठ, पुणे ३०.*

## पक्षी जगत



**स्थलांतरित पक्ष्यांचे आश्चर्यकारक कालव्यवस्थापन -** गेली किमान सात वर्षे तरी मी फर्ग्युसन महाविद्यालयाच्या आवारात येणाऱ्या एका पक्ष्यावर लक्ष ठेवून आहे. हा पक्षी चिमणीपेक्षा लहान व हरित रंगाचा असल्याने सहजी दिसत नाही. मात्र, हा आवाज करणारा पक्षी असल्याने त्याचे आगमन लगेचच कळून येते. हा छोट्या म्हणजे हिरवा वटवट्या होय. जोपर्यंत त्यांचा मुक्काम इथे, तोपर्यंत सतत त्याचा 'चिवीच !' असा स्वर कानांवर पडत असतो. माझ्या नोंदीनुसार गेल्या सात वर्षांत हा पक्षी ९ ते १५ सप्टेंबर या दरम्यान येतो आहे.

प्रसिद्ध पक्षिशास्त्रज्ञ डॉ. सलिम अली यांच्या पाली हिलवरील घराच्या हिरवळीवर एक धोबीपक्षी नियमितपणे ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात दाखल होई. त्याच ठिकाणी व त्याच काळात पोहोचायचे भान पक्ष्यांना कसे असते? तुमच्या भागात अशाप्रकारच्या स्थलांतरित पक्ष्यांची निरीक्षणे नोंदवा आणि आम्हाला कळवा.

*- प्रा. संजीव नलावडे, पुणे*

**भेट द्या : राष्ट्रीय शैक्षणिक संस्था : IIST,** तिरुअनंतपुरम, केरळ
(Indian Institute of Space Science and Technology) अवकाश संशोधन आणि तंत्रज्ञान
**शुभेच्छुक – सौ. स्नेहा शरद मुजुमदार, पुणे ५२**

# ज्ञान प्रबोधिनीची संग्राह्य पुस्तके

**समृद्ध आशय, तज्ज्ञ लेखक, आकर्षक छपाई, माफक किंमत !**

वितरक : छात्र प्रबोधन संपर्क – ०२० –२४२०७१७४/१७९/१०६




**✻ कथासंग्रह**

- मृद्गंध व मोहोर (प्रत्येकी) ६०
- बहर ५०
- कहाणी दोन भावांची ३०
- मृदुभाव जागे होता.. ३०
- प्रेरक कथा.. ४०

**✻ ललित लेखसंग्रह**

- अलगुज ५०
- केवड्याचं पान ५०
- बकुळफुलं ६०

**✻ नामवंतांच्या काव्याची रसग्रहणात्मक पुस्तके**

- गंध मोहवी काव्याचा भाग १ व २ प्रत्येकी ७०

**✻ माहितीपर पुस्तके**

- गिर्यारोहणगाथा ४०
- आपला पाऊस ३०
- छंद आकाश दर्शनाचा ८०

**✻ व्यक्तिविकासाशी निगडित पुस्तके**

- व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत ७०
- प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास ५०
- कल्पक बनू या. ८०
- Be Creative . १५०
- तरंग मनाचे ५०
- गीता–गीताई १०

**✻ शिक्षक-पालकांसाठी उपयुक्त पुस्तके**

- बुद्धिवैभव २५
- Glory of Intelligence . ३०
- हसत खेळत बुद्धिविकास भाग–१ व २ प्रत्येकी १५०
- Enhancing the Potential through Play-1&2 each १५०
- गंमत मोठ्ठं होण्यातली १५०
- रूप पालटू शिक्षणाचे ३०
- सामाजिक जाणीव संवर्धन... ८०
- आश्वासक पालकत्व ८०
- प्रबोधन गीते पुस्तक ३०
- प्रबोधन गीते MP3 Audio CD ५०
- मनुष्य घडणीसाठी आवाहन खंड १ १३०
- मनुष्य घडणीसाठी आवाहन खंड २ १२०
- राष्ट्रघडणीसाठी मनुष्यघडण १००

**✻ कविता/काव्यपंक्ती संग्रह**

- अक्षरबोली ३०
- कवितेच्या गावा ३०
- शब्दांची रत्ने ६०

**✻ प्रेरणादायी, अनुभवपर पुस्तके**

- जिद्दीची लोभस रूपं ६०
- आयुष्यातील वादळलाटा ७०
- कथा इस्रोची ६०
- आम्ही असे घडलो ८०
- हरिसिंह नलुआ.. ६०

**✻ विचार व कृतिप्रवर्तक लेखांचा संग्रह**

- स्वीकारशील स्वदेशी ५०
- हरित संदेश १५
- Green Messages . २०
- हट्टी व्हा हट्टी ६०

**✻ अभ्यासविषयक/कृतिपर पुस्तके**

- असे घटते सुंदर अक्षर २०
- प्रज्ञाबोध भाग–४ ६०
- प्रज्ञाबोध भाग–५ ७०
- त्रिमितीची किमया ८०
- 3D Magic . ९०

**✻ ज्ञान प्रबोधिनीची चरित्रात्मक व वैचारिक पुस्तके**

- राष्ट्रद्रष्टे विवेकानंद १२०
- विवेकानंद–कन्या भगिनी निवेदिता ८०
- ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक वि. वि. पेंडसे १००
- विवेकानंदांचा राष्ट्रधर्म ६०
- समर्थ रामदास काय म्हणाले? ६०
- राष्ट्रदेवो भव ५०
- स्मृतीतुनी स्फुरो कृती १५
- महात्मा गांधींचा राष्ट्रधर्म ३०
- महर्षी दयानंद काय म्हणाले? ३०
- स्वत:ला घडविण्यासाठी उपासना ३०

**✻ ज्ञान प्रबोधिनी खंड – ४**

- भाग – १ शिक्षण प्रभाग १००
- भाग – २ संशोधन प्रभाग १००
- भाग – ३ ग्रामविकसन प्रभाग १००
- चित्ररूप ज्ञान प्रबोधिनी ७५




**छात्र प्रबोधन संदर्भ DVD भाग २, १४४ अंक/७५०० पृष्ठे, फक्त ₹१५०/–**

*प्रयत्नांची करता शिकस्त, सगळा अंधार लोपतो।*
*रस्ता सर्व प्रकाश बनुनी, उत्साह संवर्धितो।।*

शुभेच्छुक – वैद्य धनंजय वसंत कुलकर्णी, पुणे

## दूरचित्रवाणी लोकप्रियता गुणांक (Television Rating Points - TRP)

दूरचित्रवाणी (टेलिव्हिजन)वरच्या काही चॅनेल्सवरचे ठरावीक कार्यक्रम तुम्ही आणि तुमच्यासारखे अनेक जण पाहात असतील. एखाद्या कार्यक्रमातला एखादा प्रसंग, त्यातली उत्सुकता शिगेला पोहोचलेली असते; तेव्हा नेमकी जाहिरात लागते आणि आपली चिडचिड होते. पण जाहिरातदारांना मात्र आनंद होतो; कारण ती जाहिरात तो कार्यक्रम पाहात असलेल्या हजारो लोकांपर्यंत पोहोचते. आणि त्यांचे उद्‌दिष्ट साध्य होते. कधी कधी एखाद्या कार्यक्रमाची लोकप्रियता मध्येच कमी होते; तेव्हा त्याचा *TRP* घसरला असे आपण म्हणतो. साहजिकच त्याचा जाहिरातींवरपण परिणाम होतो.

**हा *TRP* म्हणजे नक्की काय?**

भारतामध्ये **इनटॅम** (इंडियन टेलिव्हिजन ऑडियन्स मेजरमेंट) ही कंपनी दूरदर्शनवरच्या सर्व कार्यक्रमांचा बारीकसारीक तपशील गोळा करते. त्याचे मूल्यांकन (Rating) करते. त्यामुळे कोणता कार्यक्रम लोकप्रिय आहे; म्हणजे कोणत्या कार्यक्रमाचा TRP (Teleevision Rating Point दूरदर्शन मूल्यांकन गुणांक) जास्त आहे ते कळतं. त्यासाठी ही कंपनी दोन पद्धती वापरते.

काही निवडक घरांमध्ये 'पीपल्स मीटर' हे *इलेक्ट्रॉनिक* यंत्र दूरचित्रवाणीला जोडतात. या यंत्रामध्ये कोणता *चॅनेल,* कोणता कार्यक्रम रोजच्या रोज पाहिला जातो याची नोंद होते. प्रत्येक *चॅनेलची* आणि कार्यक्रमाची 'सांकेतिक लिपी' (फ्रिक्वेन्सी) वेगवेगळी असल्यामुळे ती त्या यंत्रावर अचूक नोंदवली जाते. (उदा. पुणे केंद्र, रेडिओ मिरची वेगवेगळ्या फ्रिक्वेन्सीवर लागतात.) नंतर 'इनटॅम' कंपनी सांकेतिक लिपीचे रूपांतर नेहमीच्या लिपीत करते. तो कार्यक्रम, त्या कार्यक्रमात काम करत असलेली माणसं, त्यांचे आवाज अशा सर्व गोष्टींची 'पीपल्स मीटर' वर नोंद होते. हा मीटर अनेक घरांमध्ये बसवलेला असतो, ती सर्व माहिती एकत्र करून कोणता *चॅनेल,* त्यावरील कोणता कार्यक्रम किती वेळा पाहिला जातो, हे समजते. त्यावरूनच कार्यक्रमाचे मूल्यांकन, लोकप्रियता ठरवली जाते. म्हणजेच कार्यक्रमाचा *TRP* ठरवला जातो. पण कधी कधी 'केबल ऑपरेटर्स' चॅनेल्सची 'फ्रिक्वेन्सी' सारखी बदलतात. त्यामुळे 'पीपल्स मीटर्स'मध्ये जी प्रणाली असते, त्या प्रणालीत अचूक माहिती गोळा होत नाही. आता भारतात *TRP* मोजण्यासाठी नवीन आणि जास्त अचूक तंत्रज्ञान वापरात येत आहे. त्यामुळे अगदी बारीकसारीक तपशीलाची नोंद उपकरणात केली जाते.

उपकरणातली माहिती साधारणपणे ३० दिवसांनंतर **'इनटॅम'** ही कंपनी गोळा करून त्याचे विश्लेषण करून एखाद्या *चॅनेलचा* किंवा कार्यक्रमाचा *TRP* किती आहे हे विशेषत: जाहिरातदारांना कळवते.

**(संकलित)**

वैजनाथ दुलंगे/मधुजा पारगावकर



भेट द्या : राष्ट्रीय शैक्षणिक संस्था : AIISH, म्हैसूर, कर्नाटक
(All India Institute of Speech and Hearing) वाचा-श्रवण शास्त्रातील अभ्यासक्रम
शुभेच्छुक – सौ. मेधा लागवणकर, पुणे. – कै. सौ. वसुधा पुरुषोत्तम ठाकूर स्मृतिप्रीत्यर्थ



# समुद्रजीवाणूंपासून प्रतिजैविके

डॉ. सुनीती गोरे

आपला भारत देश हा तीनही बाजूंनी समुद्राने व एका बाजूने हिमालयाने वेढलेला आहे. हे तीनही सागर म्हणजे एक अजब, आगळीवेगळी, समृद्ध आणि विविधतेने नटलेली अशी दुनिया आहे आणि आपल्या जमिनीवरील दुनियेपेक्षा ही कित्येकपट मोठ्ठी आहे. समुद्राबद्दल संशोधन करणाऱ्या भारतातच २० संस्था कार्यरत आहेत. गोवा, तामिळनाडू, केरळ, आंध्रप्रदेश, कर्नाटक, ओडिसा या राज्यांमध्ये त्या संस्था शिक्षण व संशोधन करीत आहेत.

आपल्या पृथ्वीवरील ७१% भाग हा पाण्याने व्यापलेला आहे. आणि फक्त २९% जमीन आहे. ही जमीन आणि त्यावरील अनंत गोष्टी याबद्दल आपल्याला खूप माहिती असते; पण पाण्याने व्यापलेल्या इतक्या मोठ्या भागाबद्दल आपण खूप कमी जाणतो. समुद्राची सरासरी खोली साधारण ४ कि.मी. असते आणि काही महासागरांमध्ये सर्वात खोल बिंदू हा ११ कि.मी.वर आहे. भूभागावरील जीवसृष्टीचा उगमही समुद्रातच झालेला आहे. पहिली तीस लाख वर्षे ही जीवसृष्टी तिथेच मर्यादित होती. या सागरी जीवसृष्टीत आपल्याला माहीत असलेल्या २, २४,०७२ सजीव प्रजाती आहेत तर आपल्याला माहीत नसलेल्या प्रजातींची संख्या ही २५ दशलक्षाच्या आसपास असू शकते. समुद्राच्या तळाशी असणाऱ्या जीवसृष्टीवर समुद्राच्या पाण्याचा प्रचंड दाब असतो. समुद्रातील सर्वात खोल असा जो बिंदू आहे त्याच्यावरील दाब हा ११,३१८ टन्स/मीटर्स$^{२}$ इतका असतो. तेथील सरासरी तापमान हे २° सेल्सिअस असते आणि तिथे प्रकाश पोहोचत नसल्याने खूप अंधारही असतो.

समुद्रातील एक अद्भूत गोष्ट म्हणजे प्रवाळ शैलमाला किंवा प्रचलित भाषेत *Coral Reef.* ऑस्ट्रेलियामधील *Great coral Reef* हे एक जागतिक आश्चर्यच समजले जाते. ही शैलमाला २९०० छोट्या शैलमालांची

*सागर अपुल्या सभोवती, हेच खरं धन आहे।*
*सूक्ष्मजीवांची अनेक रहस्ये, उलगडण्याचे ध्येय आहे।।*

**शुभेच्छुक – श्री. भालचंद्र देव, डोंबिवली**





बनलेली असून त्याची व्याप्ती २३०० किमी पर्यंत आहे. त्याचे क्षेत्रफळ अंदाजे ३४४,४०० स्क्वे. किमी आहे आणि ती शैलमाला म्हणजे जैवविविधतेचा खजिनाच आहे, हे तिथे राहात असलेल्या सजीवांच्या संख्येवरून लक्षात येते. देवमाशांच्या ३० प्रजाती, डॉल्फीन्स, पंधराशे जातींचे मासे, समुद्रसापांच्या १७ प्रजाती, सागरी कासवांच्या असंख्य प्रजाती, शार्कच्या १२५ प्रजाती, समुद्रातील मगरी, समुद्रातील पाइपफिशच्या ४९ प्रजाती, सी-हॉर्सच्या ९ प्रजाती, ७ प्रजातींचे बेडूक, २१५ प्रजातींचे पक्षी, २१९५ पाण वनस्पतींचे प्रकार, समुद्रशैवालांच्या ५०० प्रजाती, ३३० प्रजातींचे, प्रवाळांच्या ४०० जमाती अशा अनंत गोष्टींनी ही प्रवाळ शैलमाला व्यापलेली आहे. जगातील सर्वांत मोठा प्राणी 'ब्लू व्हेल' हा समुद्रात राहतो. तसेच जगातील ३.५ दशलक्ष लोकसंख्या आपल्या उपजीविकेसाठी समुद्रावर अवलंबून आहे.

सागरसृष्टी हा न वापरला गेलेला स्त्रोत आहे. यातील जीवाणूंची संख्या व त्यांचे प्रकार यात किती प्रचंड विविधता आहे, ते आपण पाहिले. ते सागर सृष्टीतील सूक्ष्मजीव वेगवेगळी प्रतिजैविके तयार करत असतील का? असा विचार शास्त्रज्ञांच्या मनात १९५० सालापासूनच यायला लागला. जमिनीतील सूक्ष्मजंतू स्वत:साठी प्रतिजैविके म्हणजेच *Antibiotics* बनवितात. १ ग्रॅम मातीमध्ये काही दशलक्ष जीवाणू राहात असतील तर त्यांच्यामध्ये अन्नद्रव्य व जागा यांच्यासाठी कमालीची जीवघेणी स्पर्धा असते; त्यामुळे एखाद्या जीवाणूने प्रतिजैविक तयार केले, तर आजूबाजूचे अनेक जीवाणू ते प्रतिजैविक मातीत पसरल्याने, मरू शकतात आणि मग त्यांच्यातील जीवघेणी स्पर्धा थोडीतरी कमी होते. आजपर्यंत आपण वापरत असलेली प्रतिजैविके ही जमिनीत सापडत असलेल्या जीवाणू किंवा बुरशीपासून बनविलेली होती. १९२८ साली अपघाताने शोध लागलेले पहिले प्रतिजैविक 'पेनिसिलीन' हे 'पेनिसिलीअम' नावाच्या बुरशीपासून तयार झाले. या प्रतिजैविकाच्या उपयुक्ततेनंतर अनेक नवनवीन प्रतिजैविके शोधण्यात शास्त्रज्ञांना यश आले आणि जंतूसंसर्गाने होणाऱ्या अनेक रोगांशी मुकाबला करता येऊ लागला. कालांतराने अतिवापरामुळे आणि चुकीच्या वापरामुळे अनेक जीवाणू या प्रतिजैविकांना प्रतिसाद न देणारे *(Resistant)* झाले. म्हणून नवीन प्रतिजैविके शोधून काढणे आपल्याला क्रमप्राप्त झाले.

त्यासाठी शास्त्रज्ञांना सागर सृष्टी हा असाच एक न वापरला गेलेला स्त्रोत खुणावत होता. भूपृष्ठावर सापडणाऱ्या जीवाणूंपेक्षा समुद्र जीवाणू खूप वेगळे आहेत. समुद्राच्या पाण्याचा प्रचंड दाब सहन करणारे किंवा हा दाब आवडणारे *(Barophilic)* असे जीवाणू तेथे आहेत. ते समुद्रातील अनेक क्षारांच्या संपर्कात सतत असतात. त्यामुळे त्यांना प्रयोगशाळेत वाढविताना खूप जास्त प्रमाणात क्षारमात्रा द्यावी लागते. या जीवाणूंना आपण *Halophilic* किंवा क्षारप्रेमी असे म्हणू शकतो. काही जीवाणूंना इतके क्षार लागत नाहीत; पण ते जीवाणू क्षारांचे जास्त प्रमाण सहन करू शकतात. त्यांना आपण *Haloduric* असे म्हणतो. तसेच समुद्रातील तापमान हे खूप बदलते असते. वरच्या थरातील तापमान व तळाचे तापमान यात खूप फरक असतो. काही जीवाणू हे २° तापमानात तर काही उच्च तापमानाच्या *Hydrothermal vents* मध्येही सापडतात. या सर्व पर्यावरण व त्यातील बदलांशी जीवाणूंनी उत्तम जुळवून घेतलेले असते. या विशिष्ट वातावरणात तग धरून राहाण्यासाठी त्यांच्यात काही विशिष्ट बदलही

**भेट द्या : राष्ट्रीय शैक्षणिक संस्था : FTII, पुणे**
(Film and Television Institute of India) दूरचित्रवाणी व चित्रपट क्षेत्राशी निगडित अभ्यासक्रम
**शुभेच्छुक – श्री. सुधीर रायकर, डोंबिवली**

झालेले असतात. अशा जीवाणूंना *Archaebacteria* किंवा *Archea* असेही संबोधले जाते.

हे असे वेगळे सूक्ष्मजीव काही प्रतिजैविके तयार करीत असतील का? असा विचार शास्त्रज्ञांच्या मनात आला. १९५० सालीच समुद्रातील सूक्ष्म जीवांपासून प्रतिजैविके शोधण्याच्या कार्याला शास्त्रज्ञांनी सुरुवात केली. समुद्राच्या पाण्याचे, गाळाचे, किनाऱ्यावरील तसेच समुद्रतळाच्या मातीचे नमुने घेऊन, त्यातील सूक्ष्म जीव हे कृत्रिम पोषण माध्यमांवर वाढविण्यात आले. प्रयोगशाळेत ते *Pure culture form* मध्ये काचेच्या *Perri Plate* मध्ये वेगळे ठेवून त्यांचे वर्गीकरण करण्यात आले. यातील प्रत्येक जीवाणू स्वतंत्रपणे प्रतिजैविके तयार करणाऱ्या पोषण माध्यमांवर वाढविल्यानंतर त्यांच्यातील काही जीवाणूंनी (१०-१५ टक्के) प्रतिजैविक तयार केले. हे प्रतिजैविक, माध्यमातील वापरले न गेलेले अन्नघटक, प्रतिजैविक तयार करणारे अगणित जीवाणू आणि त्यांचे by products यांचे मिश्रण होते. त्यातून प्रतिजैविक वेगळे करण्यासाठी विविध प्रक्रिया आणि तंत्रज्ञान वापरले गेले आणि त्याद्वारे प्रतिजैविक वेगळे करण्यात आले. या तंत्रज्ञानाच्या मदतीने हे प्रतिजैविक किती घटकांपासून बनलेले आहे, हे शोधण्यात आले. यातील कोणता घटक *Antibacterial activity* दाखवतो, हे पाहिले गेले. ते शुद्ध स्वरूपात आणले गेले आणि मग त्याच्या विविध चाचण्या करण्यात आल्या. त्याद्वारे त्या प्रतिजैविकाच्या रेणूचा रेण्वीय भार, (moleculer weight) रासायनिक सूत्र व नंतर *Structure* असे शोधण्यात आले. या प्रतिजैविकाचा सजीव प्राण्यांवर काही विपरित परिणाम तर होत नाही ना हे पाहण्यासाठी Toxicological चाचण्या करण्यात आल्या, आणि अनेक प्रकारच्या गुणवत्तेच्या चाचण्यांमधून पास होऊन प्रतिजैविक तयार झाले. आज समुद्रातील सूक्ष्म जीवांपासून अशी अनेक प्रतिजैविके तयार होत आहेत.

अशाप्रकारे पहिले प्रतिजैविक तयार झाले, ते होते *Bromoutilis* या जीवाणूपासून. वर्कहोल्डर नावाच्या शास्त्रज्ञाने हे प्रतिजैविक तयार केले. सर्वांत नवीन *Thiopeptide* प्रकारचे प्रतिजैविक *T P1161* हे समुद्रातील *Nocardiopsis* नावाच्या जीवाणूपासून तयार झाले. *Gram +* व *Gram -* या जीवाणूंमुळे होणाऱ्या





संसर्गावर *Thiopeptide* हे प्रतिजैविक वापरता येते. जपानमध्ये नव्याने शोधलेल्या एका जीवाणूपासून *Pelagiobacter Variabilis* पासून *Phenazine* प्रकारचे प्रजिजैविक तयार करण्यात आले. *Pelagiomicin A, B* आणि *C* असे त्याचे तीन प्रकार होते आणि ते फक्त जिवाणू प्रतिबंधकच *(antibacterial activity)* नाही, तर ट्युमर प्रतिबंधक *(antitumor)* म्हणूनही वापरता येते.

समुद्रातील फक्त जीवाणूंचाच उपयोग प्रतिजैविके

*ही सागरवेष्टित भूमी सुजला सुफला।*
*त्यात दडली अनंत रत्ने, प्रवाळ शैलमाला।।*

**शुभेच्छुक – सौ. स्वाती वैभव बर्वे, पुणे ४,** सुखदा प्रकाशन, दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

Happy Diwali

**Joshi & Company**

armacell
engineered foams

**Authorised Dealers of Armacell Industrial Materials**

Shop No. 15, 'B' Wing,
Orchid Complex, 1367,
Sadashiv Peth, Pune-411 030

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

मनमोहक, आकर्षक, रंगसंगती
कुटुंबातील प्रत्येकांना
एक वेगळा सुखद-आनंदमयी अनुभव,
अत्याधुनिक व आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त
भारतातील एकमेव वातानुकूलित पेंट शोरूम...

SINCE-1952
ग्राहकांचा विश्वास हेच आमचे यश...
**भारत पेंट कंपनी**
a paint showroom
टिळक चौक रोड, सोलापूर.
फोन : ०२१७-२३२६९३१/३२

HAPPY DIWALI

*Waiting to win is common to all,*
*but working to win is the style of a champion!*

**Padmini Enterprises**

**Dealers in Pathological Instruments, Chemicals & Reagents**

Address : **Office No. 113, Swamipuram,**
**Wing 'C', 2160 A, Sadashiv Peth,**
**Near Dandekar Bridge, Pune - 411 030.**
Phone No.: **020-24327533**
Mobile No.: **9822113598 / 9850652562**

**भेट द्या : राष्ट्रीय शैक्षणिक संस्था - IARI,** दिल्ली
(Indian Agricultural Research Institute) कृषिविषयक अभ्यासक्रम
**शुभेच्छुक – श्री. शरद गद्रे, डोंबिवली** –'आईच्या स्मृतिप्रीत्यर्थ.'

बनविण्यासाठी केला जातो असे नाही, तर तेथील स्पाँज (sponges), जेलीफिश, सॉफ्ट कोरल्स, शैवाल (Algae) देखील प्रतिजैविके बनविण्यासाठी वापरली जातात. *Asperdiol* नावाचे संयुग जे *Eunicea asperrula* नावाच्या *gorgonian* पासून मिळविले आहे, त्याची फक्त *antibacterial activity* नसून रक्ताच्या कर्करोगाच्या *(Leukaemia)* पेशींवरही ते प्रतिबंधक म्हणून काम करीत आहे. *Ziconotide ho Peptide* हा घटक समुद्रीय शंखाच्या गोगलगायी *(Cone snail)* पासून विलग करण्यात आला. त्याला डिसेंबर २००४ मध्ये *U.S. FDA* ने वेदनाशामक म्हणून मान्यता दिली आहे. Trabectidin हे कर्करोग प्रतिबंधक औषध म्हणून ऑक्टोबर २००७ मध्ये मान्यता दिलेले औषध, समुद्रीय जीवांपासून मिळविले होते.

पेशीच्या वाढीसाठी, पेशी जिवंत राहण्यासाठी अनेक प्रकारचे समुद्र जीवाणू उपयोगी पडतात. *Agelasphin* हे समुद्रातील *Agelas mauritianus* नावाच्या *sponge* पासून मिळविलेले संयुग कॅन्सर प्रतिबंधक आहे. त्याची सध्या पहिल्या टप्प्यातील वैद्यकीय चाचणी सुरू आहे. हे संयुग स्वादुपिंडाचा दाह कमी करणे आणि मधुमेहावर सुद्धा वापरता येते.

सर्व सूक्ष्मजीवशास्त्र प्रयोगशाळेत वापरले जाणारा *Agar Agar* हा घटक कृत्रिम माध्यमांना *Solidify* करण्यासाठी वापरतात. ते *Gelidium corneum* नावाच्या समुद्र शैवालापासून बनविले जाते. या *Agar* च्या वापरामुळेच तर आपल्याला सूक्ष्म जीवांच्या *colonies* दिसू शकतात. ते जीवाणू प्रयोगशाळेत वाढविता येतात.



आत्तापर्यंत झालेल्या समुद्रीय जीवांवरील संशोधनातून आपल्याला २५००० हून जास्त संयुगे सापडली आहेत. त्यातील ३० संयुगांवर वैद्यकीय चाचण्या चालू आहेत आणि १० संयुगे औषध स्वरूपात वापरात आहेत.

असे महत्त्वपूर्ण संशोधन अनेक देशांत, अनेक प्रयोगशाळांत चालू आहे. कोणतेही संयुग हे औषध स्वरूपात येण्यासाठी जवळपास पंधरा वर्षं लागतात. त्याच्या शेकडो चाचण्या आणि त्यानंतर *FDA* ची मंजुरी मिळाली, की मग त्याचे उत्पादन करता येते.

आता जेव्हा कधी समुद्रावर फिरायला जाल, तेव्हा समुद्रीय जीवांचा नक्की विचार करा. कुणास ठाऊक कदाचित् तुम्हीही असे एखादे संयुग शोधून काढू शकाल. कारण सागर सृष्टी ही अनंत, अमर्याद आहे आणि अजूनही न उलगडलेली अनेक रहस्ये त्यात दडलेली आहेत !


**– डॉ. सुनीती गोरे**

*ज्ञानेश्वर पादुका चौक, ११२८, शिवाजीनगर, पुणे - 16*

suneetigore@gmail.com


**शेवाळ्यामध्ये अनेक घड्याळे ?**

‘गोनिओलक्स’ हे समुद्रातलं एकपेशीय शेवाळ (अलगी). ठरावीक वेळेस स्वत:मधून प्रकाश बाहेर टाकतं, त्यावेळेस ते खूप चमकतं ! त्याचं हे प्रकाशणं मध्यरात्री होतं! ह्या शेवाळ्याला जर २४ तास अंधारात किंवा उजेडात ठेवलं तरीसुद्धा ते ठरावीक वेळीच प्रकाश बाहेर टाकतं! कारण त्याच्यामध्ये ‘ल्युसीफेरीन’ हे चमकण्यासाठी लागणारं रसायन ठरावीक वेळीच तयार होतं ! अन्न तयार करण्याची त्यांच्यामधली क्रिया भर दुपारी जास्त असते. तर पेशींचं विभाजन झुंजूमुंजू झाल्यावर लगेचच; पण थोडाकाळ होतं ! ह्या शेवाळ्याला बरेच दिवस अंधारात ठेवलं तर त्याचं प्रकाशणं काही दिवसानंतर कमी होतं. नेहमीपेक्षा कमी तीव्रतेच्या प्रकाशात ठेवलं तर त्याचं प्रकाशणं चालू राहातं, पण अन्न तयार करण्याची प्रक्रिया मात्र कमी-कमी होत जाते आणि पेशींचं विभाजन पूर्ण थांबतं ! प्रत्येक कार्यासाठी ‘गोनिओलक्स’मध्ये वेगवेगळी घड्याळं असावीत. **(संकलित)**


*ऐसे करता घडते ऐसे, तैसे करता काय घडे।*
*प्रयोग करती जे शंकासुर, तेच उद्याचे वीर बडे।।*

**शुभेच्छुक – मार्व्हेल सर्व्हिस एन्टरप्राइझेस, सोलापूर**

# दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

‘‘झेपावणाऱ्या पंखांना क्षितिजं नसतात
त्यांना फक्त झेपेच्या कवेत येणारे आकाश असते ।
आणि सृजनशील साहसांना सीमा नसतात
त्यांना फक्त ‘सुयोग्य दिशा’ हवी असते ।। ’’

गेल्या कित्येक पिढ्यांशी जुळलेला विश्वास...

## किर्लोस्कर पंपस्

Kirloskar
Enriching Lives



अधिकृत वितरक } ॲक्वालीफ्ट इंजिनिअर्स ॲण्ड सोल्यूशन्स् प्रा.लि.
फोन : ६४००४९९६, ३२५२५२४५. E-mail - alepumps@yahoo.com





**भेट द्या : राष्ट्रीय शैक्षणिक संस्था - IIFM,** भोपाळ, मध्यप्रदेश
(Indian Institute of Forest Management) वन व्यवस्थापन अभ्यासक्रम

**शुभेच्छुक – सौ. माधुरी बनसोड, पुणे**

# प्रवासाच्या खिडकीमधुनी...

प्रवासामधे खिडकीमधुनी बघत राहावे दृश्य विहंगम
काचेमधुनी आरपार ते– डोंगर झाडी, फुले मनोरम...

खिडकीमधुनी इकडे तिकडे पाऊस–वारा करितो दंगा
ऊन–सावलीसंगे सलगी, अंगांगावर घाली पिंगा

खिडकीच्या त्या चौकटीतुनी दिसते शेती, शिवार सुंदर
वावरातुनी वावर ज्याचा असा हासरा जिवंत निर्झर

गजापलिकडे नभांगणावर सूर्यबिंब तेजाळत पळते
भगभगीत त्या चैतन्याची भगवी आभा किती फाकते..!

मार्गावरूनी वाहत येई कडे– कपारींमधला दरवळ
दरडींनाही जखडून ठेवी चिवट असा तो विशाल पिंपळ

झाडा–झुडुपांवरती वेली, पारंब्यांचे धमाल झोके
कॅमेऱ्याने किती टिपावे चित्रपटांचे रंग अनोखे?

तिथे दुतर्फा उडती फिरती दरिखोऱ्यातून पक्षी–प्राणी
क्षणचित्रांतून सळसळणारी हिरवी पिवळी गवती गाणी...!

'धस्स' उरी अन् शब्दहीन मी इमारतींचे लक्ष मनोरे
बोगद्यातूनी हमरस्त्यावर धूर–धुळीचे धुके, फवारे

वाऱ्यासोबत डोळ्यांवरती हळूच येई सुंदर डुलकी
मुक्कामाचे ठिकाण येता जागी करते मजला खिडकी...

प्रवासामधे खिडकी मिळता प्रवास होई इतका सुंदर
सृष्टीसंगे तारा जुळती अंतऱ्यामध्ये कसले अंतर?

– **आश्लेषा महाजन**
*'मंजिरी', २३०, चित्ररेखा सोसा. सहकारनगर क्र. १, पुणे 411009*



*चित्रकार : राहुल देशपांडे*


Kirloskar
Enriching Lives
Seasons Greetings!
Engineering Smiles !
KIRLOSKAR OIL ENGINES LIMITED
Laxmanrao Kirloskar Road, Khadki, Pune 411 003 INDIA
Tel. : +91(20) 2581 5341, 2581 0341
Fax : +91(20) 2581 3208, 25810209
www.koel.co.in



# पंख असलेला माणूस!

*भारत सासणे*

डॉ. गरुड यांचे साहाय्यक म्हणून मी (म्हणजे शाम) व माझा मित्र राम अनेक शोधमोहिमांवर गेलो होतो. त्या दिवशी अचानक डॉ. गरुडांचा फोन वाजला.

*'रूप पालटू देशाचे' या ध्येयाच्या दिशेने शालेय व महाविद्यालयीन युवक-युवतींसाठी नेतृत्व शिक्षणाचे उपक्रम योजणारी संघटना - युवक व युवती विभाग, ज्ञान प्रबोधिनी*

**शुभेच्छुक - श्री. रवींद्र गजेंद्रगडकर, पुणे**



डॉ. कसमळकर यांनी अभियांत्रिकी तज्ज्ञ म्हणून अनेक वर्षे COEP मध्ये अध्यापन केल्यानंतर, निवृत्तीच्या काळात आपल्या अध्यात्मिक आवड आणि व्यासंगातून गीता तत्त्वज्ञानातील 'भक्ती' हे दालन या पुस्तिकेतून खुले केले आहे.



*This Mathematical thriller is written by Indraneel at the age of 15. He explains mathematical concepts, not theoretically, but through a story of two young heroes saving the world through their mathematical powers.*

*Many Thanks to Chhatra Prabodhan from Kasmalkar Family*



**प्लास्टिकचा पुनर्वापर**
**ही आपली जबाबदारी आहे**

प्लास्टिकचा पुनर्वापर म्हणजेच पर्यावरणाचे रक्षण...

**NICHROME** Packaging Solutions

NICHROME INDIA LTD. Saffire Park Galleria, 4, Pune-Mumbai Road, Shivajinagar, Pune – 411 005, India
Tel.: +91 - 20 - 6601 1001 Fax: +91 - 20 - 6601 1010 E-mail: marketing@nichrome.com www.nichrome.com

Packaging Solutions For • Liquid • Grains • Powders • Seeds • Snacks • Pharma • Personal Care




*ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक प्रणालीच्या व प्रयोगांच्या विस्ताराचे,*
*प्रसाराचे व संघटनेचे एक प्रभावी माध्यम – छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी.*

**शुभेच्छुक – श्री. उदय कर्वे, डोंबिवली**

***कुठूनतरी 'किच्... किच्... किच्' असा आवाज माझ्या कानावर पडला. आम्ही तल्लख होऊन सावध बसून राहिलो. पूर्णचंद्राचा प्रकाश धबधब्यावर पडलेला होता. आणि त्यात आम्हाला अचानक तो पंख असलेला माणूस दिसायला लागला. तो अतिशय वेगाने खडकांच्या सुळक्यांवरून आणि कपारींवरून लीलया उतरत होता. आणि अखेरच्या टप्प्यावर त्याने पंख पसरले. ते पंख अर्धपारदर्शक असे होते. पूर्णचंद्राच्या बिंबाच्या आड ती विलक्षण थक्क करणारी मनुष्याकृती तरंगू लागली.***

आम्ही त्यांच्या ऑफिसात गेलो. गरुडांनी त्यांच्या टेबलावरचा टेपरेकॉर्डर सुरू करत निवेदन करायला सुरुवात केली. आम्ही ऐकत राहिलो.

**गरुडांनी सांगितलेली हकिकत**

''काही वर्षांपूर्वीची हकिकत आहे. माझे गुरू आणि त्यांच्या क्षेत्रातील एक विद्वान डॉ. हॅमर्टन मध्यप्रदेशच्या सीमेवरच्या निबिड जंगलातील 'भीषणगड' नावाने प्रसिद्ध असलेल्या गडावर संशोधनासाठी वास्तव्याला होते. मी त्यावेळी कामानिमित्त देशाबाहेर होतो. त्यांच्या अखेरच्या पत्रानुसार त्यांचं *'क्रिप्टोझूलॉजी'* या शास्त्रशाखेत एक धक्कादायक संशोधन चाललेलं होतं. डॉ. स्टिफन्स व डॉ. चटर्जी त्यांना मदत करत होते. डॉ. हॅमर्टन यांना वंशशास्त्रातील एका गूढाचा शोध लागला होता. भीषणगडच्या परिसरात एक मानवसदृश्य प्राणी राहत असून त्याला चक्क पंख असतात, असा शोध लागल्यामुळे या प्राण्याच्या शोधात डॉ. हॅमर्टन आपल्या सहकाऱ्यांच्यासमवेत भीषणगडच्या परिसरामध्ये भ्रमंती करत होते; पण हे सर्वजण एकाएकी नाहीसे झाले. मात्र, डॉ. चटर्जीने लिहून ठेवलेला अत्यंत स्फोटक असा वृत्तांत नुकताच सापडला आहे.

त्यातील मजकुराने मी चक्रावून गेलो. हा मजकूर धक्कादायक व आश्चर्यकारक असून संशोधनाला पात्र आहे. 'पंख असलेली माणसे अस्तित्वात होती' असे उल्लेख पुराणात असले आणि हे उल्लेख अतिरंजित असले, तरी प्रत्यक्षात माणसासारखा दिसणारा व पंख असलेला असा एखादा जीव अस्तित्वात असेल काय याबद्दल *क्रिप्टोझूलॉजी* या शास्त्रशाखेत उल्लेख करून ठेवलेले आहेत. जगभरात असा माणूस किंवा असा प्राणी दिसला असल्याच्या बातम्या ऐकायला व वाचायला मिळत असतात. मात्र, ठोस असे शास्त्रीय पुरावे अद्याप कोणालाही मिळालेले नाही.

मी आणि राम, ते निवेदन स्तब्धपणे ऐकत राहिलो. त्याचा संक्षिप्त वृत्तांत पुढीलप्रमाणे -

**डॉ. चटर्जींनी लिहिलेला वृत्तांत**

डॉ. चटर्जी यांनी कित्येक वर्षांपूर्वीच्या जुन्या वहीवर लिहून ठेवलेला आणि अस्पष्ट झालेला मजकूर डॉ. गरुडांनी वाचायला सुरुवात केली. त्यांच्या गंभीर आवाजातील तो वृत्तांत ध्वनिमुद्रित होऊ लागला. त्याचे सार असे होते-

''...माझे गुरू डॉ. हॅमर्टन यांच्याबरोबर भीषणगडच्या परिसरातील जंगलामध्ये भटकंती करत असताना आम्हाला विलक्षण आणि अद्भुत असे अनुभव आले. उडते साप, झाडावर चढणारे मासे इत्यादी विचित्र जीवांचा शोध लावल्यानंतर अचानक आम्हाला भीषणगडच्या जंगलात पंख असलेला माणूस अस्तित्वात असल्याचा सुगावा लागला. या प्राण्याला प्रत्यक्ष पाहण्याची दुर्मीळ संधी आम्हाला मिळणार होती आणि त्याप्रमाणे आम्ही जायचे ठरविले...''

डॉ. चॅटर्जींच्या हकिकतीवरून असे दिसत होते की, गुरू डॉ. हॅमर्टन आणि त्यांचे दोन सहकारी विशिष्ट पौर्णिमेच्या रात्री डोंगरावरच्या एका उतारावर जाऊन बसणार होते. या डोंगरावरून 'त्रिधारा' या नावाने ओळखला जाणारा एक धबधबा पडतो. स्थानिक लोकांच्या अनुभवानुसार पौर्णिमेच्या रात्री हा प्राणी इथे पाणी प्यायला येतो व स्थानिक आदिवासींनी त्याला उतरताना, उडताना आणि पाणी पिताना पाहिलं आहे. या प्राण्याची उंची साडेचार ते पाच फूट असावी. हा प्राणी

*पौर्णिमेची रात्र, मंद आहे वारा।*
*पंखधारी मानवाला कुठे मिळेल निवारा?*

**शुभेच्छुक – सौ. गुंजन अर्चिस कुलकर्णी, नाशिक –**'आत्मदीपो भव'कुलकर्णी परिवार यांजकडून शुभेच्छा !

माणसासारखाच दिसतो आणि त्याला वटवाघुळासारखे काखेत चिकटलेले पंख असतात. प्राचीन गुहा, डोंगराच्या कपारी इत्यादी ठिकाणी समूहाने हा राहत असावा. त्याच्या अन्नभक्षण इत्यादी सवयींबाबत कोणताही अभ्यास अद्याप झालेला नाही.

त्या रात्री म्हणजे दिनांक २३ डिसेंबर १९५८ रोजी डॉ. हॅमर्टन व डॉ. चटर्जी आपल्या दुसऱ्या सहकाऱ्यासह अतिशय अवघड अशा डोंगराच्या कपारीत दुर्बीण घेऊन बसून राहिले. पौर्णिमेचा चंद्र डोक्यावर आला होता आणि सर्वत्र स्तब्धता होती. दुधासारखा प्रकाश सगळ्या जंगलावर आणि डोंगरावर पसरून राहिला होता. फक्त धबधब्याचा आवाजच तेवढा ऐकू येत होता. अशा परिस्थितीत अचानक दबा धरून बसलेल्या या संशोधक त्रयींना ते अद्‌भुत दृश्य पाहायला मिळाले. धबधब्याच्या जवळ उंच कपारीतून त्यांनी खाली उतरणाऱ्या त्या प्राण्याला पाहिले. तो प्राणी माणसासारखाच होता आणि खडकाच्या टप्प्याटप्प्यावरून उड्या घेत खाली उतरत होता. नंतर त्याने आपले पंख पसरले आणि पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राच्या प्रकाशात तो अद्‌भुत प्राणी या संशोधकांना स्पष्ट दिसून आला. हा प्राणी उडाल्याप्रमाणे काही काळ हवेत स्थिर झाल्यानंतर खडकावर उतरला आणि माणसाप्रमाणे ओंजळीतून पाणी पिऊ लागला. अत्यंत उत्तेजित झालेले डॉ. हॅमर्टन, 'नको' म्हणत असतानासुद्धा त्या प्राण्याच्या जास्तीत जास्त जवळ जाण्याचा प्रयत्न करू लागले व खडकांना धरून चढत चढत धबधब्याच्या जवळ पोहोचू लागले. तो प्राणी त्यांच्यावर अचानक हल्ला करेल असे डॉ. चटर्जी यांना वाटले नाही. पण चाहुल लागताच पंख असलेला तो मानवसदृश्य प्राणी अचानक ओरडला. त्याचे हे ओरडणे घोड्याच्या खिंकाळण्यासारखे होते. हवेत झेप घेऊन त्याने डॉ. हॅमर्टन यांच्यावर हल्ला चढवला. नंतर डॉ. हॅमर्टन हात निसटून खोल दरीत धबधब्यामध्ये पडले. त्यानंतर ते कुणालाच दिसले नाहीत.

डॉ. चटर्जी यांनी त्यानंतर विशेष काही नोंदी लिहिलेल्या नाहीत. त्यांचे इंग्रज सहकारी स्टिफन्स इंग्लंडला निघून गेले आणि डॉ. चटर्जी आपल्या गुरूच्या पार्थिवाचा शोध घेत आणि त्या प्राण्याचा शोध घेत काही काळ भीषणगडाच्या परिसरात हिंडत राहिले.

**ध्वनिमुद्रण**

डॉ. चटर्जी यांनी लिहून ठेवलेला आश्चर्यकारक वृत्तांत वाचून दाखवल्यानंतर डॉ. गरुड थोडा वेळ थांबले. आणि म्हणाले,

''डॉ. चटर्जी यांनी जे पाहिलं ते या वहीत लिहिलेलं आहे... आणि हे लिखाण मूळ लिखाण आहे असं दिसतं... पण डॉ. स्टिफन्सचे पुढे काय झाले याबद्दल तुमच्या मनात उत्सुकता असेल. त्याबद्‌दल तुम्हाला सांगतो...''

''डॉ. स्टिफन्स काही दिवस भीषणगडला राहून आपल्या मायदेशी इंग्लंडला परत गेले. पण जाण्यापूर्वी त्यांनी त्यांचे गुरू डॉ. हॅमर्टन यांचा शोध घेतला. पाण्याच्या प्रवाहासोबत डॉ. हॅमर्टन यांचे शव वाहून गेले असणारच; परंतु त्यांचा कॅमेरा तुटलेल्या-फुटलेल्या अवस्थेत खडकावर पडलेला आढळून आला. डॉ. स्टिफन्स यांनी या कॅमेऱ्यातल्या *फिल्म 'डेव्हलप'* करायचा प्रयत्न केला; पण त्यांना चांगली छायाचित्रे मिळाली नाहीत. डॉ. स्टिफन्स इंग्लंडला पुन्हा परत गेले. त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी आपले अनुभव कथित स्वरूपात ध्वनिमुद्रित केले. डॉ. जॉन स्टिफन्स हे डॉ. स्टिफन्सचे नातू. आपल्या आजोबांचे ते ध्वनिमुद्रित केलेले निवेदन त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने 'स्वच्छ' केले, जपले व सध्या डॉ. जॉन भारतात आलेले आहेत. पंख असलेल्या माणसाच्या संशोधनाची मोहीम त्यांना पुढे चालवायची आहे. त्यांनी जी ध्वनिमुद्रिका दिलेली आहे, त्यावरून एक वेगळाच थरारक अनुभव आपल्यासमोर प्रकट होतो.

डॉ. गरुड यांनी अशी प्रस्तावना केल्यानंतर टेपरेकॉर्डरवर ध्वनिमुद्रित केलेला कित्येक वर्षांपूर्वीचा डॉ. स्टिफन्स यांचा आवाज ऐकवायला सुरुवात केली. याचा वृत्तांत...



भेट द्या - राष्ट्रीय शैक्षणिक संस्था : IIMC (एकूण शाखा ५)
(Indian Institute of Mass Communication) जनसंपर्क विषयाशी निगडित अभ्यासक्रम
शुभेच्छुक – सौ. वृषाली दिलीप अदवंत, औरंगाबाद – तर्फे दीपावलीच्या शुभेच्छा !

''...माझे गुरू डॉ. हॅमर्टन यांचा असा दारुण अंत झाल्यानंतर मी व डॉ. चटर्जी यांनी त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. परंतु आम्हाला केवळ त्यांचा कॅमेरा सापडला. कॅमेरा फुटला होता, पाण्याने भिजला होता; परंतु *फिल्म डेव्हलप* करता येणे शक्य होते. नंतर मी इंग्लंडला परत गेलो; पण मला वारंवार भीषणगडची आणि त्या अविश्वसनीय अनुभवाची आठवण येत राहिली. पंख असलेला आणि मनुष्यसदृश असलेला एखादा प्राणी अस्तित्वात असेल का याचा शोध घेण्याची गरज मला तीव्रतेने वाटू लागली. पौर्णिमेच्या रात्री पंख पसरून खाली उतरणारा तो माणूस मी कधीच विसरू शकलो नाही. मी पुन्हा भीषणगड येथे जाऊन संशोधन चालू ठेवण्याचे ठरविले...''

त्यानंतर डॉ. स्टिफन्स आपल्या एका सहकाऱ्यासह भीषणगडला आले आणि जुन्या ब्रिटीशकालीन डाक बंगल्यात राहू लागले. गुहा, तसेच डोंगराच्या प्राचीन कपारीतून शोध घ्यायला त्यांनी सुरुवात केली. तसेच स्थानिक आदिवासींनी कधीकाळी या उडत्या माणसाला पाहिले असेल, तर त्याबद्दलची माहितीसुद्धा लिहून ठेवायला सुरुवात केली. एके दिवशी, पौर्णिमेच्या रात्री मात्र, ते अघटित घडले.

झाले असे की, डॉ. स्टिफन्स मध्यरात्रीच्या वेळेस डाकबंगल्याच्या खिडकीजवळ उभे राहून विचार करत होते आणि त्यांच्यासाठी अन्न शिजविले जात होते. अन्नाचा वास खिडकीतून खाली दरीपर्यंत दरवळला असावा. डाकबंगल्याची ती भिंत दरीकडे पसरलेली होती आणि तिथल्या खिडकीतून डोंगराचा उतार, कपारी आणि सुळके दिसत असत. स्तब्ध वातावरण होते. तेवढ्यात अचानक डॉ. स्टिफन्स यांना तो उडता माणूस दिसला. पंख असलेला तो मानवसदृश प्राणी हळुवारपणे झेप घेत त्यांच्या खिडकीसमोर आला आणि जवळजवळ खिडकीला लटकला. तो बहुधा अन्नाच्या शोधात आला असावा. डॉ. स्टिफन्स प्रचंड हादरले, थरारले आणि उत्तेजित झाले. परंतु त्या प्राण्याला जवळून पाहण्याची संधी त्यांना सोडायची नव्हती. त्यांनी टेबलावरील सफरचंद हातात घेतले आणि त्या पंख असलेल्या माणसाकडे हळूहळू चालायला सुरुवात केली. हळूच त्यांनी हात पसरला आणि ते सफरचंद त्या माणसाला देऊ केले. मानवसदृश प्राण्यानेसुद्धा हळुवारपणे ते फळ घेतले आणि डॉ. स्टिफन्स यांच्याकडे टक लावून पाहायला सुरुवात केली. नंतर, त्या प्राण्याने चक्क काही शब्द उच्चारले. निदान तो घशातून आलेला आवाज शब्दसदृश वाटला. त्या प्राण्याने नंतर पुन्हा हलकेच झेप घेतली आणि तो एखाद्या पॅराशूटसारखा तरंगत हळूहळू झाडीमध्ये नाहीसा झाला. आपण जे पाहिले ते सत्य की स्वप्न हे डॉ. स्टिफन्स यांना ठरविता येईना. मात्र खूप प्रयत्न करूनसुद्धा त्यानंतर तो प्राणी पुन्हा दिसला नाही. डॉ. स्टिफन्स त्यानंतर मायदेशी परतले आणि त्यांनी स्वतःच्या आवाजात उपरोक्त वृत्तांत ध्वनिमुद्रित करून ठेवला. त्यांचे नातू डॉ. जॉन स्टिफन्स यांनी ही ध्वनिमुद्रिका स्वच्छ करून डॉ. गरुड यांच्याकडे ऐकायला पाठविली.

डॉ. गरुड बोलायचे थांबले होते. त्यांनतर विलक्षण शांतता पसरली. आम्ही दोघे खूपच उत्तेजित झालो होतो.

रामने अधीर होऊन विचारलं, ''असा पंख असलेला माणूस खरंच अस्तित्वात असतो?... खरंच तो आहे?...''

डॉ. गरुडांनी मंद स्मित केले. ते म्हणाले,

*''यंग सोल्जर्स !...* तेच शोधण्यासाठी आपण भीषणगडला जाणार आहोत...''

''काऽऽय?''

आम्ही दोघेही जोरात ओरडलो.

**भीषणगड**

मध्यप्रदेशच्या सीमेवरील निबिड जंगलात वसलेला आणि एकेकाळच्या आदिवासी राजांच्या ताब्यात असलेला प्राचीन भीषणगड. हा गड मजबूत बांधून काढलेला असून उंच डोंगरावर आहे. डोंगराच्या कपारी, सुळके, पहाडावरून प्राचीन काळी तुटून कोसळलेले मोठे-मोठे भव्य आकाराचे दगड इत्यादी पाहताना

*एक अनाम आकृती, अवचित समोर आली।*
*मन भिऊ भिऊ झाले, बुद्धी मात्र जागली।।*

**शुभेच्छुक – श्री. सचिन गाडगीळ, पुणे**



अंगावर रोमांच उभे राहिले. यांच गूढ, रहस्यमय अशा वातावरणात तो 'पंख असलेला माणूस' दडला असेल या कल्पनेने आम्हाला थोडी भीती वाटली.

भीषणगडला आम्ही येऊन पोहोचलो. डॉ. जॉन स्टिफन्स आणि त्यांचे सहकारी आमची वाटच पाहात होते. डॉ. गरुडांनी आमची ओळख सहकारी म्हणून करून दिली; पण डॉ. जॉन स्टिफन्स यांना मात्र आमचे येणे तितकेसे आवडले नसावे. डॉ. गरुड आणि डॉ. जॉन यांच्या औपचारिक गप्पा सुरू असेपर्यंत मी पटकन कपारीकडे तोंड असलेली ती खिडकी पाहून आलो. याच कपारीतून डॉ. स्टिफन्स यांना तो 'उडता माणूस' दिसला होता आणि त्यांनी त्या 'उडत्या माणसा'ला सफरचंदही खायला दिले होते. मी वाकून पाहात असताना राम तिथे आला. आमच्या दोघांच्या डोळ्यांसमोर तो उडता माणूस साक्षात उभा राहिला.

**भीषणगड पुढे चालू**

सगळ्यात जवळचे गाव भीषणगंज या नावाचे होते. मी आणि राम लगेचच तयार होऊन भीषणगंजकडे रवाना झालो. आम्हाला गाव बघायचे होते, परिसर पाहायचा होता आणि स्थानिक आदिवासी लोकांची मतेसुद्धा ऐकायची होती. इथेच पहिल्यांदा आमची 'छोटू बादशहा' असे विचित्र नाव धारण करणाऱ्या आमच्याच



**भेट द्या : राष्ट्रीय शैक्षणिक संस्था - NSNIS,** पतियाळा
(Netaji Subhash National Institute of Sports) क्रीडाशास्त्र अभ्यासक्रम

**शुभेच्छुक – सौ. शर्वरी विनायक दळवी, विलेपार्ले**

वयाच्या मुलाशी बाजारात भेट झाली. 'छोटू बादशहा'चं फळांचं दुकान होतं. आम्ही त्याच्याकडून न्याहरीसाठी स्थानिक फळे विकत घेतली. मी विचारलं,

*''ॲपल नही मिलते क्या?''*

तेव्हा त्याचे वडील तिथे आले त्यांनी सांगितलं की, या दुर्गम भागात शहरातून माल येत नाही. फळे प्रामुख्याने स्थानिक असतात. उदाहरणार्थ, पपई, पेरू, रामफळ इत्यादी. मात्र, सफरचंद त्यांच्याकडे येत नाही. आमची छोटू बादशहाच्या शेरू नावाच्या कुत्र्याशी मात्र दोस्ती झाली. छोटू बादशहाच्या वडिलांनी आम्हाला पंख असलेल्या माणसाच्या दंतकथेबद्दल सांगितलं.

छोटू बादशहाशी आम्ही बोलत असता एक इंग्रज आमचे बोलणे लक्षपूर्वक एकेत होता. तो डॉ. जॉनचा सहकारी असावा. नंतर आम्ही बंगल्यावर आलो.

रामने माझी नोंदवही हिसकावून घेऊन त्यातले सफरचंद, मे महिना, फिल्म हे उल्लेख वाचले. तो त्याचा अर्थ विचारत असताना डॉ. गरुड आले व म्हणाले,

''आज रात्री आपल्याला डोंगरावर जाऊन बसायचं आहे... आजच्या दिवशी तो 'उडता माणूस' हमखास पाणी प्यायला त्या धबधब्याजवळ येतो असं म्हणतात... डॉ. जॉन यांनी व्यवस्था केली आहे. आपण आज उडणाऱ्या पंख असलेल्या माणसाला पाहणार आहोत...''

आमच्या तोंडाचा 'आ' वासला गेला आणि आम्ही अतिशय उत्तेजित झालो. आमच्या तोंडातून शब्दच फुटेना.

**पंख असलेला माणूस**

आम्ही दोघे योद्ध्याप्रमाणे तयार झालो. रामने त्याची प्रसिद्ध सॅक तयार ठेवली होती. झालंच तर, हंटरबूट, दोर, चाकू इत्यादी वस्तू त्याने बरोबर घेतल्या होत्याच. तसा माणूस दिसलाच तर कोणत्याही परिस्थितीत त्याच्याजवळ जाण्याचा प्रयत्न करायचा नाही, डोंगराची कपार चढायची किंवा उतरायची नाही असे मी रामला बजावून सांगितले. पण राम ऐकणार नाही अशी मला भीती वाटू लागली.

तिकडे डॉ. जॉन स्टिफन्स आणि त्यांचे सहकारी डॉ. गरुडांबरोबर चर्चा करत बसून होते. सर्वांकडे अतिशय शक्तिशाली दुर्बिणी होत्या. डॉ. जॉन म्हणाले,

''आज पौर्णिमा!... आज हा पंख असलेला माणूस धबधब्याजवळ पाणी प्यायला येतो अशी स्थानिक आदिवासींची नोंद आहे... कधी-कधी तो पिल्लांसोबतसुद्धा दिसतो... म्हणजेच हा प्राणी समूहाने राहतो आहे, असे दिसते... तेव्हा आता आपल्याला सुरक्षित आणि त्यातल्या त्यात जवळच्या ठिकाणी जाऊन बसायचं आहे...''

डॉ. गरुड म्हणाले होते. ''उत्क्रांतीच्या टप्प्यात मनुष्यप्राणी हळूहळू विकसित होत गेलेला आहे. पूर्वी त्याला शेपूट असू शकेल, शिंगे असतील पण ती कालौघात गळून पडली. त्याचप्रमाणे माणसाला पंखही असू शकतील. त्यापैकी अपवाद म्हणून काही जीव अस्तित्वात असतील तर त्यांचा शोध घेतला पाहिजे.'' अतिशय दुर्मिळ असलेल्या अशा एका जीवशास्त्रीय चमत्काराचे आम्ही दर्शन करणार होतो. या कल्पनेने आमची छाती धडधडू लागली.

आमची जागा मचाण बांधल्यासारखी डोंगराच्या उतारावर एका खबदाडीत तयार केली होती. तेथून त्रिधारा धबधबा स्पष्ट आणि जवळून दिसत होता. धबधब्याच्या वर उंच कपारी आणि डोंगराचा कडा दिसत होता. त्यावरच्या भेगा, घळी भयप्रद आणि गूढ वाटत होत्या. पौर्णिमेचा चंद्र. सर्वत्र पसरलेला दुधाळ प्रकाश... आणि स्तब्ध वातावरण... आम्ही भारावलो जाऊन अतिशय गुपचूप असे त्या धबधब्याकडे पाहात बसून राहिलो. आणि घड्याळाचा काटा पुढे पुढे सरकत राहिला. डॉ. गरुड अतिशय स्तब्ध बसून टक लावून धबधब्याकडे पाहात राहिले.

आणि अचानकपणे तो चमत्कार आम्हाला पाहायला मिळाला.

कुठूनतरी 'किच्... किच्... किच्' असा आवाज माझ्या कानावर पडला. आम्ही तल्लख होऊन सावध बसून राहिलो. पूर्णचंद्राचा प्रकाश धबधब्यावर पडलेला होता. आणि त्यात आम्हाला अचानक तो पंख असलेला माणूस दिसायला लागला.

**(पान क्र. ८१ वर पुढे चालू)**

*चांदणभरले आकाश, 'त्रिधारा'चा खळखळाट।
गूढ, स्तब्ध या उत्तररात्री, पाहती सारे 'त्या'ची वाट॥*

**शुभेच्छुक – सौ. पद्मजा पोटे, मुलुंड**

# दि बारामती सहकारी बँक मर्यादित, बारामती.

मुख्य कार्यालय : भिगवण रोड, बारामती – ४१३१०२.फोन नं. २२२८४४, २२४८६५

**आकर्षक व्याजदर**

| अनु. | कालावधी | सर्वसाधारण ठेवीदार | ज्येष्ठ नागरिक /सहकारी संस्थांसाठी |
|---|---|---|---|
| १. | ३१ दिवस ते ९० दिवस | ८.००% | ८.५०% |
| २. | ९१ दिवस ते १८० दिवस | ९.००% | ९.५०% |
| ३. | १८१ दिवस ते ३६५ दिवस | १०.००% | १०.५०% |
| ४. | १३ महिने मुदतीसाठी | ११.००% | ११.२५% |
| ५. | १३ महिनेच्यापुढे ते ३६ महिने | १०.५०% | ११.००% |
| ६. | ३६ महिनेच्यापुढे | १०.७५% | ११.२५% |

ठेवी : रु ९६३.०० कोटी
कर्जे : रु ६११.०० कोटी
खेळते भांडवल :
१०५३.०० कोटी

**बँकेच्या अत्याधुनिक सेवा–** • बँकेच्या सर्व शाखांमधून ग्राहकाच्या खात्यावर कोअर बँकींग सेवेद्वारे व्यवहार करण्याची सुविधा. • आर.टी.जी.एस. व नेफ्ट द्वारे भारतात कोठेही रकमा पाठवण्याची सोय.• बँकेच्या निवडक शाखांमधून ए.टी.एम.सुविधा. •कार्डद्वारा देशातील कोणत्याही ए.टी.एम. केंद्रातून रक्कम काढण्याची सुविधा. • एस.एम.एस. बँकींग सुविधेद्वारे बँकेच्या ग्राहकांना त्यांच्या बचत, चालू, कॅश क्रेडिट अथवा कर्ज खात्यावरील प्रत्येक व्यवहाराच्या नोंदीचा तपशील त्यांच्या बँकेस कळविलेल्या खातेदारांच्या मोबाईल क्रमांकावर कळविला जाईल.

**श्री. अविनाश भापकर** (उपाध्यक्ष)
**श्री. श्रीकांत सिकची** (अध्यक्ष)
**श्री. श्रीनिवास बहुळकर** (कार्यकारी संचालक)

**आणि समस्त संचालक मंडळ**



*Take up one idea.*
*Make that one idea your life*
*Think of it,*
*Dream of it, live on it.*
*- Swami Vivekanand*

With Best compliments from

# AMG CORPORATION

**Office No. 33, Tapaswi Plaza,**
**Opp. Greaves Ltd., Chinchwad, Pune-19**



**भेट द्या : राष्ट्रीय शैक्षणिक संस्था : IISM**, गुलमर्ग
(Indian Institute of Skeeing and Mountaineening) गिर्यारोहण व स्किईंग अभ्यासक्रम

**शुभेच्छुक – श्री. पराग मसूरकर, बोरीवली**



व्यक्तिविकसन

# निर्णयाच्या अवघड वळणावर ...

*गिरिप्रेमीच्या धाडसी माऊंट मकालूच्या महत्त्वाकांक्षी मोहिमेदरम्यान एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेताना, या मोहिमेचा नेता म्हणून माझी जी कसोटी लागली; त्याबद्दल थोडं शेअरिंग...*

उमेश झिरपे

पहिल्यांदा हिमालयात गेलो तेव्हा मी १२/१४ वर्षांचा होतो. तेव्हापासून आजपर्यंत मी अनेक वेळा हिमालयात गेलो. प्रत्येकवेळी वेगवेगळे अनुभव घेऊन माझे अनुभवविश्व खूप संपन्न व थक्क करणारं घडत गेलं.

एव्हरेस्ट, ल्होत्से या जगातील सर्वोच्च हिमशिखरांच्या धाडसी मोहिमेनंतर आम्ही २०१४साठी *माऊंट* मकालू या जगातील पाचव्या क्रमांकाच्या उंच शिखराची निवड केली. नेपाळ-तिबेटच्या सीमेवर अतिशय दुर्गम भागामध्ये असलेला मकालू हा खरंच एक अत्यंत कठीण असा पर्वत, गिर्यारोहकांसाठी कायमच आव्हान ठरणारा... यावेळी माझी *टीम* छोटी होती, पण खूप योजनापूर्वक चांगल्या तयारीसह आम्ही मकालूची मोहीम करत होतो.

...आमची मकालू मोहीम शेवटच्या टप्प्यात होती. १८ मे रोजी मी व अजित *बेस कॅम्पवर* शिखरावरून चढाईची बातमी येण्याची वाट बघत होतो. कोणत्याही क्षणी बातमी येणार होती; पण जसजशी वेळ पुढे जाऊ लागली तसतशी आमची अस्वस्थता वाढू लागली. आणि एकदाचा *वॉकीटाकी* वाजला. माझे कान *समिटची* बातमी ऐकायला

*साऱ्याच समस्यांना, मी झेलणार आहे।*
*युद्धात जीवनाच्या, मी जिंकणार आहे ।।*

**शुभेच्छुक – श्री. दिनेश कुलकर्णी, डोंबिवली**

आतुर झाले होते...

त्यावेळी आनंद फोनवर सांगत होता, ''मामा आम्ही शिखर माथ्यापासून केवळ १५०-२०० फुटांवरती आहोत; पण पुढील भाग खूपच धोकादायक आहे. आमचे सुरक्षा दोर केव्हाच संपले आहेत. अट्टाहास करून तसेच पुढे गेलो तर, एखादेवेळी कसेतरी पोहचू व परतीच्या वाटेत आमचं काही खरं नाही.''

हे सर्व ऐकून मला धक्काच बसला. माझ्या *टीममध*ले हे कसलेले गिर्यारोहक, ज्यांनी यापूर्वी जगातील सर्वोच्च शिखर एव्हरेस्ट, ल्होत्से याला गवसणी घातली होती. त्यांना मकालूची मोहीम सोडून द्यावी लागणार आणि तीसुद्धा पुरेशा साधन-सामग्रीच्याअभावी; हे खूपच यातना देणारं होतं.

सुरक्षा दोराची दोन बंडलं त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शेर्पांबरोबर असणं गरजेचं होतं. चढाईचे काही टप्पे फारच धोकादायक, अवघड वळणाचे असतात. तिथे सर्व भिस्त सुरक्षादोरावर अवलंबून असते. मार्गदर्शक शेर्पा आधी चढाई करण्यात येणाऱ्या भागाची पाहाणी करतात. एकूण किती धोकादायक भाग आहेत; त्याचा अंदाज घेतला जातो. त्याप्रमाणे योजना आखली जाते. सुरक्षेचा भाग म्हणून बरोबर किती सामान घ्यायचे त्याचे नियोजन केले जाते. त्या नियोजनाप्रमाणे सर्व सामान घेतले जाते. शेर्पाने जेव्हा सांगितलं की त्यानं चुकून एकच सुरक्षा दोराचं बंडल बरोबर घेतलं आहे; हे ऐकून मी हतबल झालो. मोहिमेसाठी घेतलेली मेहनत, परिश्रम, हवामानाचा अंदाज हे लक्षात घेऊन, केलेलं सर्व नियोजन क्षणभरात डोळ्यांसमोर तरळलं. चढाईपेक्षा उतरताना अधिकच धोका असतो. सुरक्षादोराशिवाय चढाईचा धोका पत्करायला मी गटाचा नेता म्हणून तयार नव्हतो. मागील वर्षी त्याच ठिकाणी चीनी गिर्यारोहकाचा अपघाती मृत्यू झाला होता. त्यावेळी जो शेर्पा बरोबर होता, तोच शेर्पा आमच्याही टीमबरोबर होता. सुरक्षा दोरांअभावी मोहीम अर्धवट सोडावी लागणार होती. पण त्याला इलाज नव्हता.

पण गिर्यारोहण मोहिमांमध्ये शिखर चढाई जेवढी महत्त्वाची, तितकंच 'सुखरूप परतणं' हेही अत्यंत महत्त्वाचं असतं. त्यामुळे सुरक्षेला प्राधान्य देत आम्ही मकालूवरून मागे फिरण्याचा निर्णय घेतला.

पण मोहीम अर्धवट टाकण्याचा हा निर्णय मला स्वस्थ बसू देत नव्हता. माझ्यासमोर *टीमचे* गेल्या वर्षभराचे अविरत कष्ट, मकालूसाठी मदत केलेले *स्पॉन्सर्स,* या मोहिमांसाठी अहोरात्र झटणारी गिरिप्रेमी मंडळी व या गिर्यारोहकांना धैर्यानं पाठिंबा देणारे त्यांचे कुटुंबीय येऊ लागले.

मी पुण्यातील स्पॉन्सरर्सशी बोललो. त्यांनीही तिथे गिर्यारोहकाच्या सुरक्षेला प्राधान्य दिलं होतं. आमच्या आधी तिथे परदेशी गिर्यारोहकांचा एक गट यशस्वी चढाई करून आला होता. हवामान २५ मे पर्यंत अनुकूल असणार होतं. त्यानंतर मोसम संपणार होता. परत मकालूला भिडण्यासाठी वर्षभर वाट पाहावी लागणार होती. याच मोसमात मकालूला भिडायचे असेल तर ऑक्सिजनच्या साठ्याची, काही सुरक्षा साधनांची तसेच पैशाची जुळणी करणं आवश्यक होतं. मी पुण्याच्या गिरिप्रेमी संस्थेतील काही लोकांशी चर्चा केली. स्पॉन्सर्सशी बोललो. परतच्या चढाईचा खर्च सुमारे ७ ते ८ लाखांपर्यंत जाणार होता. मकालू करता श्री. विजय जोशी, मनीश साबडे जनता सहकारी बँक, इंडस हेल्थ, हावरे बिल्डर्स यांसारख्या अनेक जणांनी पुन्हा आर्थिक साहाय्य देण्याची तयारी दर्शवली. अखेर मी परत मकालूला भिडण्याचा निर्णय घेतला.

त्यावेळी माझी *टीम बेस कॅम्पला* पोहोचली होती. आठ हजार मिटर्स उंची गाठून परत *बेस कॅम्पला* पोहोचल्यावर गिर्यारोहक पूर्णपणे थकून जातो. आमचे *कॅम्पवरचे* ऑक्सिजन, अन्नधान्याचे सगळे साठे संपले होते. साधनसामग्री, अतिउंचीवर खाण्याचे विशेष अन्न, ऑक्सिजन व इतर आवश्यक गोष्टींची मला पुन्हा जुळवाजुळव करावी लागणार होती.

पण महत्त्वाचं म्हणजे पुन्हा शिखर चढाई करताना थकलेल्या गिर्यारोहकांना उभारी देऊन, कुठलाही धोका न पत्करता मोहीम यशस्वी करायची होती.

गिर्यारोहकांचं मनोधैर्य उंचावण्याचा आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केला. *बेस कॅम्पवर* त्यांना नुकतीच चढाई यशस्वी केलेल्या गिर्याराहकांची व्हिडिओ फिल्म दाखवली. त्यांना प्रोत्साहन दिले. व्हिडिओ क्लीप बघून ते आधी पोहोचले होते, तिथपासून शिखर माथ्यावर जाण्यासाठी फक्त १५० ते २०० फूट अंतर आहे, हे पाहून गिर्यारोहकांनी



**भेट द्या : राष्ट्रीय शैक्षणिक संस्था : NIN**, हैद्राबाद
(National Institute of Nutrition) आहारशास्त्र
**शुभेच्छुक – श्री. नितीन कुलकर्णी, पुणे**



परत चढाईची तयारी दर्शवली. तातडीने काठमांडूला जाऊन ऑक्सिजन, अन्न व इतर सामग्रीची तजवीज करून आलो. यावेळी सर्व सामान नियोजनाप्रमाणे घेतले आहे ना, त्याची आम्ही खात्री करून घेतली.

मकालूसारख्या कठीण पर्वतावर परत मोहीम उभी करायची, यामध्ये बरेच धोके होते. पण खूप विचारपूर्वक आणि काही दिवसांतच सर्व जुळणी करून २२ मे ला माझ्या *टीमने* पुनश्च: एकदा शिखर-चढाईला सुरुवात केली. आशिष व आनंदनं हे जबरदस्त आव्हान पेलत जोमानं प्रयत्न केले, यश अक्षरश: खेचून आणलं. भारताचा तिरंगा जगातील पाचव्या उंच शिखरावर २५ मे रोजी अभिमानाने फडकावला.

मकालू चा अनुभव संपूर्ण गिर्यारोहण क्षेत्रासाठी नवी दृष्टी देणारा व मोहीमेतील गिर्यारोहकांना त्यांच्यातील असामान्य शक्तीचा प्रत्यय देणारा ठरला. अशक्य ते शक्य करून दाखविणारी ही मोहीम माझ्यासाठीही या धाडसी खेळामधली पुढची पायरी ठरली.

पण हो; हे सर्व निर्णय घेण्याचे शहाणपण आधीच्या मोहिमांमधील चुकांमधून शिकता आले, हे नक्की.

**– उमेश झिरपे**

*अस्मिता अपार्टमेंट, आपटे रस्ता, पुणे 411004*

उमेश झिरपे व त्यांच्या टीमचे छात्र प्रबोधनतर्फे मनापासून अभिवादन आणि अभिनंदन!!

*समस्यांवर मात करून, आभाळात झेपावणार आहे।*
*पंखात बळ असेपर्यंत, टक्कर देत राहणार आहे ।।*

**शुभेच्छुक – श्री. अभय लिमये, पुणे**

*There is no energy in the world which is greater than commitment to a dream.*

*With Best Compliments From...*

## Print-O-Tech Engineers

**(ISO 9001 COMPANY)**

Survey No. 29, Mantri park,
Shop No 16,17, Near Natraj Gas,
Kothrud, Pune - 411 029, Tel : 25384374
Email : paradkaruday@yahoo.co.in
paneha@gmail.com

## ARCHIVISTA ENGINEERING PROJECTS PVT LTD

*"A leading Engineering Consultancy firm in India providing Architectural and Design Engineering services to wide range of industries like Automobiles, Ancillaries, Paper & Packaging ,Engineering Products,Textiles Pharmacy, Food, Chemicals etc."*

**Our expertise extends over:**

- Architectural & Structural Design
- Authority Approvals & Infrastructure Development
- Electrical Engineering
- Fire Fighting and Safety
- HVAC and Dust Control
- Interiors and Landscaping
- Green Building Concept
- Construction Management & Site Supervision

*Our Client includes*
*Mercedes Benz, Tetra Pack, John Deere, General Motors, Times of India, Emcure Pharmaceuticals, Mahindra & Mahindra, Schreiber Dynamix Dairy & many more.*

Pune Office: 201/202 Sai Empire, Baner, Pune-411045.
Tel.: +91 20 6629 4444 Fax: +91 20 6629 4699
Chennai Office: 25/10 Ethiraj Lane Egmore, Chennai-600008. Tel.:+91 44-42145194 Fax: +91 44 42145195.
**Visit to us at** www.archivistaindia.com
E-mail: info@archivista.biz

Govind Nursery

## THE HOUSE OF QUALITY PLANTS

Farm Development, Landscapes, Garden Designer & Contractor

**At Post - Agashi, Virar (W), Tal. Vasai, Dist. Palghar**
**Mob.: 9322808816/9225105428**
**Email : govindnursery@gmail.com**

**भेट द्या - राष्ट्रीय शैक्षणिक संस्था : BARC, मुंबई**
(Bhabha Automic Research Center) केमिकल आणि लाईफ सायन्सेस व न्यूक्लियर ॲग्रिकल्चरसाठी

**शुभेच्छुक – श्री. अमित बागाईतकर, पुणे**

# ज्ञान प्रबोधिनी... सर्वांची... सर्वांसाठी

॥ राष्ट्रदेवा: भवेम ॥

## ज्ञान प्रबोधिनीच्या पुण्यातील विभागांद्वारा विविध वयोगटासाठी होणारे उपक्रम

**या उपक्रमांद्वारा ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण प्रक्रियेत सहभागी व्हा !**

### पहिली ते पाचवीतील बालगटासाठी

१) **बालविकास शिबिरे, निरंतर विकास कार्यक्रम** – द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका – २४२०७२०४
२) **पाचवी प्रवेश** – ज्ञान प्रबोधिनी प्रशाला – २४२०७१२१, क्रीडाकुल–निगडी– २७६५५२४९

### सहावी ते बारावीपर्यंतच्या किशोर-कुमारांसाठी

१) **क्षमता संवर्धन शिबिरे** – द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका – २४२०७२०४
२) **क्रीडा–विज्ञान–कला दले**– द्वारा युवक विभाग– नितिश– ९६०४००२३५० युवती विभाग– मेधाविनी– ९४२३१६२१३४
३) **छात्र प्रबोधन मासिक व त्यातील उपक्रम, स्पर्धा** – द्वारा छात्र प्रबोधन – २४२०७१०६
४) **प्रबोधक मंडळ** – मासिक उपक्रम (प्रस्तावित) – द्वारा छात्र प्रबोधन – २४२०७१७४
५) **सुट्टीमधील जोडीकार्ये** – द्वारा छात्र प्रबोधन – २४२०७१७४
६) **नागरी वस्त्यांमधील किशोरींसाठी उपक्रम** – द्वारा नागरी वस्ती अभ्यास गट – हर्षाताई – ९३२५२७२३३७
७) **मानसपट मापन** – ५ वी ते ९ वीसाठी द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका – २४२०७१४५
८) **अभिक्षमता मापन व व्यवसाय मार्गदर्शन** –(१०/१२वी) द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका – २४२०७१४४
९) **सामूहिक विद्याव्रत संस्कार –** द्वारा संवादिनी – २४२०७२२२, संत्रिका – २४२०७१४६
१०) **'उमलत्या' वयाशी जुळवून घेताना** (लैंगिकता शिक्षण व जाणीव संवर्धन)– द्वारा संवादिनी – ९९७०१५३२३७
११) **NTS मार्गदर्शन,** विविध कौशल्यांचे प्रशिक्षण – द्वारा बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र – २४२०७१९४
१२) **नेतृत्व संवर्धन शिबिरे–**बारावी व पुढील गटासाठी ५ दिवसांची निवासी शिबिरे, द्वारा नेतृत्व संवर्धन केंद्र २४२०७१७९

### पदवीपूर्व व पदव्युत्तर युवक-युवतींसाठी

१) **Preparatory & Foundation Courses -** पदवीपूर्व गटासाठी ४-४ महिन्यांचे, शनिवार – रविवार चालणारे वर्ग (प्रशासकीय व सामाजिक क्षेत्रात नेतृत्व करू इच्छिणाऱ्या युवक–युवतींसाठी)–द्वारा नेतृत्व संवर्धन केंद्र– २४२०७१७९
२) **UPSC, परिक्षा पूर्वतयारी वर्ग** – द्वारा स्पर्धा परीक्षा केंद्र – २४२०७१३४
३) **पदवीपूर्व/पदव्युत्तर करिअर समुपदेशन** – द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका– २४२०७१४४
४) **'मैत्र' समुदेशन केंद्र** – द्वारा संवादिनी – ९९७०१५३२३७
५) **अभ्यासगट, गणेशोत्सव, विक्री उपक्रम, नागरी वस्ती व ग्रामीण प्रज्ञा कार्यक्रमात सहभाग**
द्वारा युवक विभाग– आशुतोष – ९०४९०८०७८०, युवती विभाग – मेधाविनी – ९४२३१६२१३४

### प्रौढ गटासाठी

१) **संवादिनी** – स्वयंविकासातून समाज परिवर्तन या हेतूने महिलांसाठी दरमहा कार्यक्रम – २४२०७२२२
२) **पौरोहित्य प्रशिक्षण वर्ग** – द्वारा संस्कृत संस्कृति संशोधिका – २४२०७१४६
३) **शिक्षक प्रशिक्षण** – द्वारा वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र – २४२०७१९४
४) **मानसशास्त्राशी व त्याच्या उपयोजनाशी निगडित विविध प्रशिक्षण वर्ग–** द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका २४२०७१४२

याशिवाय संग्राह्य प्रकाशने, विविध संस्कार व पूजांचे अर्थपूर्ण पौरोहित्य, मानसशास्त्रीय चाचण्या व समुपदेशन इ. अनेक सेवा उपलब्ध.

**पुण्याव्यतिरिक्त ज्ञान प्रबोधिनीच्या खालील केंद्र–उपकेंद्र–विस्तारकेंद्रांवरही विविध उपक्रम योजले जातात.**
**निगडी –** ०२०–२७६५४३८०, **साळुंब्रे** (जि. पुणे) – ०२११४–२८७२९०,
**सोलापूर –** ०२१७–२३१७७८२, **हराळी** (जि.उस्मानाबाद) – ८८८८०२६३८,
**अंबाजोगाई** (जि. बीड)– ९४२१३७३५३६, **बोरीवली** (मुंबई)– ९८६७३८३०३८, **डोंबिवली** (जि. ठाणे)–९९३०१०२९९८

**गावोगावी ज्ञान प्रबोधिनीचे मनुष्यघडणीचे विविधांगी उपक्रम सुरू करू इच्छिणाऱ्या सर्वांचे मन:पूर्वक स्वागत !**
**तपशिलासाठी संबंधित विभागांशी संपर्क साधावा.**

**मुख्य कार्यालय – ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, दूरभाष – ०२० – २४२०७०००**

*गगन भरारी घेत दिशांचे हात हाती घेऊ।*
*उजेडवेड्या आकांक्षांचा सूर्य आम्ही पाहू।।*

**शुभेच्छुक – सौ. स्मिता फडणीस, बोरीवली** – कै. उषाबाई फडणीस यांचे स्मरणार्थ






भेट द्या - राष्ट्रीय शैक्षणिक संस्था : NBRC, हरियाना
(National Brain Research Center) मेंदूशी निगडित संशोधनासाठी

शुभेच्छुक - सौ. रजनी सोहोनी, पुणे

## मास्टर शेफ व्हा!

खाली दिलेल्या तक्त्यात काही पदार्थांची नावे दिली आहेत. ते पदार्थ गव्हावर कोणकोणत्या प्रक्रिया केल्या तर तयार होतील ते तुम्ही शोधून काढा. खाली प्रक्रियांची नावें दिली आहेत. ती योग्य त्या गाळलेल्या ठिकाणी घाला.

कुंडीत पेरले, दूध + साखर, हिरवी रोपं, पांढरा साका, शिजवला, गोल चकल्या, उन्हात वाळवल्या, तेलात तळल्या, बारीक तुकडे, उकळवला, उकडवला, फोडणी, उमलले, उकडवला, साखरेचा पाक, साखर + दूध, पाणी + फोडणी, जाड धागे, बारीक धागे, पात्रात शॅलो फ्राय, तव्यावर पसरला, पात्रात उकडला, भाजला, तव्यावर, गॅसवर, तळला, शिजवले, लांब जाडसर काड्या, उकडला, तळला, भट्टी किंवा ओव्हनमध्ये भाजला, टोस्टरमध्ये खरपूस भाजला, हवेत उडवली, बहिर्गोल तव्यावर भाजली, कातण्याने कापला, तुपात/तेलात तळला, भट्टीत भाजला, चौकोनी/आयताकृती तुकडे, तेलात तळला, ओव्हन, भट्टीत भाजले, शेगडीवर भाजला, मातीच्या मडक्यात विस्तव टाकून भाजला, पोलपाटावर लाटला.

– डॉ. कांचनगंगा गंधे




या तक्त्यात समाविष्ट नसलेल्या अन्य गव्हाच्या पदार्थांची यादी करा. तसेच अन्य कुठल्याही एका धान्याचा अशाप्रकारे तक्ता करून पाठवा.


दैनंदिनाच्या लाटेवरले पक्षी आम्ही मुले।
नव्या दिशाची पहाट अमुच्या पंखावरती फुले।।
शुभेच्छुक – सौ. सीमा परांजपे, पुणे

## रंगगंध कलासक्त न्यास, चाळीसगाव



केवळ नाट्यचळवळ नव्हे एक सर्वंकष सांस्कृतिक यात्रा...!!

रजि : ई ९५८/जळगांव

पूज्य पुरुषोत्तम दारव्हेकर स्मृती,
अखिल भारतीय मराठी साहित्य अभिवाचन महोत्सव,
२०१५ (वर्ष तेरावे)

दि. २७ फेब्रुवारी ते १ मार्च २०१५
स्थळ – राजपूत मंगल कार्यालय, चाळीसगांव

या तेराव्या वर्षी आमच्या कक्षा रुंदावत आहेत. या वर्षापासून प्राथमिक फेऱ्या
१४ डिसेंबर २०१४ ते ८ फेब्रुवारी २०१५ दरम्यान दर रविवारी खालील १६ ठिकाणी

| | | |
|---|---|---|
| १. नागपूर | २. सोलापूर | ३. देवनार (मुंबई), |
| ४. कोल्हापूर | ५. नांदेड | ६. रत्नागिरी |
| ७. पुणे | ८. औरंगाबाद | ९. नाशिक |
| १०. जळगांव | ११. अहमदनगर | १२. अमरावती |
| १३. कल्याण | १४. सांगली | १५. परभणी |
| १६. लातूर | | |

**खास वैशिष्ट्ये -**

१. अंतिम फेरीत एकूण रुपये ४०,००० ची बक्षिसे, २. परराज्यातील स्पर्धकांना थेट अंतिम फेरीत प्रवेश व रुपये १००० प्रती व्यक्ती प्रवास साहाय्य ३. महाराष्ट्रातील अंतिम फेरीत पोहोचणाऱ्या स्पर्धकांना सादरीकरणानंतर रुपये ५०० प्रती व्यक्ती पुरस्कार

अधिक माहितीसाठी - स्पर्धाप्रमुख- श्री राजेंद्र चिमणपुरे, मुक्तानंदनगर, भडगाव रस्ता, चाळीसगाव. मो. ९४२०६६६१२९
श्री. मुकुंद करंबेळकर, शल्यशोभा , करगांव रस्ता, चाळीसगाव. मो. ९८२२२६३२७९. mukunddk@gmail.co

फेसबुकवर अभिवाचन महोत्सव ग्रुपमध्ये सामिल व्हा.

रहस्यकथांचा बादशाहा

# धनंजय

वर्ष ५४ वे **दिवाळी अंक**

भय, गूढ, रहस्य, विज्ञान, विस्मय, युद्ध अशा विविध ५० कथांचा आणि ४ लेखांचा वाचन फराळ. अनेक मान्यवरांच्या तसेच नवोदित लेखकांच्या कथांचा वाचनानंद धनंजय दिवाळी अंकातून मिळवा.

# चंद्रकांत

कादंबऱ्यांचे मुक्तपीठ

वर्ष ५१वे **दिवाळी अंक**

चार संपूर्ण कादंबऱ्या

लेखक

- अरुण हेबळेकर
- भालचंद्र देशपांडे
- चंद्रकांत भोंजाळ
- माधुरी तळवलकर

कादंबरी साहित्य प्रकारा विषयी अभ्यासपूर्ण लेख

- श्रीनिवास हेमाडे
- दिपक घारे
- डॉ. मीना वैशंपायन

ज्येष्ठ अभिनेत्री ललिता पवार यांच्या सिनेकारकिर्दीचा बाबू मोशाय यांनी घेतलेला आढावा

अवश्य संग्रही ठेवावा असे दिवाळी अंक

राजेंद्र प्रकाशन, धनंजय कार्यालय, महाराजा बिल्डिंग, गिरगांव, मुंबई - ४०० ००४
दूरध्वनी : २३८२३५४८/२८३३२४०६





**भेट द्या - राष्ट्रीय शैक्षणिक संस्था : IIT** (एकूण शाखा १६)
(Indian Institute of Technology) विविध तंत्रज्ञानातील अभ्यासक्रम

**शुभेच्छुक – श्री. सचिन जोगळेकर, पुणे**



## मुलांचे पान

**_मैथिलीने एका लघुपटात भूमिका केली. अभिनय करताकरता ती नकळत त्या भूमिकेत घुसली. लघुपटातल्या मुलीचं अवघं भावविश्व तिचं झालं. हा भावनिक अनुभव तिने या लेखात शब्दबद्ध केलाय..._**

# एका भूमिकेचा प्रवास...



*एक साधी सरळ मुलगी. गावापासून दूर एका खडकाळ टेकडीवर राहणारी. लांबसडक केस, फुला-फुलांचा फ्रॉक घालणारी, नाजूक आणि भोळी. तिने ना कधी लिहिले ना वाचले. शाळाच काय; पण कधी गावही पाहिला नव्हता जवळून. एक दिवस पाणी आणायला गेलेल्या आपल्या आईच्या शोधात, ती जाऊन पोहोचते एका गावात... दुपारची वेळ. गाव निवांत. ती एका घरात डोकावून बघते. नवीन माणसं पाहून जरा गोंधळते. ती माणसे तिला सांभाळून घेतात. पाणी भरून आणताना वाहत्या पाण्यात पाय घसरून तिची आई तिला सोडून गेलेली असते. ही पोर नदीकिनारी उभी राहते. निश्चल, गोंधळलेली. पुढे काय? माहीत नाही. तिला आठवतं...''आई व मी किती सुखात होतो, किती सुंदर होतं आमचं आयुष्य! कसलाच त्रास नाही. फक्त प्रेम. दुसरं काहीच नाही. खरंतर सगळं होतं जंगलात; पण उन्हाळ्यात, सगळे छोटे झरे कोरडे पडले. मला पाणी हवं होतं, म्हणून आई गावात पाणी आणायला गेली. ती परत आलीच नाही ! मी तरी इथं का थांबावं? आईचं काय झालं असेल?...'' क्षणभर गोंधळ, मग निश्चय... तीही नकळत नदीत झेप घेते...*

''अशी आहे गोष्ट. काम करशील?'' राधिकाताईनी मला विचारलं, ''छोटीशीच आहे, पण मस्त आहे!'' तिनं पुस्ती जोडली.

''नक्की ! कुठं आहे *शूटींग?*'' मी उतावीळपणे विचारलं. गोष्ट जंगलातली, म्हणजे नक्कीच मस्त ठिकाणी असणार ! *''गुड !* उद्या पाच वाजता इथेच भेटूयात. सगळ्या गटाला भेटवते तुला,'' ताई म्हटली.

आठवड्याभरानेच, आमचा प्रवास सुरू झाला. आम्ही *ओपन जीप* मधून तोरणा गडाकडे कूच केले. शामदादा व राधिकाताईला *फिल्म* इंडस्ट्रीत *'दिग्दर्शक'* म्हणून काम करायचं होतं. त्यांच्या अंतिम परीक्षेसाठी त्यांना ही *फिल्म* करायची होती. *फिल्म* आवडली, तर ते पास ! या ३० मिनिटांच्या लघुपटासाठी आम्ही दोन दिवस व दोन रात्री मेहनत घेणार होतो.

आमची जीप एकदम मस्त होती आणि प्रवास तर खूपच रमणीय होता. तोरण्याला जाण्यासाठी पाबेघाटाचा रस्ता आम्ही निवडला होता ! तोरण्याला जवळपास पाच रस्ते जातात, त्यापैकी हा सर्वात निसर्गरम्य. आमचा पहिला थांबा खडकवासला होता.

खडकवासल्याच्या *बॅक वॉटर*

*सार्‍याच संकटांना, मी झेलणार आहे।*
*युद्धात जीवनाच्या, मी जिंकणार आहे।।*

**शुभेच्छुक – श्री. आशिष अविनाश फडके, पुणे** – कै. श्रीमती कमलाबाई रघुनाथ फडके स्मरणार्थ

पॉइन्टवर, आमचं दृश्य होतं. मुलगी गावात येते तेंव्हाचा शॉट .भर दुपार झाली असली तरी पाणवठ्याजवळ थंड हवा होती. तिथल्या लहानशा गावात एका आजी-आजोबांकडे आम्हाला गोड पाहुणचार मिळाला. त्यांच्यासोबत शूटिंग करायचं होतं.

मला भयंकर गोंधळलेला चेहरा करून त्यांच्या घरात शिरायला सांगितलं होतं. खूप शांतता... आणि मग माझा धक्का लागून एक पाण्याचा पेला पडतो. तो मी धरणार, इतक्यात तो गडगडत आजींच्या पायाशी जातो. मी घाबरून वर बघते व पटकन मागे सरकते. आजी- आजोबा माझी विचारपूस करतात. ''आईला शोधत आले. माझी आई कुठंय?'' ती इतकंच बोलते.

ते तिला खाऊ देतात. त्याने ती अजूनच गोंधळते आणि नदीच्या दिशेनं पळतच सुटते.

***

तिथला शॉट झाल्यावर, पुढे प्रवास सुरू झाला. सिंहगडची उंच बाजू रस्त्यातून दिसत होती. रस्ता तसा ओकाबोका वाटत होता. पावसाळ्यात जसं हिरवं दिसतं तसं नव्हतं; पण हवा खूप मस्त होती !

पाबेघाटातून जाताना डोंगराच्या कुशीतून गेल्यासारखं वाटतं. डोंगरावरचं पिवळं गवतही सोनेरी दिसत होतं. फक्त हिरवा गर्द रंग नाही, तर सोनेरी पिवळा, केशरी हे भडक रंगही अप्रतिम दिसतात, हे नव्याने कळले. आमचा पुढचा थांबा, पाबे घाटातील एका विशाल वडापाशी होता.

त्या झाडाच्या काही पारंब्या झोपाळ्यासारख्या वळल्या होत्या. त्यावर मी खेळतानाचा सीन होता. मी त्या झाडास घट्ट मिठी मारते. आईला म्हणते, ''हे बघ ! कित्ती मोठं आहे झाड !'' आई हसून बघते.

''तू सुद्धा एवढी मोठी होणार ना?'' विचारते. मी मान नकारार्थी हलवून म्हणते, ''मग मला तुझ्या कुशीत कसं झोपता येईल?''

ते वडाचं झाड खरंच खूप मोठ्या बुंध्याचं आहे. अजूनही तिथे गेले, तर मी झाडाला मिठी मारते...

घाट चढल्यावर उंचावरून नदी दिसते. नागमोडी वळण घेत ती क्षितिजापलीकडे जाते. वाटेत लहानश्या धबधब्यांनाही बरोबर नेते. पण उन्हाळ्यामुळे सगळे धबधबे आपल्या खुणा दगडी उतारावर तशाच ठेवून वाळून गेले होते. मधेच दिसणाऱ्या झाडांचीच काय ती हिरवाई, बाकी काळा पाषाण ! नदी व गाव मागे टाकल्यावर कुठे राजगड- तोरण्याचा जोडा दिसू लागला. दोन दोस्त शेजारी उभे; मधून जाणारा मार्ग तेवढा त्यांना वेगळे करतो. डावीकडे राजगड, उजवीकडे तोरणा. या दोन किल्ल्यांना जोडणारी पुरातन वहिवाटही खूप थरारक आहे. तोरण्यावरून उतरताना दोन झाडांच्या आधारावर बांधलेले एक लाकडी घर होतं. पर्यटकांना आश्रय म्हणून असावं. तेच कथेतल्या मुलीचं व आईचं घर !

परतीच्या प्रवासात तर मी झोपूनच होते. आजारी होते. पण गडावरच्या हवेतच राहावंसं वाटत होतं. परतीच्या प्रवासात, नदीपाशी शेवटचा सीन होता.

मला पाठमोरं उभं राहायचं होतं आणि मोजून एका मिनिटात पाण्यात उडी मारायची होती. नदीतला सर्वात उथळ भाग निवडला होता. त्यातही नदीत तीन जणं मला धरण्यासाठी उभे केले होते. सात फुटावरून उडी मारायची होती. तरीही मला भीती वाटत होती. पोहोता येत होतं; पण तरी... ती नदी होती. टॅन्क नाही ! आणि खाली दगडावर आपटून काही झालं तर? तो शॉट मला ५ वेळा द्यावा लागला !!

त्या मुलीला कसं जमलं असेल?? इतकी ताकद, इतकं धाडस तिनं कसं केलं असेल?? आईबद्दलचं प्रेम आणि तिचा भोळेपणाच तिला इतकी ताकद देऊन गेला असेल का? खरंच इतकी ताकद असते ममतेत? की त्या मुलीला पुढे काय होईल हे माहीत नसल्यामुळे अडाणीपणानं तिनं झेप घेतली? क्षणार्धात, ती स्वत:सही विसरून आईसाठी वाहत्या नदीत उडी मारते !! माझं मन विचारांनी भरून गेलं! मीही मग निश्चय केला. मिनिटभर वाहत्या पाण्याकडे पाहिले आणि मग सहज शरीर पाण्यात सोडून दिलं... माझ्यासाठी ही एक लहानशी सहलच होती; पण या सहलीतून 'त्या' फ्रॉकवाल्या मुलीकडून कळत न कळत मी खूप काही शिकले. आपण स्वत:ला खूप सुशिक्षित आणि योग्य निर्णय क्षमता असणारे, सर्व बाजूंनी विचार करणारे समजतो. पण ते मला काहीसे अनैसर्गिक वाटू लागले. निसर्गात वाढलेली ती अल्लड मुलगी

**अभिमानास्पद : नोबेल पुरस्कार विजेते भारतीय - रवींद्रनाथ टागोर - (१९१३)**
'गीतांजली ' या काव्यसंग्रहासाठी , हा पुरस्कार मिळवणारे पहिले भारतीय
**शुभेच्छुक - श्री. अमोल दत्तात्रय दांडेकर, सांगली.**




किती मस्त होती ! कसलाच ताण नाही.

आणि मी? साक्षर, समजूतदार, पण घाबरट! कसली ही भीती? त्या अल्लड, निरागस, निर्भय आदिम मुलीचं मला जबरदस्त आकर्षण वाटू लागलं. तिची आणि माझी तुलना होऊ लागली...माझ्याच मनात. बरेच प्रश्नही मनात येत राहिले. पुढे काय झाले असेल त्या मुलीचे? तिच्या आईचं? गाववाल्यांनी वाचवले असेल का तिला? मी तसं राधिकाताईलाही विचारलं.

''अगं पात्र आहे ते कथेतलं! *फिल्म* आपण इथेच संपवतो. प्रेक्षकांना विचार करायला लावतो!'' ती म्हणाली,

''तरी गं! भेटते का तिला तिची आई ??'' मी न राहवून विचारलं.

ती माझ्याकडे बघून हसत म्हणाली, ''हो.''



**कु. मैथिली सेवेकरी** (इ. १०वी)
*अक्षरनंदन शाळा, पुणे*
*चित्रकार : अंजली पुरंदरे*

---

## सण/उत्सव
## दिवाळी



प्रकाश लेवूनी ज्योती हसली
काळोखाची रात्र उजळली
मनामनातील दीप पेटवत
दिवाळी ही अवतरली ।।धृ. ।।

झुलता आकाशदीप लावला
दिशा तेजोमय झाल्या
लक्ष्मीच्या पाऊलखुणा
घराघरात उमटल्या ।।१ ।।

संस्कृतीचे नाते दिवाळी
आनंदाने गाते दिवाळी
संकल्प नवे, स्वप्न नवे
घेऊन येते दिवाळी ।।२ ।।

नव्या आशांची, नव्या जगाची
नव्या युगाची वाट रेखण्या
वाटेवरती प्रकाश पेरीत
आली दिवाळी घरी ।।३ ।।



**– *कु. भावना आगळे,*** *(इ. १० वी)*
*ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे*

*प्रकाशवेड्या प्रत्येकाला, साद दिवाळीची ।*
*घर सजवू या तोरण बांधून, आस मांगल्याची ।।*

**शुभेच्छुक – श्री. अनिरुद्ध शहापूरकर, पुणे**




**अभिमानास्पद : नोबेल पुरस्कार विजेते भारतीय - सी. व्ही. रमन** - (१९३०)

भौतिकशास्त्रातील उल्लेखनीय कार्य (रमन इफेक्ट)

**शुभेच्छुक –श्री. अभय जोशी, डोंबिवली**

# माझी पहिली प्रसिद्धी



आमच्या शाळेत सहाव्या इयत्तेसाठी 'बालभवन' नावाचा उपक्रम आहे. अभ्यासाव्यतिरिक्त तेथे विविध स्पर्धा, खेळ, संस्कारक्षम पुस्तके वाचणे, हस्तकला, चित्रकला इ. उपक्रम विद्यार्थ्यांच्यासाठी राबवले जातात. शाळा सुटल्यावर हा उपक्रम असल्यामुळे, शाळेतील माझा सारा थकवा निघून जातो.

एके दिवशी बालभवनचे सर म्हणाले, ''तुमच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी हा उपक्रम आहे. तुम्ही येथे माहितीपूर्ण कात्रणे, छानसे चित्र, तुम्हाला सुचलेला निबंध, काही माहिती किंवा सुचलेली कविता आणून दाखवू शकता.'' हे ऐकताच मी विचारात बुडालो.

माझे बाबा कविता लिहितात. त्यांच्या काही कविता मी वाचल्या होत्या. संध्याकाळी ठरवले, आपणही कविता लिहायची. कशी का होईना; पण लिहायचीच. संध्याकाळ निघून गेली. पण काही सुचलंच नाही. सकाळी आठ वाजता परत बसलो वही, पेन घेऊन. मी माझ्या कवितेचं नाव ठरवलं होतं 'शाळा.' मनाने कशीतरी चार कडवी लिहिली.

त्या दिवशी बालभवनमध्ये गेल्यावर सर वर्गात आले. मी दप्तरातील वहीतून हळूच कवितेचा कागद बाहेर काढला. छातीत धडधड होत होती. सर काही बोलण्याअगोदरच मी सरांपाशी जाऊन कागद पुढे केला. त्यांनी कविता वाचली. मला विचारले, ''तूच केलीस ही कविता?''

मी उत्तरलो, ''हो, मीच!'' त्यांनी मला शाबासकी दिली. मला वर्गात वाचून दाखवण्यास सांगितली. मला प्रचंड आनंद झाला होता. हाच माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय दिवस!

तेव्हापासून मी कविता करायला लागलो. वर्गात माझी 'कवी' म्हणून ओळख होत गेली. एकीकडे मी मिळेल ते वाचायला सुरुवात केली. एके दिवशी असेच पुस्तके चाळत असताना मला 'छात्र प्रबोधन' अंक सापडला. त्यामध्ये 'पहिली प्रसिद्धी' हे मल्हार अरणकल्ले यांचे ललित वाचले. आणि मला वाटू लागले आपणही आपले लेखन वृत्तपत्रांमध्ये, मासिकांमध्ये पाठवूया. आणि योगायोग म्हणजे दुसऱ्याच दिवशी वृत्तपत्र वाचत असताना पुरवणीमध्ये 'तुमचाही सहभाग हवा', 'खळखळून हसवणारे विनोद पाठवा' असा मजकूर कोपऱ्यामध्ये वाचला. मग काय? केले मनाने तीन विनोद तयार. ते बाबांना दाखवले व पाठवण्याविषयी विचारपूस केली. लगेचच ते विनोद पाठवून दिले.

दर रविवारी मी पुरवणी पाहायचो. पाहता-पाहता ३ रविवार लोटले. मला वाटले, त्यांनी माझे विनोद स्वीकारले नसतील. पुढे पुढे मी पुरवणी पाहायचीच बंद केली. त्यानंतर काही दिवसांनी शाळेत जाताना माझा मित्र म्हणाला, ''कालच्या पुरवणीतले विनोद तूच लिहिलेस ना?'' मला काही समजले नाही. मी म्हणालो, ''कोणते?'' 'बहार पुरवणीतील', असं ऐकताच मी सायकल वळवली. पॅडल जोरात मारून सायकल तुफान वेगाने घरच्या दिशेने पळवली. कधी पुरवणी पाहीन, असे झाले होते. आनंद तर माझ्या मनात मावेनाच. इतका आनंद! घरी पोहोचल्यावर सायकल तशीच फेकली. घरात जाऊन रद्दीमध्ये कालची पुरवणी हुडकू लागलो. बाबांनी सांगितले बॅगमध्ये असेल. बॅग चाचपली. पुरवणी सापडली. पटकन पाने उलगडत ते पान शोधले. आणि आनंदाने उडीच मारली. संपूर्ण नावासहीत तसेच चित्रासहित माझे विनोद प्रसिद्ध झाले होते. आई-बाबांनी शाबासकी दिली. त्याच दिवशी शाळेत सरांनी मला उभे केले. ते कात्रण घेऊनच आले होते.

*नव्या जाणिवा झाल्या, काही नवे आकळले।*
*डोळे तेच होते, पण दृष्टी नवी लाभली ॥*

**शुभेच्छुक – सौ. अनघा विश्वास दातार, सातारा**



मला वाचायला लावले. माझी भरभरून स्तुती केली. हीच मला मिळालेली पहिली प्रसिद्धी! सर्वांची शाबासकी मिळाल्याने प्रसिद्धीचा व छापील अक्षरांचा तेव्हापासून मला भलताच लळा लागला. ही माझी पहिली प्रसिद्धी.

तसं म्हटलं, तर छात्र प्रबोधनमधील 'पहिली प्रसिद्धी' या अरणकल्ले सरांचा लेख माझ्या अजूनही स्मरणात आहे. तो वाचल्यापासून मला 'छात्र प्रबोधन' वाचण्याची गोडी वाटू लागली. आपणही काही लिहून बघावं, असं तीव्रतेनं वाटू लागलं.

त्यांनतर मी खूप काही लिहू लागलो. काही छोट्या कथा, कविता, लेख पाठवू लागलो. त्यातून अधिक प्रसिद्धी मिळत गेली. शाळेत 'लेखक' म्हणून माझी ओळख झाली. हे सर्व बालभवनमधील उपक्रम व 'छात्र प्रबोधन' मासिकामुळे शक्य झालं.


**– चि. प्रतीक जाधव** (इ. ९ वी)
*राजेंद्र विद्यालय, खंडाळा, जि. सातारा*


*चित्रकार : अंजली पुरंदरे*

---

*वाचलेच पाहिजे असे काही*

**सा**धना प्रकाशनातर्फे प्रकाशित 'कैफियत' हे राजन गवस यांचं पुस्तक म्हणजे समाजवास्तवच. राजन गवस हे संवेदनशीलपणे आणि परखडपणे स्वत:चे अनुभव मांडणारे लेखक आहेत.

'कैफियत' पुस्तकामध्ये त्यांनी अनेक महत्त्वाचे सामाजिक प्रश्न वाचकांपुढे मांडले आहेत. त्यातून वाचकांना भांबावून टाकणारं भयग्रस्त करणारं, भोवळ आणणारं वर्तमान कळतं. पुस्तकातील अनुभव म्हणजे साधनातील त्यांच्या लेखांचे संकलन होय. या अनुभवांमध्ये त्यांनी गावाकडील बालपणातील प्रसंगांची मदत घेतली आहे.

वृक्षतोड, जागतिकीकरणाचे खेड्यांवर होणारे परिणाम, प्रदूषण, पैश्याचे स्थान, बदलत चाललेले नातेसंबंध, वाढती लोकसंख्या, आत्महत्या, दिखाऊपणा,




राजकारण, भ्रष्टाचार या प्रश्नांना वाचकांपर्यंत पोचवण्यासाठी पुस्तकामध्ये अनेक लेख आहेत. प्रत्येक लेखाचा शेवट आपल्या मनात प्रश्न उभे करतो व वाचकाला अस्वस्थ करतो. यामुळे आपल्याला एखाद्या प्रश्नाला किती वेगवेगळ्या प्रकारच्या बाजू असू शकतात याचे भान येते.

पुस्तकामधील मला विशेषत्वाने आवडलेले लेख म्हणजे 'राजकारण', 'कोंडी' व 'गुरुजी' हे लेख. लेखामध्ये असणारे चित्र खूपच बोलके आहे. ते आपल्याला लेख वाचायला भाग पाडतात आणि अंतर्मुख करतात.

अशा या 'कैफियत' पुस्तकामधील 'चिमण्या' हा लेख दहावीच्या पाठ्यपुस्तकात आहे. या लेखामध्ये दिवसेंदिवस कमी होत चाललेल्या चिमण्यांच्या परिस्थितीचे वर्णन आहे. चिमण्यांच्या अस्तित्वाला असलेला धोका वर्णन करताना लेखकाच्या मनातील तळमळ व्यक्त होते.

पुस्तकामधील राजन गवस यांची साधी सोपी भाषा व आपल्यासारख्या शहरी लोकांना माहीत नसणारे गावाकडचे शब्द लेख रंजक बनवतात. खूप अलंकारिक भाषा न वापरता, योग्य ते बारकावे परखडपणे मांडल्यामुळे लेख वाचण्याची उत्सुकता वाढते.


**– कु. नीरजा भिडे** (इ. १० वी)
*अक्षरनंदन, पुणे*



**अभिमानास्पद : नोबेल पुरस्कार विजेते भारतीय - हर गोविंद खुराना** - (१९६८)
औषध शास्त्रातील उल्लेखनीय कार्य
**शुभेच्छुक – डॉ. नितीन खेडकर, पुणे**

कविता

# यशाचा सुगंध

नगरपालिकेच्या शाळेचा गणवेश अंगावर,
संध्याकाळी ती गजरे विकत असते कोपऱ्यावर.
सिग्नलपाशी गाडी थांबताच खिडकीपाशी येते,
''एक गजरा घ्या ना काका,'' ती बाबांना म्हणते.
एकदा मी म्हटलं तिला, ''शाळेत ना तू जातेस?
एवढे सगळे गजरे विकून, अभ्यास कधी करतेस?''
म्हणाली, ''कधी होतो अभ्यास, कधी नाही होत.
घरामधल्या माणसांचं भरलं पाहिजे ना पोट?
वडील आहेत आजारी, बिछान्याला खिळून,
आईचे हात दुखून येतात गजरे वळून वळून''
बाबांनी मग सगळेच गजरे एकदम घेतले विकत,
खूश होऊन घराकडे ती गेली पळत पळत.
एक गजरा गाडीत लावून, एक आईला दिला,
'बाकी गजरे करू काय?' बाबांना प्रश्न पडला
आजी-आजोबांचे फोटो गजरे माळून सजले
बाकी गजरे देवघरातले देव घालून बसले.
तेव्हापासून आमच्या घरी गजरे घमघमत,
तिचा अभ्यास व्हावा म्हणून आम्ही सुगंधात बुडत.



निकालाच्या दिवशीही ती गाडीपाशी आली,
''आज गजरे विकणं बंद,'' हसून म्हणाली.
''पास झाले, उपकार तुमचे; गेले पुढच्या वर्गात,''
मदनबाणाचा एकच गजरा दिला बाबांच्या हातात.
आज तिच्या केसातही मदनबाणच दिसला;
तिच्या यशाचा सुगंध दोन्ही घरांत दरवळला.

**– डॉ. सुमन नवलकर**
*४/२०, ज्योती बिल्डिंग, प्लॉट नं. ४३/४५,*
*बरकत अली दर्गा मार्ग, वडाळा (पूर्व) मुंबई ४०००६७.*

*चित्रकार : कुडल हिरेमठ*

*घे भरारी अंतरी, जा मुक्त दिगंतरी।*
*कर्तृत्वाचा आलेख, पसरू दे दिशांतरी॥*
**शुभेच्छुक – सौ. अंजली श्रीकांत संभुस, पुणे**

*With best compliments from*

**PRATIBHA ELECTRICAL CONTRACTOR LLP**

Electrical Engineers, Contractors & Suppliers

*REGISTERED OFFICE*

**23, 'SHIKHAR,' SHUKRAWAR PETH, OPP. TULSHIBAG, PUNE - 2.**

**TEL : 020 - 24458830, 24333777**

।। दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा! ।।

यंदा दहावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी
महत्त्वाचे आणि आवश्यक पुस्तक

**दहावीनंतरची शाखा निवड**

**लेखक - विवेक वेलणकर**

आत्तापर्यंत ३ वर्षात १२ आवृत्त्या संपल्या

पुस्तकासाठी संपर्क -
ए. आर. व्ही. इन्फोटेक, १२००,
सदाशिव पेठ, लिमयेवाडी, पुणे -३०
ई मेल :- pranku@vsnl.com
फोन नं. ९८५०६३८४८२
९८५००६३४८०

**महेश अर्बन को-ऑप. बँक लि., सोलापूर**

**मुख्य कार्यालय** - १२८, शुक्रवार पेठ, फौजदार चावडीजवळ, सोलापूर
फोन नं. २७४२४००, २६२२६४५.
**शाखा** - सिद्धेश्वर मार्केट यार्ड, सोलापूर, फोन नं. २७४२४०२.
शिवगंगा नगर, जुळे सोलापूर, सोलापूर, फोन नं. २७४२४०१.

- आमची वैशिष्ट्ये -

- सुरवातीपासून सतत 'अ' वर्ग.
- विविध ठेवी योजनेवर आकर्षक व्याजदर
- संपूर्ण संगणकीकृत सेवा
- RTGS / E-Payment of Tax ची सोय.
- व्यापार, उद्योग व व्यावसायिकांना कमी व्याजदराने कर्जाची उपलब्धता
- विनम्र सेवा

**राजेंद्र गं. कोठावळे** (मुख्य कार्यकारी अधिकारी)
**मल्लिनाथ रा. मसरे** (व्हा. चेअरमन)
**अनिल वि. सिंदगी** (चेअरमन)

**आणि समस्त संचालक मंडळ**



**अभिमानास्पद : नोबेल पुरस्कार विजेते भारतीय - मदर तेरेसा** - (१९७९)
शांततेसाठी पुरस्कार

**शुभेच्छुक - श्री. मिलिंद वैद्य (प्लास्टोटेक), पुणे**

# रण फंदीची जात आमुची...!

निनाद बेडेकर



ब्रह्मपुत्रा शांतपणे वाहात होती. पात्रात नावा-जहाजं होती; पण लढाई म्हणावी तशी सुरू झाली नव्हती. नवाबाचं आरमार घेऊन रामसिंह कछवाह कामाख्याला आला होता. हटाखुली, अश्वक्लीत आणि कामाख्या या त्रिकोणात, ब्रह्मपुत्रेच्या पात्रात ते आरमार एकवटलं होतं. आरमारानं असमच्या अहोम राजाच्या आरमाराला मागं रेटलं होतं. अहोमांचा पराभव दिसत होता. जिकडे तिकडे मुघलांची लाल-पांढरी निशाणे दिसत होती. त्यावरचे सिंह-सूर्य झळाळत होते. ऊन पडलं की, त्यांची झळाळी आणखी वाढत होती.

अहोम राजाचं सैन्य ब्रह्मपुत्रेच्या दोन्ही काठांवर रेटलं गेलं होतं. तेथे तटबंदी होती आणि त्याआडून त्यांचे सैनिक जमेल तसा मुघलांचा प्रतिकार करत होते. पण प्रतिकार क्षीण होत होता. मुघलांच्या तोफा त्यांच्या जहाजांवरून धडाडत होत्या. त्यांचा प्रतिकार असमी सैन्याकडून जसा जमेल तसा होत होता; पण असमी सैन्याकडे फार बारूद नव्हते. त्यांच्या तोफा फारच कमी पल्ल्याच्या होत्या. त्यांचे गोळे मुघली जहाजांना कोणतीही इजा करू शकत नव्हते.

अचानक मुघली काफिल्यापासून काही मोठ्या तोफा एकाच वेळी धडाडल्या. मोठे तोफगोळे किनाऱ्यावर आले. किनाऱ्यावरच्या असमी तटबंदीला खिंडार पडले. सरबत्तीचा आवाजच एवढा मोठा होता की, झोपलेले लोक एकदम दचकून जागे झाले. तटबंदीला पडलेल्या खिंडारातून पलीकडे जाण्याची मुघलांची तयारी सुरू झाली.

तापानं फणफणलेला, अहोम राजाचा सेनापती, लाच्छित बडफूकन, वैद्यांचा सल्ला न जुमानता आपल्या राहुटीबाहेर आला. खड्या आवाजात त्यानं विचारलं,

''तटबंदीत काय गडबड सुरू आहे...?''

''तटबंदीला खिंडार पडलं, देव...!''

''खिंडार? मग बुजवा ते ताबडतोब ! मुघल तेथून आत

*बंडाचा तो झेंडा उभवुनि, धामधूम जिकडे तिकडे ।*
*उडवुनि देऊनि जुलुमाचे या, करू पहा तुकडे तुकडे ।।*

**शुभेच्छुक – एक हितचिंतक, डोंबिवली**

शिरता कामा नयेत !!''

''जशी आज्ञा देव...!''

आपले सैनिक खिंडार बुजवण्याचं काम तडफेनं करणार नाहीत, याची खात्री असल्यानं लाच्छितनं आपल्या मामाला बोलावलं.

''मामाश्री, हे खिंडार बुजवण्याची जबाबदारी मी आपल्यावर सोपवतो. आज रात्रीच हे काम करून टाका.''

''होय देव ! अवश्य !''

''मग ताबडतोब कामाला लागा!''

सगळे लोक पांगले. मामा खिंडार बुजवण्याच्या कामासाठी निघून गेले. लाच्छित परत आपल्या छावणीत आला. त्यानं आपल्या निवडक तरुण सरदारांना बोलावून घेतलं. सगळे जमल्यावर तो म्हणाला,

''अहोम राजे स्वर्ग देव चक्रध्वजसिंह यांच्या सरदारांनोSSS! मी तुम्हाला काही सल्ला देण्यासाठी बोलावलं आहे. माझं शरीर तापानं पोखरलं आहे; पण माझं मन मात्र निर्धास्त आहे !''

''आपण विश्रांती घ्यावी देवSSS ! आम्ही मुघलांशी लढू. प्राण पणाला लावून लढूSSS आपण निश्चिंत राहा.''

''मला त्याची खात्री आहे; पण तुम्ही प्राण देऊ नका. प्राण वाचवून





**अभिमानास्पद : नोबेल पुरस्कार विजेते भारतीय - सुब्रमण्यम चंद्रशेखर** - (१९८३)
भौतिकशास्त्रातील उल्लेखनीय कार्य
**शुभेच्छुक – श्री. संदीप घरत, डोंबिवली**

लढा. प्राण असले तर ही लढाई दीर्घकाळ चालेल. मनात जिद्द ठेवा!''

''होय देवऽऽऽ''

''मला तुम्हाला मराठ्यांचा राजा शिवाजीविषयी सांगायचं आहे! हा राजा त्याच्या मुलासोबत त्या क्रूरकर्मा औरंगजेबाच्या तुरुंगात, कैदेत होता. औरंगजेबानं आपल्या बापाला कैदेत टाकलं. भावांना मारलं, थोरल्या मुलाला ठार केलं.

*सतरावं शतक! मुघल साम्राज्य हिंदुस्थानात हळूहळू आपले हातपाय पसरू पाहात होतं. महाराष्ट्रात होणाऱ्या आक्रमणांना शिवाजी महाराजांनी जसा कडवा विरोध केला तसाच प्रयत्न देशाच्या ईशान्य कोपऱ्यात असणाऱ्या आसाममध्येही झाला. 'आसामचा शिवाजी' म्हणून ज्याचा गौरव करता येईल असा झुंजार लढवैय्या म्हणजे लाच्छित बडफूकन!*

*संपूर्ण समर्पणाच्या भावनेने मायभूला शत्रूपासून वाचविण्यासाठी अवघं आयुष्य वेचणाऱ्या आसाममधील या योद्ध्याची कथा बेडेकर यांनी अतिशय नाट्यपूर्ण शब्दांत आपल्यासमोर साक्षात जिवंत केली आहे.*



*ही भारतभूमी नवरत्नांची खाण।*
*या इथे जन्मले योद्धे दिव्य महान॥*

**शुभेच्छुक - सौ. मधुरा जोशी, डोंबिवली**

त्याच्या तावडीतून कोणीही जिवंत सुटला नव्हता; पण हा शिवाजी राजाSSSS !''

''त्याचं काय देव?''

''हा राजा, आपल्या बुद्धिचातुर्यामुळे निसटून गेला. त्याची जिद्द, तयारी वाखाणण्यासारखी होती. अवघा हिंदुस्थान आश्चर्यचकीत होऊन गेला होता.''

''देव, आम्हाला या शिवाजी राजांबद्दल जरा सांगा ना !''

''हो तेच सांगण्यासाठी मी आपल्याला बोलावले आहे. मीही त्याला असममधून एक पत्र पाठवले.''

''काय SSS? देव ! शिवाजीमहाराजांना पत्रSSS''

''हो ! मी लिहिले होते की, तुम्ही पश्चिमेकडून आणि आम्ही पूर्वेकडून एकाच वेळी मुघलांवर हल्ले चढवू. त्यांना नेस्तनाबूत करण्यास फार वेळ लागणार नाही SS!''

''मग देव, पुढे काय झाले?''

''शिवाजीराजांनी त्यांचे काम चोख केले. ते अजूनही करतच आहेत. पण हा रामसिंह कछवाह इथे येऊन बसल्याने आम्हाला असम सोडता येत नाही. त्यात ही प्रकृती SS !''

''देवSS ! आपला मनसुबा कळला. आम्ही तो तडीस नेऊ. आम्ही आपल्याला वचन देतो.''

''होय. आपल्याकडून हीच अपेक्षा होती.''

एक वेगळा विचार मनात धरून, निर्धार करून असमी सरदार आपापल्या डेऱ्यात गेले. लाच्छितला ग्लानी येत असल्याने तोही आपल्या शयनकक्षात गेला.

दुसऱ्या दिवशी पहाटे लाच्छित उठला. ताप कमी झाला होता. ग्लानी गेली होती. खिंडाराचं काम कोठवर आलं आहे ते पाहण्यासाठी तो निघाला. लाच्छित खिंडारापाशी आला आणि पाहतो तो काय? खिंडार तसेच होते. सैनिक झोपलेले होते. ते दृश्य पाहाताच लाच्छितच्या तळपायाची आग मस्तकात गेली. तो ओरडला,

''मामाश्रीSSS !''

त्याचा मामा झोपेतून दचकून जागा झाला. समोरच रागाने लालबुंद झालेला लाच्छित उभा होता. तो थरथरत होता. काम पूर्ण न झाल्याने तो मामावर चिडला होता !

''मामाश्री SSS ! हे काय? खिंडार अजून तसंच SS !''

''होय देव ! आपले सैनिक दिवसभराच्या लढाईने थकले होते. मीच त्यांना आराम करण्याची परवानगी दिली SS !''

''मामाश्री SS ! तुम्ही काम अर्धवट टाकले. कोताई केली. उद्या मुघल येथून आत घुसले तर असमच्या नाशाची ती सुरुवात असेलSS !''

''पण देव SS !''

''ते काही नाही मामाश्री SS ! काम वेळेत केले नाहीत, आता शिक्षा भोगा. *देशतकं मोमाई डांगर न होय !* (देशापेक्षा मामा मोठा नाही.)''

असं म्हणत लाच्छितनं कमरेची तलवार हातात घेतली आणि एका वारात आपल्या स्वत:च्या मामाचं डोकं उडवलं ! हे दृश्य पाहून घाबरलेल्या असामी सैनिकांनी झटक्यासरशी ते खिंडार बुजवलं! लाच्छित म्हणाला,

''आम्ही शिवाजीराजांच्या गोष्टी सांगायच्या आणि गुन्हा झाला तरी गुन्हेगाराला मोकळं सोडायचं? नाही नाही SSS ! माझा मामा असला म्हणून काय झालं? त्याचा गुन्हा शाबित झाला आहे; त्याला ताबडतोब शिक्षा केलीच पाहिजे SS!'' असमी सेनेतून आरोळ्या उठल्या SS!

''लाच्छित देव की जय होSS!'' त्या आरोळ्या मुघलांच्या कानावर गेल्या. रामसिंह आपल्या जहाजावरून बघू लागला. खिंडार बुजवलं गेलं होतं. असमी सैनिक उन्मादाने ओरडत होते. अजून एक संधी वाया गेल्याबद्दल रामसिंह मनात चडफडला. लाच्छित आपल्या छावणीत परतला.

त्यानंतर रामसिंहाने असम काबीज करण्याचे अनेक प्रयत्न केले; पण त्याचे सगळे प्रयत्न पाण्यात गेले. लाच्छितने आता मुघलांना ब्रह्मपुत्रेतून हाकलून लावण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्याने आपल्या सरदारांना बोलावले. त्यातील एकजण लाच्छितला म्हणाला,

''देव ! कुचबिहारच्या राजांनी स्वर्गदिवांना पत्र पाठवले का?''

''होय, पाठवले SS!''

''काय आहे त्या पत्रात?''

**अभिमानास्पद : नोबेल पुरस्कार विजेते भारतीय - अमर्त्य सेन -** (१९९८)
अर्थशास्त्रातील कार्य
**शुभेच्छुक – सौ. कविता बाम, कल्याण**

''त्या पत्रात प्राणनाथांनी शिवाजीराजांच्या हालचाली कळवल्या आहेत. मराठ्यांनी मुघलांविरुद्ध मोठे युद्ध सुरू केले आहे !''

''महाराष्ट्र हा इतका छोटासा प्रदेश आणि तो मुघलांशी युद्ध पुकारतो?''

''प्रदेश लहान का मोठा हा प्रश्न नाही. आपल्या प्रदेशाच्या स्वातंत्र्यासाठी हृदयात ऊर्मी उठल्या पाहिजेत. देशप्रेमाचा वणवा प्रज्वलित झाला पाहिजे. तो शिवाजीराजांनी केला आहे. त्यांचा प्रदेश खाचखळग्यांचा, नद्या-नाल्यांचा, कपाटविवरांचा, किल्लेकोटांचा आहे. त्याच्या आधाराने ते शत्रूशी लढतात. शिवाजी महाराजांनी मराठ्यांच्या मनात स्वराज्याचं बीज पेरलं आहे. छत्रसाल बुंदेल्यानं शिवाजीराजांकडून स्वातंत्र्याचे धडे गिरवले. अवघ्या हिंदुस्थानात आता क्रांतीचे वारं वाहू लागले आहे ! असमच्या लढाऊ सैनिकांनो, आपल्यालाही मुघलांना असमबाहेर काढायचं आहे. जोपर्यंत स्वराज्य मिळत नाही, तोपर्यंत ही लढाई सुरूच राहाणार. आता थांबायला आणि थकायला वेळच नाही. घ्या कामाख्येचं नाव आणि तुटून पडा मुघलांवर. आमार शोनार असम SS! आमी तुमीको भालो बाछी !'' बोला.

''स्वर्गदेव चक्रध्वजसिंह महाराज की SSS !''

''जय SSS''

असामी सैनिकांनी त्वेषाने मुघलांवर एल्गार केला. लाच्छितनं बांधलेल्या छोट्या जहाजातून मुघलांवर हल्ले सुरू झाले. कामाख्या, हटाखुली आणि अश्वक्लीत या त्रिकोणात युद्धाला जोर चढला. ही सराईघाटाची लढाई! दोन्ही बाजूंचे असंख्य सैनिक कामास आले. ब्रह्मपुत्रा लालेलाल झाली.

सततच्या लढाईने लाच्छितला मोठा ज्वर चढला. आपल्या सैनिकांना प्रोत्साहन देण्यासाठी दोन्ही हातांत तलवारी घेऊन तो लढण्याचा प्रयत्न करू लागला. ऐन मोक्याच्या क्षणी त्याच्या अंगात सरसरून ताप चढला. त्याच्याविरुद्ध असममध्येच कारस्थाने सुरू झाली. त्याचा उदय कित्येकजणांना बघवत नव्हता. मानसिक तणावाने लाच्छितला घेरले.

रामसिंहाला लाच्छितची ही अवस्था कळली. त्याने असमी सैन्याविरुद्ध लढण्याची जोरदार तयारी सुरू केली. जहाजाला जहाजे भिडली. सैनिकांना सैनिक भिडले. तलवारीला तलवार भिडली. मुघल तलवारींचा मार सहन न झालेले असमी पळू लागले.

तापाने फणफणलेला लाच्छित बडफूकन एका असमी जहाजावर चढला. रण सोडून पळणाऱ्या असमी सैनिकांना तो म्हणाला,

''पळा SS ! पळा SS! आपल्या घरी बायका-मुलांसोबत सुखात राहा. स्वर्गदेवांना सांगा, लाच्छित *जियाई थकामाने गवाहाटी एरा नाही.''*

जिवात जीव होता तोपर्यंत लाच्छितने गुवाहाटी शत्रूच्या हातात पडू दिली नाही. लच्छितचा तो आवेश पाहताच पळणाऱ्या असमी सैनिकांत चैतन्य पसरले. पळण्याचे सोडून ते परत फिरले. असमी नावा परत फिरल्या. तुंबळ लढाई झाली. मुघलांचा सपशेल पराभव झाला. त्यांच्या फौजेची वाताहत झाली. मुघल सैन्यात लढण्याचे बळच राहिले नाही.

लाच्छित विजयी होऊन परत आला; पण त्याच्या आजाराने उचल खाल्ली. त्याला ग्लानी आली. स्वतंत्र असमचे नाव घेत लाच्छितने शेवटचा श्वास घेतला. लाच्छित बडफूकन असमच्या आणि हिंदुस्थानच्या इतिहासात अमर झाला. स्वर्गदिवांना लाच्छितच्या मृत्यूची बातमी कळताच ते दुःखी झाले. अवघा असम हळहळला. एक भूमिपुत्र आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी शहीद झाला.

*पोलादी निर्धार आमुचा*
*असुर बळाची खंत नसे*
*स्वतंत्रतेच्या संग्रामाला*
*विजयावाचून अंत नसे*
*श्रद्धा हृदयातील आमुची*
*वज्राहुनि बलवंत असे*
*मरण मारुनि पुढे निघाले*
*गर्व तयांचा कोण हरी?*
*रणफंदीची जात आमुची,*
*कोण आम्हा भयभीत करी?*

**निनाद बेडेकर**
*'स्वानंद', ५, हरेकृष्ण मंदिर पथ, पुणे 411016*
*चित्रकार : राहुल देशपांडे*

*आज करेंगे और मरेंगे जिद्द तशी निधड्याची।*
*पोलादी स्फुरते ही शक्ती वज्राची*
**शुभेच्छुक –सौ. उज्ज्वला बसोले, गोरेगाव, मुंबई**

# कागदी परडी

कृतिपर



आ. १



आ. २



आ. ३



आ. ४



आ. ५

बालमित्रांनो, लवकरच सुट्टी लागेल. गंमत-मजा करण्याचे दिवस सुरू होतील. अशा वेळी तुम्हाला काही नवीन गोष्टी करायला आवडतील का? घरात उपलब्ध असलेल्या साहित्यातूनच हे बनवायचे आहे. चला करू या सुरुवात!

**साहित्य-** वर्तमानपत्र, डिंक, कात्री, झाडूची काडी

**कृती-** १) जुन्या वर्तमानपत्राच्या बालमित्र पुरवणीच्या आकाराचे संपूर्ण पान उघडून घ्या.

२) आकृती १ मध्ये दाखवल्याप्रमाणे त्याचे तीन समान भाग करून पट्ट्या कापून घ्या.

३) आकृती २ मध्ये दाखवल्याप्रमाणे झाडूची काडी पानाच्या एका पट्टीच्या टोकावर ठेवून अशाप्रकारे सुरनळी (पुंगळी) बनवा.

४) पट्टीचे शेवटचे टोक सुरनळीला चिकटवा, काडी काढून घ्या

५) भरपूर सुरनळ्या (अंदाजे ५०-६०) बनवून घ्या.

६) आता प्रत्येक सुरनळी बोटाने दाबून ती चपटी करून घ्या. एकेक सुरनळी घेऊन ती काडीभोवती गुंडाळून चिकटवा.

७) आकृती ३ मध्ये दाखवल्याप्रमाणे पहिल्या गुंडाळीच्या बाहेरील बाजूचे टोक दुस-या सुरनळीच्या टोकात अडकवा.

८) अशाप्रकारे प्रत्येक सुरनळी एकमेकात अडकवून ती चिकटवा. अशाप्रकारे गुंडाळी तयार होईल.

९) आणखी एक छोटी गुंडाळी बनवा. ह्या गुंडाळीच्या मध्यभागावर बोटांनी हलक्या हाताने दाब द्या. गुंडाळीला खोलगट ताटलीचा आकार प्राप्त होईल. छोटी व मोठी अशा दोन ताटल्या तयार होतील. (आकृती क्र. ४ प्रमाणे)

१०) दोन्ही ताटल्या एकमेकांवर आकृती क्रमांक ५ मध्ये दाखविल्याप्रमाणे चिकटवल्यावर आकर्षक परडी तयार होईल.

– **ज्योत्स्ना सुतवणी,** ठाणे jyotsna.sutavani@gmail.com

*Happy Diwali*

**IDEAL GAS SPRINGS PVT LTD**

Plot No. E-3/3, Old MIDC, Satara. Contact -02162 244294,
Email-igspl@sancharnet.in response@idealgassprings.com



**अभिमानास्पद : नोबेल पुरस्कार विजेते भारतीय - व्ही. रामकृष्णन्** (२००९)
रसायनशास्त्रात उल्लेखनीय कार्य (विभागून)

**शुभेच्छुक – सौ. मंजिरी भागवत, पुणे**



एखादा अवलिया मित्र आपल्या स्मरणात राहतो तो त्याच्या वेगळेपणामुळे. प्रसादचा परदेशी मित्र पवेल त्याला स्मरतो, तो त्याच्या वेगळ्या फंड्यामुळे; त्याची कॉफी बनवायची पद्धत वेगळी अन् त्यामागचं तत्त्वज्ञानही आगळंच. त्याची फोटोग्राफीही अशीच जगावेगळी.. त्याची भाषाही या मित्रांना परकी... त्याने मित्रांना एकच शब्द शिकवला... त्याचबरोबर फुलांची भाषाही शिकवली. असा हा पवेल....

व्यक्तिचित्र म्हटलं, की आपल्या डोळ्यांसमोर काही प्रसंगातून त्या व्यक्तीचे रूप, गुण, तिच्याशी असलेले भावबंध असा एक आकृतिबंध उभा राहातो. पण प्रसादने मात्र, स्वत:चा खास वेगळाच आकृतिबंध इथे वापरलाय. आपल्या दोस्ताच्या मुक्त व्यक्तिमत्त्वासारखा...

# कॉफी, कॅमेरा आणि काहीबाही...

प्रसाद सांडभोर

**०/पत्र**

भलीमोठी बॅग घेऊन मी बसमध्ये चढत असताना इराच्या हाका ऐकू आल्या. ती धावत बसच्या दिशेनं येत होती.

‘‘हे बघ! तुझ्यासाठी पवेलचं पत्र आलं! किती जाडजूड पाकीट आहे’’, ती धापा टाकत म्हणाली.

‘‘ए, आम्हालापण सांग हं, त्यानं काय पाठवलंय ते..’’

तिसरं सत्र संपवून दिवाळीच्या सुट्टीसाठी मी उत्साहात घरी जायला निघालो होतो. किती छान वेळ साधली पवेलनं!

बस सुरू होताच अधीरतेनं मी पाकीट फाडून पत्र वाचायला घेतलं. पत्र कसलं? साधारण अर्धा वीत रुंद आणि वीतभर लांबीच्या कागदाची उलटसुलट घड्या घालून बनवलेली थप्पीच होती ती ! चांगली अर्धा-पाऊण सेंटिमीटर जाडीची आणि त्यावर पवेलचं बोरूनं लिहिलेलं खरखुरं अक्षर... अवलियाच आहे हा खरा ! मी ती कागदाची भेंडोळी सावरत मजकूर वाचू लागलो.

पत्राच्या प्रत्येक घडीबरोबर

*कलांवरती प्रेम करावे, साहित्याचा ध्यास धरावा ।*
*अभ्यासाचा विचार अपुला, वृत्तीमध्ये मुरवून घ्यावा ।।*

**शुभेच्छुक –अरविंद सेल्स कॉर्पोरेशन, सोलापूर**

हळूहळू आठवणी उलगडत गेल्या...

**१/कॉफी**

पवेल एक प्रश्न कायम विचारत असे, ''तुमच्या देशात इतक्या सुंदर कॉफीचं उत्पादन होतं; तरीसुद्धा इथे प्यायला छानशी कॉफी कुठेच का बरं मिळत नाही?''

यावर माझं उत्तर ठरलेलं असे, ''कारण आम्ही आमची कॉफी तुमच्या देशात पाठवतो ना!''

त्याच्या देशात, त्याच्याकडे *कॉफीमेकर* होता. त्यानं स्वत: कॉलेज-प्रोजेक्ट म्हणून बनवलेला. त्यात भाजक्या *कॉफीबीन्स* टाकून, दळून, तो त्याला हवी तशी कॉफी बनवायचा.

*कॉफीबीन्स* किती भाजलेल्या असाव्यात इथपासून पवेलचं 'कॉफीशास्त्र' सुरू व्हायचं. वेगवेगळ्या प्रकारची कॉफी - *एस्प्रेसो, लाते, अमेरिकानो, कॅप्युचिनो, मॅकिआतो* - आणि या प्रत्येकातल्या दूध, पाणी, वाफ आणि कॉफीच्या प्रमाणाबद्दल तो फार चोखंदळ होता. *एस्प्रेसो* एवढीच कॉफी; पण दुप्पट दूध आणि निमपट पाणी. कोणती कॉफी कोणत्या रूपात *सर्व्ह* करावी? कप कसा आधीच गरम करून घ्यावा; जेणेकरून कपाच्या तळातल्या कॉफीची चव बदलणार नाही, इत्यादीबद्दल पवेलची स्वत:ची खास मानकं होती.

आमचं बऱ्याच ठिकाणी हिंडून झालं, पण पवेलला हवी तशी कॉफी कुठेच मिळेना! मोठमोठ्या ब्रॅण्डेड कॅफेजची कॉफी त्याच्या मते *'बॅड कॉफी'* का? तर ते *एस्प्रेसोमध्ये* थेट दूध मिसळतात म्हणून. छोट्या टपऱ्यांवरची कॉफी म्हणजे '*फनी कॉफी*' कारण त्या कॉफीवर कोको पावडर भुरभुरलेली असते. *इन्स्टंट कॉफीचा* पवेलला प्रचंड तिटकारा. त्याच्या मते तो निव्वळ कचराच! कॉफी पावडर बनताना *फिल्टरमध्ये* उरलेला गाळ (ज्याला 'चिकोरी' म्हणतात.) *इन्स्टंट कॉफी* म्हणून विकतात असं त्याचं ठाम मत. उडपी हॉटेलातली *फिल्टर कॉफी* मात्र त्याच्यासाठी नवा प्रकार होता. तिथे त्याने थेट भटारखान्यात जाऊन कॉफी बनवायची प्रक्रिया समजावून घेतली होती.

एकदा आम्ही असेच कुणीतरी सुचवलेल्या *रेस्टॉरंटमध्ये* कॉफी - परीक्षणासाठी गेलो होतो. *ऑर्डर* देऊन गप्पा मारत असताना अचानक पवेल बोलायचा थांबला. त्याच्या डोळ्यांत एक वेगळीच चमक आली आणि तो किंचाळला, ''ऐक ! ऐक !! हाच तो आवाज !'' काहीसा कुकरच्या शिट्टीसारखा आवाज येत होता, यांच्याकडे योग्य *कॉफीमेकर* आहे. आपली कॉफी बनतेय त्यात !''

ती कॉफी खरंच वेगळी होती. शोधकार्य पूर्ण झाल्याच्या आनंदात कॉफी पित पित मी पवेलला विचारलं, ''काय रे? सगळ्यात छान, लक्षात राहिलेली कॉफी तू कुठे प्यायला आहेस?'' तो म्हणाला,

''प्रसाद, योग्य पद्धतीपेक्षाही कॉफीची चव तुम्ही ती कोणासोबत, कोणत्या ठिकाणी घेत आहात यावर अवलंबून असते. कॉफी हे निमित्त असतं. लक्षात राहातात ती माणसं, जागा. अन् आठवणी.''

**२/कॅमेरा**

पवेलला फोटोग्राफीचं प्रचंड वेड! इतकं की 'यत्र यत्र पवेल तत्र तत्र *कॅमेरा.*' पवेलच्या प्रत्येक गोष्टीप्रमाणे हा *कॅमेराही* विशिष्ट प्रकारची *लेन्स* असलेला, जुन्या पद्धतीचा, रीळवाला!

पवेलनं कधी, कुठे फोटो *क्लिक* केला की मजा यायची. लोक फोटो बघायच्या अपेक्षेने जवळ यायचे; पण कॅमेऱ्यात फोटो दिसायचाच नाही! मग पवेल त्यांना समजवायचा. ''हा ॲनलॉग कॅमेरा आहे. यात फोटो लगेच नाही दिसत.'' आणि मग त्याचं नेहमीचं *'डिजिटल* गोष्टींच्या अतिरेकावरचं व्याख्यान' सुरू व्हायचं. त्याच्या मते सगळ्याच गोष्टी *डिजिटल* आणि *इन्स्टंट* कशाला हव्यात? काही गोष्टींची मजा ही त्यांच्या हळू असण्यातच आहे.

त्यानं आमच्या *लेझर कटिंग* मशीनवर बराच खटाटोप करून स्वत:साठी एक छोटेखानी *पिनहोल कॅमेरा* बनवला होता. फोटो काढताना त्याचं *शटर* हाताने ठरावीक वेळासाठी उघडं धरून ठेवावं लागत असे. त्याचं स्वत:चं *डिझाइन* होतं ते.

एका रविवारी दुपारी पवेल पळत पळत रूमवर आला.

''बघ मला काय मिळालं ते! *पेंटॅक्स. ओरिजिनल.* पाचशे रुपयांत.''

**अभिमानास्पद : टेम्पलटन पुरस्कार विजेते भारतीय - मदर तेरेसा** (१९७३)
शांततेसाठी (मिशनरीज ऑफ चॅरिटी या संस्थेच्या संस्थापक)

**शुभेच्छुक – साधना प्रिंटींग प्रेस, सोलापूर**

त्याच्या हातात एक जुनाट *कॅमेरा* होता.अहमदाबादच्या संडे *मार्केटमधली* खरेदी. स्वारी एकदम खूश होती.

''खूप वर्षांपासून माझं स्वप्न होतं हा *कॅमेरा* वापरायचं; पण चेकमध्ये कधीच घेऊ शकलो नाही. आणि इथे फक्त पाचशे रुपयांत मिळाला बघ ! हा: हा:!! याचा आरसा जरा अडकतो फोटो काढताना; पण तो दुरुस्त करता येईल.''



इतकं सांगून तो निघून गेला. एक आठवडा लागला *पेंटॅक्स* दुरुस्त व्हायला. पण त्यानंतर तो पवेलच्या गळ्यातला ताईत बनला, हे वेगळं सांगायला नकोच !

पवेलनं काढलेले फोटो मात्र आम्ही कधीच बघितले नाहीत. तो *रोल डेव्हलप* करत नसे. एकदा पवेल सांगत होता,

''तुला माहीत आहे? काही आदिवासी कॅमेऱ्याला फार भितात. त्यांच्या मते कॅमेरा समोरच्याच्या आत्म्याचा तुकडा फोटोमध्ये बंदिस्त करतो.''

''म्हणून तूपण *फोटो डेव्हलप* करत नाहीस का?''.. मी सहज विचारलं.

'अंहं... नाही. एक वेळ होती जेव्हा मीपण अधाशासारखे फोटो काढायचो. *डिजिटल, ॲनलॉग;* पण *अमेच्युअर*. आता *फोटोग्राफी* माझ्यासाठी *मेडिटेशन* आहे. प्रत्यक्ष फोटोपेक्षा, तो फोटो काढण्याचा क्षण अनुभवायला मला जास्त आवडतं.''

*क्लिक!* आणि त्यानं तेवढ्यात माझा फोटो काढला.

**३/न्हिन्हिका**

आमच्या 'बेस्ट कॉफी इन अहमदाबाद' मोहिमेच्या निमित्तानं आम्ही खूप भटकलो. कधी पायी, कधी सायकलवरून. फिरताना सतत गप्पा सुरू असायच्या - चित्रपट, कादंबऱ्या, चेक व भारतीय साहित्यिक, विचारवंत - त्यांचे विचार, तत्त्वज्ञान, त्याच्या देशात चालू असलेला निवडणूक प्रचार, आवडी-निवडी... असं बरंच काही.

कधीकधी आम्ही रात्रभर जागायचो, तारे मोजत ! शेकोटीजवळ बसून तो गिटार वाजवत त्याच्या भाषेतली गाणी गायचा; अर्थ सांगायचा.

मग आम्ही सहज विचारायचो.

''पवेल, मोराला तुझ्या भाषेत काय म्हणतात रे?''

*''मोर? यू मीन पिकॉक? वी से पाSSS फ्!''*

*''पाफ?''*

''अहं... *'पाSSSफ्'*

उच्चारांच्या बाबतीत पवेल फार कटाक्षाने लक्ष द्यायचा. तो आमच्याकडून बऱ्यापैकी हिंदी, मराठी बोलायला आणि देवनागरीतून लिहायलाही शिकला. आम्हाला मात्र त्याने आवर्जून एकच शब्द शिकवला, *'न्हिन्हिका.'*

शब्दश: अर्थ होईल *'चीअर्स'.* पण चेक संस्कृतीत *'न्हिन्हिका'* म्हणजे 'खुशाल राहा.' याच नावाचं एक मोहोरीसारख्या पिवळ्या फुलांचं झुडूपही असतं, असं त्यानं सांगितलं.

पुढे एकदा त्यानं पत्रातून मला त्या *'न्हिन्हिका'च्या* काही बिया पाठवल्या. भारतीय हवामानात ते वाढतं का हे तपासायला!

आज ते *'न्हिन्हिका'* पिवळ्या पिवळ्या फुलांनी बहरलं आहे. गॅलरीत वाऱ्याच्या झुळकेबरोबर डोलतं आणि सांगतं, *''न्हिन्हिका,* न्हिन्हिका!''

✡ ✡ ✡

**– प्रसाद सांडभोर**
*१३ अ, विजयश्री सोसायटी,*
*कोथरूड, पुणे 411038*

*चित्रकार : सौरभ उपळेकर*

*फुलांचे झुबके किती लहडले, प्रत्येक फांदीवरी ।*
*त्यांचा गंध चहूकडे पसरला, वर्णू किती माधुरी ।।*

**शुभेच्छुक –सौ. हिमानी गोडसे, पुणे**

कविता

# इटुक इवली कळी

मी इटुक, इवली तुझी कळी गं आई
हळूहळू उमलू दे मला, कशाला घाई?

मी पानांमध्ये तुझ्या दडून राहीन
अन् हळूहळू जीवनरस मी घेईन
मधुगंध भरू दे अल्लदसा कोषात
उतरू दे पाकळीत रंगांची नवलाई ॥१॥

मी मऊ कोवळे ऊन पिऊनी छान
पाखरांसवे घेईन मस्तशी तान
वाकुल्या ढगांना अध्येमध्ये दावून
वाऱ्याशी गप्पा ठोकीन काहीबाही ॥२॥

मी उमलावे ना म्हणून भुंगे येती
अन् फुलपाखरे पंख झुलवूनी जाती
दवबिंदू पसरती रत्नांच्या किती राशी
पण 'उमलायचे' मनात माझ्या नाही ॥३॥

कधी सूर्यकिरण अवचित एक येईल
झिरपेल पाकळीत अंतरंग उजळेल
ती चांदण-दुलई रात्र उचलूनी नेते
त्यावेळी हसरे फूल तुला गवसेल ॥४॥

तू तुझ्या फुलाला ओळखशील ना आई?
हळूहळू उमलू दे मला, कशाला घाई?




**– मृणालिनी कानिटकर-जोशी**
फ्लॅट क्र. ३४, विंग-एफ ३,
वृंदावन पार्क सोसायटी,
कोथरूड, पुणे 411 038


चित्रकार : सचिन जोशी




एक सकाळ उन्हे माळून, माझ्या दारी आली।
हातावरती आभाळ ठेवून, हासत हासत गेली॥
शुभेच्छुक –सौ. नीलिमा किशोर करमरकर, पुणे





*मनाच्या व बुद्धीच्या क्षमतांवर संशोधन, संवर्धन व मूल्यमापन*
*करणारे जागतिक स्तरावरील केंद्र – प्रज्ञा मानस संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी, पुणे*

**वार्षिक पान प्रायोजक – बडवे इंजिनियर्स, प्रा. लि., पुणे**







*संस्कृत संशोधन, समृद्ध ग्रंथालय, अर्थपूर्ण संस्कारांची पुनर्मांडणी,*
*पौरोहित्य प्रशिक्षण इ. चे केंद्र - संस्कृत-संस्कृति-संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी, पुणे*

वार्षिक पान प्रायोजक - डॉ. गितांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, नॉटिंगहॅम, इंग्लंड

कविता

# एक ससा लाल डोळ्यांचा



आठवते मला गाव माझे आणि तिथले रस्ते, गल्ल्या
एक अगदी मित्र जवळचा - एक ससा लाल डोळ्यांचा
एक मुलगी माळावरती भटकणारी इकडे तिकडे
तिथला तो रखरखाट, काही बकऱ्या अन् खुरटी झुडपे

मग एकदा पकडून एस्. टी. निघाले, मी तिथून पलीकडे
मागे मागे जात होते माळ, बकऱ्या अन् खुरटी झुडपे
नव्या शहरात जागोजागी नवी आकर्षणे, नवी माणसे
सगळ्या चवी चाखताना मनात गाव होई जागे

शोधत होते सतत काही; पण काय ते माहीत नव्हते
पिंजून काढले रस्ते सगळे, तरी हाती काहीच येत नव्हते
डोळ्यांसमोर तरळून जाते, गावाकडची ती छोटी खोली
कोपऱ्यात तू गप्प गप्पसा, तापाने मी फणफणलेली

अंधार होता खोलीमध्ये चोहीकडे भरून राहिला
पण नव्हती मनात भीती, नव्हती कसली उदासीनता
माझ्या पहिल्या प्रेमा, आता मला आहे कळून चुकले
जगामध्ये माझ्यासाठी जागा ती एकच असे

जाईन म्हणते परतून आता, राहीन परत तुझ्यापाशी
अन् नव्याने पुन्हा होईन, छोटी मुलगी मी जराशी
पाहीन तुझ्या डोळ्यांत जेव्हा दिसतील मला पुन्हा नव्याने
ते माळ, त्या बकऱ्या आणि ती माझी खुरटी झुडपे

**– मेघना पळशीकर**
*एफ-११०३, कपिल, अभिजात अपार्ट.,*
*डहाणूकर कॉलनी, पुणे 411038*
*चित्रकार : राहुल देशपांडे*

*पाणी, ऊर्जा, हाताला काम। संख्या शिक्षण संघटित ग्राम।।*
*यामध्ये खोरे पातळीवर काम – ग्रामविकसन प्रभाग, ज्ञान प्रबोधिनी, पुणे*

**वार्षिक पान प्रायोजक – सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन, ह्यूस्टन, टेक्सास, अमेरिका**



सकाळ



दुपार



संध्याकाळ

# चित्रलीला

*– गोपाळ नांदूरकर*

निसर्गचित्रण हा चित्रकलेच्या शिक्षणातला व चित्रकाराच्या विकासातला महत्त्वाचा घटक आहे. एखाद्या दृश्याचं चित्रण करताना त्यातले विविध आकार, त्यांचे परस्परांशी नाते आणि प्रमाण, त्यातल्या उभ्या - आडव्या रेषा या साऱ्यांच्या आधारे सुयोग्य चित्ररचना मिळवणं हे उद्दिष्ट असते. त्यानंतर तेथे दिसणारे विविध रंग त्यांचे परस्परांशी नाते पाहावे लागते. आणखी एक महत्त्वाचा घटक असतो 'छाया-प्रकाश'; त्यामुळे निर्माण होणाऱ्या गडद व फिकट छटांचे फरक आणि त्यातून आकारांच्या जडणघडणीची होणारी जाणीव चित्रकाराला समजणे आवश्यक असते. सूर्यामुळे मिळणारा प्रकाश ही किमया घडवतो.



*शेती, फलोत्पादन व फळ प्रक्रिया यांच्या उत्पन्नातून चाललेला ग्रामीण शिक्षणाचा प्रकल्प – ज्ञान प्रबोधिनी, हराळी, ता. लोहारा, जि. उस्मानाबाद.*

वार्षिक पान प्रायोजक – सौ. प्राची अमर परांजपे, सांगली

त्यामुळे जेव्हा सूर्य उगवतो ती 'सकाळ'. जेव्हा सूर्य आकाशात अगदी वर तळपतो ती 'दुपार' आणि अस्ताला जातो ती 'संध्याकाळ' या तिन्ही वेळांना समोरची दृश्ये परिणाम बदलत जातात. तेथील घटक बदलत नाहीत की त्यांच्या जागा बदलत नाहीत; पण त्यावरील छाया-प्रकाश बदलतो, त्यामळे रंग परिणाम बदलतो. सूर्यप्रकाशाची सौम्यता वा प्रखरता. सूर्यकिरणांचा कोन, त्यानुसार तयार होणाऱ्या सावल्या यांचे यथायोग्य चित्रण केल्यास आपल्या चित्रातही विशिष्ट वेळेचा परिणाम साधता येतो. हा विषय तुम्हाला येथे उदाहरणासह दाखवला आहे. सोबतची तीन चित्रे एकाच दृश्याची आहेत.

कोकणातील समुद्रकिनाऱ्यावरील एका हॉटेलच्या रूममधून समोर दिसणारे हे दृश्य ! त्याचे मी स्केच केले.

**१) सकाळचे चित्र -** चित्रण करताना माझ्या डाव्याबाजूने सूर्य उगवलेला होता. प्रकाशाने उजळलेल्या भागातील घटकांचे रंग उजळ आणि सुस्पष्ट जाणवत होते. सावलीचा भाग काहीसा धूसर व निळसर जाणवतो. आपल्याला एखाद्या रंगाच्या उजळ (उष्ण) आणि शांत (शीतल) अशा रंगछटा तयार करता येणे आवश्यक असते. पिवळा, नारिंगी, लाल हे रंग **उष्ण रंग** मानले जातात तर निळा, हिरवा, जांभळा हे शांत **(शीतल)** रंग मानले जातात. म्हणजे त्यांचा तसा परिणाम जाणवतो. पण मित्रांनो, आपल्याला नारिंगी व लाल यांच्याही शांत (शीतल) छटा बनवता येतात. समोरच्या दृश्यातही ते रंग तसे जाणवतात. उदा. या चित्रातील पायऱ्यांना दिलेला लालसर रंग सकाळच्या चित्रात उजळ दिसतो. तोच दुपारी व सायंकाळी सावलीत असल्याने शीतल वाटतो. तेव्हा त्याची सुयोग्य छटा तयार करायला हवी. ती करण्यासाठी मूळ लाल रंगात निळा मिसळल्यावर ती छटा निळसर लाल होते व शीतल भासते. या पद्धतीने या तिन्ही चित्रांतील रंगछटांच्या बदलाचा अभ्यास करा.

**२) दुपारचे चित्र-** दुपारची वेळ होते, तेव्हा सूर्य आकाशात अगदी वरच्या बाजूस तळपत असतो. त्यावेळी प्रकाशाची तीव्रता अधिक असते; त्यामुळे प्रकाशित भाग खूप उजळ व सावलीचा भाग गडद शीतल भासतो. छाया-प्रकाशाच्या छटांमधील विरोधाभास (Contrast) अधिक दिसतो. कुंडीतील झाड प्रखर सूर्यप्रकाशात उजळपणे चमकते आहे आणि सावलीतील भाग गडद दिसतो आहे.

**३) सायंकाळचे चित्र -** माझ्या उजवीकडे सूर्य मावळतीला झुकला होता. प्रकाशाची तीव्रता कमी झाली होती; पण प्रकाशाला सोनेरी-केशरी छटा येऊ लागली होती. सावल्या आडव्या पसरायला लागल्या होत्या. त्यातून येणारी प्रकाशाची तिरीप खालच्या बाजूला दिसत आहे. संपूर्ण चित्रावर शीतल छटांचा प्रभाव आणि थोड्याच ठिकाणी रेंगाळणारा प्रकाश दिसतो. सूर्यास्त जवळ आला, की सावल्यातील घटक आणि आकार हळूहळू एकमेकांत मिसळत जातात.

**महत्त्वाची टीप -** चित्र कोणत्याही वेळेचे असले तरी त्याच्या रंगसंगतीद्वारे चित्राला एकात्मता मिळायला हवी. त्यासाठी सुयोग्य छाया-प्रकाशाची छटा (tone) व त्यानुसार योग्य ती रंगछटा (colour shade) तयार करता यायला हवी. यासाठी बारकाईने निरीक्षण व रंग हाताळण्याचा भरपूर सराव हवा. त्यासाठी एक प्रयोग करून पाहा. एक रंग निवडा. प्रथम तो बाटलीत अथवा *ट्यूबमध्ये* जसा उपलब्ध आहे तसाच कागदावर वापरून पाहा. नंतर त्यात हळूहळू काळा रंग वाढवत गडद छटा तयार करा.

आता त्या रंगात निळा, हिरवा, ब्राऊन (तांबडा) असे रंग मिसळून त्याच्या शांत आणि शीतल भासणाऱ्या छटा तयार करा.

रंगात पिवळा, नारिंगी, लाल असे उजळ रंग मिसळून उष्ण व उजळ परिणामांच्या छटा निर्माण करा.

विविध रंगमाध्यमे वापरा आणि चित्रकलेचा भरपूर सराव करा. सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

**– गोपाळ नांदूरकर**
*१० विष्णू सदाशिव अपार्टमेंट, ४१*
*श्रीराम हौ. सोसा. पुणे ५८*

*सकाळ, दुपार, संध्याकाळ, रंगांचा मेळ।*
*अन् छाया-प्रकाशाचा योजला खेळ ।।*

**शुभेच्छुक – सौ. कविता प्रियव्रत देशपांडे, चेन्नई**

## इंग्रजी भाषा कौशल्यविकसन कार्यशाळा

**हेतू :** इ. ५वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजी या विषयाची भीती कमी होऊन भाषा वापर अधिक चांगल्या प्रकारे होण्यासाठीची कौशल्ये शिकवणे, कौशल्यांची ओळख करून देणे.

**वयोगट :** वय वर्षे १० ते १२
(इ.५ वी ते ७ वी )

**कालावधी :** एकूण ३ महिने (नोव्हें.१४ ते जाने.१५)
(दर महिन्यातील दुसरा व तिसरा रविवार)

**वेळ :** २ तासांचे १ सत्र
(एकूण ६ सत्रे, एकूण १२ तास)

**शुल्क –** ₹ ५४००/– (सेवाकरासहित)
शुल्क फक्त चेकद्वारे स्वीकारले जाईल.

## ओळख शहाण्या भावनांची

**हेतू –** स्वत:चे विचार, भावना ओळखून योग्य प्रकाराने व्यक्त करता येणे. सकारात्मक नाते संबंधाचे महत्त्व कळणे.

**वयोगट –** इ. ८ वी ते १० वी

**कालावधी –** एकूण ४ महिने–१६ तास (२३ नोव्हे., २८ डिसें.,२०१४ आणि २५ जाने. १ फेब्रु. २०१५)

**प्रशिक्षक –** संबंधित विषयातील कामाचा १० ते १२ वर्ष अनुभव असणारे मानसतज्ज्ञ.

**प्रशिक्षण माध्यमे –** विषयाच्या गरजेनुसार गटचर्चा, नाट्य सादरीकरण, मुलांचा प्रत्यक्ष सहभाग, कृतीखेळ, गरजेनुसार निवडक चित्रफिती.

**शुल्क–** ₹ ५६००/–(सेवाकरासहित) शुल्क फक्त चेकद्वारे स्वीकारले जाईल.

**आवश्यक साहित्य –** लेखन साहित्य, पाण्याची बाटली, आयकार्ड साईज फोटो.

**नोंदणी दिनांक –**१३ ते २० ऑक्टोबर २०१४.
**(JNANA PRABODHINI INSTITUTE OF PSYCHOLOGY)**
या नावाने चेक लिहायचा आहे. नोंदणीसाठी संपर्क – ०२०–२४२०७११६


When we move our focus
from competition to contribution,
life becomes a celebration.

*With best compliments from*

# Pravin Sawant

Mob. : +91- 9820116169

Bliss, Flat No. A 301, Vasant Oskar,
L. B. S. Marg, Mulund, Mumbai - 400080





**अभिमानास्पद : टेम्पलटन पुरस्कार विजेते भारतीय - डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्** (१९७५)
पाकिस्तानबरोबर सामंजस्यपूर्ण संबंध राखण्यासाठी

**शुभेच्छुक – औमा इंजिनिअर्स, पुणे ☎ २४५३९२२२**

**(पान क्र. ४७ वरून पुढे चालू)**

तो अतिशय वेगाने खडकांच्या सुळक्यांवरून आणि कपारींवरून लीलया उतरत होता. आणि अखेरच्या टप्प्यावर त्याने पंख पसरले. ते पंख अर्धपारदर्शक असे होते. पूर्णचंद्राच्या बिंबाच्या आड ती विलक्षण थक्क करणारी मनुष्याकृती तरंगू लागली. मोठं मोहक, तरीही भयप्रद असं ते दृश्य होतं. तो माणूस खडकावर उतरला. वाकून धबधब्याच्या जवळ गेला आणि ओंजळीने पाणी प्यावं त्या पद्धतीने तो पाणी पिऊ लागला. आमच्या सर्वांच्या शक्तिशाली दुर्बिणी त्याच्यावर रोखलेल्या होत्या. त्याचवेळेला रामला राहवले नाही. राम विलक्षण चपळाईने डोंगराची कपार चढायला लागला; कारण त्याला अतिशय जवळून त्या माणसाला पाहायचं होतं. पंख असलेल्या माणसाला चाहूल लागली असावी. तो घोड्यासारखा खिंकाळला. पाठोपाठ त्याने घशातून काही मानवसदृश शब्दोच्चार केला आणि त्याने झेप घेऊन रामवर हल्लाच केला. डोळे फाडून त्या विलक्षण घटनेकडे आम्ही पाहात राहिलो. काय करावे हे कोणाला सुचलेच नाही.

**पंख असलेला माणूस-पुढे चालू**

मी रामला ओरडून सावध करू लागलो आणि आमच्या संशोधकांच्या टोळीमध्येसुद्धा गडबड उडाली. मी पाहिले की, राम अजूनही कपारीला घट्ट चिकटून बसला होता आणि तो प्राणी मात्र




एका झेपेत खडकाच्या मागे नाहीसा झाला होता. पुन्हा एकदा 'किच्... किच्... किच्' आवाज येत राहिला आणि तो माणूस डोंगरदऱ्यांच्या कपारीकपारीवरून ओझरता चढताना दिसला आणि नंतर कायमचा दृष्टीआड झाला. सुदैवाने रामचा हात सुटला नाही किंवा तो खाली पडला नाही. डॉ. जॉन आणि त्याचे सहकारी ओरडून रामला प्रतिबंध करू लागले आणि त्याच्या दिशेने सरपटत जाऊ लागले. थोड्याच वेळात रामही आमच्यात सामील झाला आणि पंख असलेल्या माणसाला पाहण्याची ती आमची मोहीम तेथेच संपली. मात्र आम्ही सर्वांनी आपल्या डोळ्यांनी तो 'पंख असलेला माणूस' अगदी जवळून पाहिला होता. रामच्या साहसामुळे त्यात थोडा अडथळा निर्माण झाल्यामुळे डॉ. जॉन रागावले होते. मात्र डॉ. गरुड विचारमग्न दिसायला लागले. काहीच न बोलता आम्ही सगळे डाकबंगल्याकडे परतलो.

**'किच... किच... किच...' आणि चर्चा**

मी आणि राम सकाळीच आपापल्या कामाला लागलो होतो. पूर्णचंद्राच्या बिंबाआडून दिसणारा हवेत झेपावलेला आणि पंख पसरलेला तो माणूस मी कधीच विसरू शकत नव्हतो.

चहा पिताना रामला मी म्हटले,

''त्याने तुझ्यावर हल्ला केला तेव्हा मला फार भीती वाटली होती!... वाटलं होतं तुझा हात निसटणार आणि तू डॉ. हॅमर्टनप्रमाणेच खोल दरीत कोसळणार...

''थांब रे, मला तुझ्याशी काही महत्त्वाचं बोलायचंय...'' राम म्हणाला.

''बोल ना!''

''मी तिथे पोहोचलो तेव्हा त्या खडकाजवळ मला वास आला... तेल किंवा ऑईलसारखा घाणेरडा... फॅक्टरीमध्ये येतो तसा वास आला.''

त्याचवेळेस डॉ. गरुड आमचा शोध घेत तिथे येऊन पोहोचले.

''*सो यंग सोल्जर्स?...* तुम्हाला काय वाटतं?''

आम्ही काहीच बोललो नाही. डॉ. गरुडांनी नंतर रामला पुरेसं दटावलं. नंतर डॉ. गरुडांनी अचानक विचारलं,

''तुला काय वाटतं श्याम?''

मी सावरून बसलो. मी हलक्या आवाजात म्हटलं,

''मी *इम्प्रेस* झालो नाही...''

डॉ. गरुडांना आश्चर्य वाटलं.

*कडे कपारी दरी भयावह, आभाळाचा निळसर नूर।*
*किती रहस्ये उठली त्यातून, सुरवर काही, काही बदसूर।।*

**शुभेच्छुक – सौ. उषा श्रीनिवास पुरंदरे, पुणे**

*''यू आर नॉट इम्प्रेसड्?...* अरे, पण आपण सर्वांनी आपल्या डोळ्यांनी त्याला पाहिलं ना!... तरीही तुझा विश्वास का नाही बसत?''

मी म्हणालो, ''आम्ही जे पाहिलं ते एक दृश्य होतं!... पण निर्णयाला येण्याआधी आम्हाला सर्व पुराव्यांची तपासणी करण्याची गरज आहे...''

डॉ. गरुड हसले. त्यांचे डोळे समाधानाने चमकले.

*''गो अहेड !''*

ते म्हणाले आणि त्याच वेळेस डॉ. जॉन आमच्या खोलीत आले. ते डॉ. गरुडांना काही चर्चा करायला घेऊन गेले. त्यांनी काही आदिवासी स्थानिकांना शोधून आणलं होतं. या आदिवासींनीसुद्धा काल 'उडत्या माणसा'ला पाहिलं होतं. राम आणि मी असे दोघेच राहिलो असताना मी हलक्या आवाजात रामला म्हटलं,

''तू तो 'किच्... किच्... किच्' हा आवाज ऐकलास आणि पाठोपाठ तुला तो कसलासा विचित्र *ऑईलचा* वास आला! काय वाटतं तुला?''

राम विचारात पडला. तो अस्वस्थ झाला होता. आणि त्याचवेळेस आम्हाला भेटायला 'छोटू बादशहा' आणि त्याचा शेरू कुत्रा आल्याचं कळालं. छोटू बादशहाने आमच्यासाठी फळं आणली होती. मात्र *'ॲपल* इकडे येतच नाही,' असं तो रामला सांगू लागला. माझ्या मेंदूतल्या पेशी अचानक उत्तेजित झाल्या आणि मी विचार करू लागलो. मला काही दिशा सापडली होती.

**शोध**

त्या रात्रीही लख्ख चांदणे होते. मी माझ्या खोलीत नोंदवही घेऊन बसलो होतो. राम झोपला होता आणि मी अगदी एकाग्र होऊन विचार करीत बसलो होतो आणि मला तो शोध लागला. मी ताडकन उडालोच. खुर्चीवर मला स्वस्थ बसवेना. मी रामला हलवून जागं केलं. मी म्हटलं.

''चल... चल... ताबडतोब चल...''

''अं... कुठे?''

''आपल्याला तिथं जायचं आहे... धबधब्याजवळ... गुपचूप...''

''का?''

''आपल्याला शोध घ्यायचाय...''

रामने जास्त प्रश्न विचारले नाहीत. आम्हाला शोध मोहिमेला जायचं होतं. कदाचित तो पंख असलेला माणूस आम्हाला पुन्हा दिसला असता!

जिथे आम्ही काल बसलो होतो त्याठिकाणी आम्ही पोहोचल्यानंतर दुर्बिणीतून दूरवर निरीक्षण केलं आणि मग मी म्हटलं,

''तू गेला होतास त्याच रस्त्याने आता आपल्याला धबधब्याजवळ पोहोचायचं आहे...''

तो म्हणाला,

''सांभाळून ये !''

आणि एकमेकांच्या कमरेला दोऱ्या बांधून गिर्यारोहकांप्रमाणे कपारीला धरत धरत हळूहळू आम्ही धबधब्याच्या दिशेने चढू लागलो. आमचं गिर्यारोहणाचं प्रशिक्षण असं उपयोगी ठरणार होतं.

धबधब्याचा आवाज कानठळ्या बसवणारा होता आणि तुषारांनी आम्ही भिजून गेलो होतो.

''तो उडता माणूस इथे उभा होता! इथेच मी तो वास घेतला...''

आम्ही खडकाला वळसा घातला. तिथे छोट्या गुहेसारखा भाग होता. मी तिथे वाकून पाहू लागलो. मी तेथे विजेरीचा प्रकाश आत टाकला. तिथे एक बाटली होती व एक बिस्किटाचा पुडा होता.

आम्ही सावधगिरीने काळोख्या गुहेच्या अंतरंगात प्रवेश केला.

गुहेत कुबट वास येत होता. कदाचित आमच्यावर हल्ला झाला असता. राम आधीच सावध होऊन कराटेची पद्धतशीर पावले टाकत पुढे चालला होता आणि मी त्याच्या मागोमाग होतो.

नैसर्गिक गुहेत चक्क एक लाकडी दरवाजा होता. आम्ही तो ओलांडला अन् तो धाडकन बंद झाला. आम्ही गुहेत अडकलो.

**अडकलो - रामची कमाल**

राम कराटे मास्टरच्या पवित्र्यात सावकाश सावकाश पुढे चालत राहिला. लगेचच आम्हाला डॉ. जॉनचा सहकारी दिसला. तो आमच्याकडे येत होता.

त्याच्या हातात दोऱ्यांचं बंडल होतं आणि आमचे हातपाय बांधण्याचा त्याचा इरादा स्पष्ट होता. रामने त्याला पुरेसं जवळ येऊ दिलं आणि एक श्वास घेतला. तो इंग्रज हसत हसत बेसावधपणे जवळ येताच रामने त्याची ती प्रसिद्ध

**अभिमानास्पद : टेम्पलटन पुरस्कार विजेते भारतीय - बाबा आमटे** (१९९०)
कुष्ठरोग्यांसाठी विशेष उल्लेखनीय कार्य
**शुभेच्छुक – श्री. विजय निकम, सांगली**

कराटेची किंकाळी ठोकली, 'हाऽईऽऽ' अशी. आणि आपली जबरदस्त किक् मारली. त्या जबरदस्त लाथेबरोबरच तो इंग्रज एकदम अंधारात फेकला गेला आणि खडकावर आपटला. आम्ही त्याचा ताबा घेतला होता आणि त्याचे हातपाय त्याच्याच दोराने बांधून टाकले होते.

बाहेरच्या लाकडी दरवाजाजवळ दोन आदिवासी रक्षक होते. रामने रुबाबात आपण आदिवासी राजकुमार असल्याचे भासवून त्यांच्या भाषेत बोलायला सुरुवात केली. त्यांनी लगेच दार उघडून दिले.

**पुन्हा अडकलो?**

आम्ही चंद्रप्रकाशात डोंगर उतारावरून पळायला सुरुवात केली. आम्हाला कोणत्याही परिस्थितीत डॉ. गरुडांची भेट घ्यायची होती. पण तिथे जाऊन एका नव्याच सापळ्यात आम्ही अडकणार होतो याची आम्हाला पुसटशी कल्पनाही नव्हती. आणि सगळ्यांकडेच मोबाईल असल्यामुळे इकडे काय घडलं याची कल्पना लगेच पलीकडे दिली गेली असेल हे आमच्या लक्षातच आलं नाही. बंगल्यात सामसूम होती. सगळे दिवे लागलेले होते. डॉ. गरुड त्यांच्या खोलीत खुर्चीवर टेबलासमोर बसून होते. ते थकलेले जाणवत होते. रामने गुहेच्या बाहेर सापडलेला 'उडत्या मानवाचा पोशाख' त्याने घाईघाईने स्वतःच्या अंगावर चढवला आणि पंख पसरूनच माझ्या मागोमाग त्याने डॉ. गरुडांच्या खोलीत *एन्ट्री* घेतली. श्वास न घेताच, धपापत्या ऊराने आम्ही म्हटलं,

''डॉक्टर अंकल! आम्हाला तुम्हाला काहीतरी ताबडतोब सांगायचं आहे!''

डॉ. गरुडांनी रामकडे आणि त्याच्या मातकट राखाडी रंगाच्या *'कॉश्चुम'कडे* आणि त्याने पसरलेल्या पंखांकडे खेदाने पाहिलं, मान हलवली आणि ते मला म्हणाले,

''मला वाटलंच होतं... पण तुम्ही दोघांनी इथे यायला नको होतं!''

मला धोक्याची जाणीव झाली आणि त्याचवेळेला डॉ. जॉन त्यांच्या एका सहकाऱ्यासह आतल्या खोलीतून बाहेर आले. त्यांच्या हातात बंदूक होती. बंदूक डॉ. गरुडांवर रोखलेली होती आणि ते छद्मीपणाने हसत होते. त्यांनी म्हटलं,

''तुम्ही सत्य शोधून काढलंच... आता तुम्ही तिघेही इथे बंदिवान आहात... आणि मी जे सांगतो ते तुम्हाला ऐकावंच लागेल... तर मिस्टर श्याम! काय सापडलंय तुम्हाला?... सांगा बरं!''

डॉ. गरुड म्हणाले,

''श्याम, तुला जे सांगायचंय ते पहिल्यापासून सांग... अगदी शांतपणे...''

''काल आपण तो उडता माणूस पाहिला. त्याबरोबर तो 'किच्... किच्... ' आवाज येत होता. दुर्बिणीतून चंद्रप्रकाशात मला खडकावरून खाली येणारी लोखंडाची तार दिसली होती... त्यावेळेस मला तिचं ' महत्त्व लक्षात आलं नव्हतं... पण आकाशपाळणा म्हणजेच *'केबलकार'* उतरताना *पुलीवरील* लोखंडी तार घासली गेल्यामुळे जसा आवाज येतो तसा तो आवाज येत होता... नंतर रामने तिथे तेलाचा वास येत असल्याबद्दल सांगितलं.''

''मग?''

''आज रात्री मी ते हस्तलिखित पुन्हा पुन्हा वाचत राहिलो... डॉ. चटर्जी यांनी २३ डिसेंबर १९५८ अशी तारीख नोंदवलेली आहे. पण ज्या कागदांवर त्यांनी मजकूर लिहिला त्यातील एक कागद वेगळ्याच प्रकारचा असून त्यावर सन १९७१ असा *वॉटरमार्क* छापलेला दिसून आला. सन १९५८ रोजी सन १९७१ चा कागद अस्तित्वात असणार नाही... म्हणजेच हा मजकूर बनावट आहे... त्यातून या भागात सफरचंद मिळतच नाहीत... मात्र, डॉ. स्टिफन्स यांनी खिडकीतून त्या प्राण्याला सफरचंद दिलं होतं, ही गोष्ट मला खटकत होती... आणि विशेषतः त्या महिन्यात सफरचंद मिळतच नाहीत... तेव्हा ही सफरचंदाची गोष्टसुद्धा बनावट आहे असं माझ्या लक्षात आलं...''

''म्हणून तुम्ही दोघं मला न सांगता धबधब्याकडे गेलात का?''

*''सॉरी !* पण आम्हाला तिथे ताबडतोब जाऊन पाहणं आवश्यक वाटलं... आम्हाला वंगण म्हणून वापरायची तेलाची बाटली सापडली... जी *'केबलकारला'* लावली जायची... आणि लपून

*गरुड भरारी कधी न आता, थांबायाची कुठे।*
*ग्रह ताऱ्यांना कवेत घ्याया, झेपावत हा सुटे।।*

**शुभेच्छुक - श्री. हर्षद कुलकर्णी, बंगलोर**

बसलेल्या आपल्या उडत्या माणसाला खाण्यासाठी बिस्किटाचा पुडाही ठेवलेला सापडला... डॉ. जॉन स्टिफन्स यांचा सहकारीही त्या गुहेत सापडला... कोणीतरी मोबाईलवरून आमच्या सुटकेबद्दल इकडे वर्दी दिली असेलच... आणि आम्ही इथे पुन्हा अडकलो!''

''तुम्ही नाही... आपण तिघेही अडकलेलो असून यांना आपण एक स्वाक्षरी देणार आहोत... ''

''स्वाक्षरी?''

रामने ओरडून विचारलं.

**सुटका**

डॉ. जॉन स्टिफन्स यांनी हसून म्हटलं,

''आता पुढचं मी सांगतो... डॉ. गरुडांच्या *लेटरहेडवर* आम्ही एक मजकूर *टाईप* करून ठेवलेला आहे... संशोधनाअंती त्यांना भीषणगडच्या परिसरात 'पंख असलेला उडणारा माणूस' सापडला असल्याची सगळी हकिकत त्या मजकूरात दिलेली आहे... हा मजकूर डॉ. गरुडांच्या स्वाक्षरीनेच आता आंतरराष्ट्रीय पातळीवर धमाल उडवणार आहे... कारण हा मजकूर घेऊन आम्ही ताबडतोब भारत सोडणार आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत ही हकिकत विकणार आहोत... सोबत, 'उडणाऱ्या माणसा'चे लांबून घेतलेले फोटो, डॉ. चटर्जी यांचे बनावट हस्तलिखित आणि डॉ. स्टिफन्स यांच्या आवाजातली बनावट ध्वनिमुद्रिका सुद्धा विकली जाणार आहे... डॉ. गरुडांना प्रश्न विचारायला संशोधक येतील तेव्हा ते आणि त्यांचे दोन तरुण सहकारी नाहीसे झालेले असतील... कारण ते धबधब्यात फेकले गेलेले असतील...''

इतकं बोलून डॉ. जॉन मोठमोठ्याने हसू लागले आणि त्यांनी बंदूक आमच्यावर रोखूनच ठेवली; पण पाठोपाठ अचानक दोन चमत्कारिक घटना घडल्या. एक म्हणजे, डाकबंगल्याच्या दारातून आमचा फळवाला मित्र 'छोटू बादशहा' मोठ्या तातडीने धावत आत शिरला आणि त्याचा शेरू कुत्रासुद्धा वेगाने धावत आला. मोठमोठ्याने भुंकत त्याने डॉ. जॉन यांच्यावर झेप घेतली. डॉ. जॉन खाली पडले. शेरूची ही करामत पाहताच रामने खुर्चीवरून उडी घेतली आणि बंदूक ताब्यात घेतली. तसंच डॉ. जॉनच्या दुसऱ्या सहकाऱ्याला ताब्यात घेतलं. डॉ. जॉन उठले आणि मागच्या दारातून डोंगराच्या उताराकडे धावू लागले. शेरूही मागे होताच. पण इथे हे नाट्य संपत नाही. त्याचवेळेस कुठूनसा आकाशातून घोड्याच्या खिंकाळण्यासारखा आवाज ऐकू आला.

डॉ. जॉन *'नो... नो... नो, ओ गॉड नो'* असं ओरडत होते. त्यांचं लक्ष आकाशाकडेच होतं आणि तो खिंकाळण्यासारखा आवाज आभाळातून येत होता. त्यानंतर ते पाय घसरून दरीत कधी कोसळले हे आमच्या लक्षातच आलं नाही. काय पाहिलं होतं त्यांनी आकाशात? कदाचित खरा 'पंख असलेला माणूस' तर नाही? त्यानेच त्यांच्यावर हल्ला तर केला नसेल? निसर्गाच्या पोटात काय दडलेलं असतं, हे आपल्याला सांगता येत नसतं, आपण फक्त अभ्यास करायचा असतो, असं डॉ. गरुड आम्हाला नंतर पुन्हा पुन्हा सांगत राहिले.

'छोटू बादशहा'ने आम्हाला धावताना पाहिलं होतं आणि कुतूहलाने तो आमच्या मागोमाग धावत आला होता. त्याने आणि त्याच्या शेरू कुत्र्याने ऐनवेळेला आमची मदत केली होती.

डॉ. गरुडांनी त्यांच्या संग्रहातला 'पंख असलेल्या माणसा'चा एक फोटो आम्हाला दाखवला. ही दंतकथाच, पुराणातली. रामने तो पंखांचा पोशाख अजून जपून ठेवलाय आणि आम्ही नक्की काय पाहिलं यावर आमची अजूनही चर्चा होते. बनाव नक्कीच असेल, आंतरराष्ट्रीय कारस्थान होतंच, त्याबद्दल संबंधितांना आपोआपच शिक्षाही मिळाली हे ही खरं, पण आकाशातून ऐकू आलेला घोड्याच्या खिंकाळण्यासारखा तो अद्भुत आवाज अजूनही आमच्या कानात घुमतो आहे!

निसर्गाच्या पोटात काहीही दडलेलं असू शकतं हे खरंच! हो ना?

✡ ✡ ✡

**– भारत सासणे**
*२०४ लक्ष्मी एन्क्लेव्ह, गणेशखिंड रस्ता, शिवाजीनगर, पुणे 411016*

*चित्रकार : गिरीश सहस्रबुद्धे*

**अभिमानास्पद : टेम्पलटन पुरस्कार विजेते भारतीय - पांडुरंग शास्त्री आठवले -** (१९९७)
स्वाध्याय परिवार कार्यासाठी
**शुभेच्छुक – नातू प्रतिष्ठान, पुणे**

# ज्ञान प्रबोधिनी - हराळी
## फलप्रक्रिया विभाग

**ज्ञान प्रबोधिनीच्या फळबागांमधल्या ताज्या फळांपासून केलेली शुद्ध नि चविष्ट प्रबोधन उत्पादने! रास्त भावात!!**

- आवळा कॅण्डी
- आवळा सुपारी
- आवळा पावडर
- आवळा लोणचे
- आवळा सिरप
- आवळा सरबत
- आले पावडर
- आले-लिंबू सरबत
- लेमन स्प्रेड (क्रश)
- लिंबू गोड लोणचे
- लिंबू तिखट लोणचे
- लिंबू साल पावडर
- चिंच गोळी
- चिंच सॉस
- हिरवी मिरची ठेचा
- लाल मिरची ठेचा
- टोमॅटो सॉस
- आमरस



*दक्षिण मराठवाड्यातील भूकंपक्षेत्रात हराळी गावच्या महिलांच्या उद्योगातली ही उत्पादने. एकदा चाखाल तर पुन्हा पुन्हा मागाल.*

**मुख्य संपर्क :** मु. हराळी, डाक तोरंबा, ता. लोहारा, जि. उस्मानाबाद.
दूरभाष - ८८८८८०२६१२, ८८८८८०२६३८

**सोलापूर :** ज्ञान प्रबोधिनी भवन, १५६, ड रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१
दूरभाष - ०२१७ - २३१७७८२, २३११६२७

**पुणे :** ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
दूरभाष - ०२०-२४२०७००१

**घाऊक व किरकोळ विक्रेत्यांनीही चौकशी करावी.**

*पंखामधले बळ वाढावे, साथीला आभाळ।*
*परि न विसरू, जिथून उडालो तो गवताचा माळ॥*

शुभेच्छुक - श्री. अनिलराव देशमुख, पुणे







# गाऊ 'मंगल' गान

**भारताची 'मॉम'(मार्स ऑर्बिटर मिशन) मंगळ मोहीम -** भारतीय शास्त्रज्ञांनी स्वदेशात स्वबळावर विकसित केलेले तंत्रज्ञान वापरून बुधवार २४ सप्टेंबर २०१४ रोजी भारताचे 'मंगल' यान अर्थात पी. एस्. एल् व्ही सी -२५ हे प्रक्षेपक (अग्निबाण) सकाळी ७-४५ च्या सुमारास मंगळाच्या गुरूत्वाकर्षण कक्षेत शिरले. या अगोदर अमेरिका, रशिया, युरोपीय युनियन यांनीही 'मंगळ' मोहीम यशस्वी केली होती. पण पहिलीच मंगळ-मोहीम अचूक आणि शंभर टक्के यशस्वी करणारा भारत हा एकमेव देश आहे.

**'मंगळ' ग्रहाची माहिती -** मंगळ - *'मार्स', 'रेड प्लॅनेट'*, सूर्यमालेतला चवथा ग्रह, रंग- तांबूस. व्यास ६७९५ कि.मी. आस- सूर्यभ्रमणकक्षेशी २५.१९ अंशांनी कललेला, त्यामुळे उन्हाळा, हिवाळा ऋतू असण्याची शक्यता, स्वत:भोवती फिरण्याचा काळ ६८७ दिवस. दोन चंद्र-फोबॉस, डायमॉस.

**भारताचे 'मंगळ' यान -**

✻ यशस्वी करणारी संस्था - भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्रो)

✻ प्रमुख नियंत्रण केंद्र - बेंगळुरू, ब्यालुलु केंद्र,

✻ प्रमुख शास्त्रज्ञ - के. राधाकृष्णन (अध्यक्ष इस्रो), एस्. रामाकृष्णन (संचालक, विक्रम साराभाई अवकाश केंद्र), एम्. अण्णादुराइ (कार्यक्रम संचालक), एस्. के. शिवकुमार (संचालक, इस्रो, उपग्रह केंद्र), एस्. अरुणन् (प्रकल्प संचालक)

✻ मोहिमेचा शुभारंभ - ५ नोव्हेंबर २०१३; यानाचे प्रक्षेपण श्रीहरीकोटा येथून. मंगळकक्षेत यशस्वी पदार्पण - २४ सप्टेंबर २०१४

✻ ६८ कोटी कि.मी. पेक्षा जास्त अंतर कापले.

✻ 'मंगळ' यान - वजन ५०० किलो, आतापर्यंत ८५० किलो इंधन वापरलं.

✻ १५ किलो वजनाची पाच वैज्ञानिक उपकरणे

**वैज्ञानिक उपकरणे -**

✻ लेमन अल्फा फोटोमीटर- मंगळावर पाणी होते का ही माहिती मिळवण्यासाठी

✻ मिथेन सेन्सर फॉब्र मार्स - जीवसृष्टीचा अभ्यास करण्यासाठी

✻ मार्स कलर कॅमेरा - पृष्ठभागाची छायाचित्रे घेण्यासाठी

✻ टी. आय. आर. स्पेक्ट्रोमीटर - खनिजं आणि मातीचा अभ्यास करण्यासाठी.

✻ स्वतंत्र इंधन यंत्रणा, ऊर्जेसाठी सोलर पॅनेल

✻ खर्च : रुपये ४५० कोटी. (इतर देशांच्या मानाने फक्त ११ %)

✻ अवकाश संशोधनात इतर देशांप्रमाणे अग्रगण्य.

**काय साध्य होणार?**

✻ बाह्य अवकाशातील संदेश दळणवळण यंत्रणा, दिशादर्शन यांचे व्यवस्थापन.

✻ मंगळावरील विरळ वातावरणाचा, ज्वालामुखीचा, भूरचनेचा आणि जीवसृष्टी अस्तित्वाचा अभ्यास.

✻ भविष्यात मानवी वास्तव्य होऊ शकेल का? याचा अभ्यास.

**काय साधले?**

✻ सूर्यमालेतल्या अन्य ग्रहांपर्यंत पोहोचण्याची क्षमता, शक्ती आणि तंत्रज्ञानात भारत अग्रगण्य देश आहे.

✻ पहिली मंगळ मोहीम अचूक आणि शंभर टक्के यशस्वी.

**(संकलित)**

**भारताची मंगळ मोहीम यशस्वी करणाऱ्या सर्व शास्त्रज्ञांना व त्यांच्या 'टीम'ला मनापासून सलाम !!**



*अमुच्या जिज्ञासेची झेप, ज्ञानसीमा लांघणारी।*
*अमुची आविष्कार शक्ती, नित्य नवे शोधणारी ।।*

**शुभेच्छुक – श्री. नागेश साने, पुणे**

# निसर्गातील मूलभूत बले

डॉ. निवास पाटील

साधारणपणे १४ अब्ज वर्षांपूर्वी विश्व निर्माण होण्यास सुरुवात झाली. त्यानंतर पुढच्या १० अब्ज वर्षांमध्ये आकाशगंगा तयार होऊन, त्यांमध्ये तारे तयार होणे, ग्रह तयार होणे अशा घटना घडल्या. यामध्ये आपली सूर्यमाला तयार झाली व पृथ्वीचीही निर्मिती झाली. तेव्हापासून, म्हणजे ४ अब्ज वर्षांपासून पाऊस पडणे, वारा वादळे वाहणे, जलचक्र चालणे, बर्फाचे प्रदेश, वाळवंटे तयार होणे, जंगलांमध्ये व अन्य सर्व ठिकाणी वेगवेगळ्या वनस्पती (पिके, फळझाडे, बुरशी, शेवाळे) उगवणे, प्राण्यांचे वावरणे, शिकार करणे, पुनरुत्पादन करणे अशा विविध घटना आपल्या पृथ्वीवर घडत आल्या आहेत. १ कोटी वर्षांपासून आपण मानव पृथ्वीवर वास्तव्य करून आहोत. भाले, तलवारी यांसारखी शस्त्रास्त्रे तयार करणे, शेती करणे, आगीचा शोध लावणे असे उद्योग या १ कोटी वर्षात केले. सध्या आपण विविध प्रकारची यंत्रं चालवतो क्रेन्स, पंप, गाड्या, संगणक, मोबाईल, पंखे, दिवे इत्यादी.

विश्व तयार होण्यापासून ते हा लेख मी लिहिण्यापर्यंत ज्या ज्या घटना घडल्या, त्या सर्व घटनांमध्ये कशाची ना कशाची तरी हालचाल झाली.

कोणतीही गोष्ट जेव्हा हलते, तेव्हा तिच्यावर पूर्वी बल लागलेले असले पाहिजे. कोण्या मित्राला त्रास देण्याच्या हेतूने जरी मी रबरामध्ये खडू अडकवून जोरात सोडला, तरी रबर ताणून मी त्या खडूला ऊर्जा पुरवलेली असतेच! खडू प्रत्यक्ष जाताना मी काहीही काम केलेले नसले, तरी

*हालचाल होण्यासाठी बल लागते हे आपल्याला ४-५ हजार वर्षांपासून तरी माहीत असावे. माझ्या स्नायूंमधील बल ते कडे कपारी कोसळवणारे बल अशा विविध बलांचा परिचय आपल्याला होत गेला. माणूस जात्याच छोट्या छोट्या गोष्टी एकत्र करून त्यांचं वर्गीकरण करत असतो. तसं बलांचंही वर्गीकरण माणूस करत आला. सध्या त्याच्या वर्गीकरणानुसार निसर्गात किती बलं काम करतात, ती कशा प्रकारे काम करतात हे आपण या लेखातून समजून घेऊ.*


गुरुत्वाकर्षण बलामुळे निर्माण झालेल्या आकाशगंगा, ग्रह,तारे

त्यापूर्वी मी बल लावलेले असतेच. हालचाल होण्यासाठी बल लागते हे आपल्याला ४-५ हजार वर्षांपासून तरी माहीत असावे. माझ्या स्नायूंमधील बल ते कडे कपारी कोसळवणारे बल अशा विविध बलांचा परिचय आपल्याला होत गेला. माणूस जात्याच छोट्या छोट्या गोष्टी एकत्र करून त्यांचं वर्गीकरण करत असतो. तसं बलांचंही वर्गीकरण माणूस करत आला. सध्या त्याच्या वर्गीकरणानुसार निसर्गात किती बलं काम करतात, ती कशा प्रकारे काम करतात हे आपण या लेखातून समजून घेऊ.

**गुरुत्वाकर्षण बल, विद्युतचुंबकीय बल, तीव्र आण्विक बल आणि क्षीण आण्विक बल,** अशी ही मूलभूत बले आहेत. निसर्गातील प्रत्येक घटना मग ती फूल फुलण्याची असो वा सूर्य प्रकाशण्याची असो, ती घडण्यासाठी एक किंवा जास्त मूलभूत बले कारणीभूत होत असतात. शास्त्रज्ञांच्या मते ही चारही बले एकाच बलाची वेगवेगळी रूपे असून या बलांना जोडणारा एकच सिद्धांत शोधण्याचे काम सध्या चालू आहे.

विश्वातील चार मूलभूत बलांपैकी **गुरुत्वाकर्षण बल** किंवा गुरुत्वीय बल हे एक असे बल आहे. या बलाचा शोध उरलेल्या तीन बलांअगोदर लागूनही त्याच्याबद्दल आपल्याला सर्वात कमी माहिती मिळाली आहे. १६८७ मध्ये सर आयझॅक न्यूटनने या बलाचा शोध लावला आणि तो आधुनिक विज्ञानाचा पाया ठरला. गुरुत्वाकर्षणामुळे वस्तू एकमेकाकडे खेचल्या जातात. त्याच्यामुळे झाडावरून तुटलेले फळ जमिनीवर पडते. चंद्र

*भवतालीचे विश्व, कोणत्या सूत्राने चाले।*
*विविध बलांच्या सिद्धांताने, दळ सारे हाले।।*

शुभेच्छुक - सौ. स्नेहा शरद मुजुमदार, पुणे ५२

पृथ्वीभोवती, पृथ्वी सूर्याभोवती आणि आपली सूर्यमालिका आकाशगंगेच्या केंद्राभोवती परिभ्रमण करण्यास, हेच बल कारणीभूत असते.

विश्वातील प्रत्येक वस्तूवर हे बल कार्य करते. हे बल दूर अंतरापर्यंत प्रभाव पाडते आणि ते नेहमी आकर्षण बल असते. म्हणजे, गुरूत्वाकर्षण शक्ती ज्या दोन वस्तूंवर काम करत असतील त्या या बलामुळे एकमेकांकडे ओढल्या जातील; गुरुत्वाकर्षण बल काम करतंय म्हणून त्या वस्तू एकमेकांपासून लांब ढकलल्या जाणार नाहीत. एखादी वस्तू जितकी मोठी आणि जितकी जड, तितकी ती इतर वस्तूंवर जास्त गुरुत्वीय बल लावू शकते. मोठ्या वस्तूतील प्रत्येक कणावर कार्य करणाऱ्या सर्व बलांची बेरीज होत असल्याने ते इतर बलांपेक्षा प्रभावी ठरू शकते. सर्व विश्वावर गुरुत्वाकर्षणाचे अधिराज्य असले तरी उरलेल्या तीन मूलभूत बलांपेक्षा ते खूपच कमी प्रभावी असते. घरातील साध्या चुंबकाची त्याच्या जवळच्या थोड्या सेंटिमीटरपर्यंतच्या भागातील तीव्रता संपूर्ण पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण बलापेक्षा खूप जास्त असते. आपल्या पृथ्वीचे गुरुत्वाकर्षण बल इतके दुर्बल आहे, की ज्यावेळी आपण एखादा दगड वर उचलतो त्यावेळी आपल्या स्नायूतील बल, त्या दगडाला स्वत:कडे खेचणाऱ्या $६ \times १०^{२४}$ किलोग्रॅम वस्तुमान असलेल्या आख्ख्या पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण बलावर मात करते.

गुरुत्वाकर्षण हे असे बल आहे, की ज्यावर मानवाला नियंत्रण मिळविता आलेले नाही. उरलेल्या तीन बलांची तीव्रता आपणाला कमी जास्त करता येते. परंतु गुरुत्वाकर्षणाच्या बाबतीत तसे करता येत नाही. हे बल थांबवता येत नाही किंवा क्षीण करता येत नाही. हेच बल आपली उंची आणि आकार ठरविते. याच बलामुळे विषुववृत्तावर तासाला १६०० किलोमीटर एवढ्या वेगाने स्वत:भोवती फिरणाऱ्या पृथ्वीच्या पृष्ठभागापासून आपण दूर फेकले जात नाही. झाडावरून पडलेल्या सफरचंदाला जमिनीवर आणणारे बल आणि चंद्राला पृथ्वीभोवती फिरायला लावणारे बल भिन्न नसून एकच आहेत, असे न्यूटनने दाखवून दिले. त्याने शोधून काढलेल्या कॅल्क्युलसमुळे झाडावरून जमिनीवर पडणारे सफरचंद त्याच्या जवळच असलेल्या इमारती व डोंगर यांच्याकडे खेचले न जाता सरळ रेषेत खाली का पडते, याचे उत्तर मिळाले. पडणाऱ्या सर्वच वस्तू पृथ्वीच्या केंद्राकडे खेचल्या जातात आणि ही खेच त्या वस्तूंना स्वत:कडे खेचणाऱ्या इमारती व डोंगर यांच्या आकर्षण बलावर मात करते, म्हणून त्या सरळ रेषेत खाली पडतात.

गुरुत्वाकर्षणामुळे विश्वाला अस्तित्व आहे, त्याला आकार मिळाला आहे. परंतु या बलाची निर्मिती कशी होते हे अद्यापही कळलेले नाही. कृष्णविवर नावाच्या ज्या वस्तू अवकाशात असतात, त्यांचे गुरुत्वीय बल इतके जास्त असते, की विश्वातील सर्वात वेगवान वस्तू म्हणजे प्रकाशही तेथून बाहेर पडू शकत नाही. इतके ताकदवान गुरुत्वाकर्षण क्षेत्र तयार होताना, तेथील स्थलकालात गुरुत्वाकर्षणाच्या लहरी पसरत असाव्यात आणि अशा लहरी शोधकाने शोधता येतील असे शास्त्रज्ञांना वाटते. गुरुत्वाकर्षणाच्या लहरी शोधून काढण्यासाठी अनेक ठिकाणी गुरुत्वलहरी शोधक बसविण्यात आले आहेत. परंतु अद्यापही अशा लहरी शोधून काढण्यात यश आलेले नाही.

**विद्युतचुंबकीय** हे विश्वातील दुसरे मूलभूत बल आहे. विद्युत आणि चुंबकीय ही निसर्गातील महत्त्वाची बले आहेत. त्यांची वर्तणूक गुरुत्वाकर्षण बलासारखीच असली तरी त्यांच्यात महत्त्वाचा फरक असा की, दोन समान विद्युतभार एकमेकांना दूर लोटतात किंवा दोन चुंबकांचे समान ध्रुव एकमेकांपासून दूर जातात. विद्युत आणि चुंबकीय बले ही गुरुत्वाकर्षण बलापेक्षा खूप प्रभावी असतात. परंतु रोजच्या जीवनात आपणाला त्यांचा अनुभव येत नाही. कारण डोळ्यांनी दिसणाऱ्या वस्तूत संख्येने जवळजवळ सारखेच विद्युत धनभार व ऋणभार असतात. याचा अर्थ असा की, दोन मोठ्या वस्तूंमधील विद्युत आणि चुंबकीय बले एकमेकांना प्रभावहीन करतात. याउलट वस्तूतील गुरुत्वाकर्षण बलांची बेरीज होत असल्याने ते प्रभावी ठरते.

सध्याच्या विद्युत आणि चुंबकीय बलाच्या संकल्पनांचा विकास अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात झाला. या कालावधीत भौतिकशास्त्रज्ञांनी विद्युत आणि चुंबकीय बलांवर अनेक प्रयोग केले. मुख्यत: वेगवेगळ्या *बॅटऱ्या* तयार करून विद्युतप्रवाह किंवा विद्युतधारा (current) तयार करणे; तो विविध यंत्रांमधून फिरवणे, एडिसनने बल्ब तयार करणे अशा विविध प्रयोगातून मानवाने विद्युत शक्तीला



**क्रांतिकारी शोध : निकोलस कॉपरनिकम -** (१५४३)
दि. कॉपरनिकम सिस्टीम : 'सूर्यमालेचे केंद्रस्थान आहे'
**शुभेच्छुक – सौ. सुलभा आशिष फडके, पुणे** – कै. रामचंद्र जनार्दन काळे स्मरणार्थ

चांगलेच वापरून घेतले. तर विविध प्रकारची चुंबके बनवणे, चुंबकांमधील बल कमी जास्त कसे होते यावर काही प्रयोग चालत असत. या प्रयोगांतून विद्युत आणि चुंबकीय बलांच्यातील परस्पर संबंधाचा महत्त्वाचा शोध लागला. हा शोध असा होता- धावत्या विद्युतभारामुळे चुंबकीय बल निर्माण होते आणि गतिशील चुंबकामुळे विद्युतभार उर्फ विजेचा प्रवाह निर्माण होतो. हा संबंध डॅनिश भौतिकशास्त्रज्ञ हॅन्स ख्रिस्तियान ऑरस्टेड याच्या पहिल्यांदा लक्षात आला. ही गोष्ट आहे १८२० सालातील. यातूनच त्याने विद्युतचुंबकत्व या नवीन संकल्पनेला जन्म दिला. पुढे ब्रिटिश शास्त्रज्ञ मायकेल फॅरेडे याने स्पष्ट केले, की जर चुंबकीय क्षेत्राला विद्युतप्रवाह कारणीभूत होत असेल तर चुंबकीय क्षेत्रामुळे विद्युतप्रवाह निर्माण झाला पाहिजे. विशेष म्हणजे १८३१ मध्ये फॅरेडेने याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. फॅरेडेने हे प्रयोग करेपर्यंत सर्व शास्त्रज्ञ असेच मानत होते, की दोन चुंबकांमधील चुंबकीय बल व विद्युतप्रवाह तयार करणारे विद्युतबल यांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही.

पण लवकरच बलाला क्षेत्र असते हा एक अत्यंत महत्त्वाचा शोध फॅरेडेने लावला. यासाठी त्याने विद्युतभार आणि चुंबक यांच्यामध्ये विशिष्ट क्षेत्राची कल्पना केली. 'ओढणे' आणि 'ढकलणे' हे या क्षेत्राचे वैशिष्ट्य असते. फॅरेडेने या क्षेत्राला 'बलक्षेत्र' म्हणून संबोधले. बलक्षेत्राची कल्पना आपणाला एका साध्या प्रयोगातून पाहता येईल. एका चुंबक पट्टीवर काचेची प्लेट ठेवून त्यावर लोखंडाचा कीस पसरवा. लोह कणांमधील घर्षण कमी करण्यासाठी काचेच्या प्लेटवर टिचक्या मारा. असे केले असता, अदृश्य अशा चुंबकीय बलामुळे या कणांची विशिष्ट अशी नालांच्या आकाराची रचना तयार होते. हिची व्याप्ती चुंबकाच्या एका ध्रुवापासून दुसऱ्या ध्रुवापर्यंत असते. ही रचना अदृश्य अशा चुंबकीय बलाचा नकाशाच असतो. आज आपण सर्व बले क्षेत्रामुळे प्रसारित होतात असे म्हणतो. आधुनिक भौतिक शास्त्रातील ही एक महत्त्वाची संकल्पना बनली आहे.

१८६० च्या दशकात स्कॉटिश भौतिकशास्त्रज्ञ जेम्स क्लर्क मॅक्सवेलने फॅरेडेच्या कल्पनांना गणिती चौकट तयार केली. या चौकटीने विद्युत, चुंबकीय आणि प्रकाश यांच्यातील 'संबंध' स्पष्ट केला. मॅक्सवेलने अशी ४ गणिती समीकरणे मांडली, की ज्यामुळे विद्युत आणि चुंबकीय बले एकाच विद्युतचुंबकीय क्षेत्राची रूपे आहेत, हे आपणाला कळून येते. थोडक्यात, मॅक्सवेलने विद्युत आणि चुंबकीय बलांचे एकीकरण केले. विद्युतचुंबकीय क्षेत्र तरंगाच्या स्वरूपात प्रसारित होते, हे त्याने दाखवून दिले. त्याने मांडलेली समीकरणे आणि केलेल्या प्रयोगातून मिळालेली माहिती यांच्या आधारे या तरंगाची गती काढली. मॅक्सवेलच्या दृष्टीने आश्चर्याची गोष्ट अशी की, त्याने काढलेली तरंगाची गती प्रकाशगती एवढी निघाली. प्रकाश हा 'विद्युतचुंबकीय लहर' आहे, हे त्याने दाखवून दिले. विद्युतचुंबकीय लहरी सेकंदाला जवळजवळ ३,००,००० किलोमीटर वेगाने प्रवास करतात हे मॅक्सवेलच्या समीकरणांनी स्पष्ट केले.

विद्युतचुंबकीय बल हे लांब पल्ल्याचे बल असून ते गुरुत्वाकर्षण बलापेक्षा खूप प्रभावी आहे. हे बल फक्त भारित कणांवर कार्य करते. विरुद्ध भार असलेल्या कणांत ते आकर्षण बल आणि सारखाच भार असलेल्या कणांत ते दूर ढकलणारे बल म्हणून कार्य करते. याचा अर्थ मोठ्या वस्तूंमधील विद्युत बले एकमेकांना प्रभावहीन करतात. परंतु अणू परमाणूच्या स्तरावर ती प्रभावी ठरतात. अणू एकमेकांजवळ राहणार का नाही, ते एकमेकांशी इलेक्ट्रॉन्सची देवाणघेवाण करणार का नाही याचे उत्तर हे त्या दोन अणूंमध्ये विद्युत चुंबकीय बल किती आहे या वर अवलंबून असते. दोन अणू एकमेकांना इलेक्ट्रॉन्स देऊ शकणार असतील किंवा एकमेकांमध्ये असलेले इलेक्ट्रॉन्स वाटून घेणार असतील तर ते दोन अणू एकत्र येतील. अशा एकत्र आलेल्या अणूंना आपण रेणू म्हणतो. त्यामुळे रेणूंचे बनणे, न बनणे हे सर्वस्वी विद्युत चुंबकीय बलावर अवलंबून आहे. मी एखाद्या ठिकाणाहून दुसरीकडे दुचाकीने जातो. तेव्हा तिच्या इंजिनात पेट्रोलचा स्फोट होतो, त्या स्फोटामुळे पिस्टन वरती-खाली धावते आणि त्या हालचालीमुळे माझ्या गाडीचे चाक फिरते. हे पेट्रोल, दुचाकी ज्या रस्त्यांवर धावतेय, ते रस्ते सारे कसे बनले याचं वर्णन करायला विद्युत चुंबकीय बलाचा उपयोग होतो. आपल्या पृथ्वीवरच्या आपल्या आसपास घडणाऱ्या जवळजवळ सर्व घटनांवर विद्युत चुंबकीय बलांचा प्रभाव असतो.

निसर्गातील मूलभूत बलाचा तिसरा प्रकार आहे **क्षीण**

*प्रश्न जर नसते पडले, शोध कोणी घेतले असते? ।*
*उन्नतीचे नि प्रगतीचे, सगळे मार्गच खुंटले असते ।।*

**शुभेच्छुक – श्री. राम गद्रे, पुणे** – 'संगणक शिका आणि थोरांनाही शिकवा.'




**क्रांतिकारी शोध : आयझॅक न्यूटन -** (१६६४)
गुरुत्वाकर्षण : 'विश्वातील सर्व गोष्टींवरती गुरुत्वाकर्षण बल काम करते'

**शुभेच्छुक - श्री. आनंद कुलकर्णी, पुणे**







**केंद्रकीय बलाचा.** किरणोत्सारासाठी (रेडिओ ॲक्टिव्हिटीसाठी) हे बल कारणीभूत असते. कोणताही साधा अणू जेव्हा किरणोत्सर्ग टाकतो, तेव्हा त्याच्या अणुगर्भामध्ये क्षीण आण्विक बलाने काहीतरी गडबड केलेली असते. ताऱ्यांत मूलद्रव्ये तयार करण्यात या गडबडीचा अत्यंत महत्त्वाचा वाटा असतो. पूर्वी, म्हणजे कैक अब्ज वर्षांपूर्वी विश्वात अ'त्र-तत्र-सर्वत्र' फक्त हायड्रोजन वायूच भरून राहिला होता. अशा हायड्रोजनच्या ढगांमध्ये पूर्वीचे तारे निर्माण झाले. या ताऱ्यांमध्ये हे हायड्रोजन अणू एकत्र येऊन एकमेकांशी जोरदार टकरी घेऊ लागले. या टकरींमध्ये दोन पैकी एका अणूतील प्रोटॉनचे न्यूट्रॉनमध्ये रूपांतर होऊ लागले. असे दोन न्यूट्रॉन आणि दोन प्रोटॉन एकत्र येऊन हेलियम वायू बनू लागला. प्रोटॉनचे न्यूट्रॉनमध्ये रूपांतर, कधी न्यूट्रॉनचे प्रोटॉनमध्ये रूपांतर हे सर्व या क्षीण आण्विक बलाचे परिणाम! प्रोटॉन आणि न्यूट्रॉन विविध संख्येने एकत्र येण्याचा खेळ अनेक ताऱ्यांमध्ये रंगू लागला. त्यातून विविध ताऱ्यांमध्ये कार्बन, नायट्रोजन, ऑक्सिजन, सल्फर आदी अनेक मूलद्रव्ये बनली. हे तारे जेव्हा फुटले, तेव्हा ही मूलद्रव्ये त्यातून बाहेर पडली. आपल्या सूर्याने कधीतरी ती उचलली, म्हणून तर पृथ्वी बनू शकली! क्षीण आण्विक बलाचा उपयोग आपल्याला दररोज होत नाही, हे खरे. पण अणुवीजनिर्मिती केंद्रात युरेनियमचे, थोरियमचे अणू फुटून जी ऊर्जा बाहेर पडते ती वीज निर्माण करण्यासाठी वापरली जाते. हल्ली आधुनिक वैद्यकशास्त्रातील अनेक चाचण्यांमध्ये किरणोत्सारी अणू शरीरात पाठवले जातात आणि मग शरीराचा आतून छान अभ्यास होऊ शकतो. कर्करोगावरील उपचारात बऱ्याच वेळेला नाठाळ पेशींना वठणीवर आणण्याकरता किरणोत्सारी अणू पाठवले जातात. सारे क्षीण केंद्रकीय बलामुळे शक्य होते.

निसर्गातील चौथ्या मूलभूत बलाला **तीव्र केंद्रकीय बल** म्हणतात. अणूच्या केंद्रात प्रोटॉन आणि न्यूट्रॉन यांना बांधून ठेवण्याचे काम हे बल करीत असते. तसेच प्रोटॉन व न्यूट्रॉन आणखी लहान असलेल्या क्वार्क कणापासून तयार होत असल्याने प्रोटॉन आणि न्यूट्रॉनना एकसंध ठेवण्याचे काम हे बल करीत असते. 'कणांना बांधून ठेवणे' हा या बलाचा वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म मानला जातो. आपण लेखभर पाहात आलो की विश्वात हायड्रोजन अणू भरून राहिलेले होते. मुळात हे अणू तयारच कसे झाले? १९६० च्या आसपास क्वार्क नावाचे आणखी मूलभूत कण शास्त्रज्ञांना सापडले. या क्वार्कचे एकमेकांना बांधले जाणे, हे सर्वस्वी तीव्र आण्विक बलावरती अवलंबून असते. थोडक्यात तीव्र केंद्रकीय बल नसते तर मुद्दलात हायड्रोजन वायूच तयार झाला नसता; आणि त्यानंतरचे ग्रह तारे हे व्याजही तयार झाले नसते !

असो. या चारही मूलभूत बलांची माहिती आपल्याला असायला हवी. क्षीण आणि तीव्र केंद्रकीय बलांबद्दल अधिक माहिती तुम्ही यू-ट्युबवर जाऊन काही छान व्हिडिओ क्लिप्स् बघून मिळवू शकाल. खोलात समजून घ्यायचं असेल तर विज्ञानात पदव्युत्तर अभ्यासच करावा लागेल! पण, बलांचा इतिहास म्हणजेच आपल्या या विश्वाचा इतिहास आहे अशी काहीशी जाणीव तुम्हाला लेख वाचताना होत होती का? जरूर विचार करा!!

**– डॉ. निवास पाटील**
*'पल्सार', प्लॉट नं. ६, गंगापूर रस्ता,*
*नाशिक 422013*

*अणुरेणूंची अगाध दुनिया, दृष्टीच्या पार।*
*सूक्ष्म जीव अदृश्य किरणही भवती फिरणार।।*
**शुभेच्छुक – एक हितचिंतक, सातारा**

*Be a good person*
*but never try to prove it.*

with best compliments from

**PRABHA ENTERPRISE**

MFG's of automobile components and machine tools. All type of bar turning job works. Spare capacity on CNG SLIDING HEAD & CNC TRAUB

Avinash Musale 9850079738
Akshay Musale 9011043499

1325/13, Shivaji Udyam Nagar
Kolhapur- 416234
Contact - 0231 6681336

*Take risks in your life.*
*If you win you can lead.*
*If you loose you can guide.*

**Shree Multi Services**

**Contact Us :** Shop No. 3, Vakratund Heights, Opp Ganapati Mandir, Jambhulwadi Rd., Dattanagar, Ambegoan, Pune 411046 Maharashtra, India

**Ph. :** (+91) 989 0273 970
(+91) 982 2468 634

www.shreemultiservices. com
pramod.dongre@ shreemultiservices. com
umesh.dongre@ shreemultiservices. com
info@shreemultiservices. com

**संस्कृतम् एव संस्कृतिः**

संस्कृत – भाषा – संस्था (पुणे शाखा)

**संस्कृत स्पर्धा परीक्षा**

( इ. ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी )

लेखी : संस्कृत वाचनमाला – १ प्रश्नपत्रिका – १०० गुण
संस्कृत भाषा दर्पण – १ प्रश्नपत्रिका – १०० गुण
मौखिक : सामान्य प्रश्न, कथाकथन, कविता – ५० गुण

**सुभाषिते, प्रार्थना–संगणक तबकड्या उपलब्ध.**

माध्यमाची अट नाही.

रंजकतेसह संस्कृत भाषेची ओळख

संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक
१) सौ. विनोदिनी जोशी ०२०–२४२६५०००
२) सौ. शीतल गोखले ०२०–२४४८२७१२
३) डॉ. विशाखा टुमणे ९८५०१००५३४



**क्रांतिकारी शोध : मायकेल फॅरॅडे** - (१८२१)
विद्युत बल व चुंबकीय बल यांचा एकमेकांशी घनिष्ठ संबंध आहे.

शुभेच्छुक – अंशुमन, पुणे ☎ २५४६०८१२

# गुण-दोषांतील सीमारेषा

शैलजा देशमुख

तिन्हीसांजेची वेळ कधी नीट अनुभवली आहे तुम्ही? दिवस अस्ताला जात असलेला. रात्र उंबरठ्यावर आलेली. ना धड प्रकाश, ना अंधार, दिवस-रात्रीच्या सीमेवर रेंगाळणारे ते क्षण! अशावेळी समुद्राच्या तीरावर, दूरवर दिसणारी क्षितिजाची रेषा. एकीकडे खोलवर गेलेले पाणी अन् वरती आकाश यातील धूसर सीमारेषा तर दुसरीकडे पाणी आणि जमीन यातील सीमारेषा! भोवताली थोडीफार माणसांची वर्दळ... माणसांत असूनही आपण अगदी एकटे... त्यावेळी जाणवतं, अशा अनेक सीमारेषांवर आपलं वावरणं आपल्याला जाणवतही नाही अनेकदा... एक पाय अल्याड तर दुसरा पल्याड... तोल गेला तर एका टोकाला जाणं. अनेकदा आपल्याला ही पुसट सीमारेषा समजत नाही. कुणी समजावूनही सांगत नाही. वाटलं, हे तुम्हाला सांगायला हवं कारण तुमचं वयही असंच बालपण अन् तारुण्याच्या सीमारेषेवरचं... या वयात आपलं वागणं काही वेळा आपल्यालाच उमगत नाही.



कधी भावनांचा उद्रेक - कधी कोंडमारा. कधी पारडं न कळत चांगल्या वागण्याकडे झुकतं तर कधी अगदी आपल्यालाही नकोशा वाटणाऱ्या दोषांकडे! जरा उघड्या डोळ्यांनी आपल्या भोवताली आणि स्वतःकडे पाहिलं तर या निसटत्या सीमारेषा आपल्यालाही जाणवतील !

*दहावीचा निकाल चार दिवसांवर आला होता. शेजारचा राजू भेटल्यावर त्याला म्हटलं, ''काय राजू, रिझल्ट आला ना उद्यावर?''*

*''काकू, बघू या काय होतं ते, काही झालं तरी नव्वद टक्क्यांच्या वर गुण मिळतीलच, याची खात्री आहे.'' राजू बेफिकीरीने म्हणाला. चार दिवसांनी समजलं, राजूला फक्त ७२ टक्केच गुण मिळाले होते. आमच्या शेजारचा नितीन त्याच्याच वर्गात. तो म्हणाला, ''काकू, खरं म्हणजे राजूची इतकीच तयारी होती. त्याला उगीचच* ***फाजील आत्मविश्वास*** *होता.''*

त्याचा हा वाक्प्रयोग मला अंतर्मुख करून गेला. खरंच, माणसानं आशावादी असावं, आत्मविश्वास असावा; पण स्वतःबद्दल इतकी चुकीची कल्पनाही नको. अर्थात ही सीमारेषा

**मित्रांनो, आत्मविश्वास असणं, नम्रतेने वागणं, योग्य ठिकाणी स्पष्ट बोलणं हे खरंतर खूप महत्त्वाचे गुण! पण तेच गुण फाजील आत्मविश्वास, न्यूनत्वाची भावना वा उद्धटपणाकडे झुकले तर दोष ठरतात. त्यामधली सीमारेषा समजली नाही तर अशा प्रकारचे दोष आपल्या स्वभावात कधी भिनतात ते कळतही नाही.**

**या लेखात गुण–दोषांतील सीमारेषांच्या संदर्भात तीन ठळक स्वभावविशेषांचा विचार केलाय; परंतु अशा अनेक सीमा–रेषा अंतर्मुख होऊन विचार केलात तर तुम्हालाही समजतील. त्यांचा शोध आपला आपणच घेऊन सुधारणा करण्याचा जरूर प्रयत्न करा.**

*अभ्यासाशी नाते असू दे, खेळावरही लोभ दिसू दे।*
*व्यक्तित्त्वाची खोलून पाने, उमलून यावे सर्वांगाने।।*

**शुभेच्छुक – श्री. विक्रम चाफेकर, पुणे** – दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !

कळणार कशी?

यामागे एक कारण असं असतं की, काही वेळा आपल्या क्षमतांची मर्यादाच आपल्याला कळत नाही. क्षमता वाढवता येतात नक्कीच! पण त्यासाठी प्रयत्न करायला नकोत का? मुळात स्वत:ला ओळखायला शिकायला हवं. स्वत:चं, परिस्थितीचं मूल्यमापन करता यायला हवं. याउलट, काही वेळा आपल्यात असलेल्या क्षमता आपल्याला चांगल्याच माहीत असतात. 'अमूक गोष्ट काय मला सहज जमणारच', अशी बेपर्वाईही असते.

*मला आठवतं, माझी एक नीता नावाची विद्यार्थिनी होती. शाळेत असताना वक्तृत्व स्पर्धेत तिला बरेचदा बक्षीसही मिळायचं. नंतर-नंतर तिला 'आपल्याला काय, कुठेही छान बोलता येतं!' असं वाटू लागलं आणि मग एकदा आमच्याच शाळेत आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा होत्या. आमच्या शाळेतर्फे नीता बोलणार होती. कितीही सूचना दिल्या तरी नीताने फारशी तयारी केली नव्हती. काहीही तयारी न करता ती मोठ्या दिमाखात स्टेजवर गेली आणि व्हायचं तेच झालं. तिला काहीही बोलायला सुचेना; नीताची पार फजिती झाली. नीताला फाजील आत्मविश्वास नडला.*

कधी या फाजील आत्मविश्वासातून आपण अविचारी धाडस करून बसतो. आणि त्याचे दुष्परिणाम आयुष्यभर पुरणारे ठरतात. याची अनेक उदाहरणं तुम्ही वर्तमानपत्रांत वाचत असता. किनाऱ्यावर ज्या ठिकाणी 'समुद्रात जाणं धोक्याचं आहे', असा इशारा दिलेला असतो, तिथे पोहायला जाऊन काही तरुण 'आपण उत्तम पोहणारे आहोत', असा फाजील आत्मविश्वास दाखवतात आणि प्राणाला मुकतात.

अवघड डोंगरकडे चढताना पुरेशी तयारी करून जाणं, नीट योजना आखणं हेही आवश्यक असतं. अन्यथा फाजील आत्मविश्वासापायी केलं जाणारं वेडं साहस जिवावर बेतणारं ठरू शकतं. मात्र, आपला आत्मविश्वास हरवणार नाही, साहस करण्याची जिद्द हरवणार नाही याचीही काळजी घ्यायलाच हवी. फक्त त्यासाठी आपल्या क्षमता वाढवणं, व्यक्तिमत्त्व समृद्ध करणं हे अनुभवातून नकळत व्हायला हवं. एखादी चूक झालीच तर ती सुधारण्याची मानसिकताही असायला हवी.

आधीच्या उदाहरणातील राजूची जशी स्वत:ची प्रतिमा मोठी करून पाहाण्याची वृत्ती तर शेजारची स्नेहा याचं दुसरं टोक.

*खरं म्हणजे, तिची अभ्यासाची तयारी उत्तम; पण तिचं सारखं 'मला कमीच गुण मिळणार. मी म्हणजे काय एक सामान्य मुलगी', असं नित्याचंच तुणतुणं! स्वत:च्या मर्यादांची जाणीव हवी हे खरं; पण इतकी **कमीपणाची भावना** कशासाठी? **नम्रपणाचं** रूपांतर अशा भावनेत कधी होतं हे कळतही नाही.*

आपलं 'स्व'त्व आपल्याला कळायला हवंच ना! काही जणांच्या मनात ही न्यूनत्वाची भावना पार रुजलेली असते. अशी माणसं कायम मागेमागे राहातात. धडाडीनं, आत्मविश्वासानं पुढे येतच नाहीत. त्यांना संधीचा फायदा घेता येत नाही. काही मिळवण्याची जिद्द उरत नाही. काही वेळा आपण किती नम्र आहोत हे 'दाखवण्याचा' त्यांना सोस असतो. हा खोटेपणा काही वेळा समोरच्याला फसवतो. पण मोठ्यांनाच काय, तुम्हा मुलांनाही हा खोटा विनय नक्कीच समजतो. मग अशा मित्र/मैत्रिणीला तुम्ही 'काय गूळ लावतो', 'गोड बोलून चमचेगिरी करतो' अशी दूषणं देताच ना!

मोठ्यांशी विनम्रपणे वागताना आपल्याकडे कमीपणा घेण्याची मुळीच गरज नसते. आपला आब आपल्यालाच राखून ठेवता येतो. कधी पुरेसं स्पष्ट, तरीही गोड बोलून तर कधी मौनातून!

'मोठी माणसं कुठेआपल्याला स्पष्ट बोलू देतात?', ही नक्कीच तुमची तक्रार असेल, हो



*'शरीर सतेज, सुंदर मन हेच विद्यार्थ्यांचे धन'*
*आचरणात आणूया स्वामी विवेकानंद, समर्थ रामदास यांचे हे चिंतन.*
**शुभेच्छुक – डॉ. श्रीकृष्ण चिंचणीकर, पुणे**

ना? काही प्रमाणात ती खरीही असते; पण पूर्णतः नाही. तुम्ही जसजसे मोठे होता तसतसं तुम्हाला दुसऱ्याचं वागणं पटेनासं होतं. ही खरं तर तुमच्या वाढण्याची खूण आहे. पण तुम्ही कसा प्रतिसाद देता हे खूप महत्त्वाचं असतं. आपलं मत ठामपणे, स्वतःशी विचार करून, योग्य वेळी; चांगल्या भाषेत मांडलंत, तर तो असतो **स्पष्टवक्तेपणा !** समोरचा माणूस वयाने मोठा असेल तर स्पष्ट बोलणं ही तारेवरची कसरत असते. पण मी तर म्हणेन समोरची व्यक्ती लहान असली तरीही आपण मर्यादेनंच आपलं म्हणणं मांडायला हवं. आपला आणि समोरच्याचाही मान राखायला हवा! तर्काला सोडून, मोठमोठ्याने बोलून, धिंगाणा केला तर आपला स्पष्टवक्तेपणा **उद्धटपणा**कडे झुकतो.



आठवा बरं, आईचं किंवा शाळेत अध्यापकांचं बोलणं पटलं नाही तर तुम्ही कसे वागता? कधी लगेच उलट शब्दांत निषेध व्यक्त करता, तर कधी आक्रस्ताळेपणा करता, आपल्या वागण्याचं समर्थन करता, कधी शब्दांविना देहबोलीतून - आपल्या हालचालींतून उद्धट वर्तन करता.

नात्यातल्या एखाद्या समारंभाला तुम्हाला मुळीच जायचं नसतं किंवा परंपरागत असलेली एखादी गोष्ट करण्याची तुमची इच्छा नसते. तुम्ही धाडकन 'मी नाही हे करणार!' असं रागारागाने, उद्धटपणे बोलता. कधी त्यात तथ्य असेलही, तुमच्या दृष्टीने एखादे महत्त्वाचे काम तुमच्यासमोर असेल, एखादा विचार तुम्हाला पटत नसेल; पण उद्धटपणे न वागता तुम्ही तुमचं म्हणणं मांडू शकता. काही गोष्टी आपण समाजात राहतो म्हणून, बांधिलकी म्हणून कराव्या लागतात. काही गोष्टींमागे आपल्याला न समजणारं तत्त्वही असू शकतं. आई-बाबांना जेव्हा वेळ असेल तेव्हा स्पष्ट चर्चा करून समजून घेण्याचा प्रयत्न करा. मात्र, उद्धटपणे विनाकारण नकारात्मक भूमिका घेणं चुकीचंच आहे.

अर्थात, हे ठरवून होत नाही. तो तुमच्या भावनांचा उद्रेक असतो. त्यावर ताबा मिळवून आपलं म्हणणं तर्कनिष्ठपणे, शांतपणे मांडता येणं ही स्पष्टवक्तेपणाची कसोटी आहे. अशा वेळी आपण मर्यादा ओलांडून उद्धटपणे तर वागत नाही ना हा विचार करायला हवा. ही प्रयत्नपूर्वक शिकण्याची गोष्ट असते. स्पष्ट बोलताना काळ-वेळ पाहून बोलणं, वयाचं भान ठेवून बोलणं हेही महत्त्वाचं असतं.

काही वेळा आर्थिक, सामाजिक परिस्थितीतून न्यूनगंड, अहंगंड, उद्धटपणा येत असतो. आपल्या घरी काम करण्यास येणाऱ्या व्यक्ती, *ड्रायव्हर* काका, सोसायटीतील रक्षक यांच्याही वयाचा मान ठेवायला हवा.

*मला एक प्रसंग आठवतोय! 'सोसायटीच्या आवारात मोठ्या मुलांनी क्रिकेट खेळू नये, खिडकीच्या काचा फुटतात, दुपारच्या वेळी ज्येष्ठ मंडळी विश्रांती घेत असतात, त्यांना आरडाओरड्याने त्रास होतो,' हे प्रवेशद्वारावरील रक्षककाका मुलांना समजावून सांगत होते. त्यावर वरद उद्धटपणे म्हणाला 'तुम्ही कोण आम्हाला सांगणार? आम्ही इथे खेळणारच.'*

खरं तर, 'काका, तुम्ही म्हणता ते ठीक आहे. आम्ही आवाज न करता दुसरा खेळ खेळतो,'

*सोड निराशा, झाड आळसा, ध्येयपथा आक्रमी।*
*वाटाड्या हो तूच तुझा, मग तुला कशाचे काय कमी।।*

**शुभेच्छुक – श्री. एस. डी. ढवळे, सातारा**

**Happy Diwali**

*Truth is always like oil in water.
No matter how much water you add,
oil always floats on 'Top'*

## Autotec Industries

GAT No. 1203, Vadki
Pune-Saswad Rd., Pune - 412308

Mob.: 9422003907
email: autotecpune@yahoo.co.in

*Have faith in yourself
great convictions are the
mother of great deeds*

*With best compliments from*

## Kaneri Industries

***Shiroli, Kolhapur***

*Don't lower your goals to the level of your abilities
Instead, raise your abilities to the heights of your goal!*

Happy Diwali

# Spark Engineers

**526, Narayan Peth, Punit Apts,
Opp. Modi Ganapati, Pune- 411 030
Contact - 020 24450363**




**क्रांतिकारी शोध : चार्लस् डार्विन** - (१८५९)
उत्क्रांतीवाद

**शुभेच्छुक – श्री. चंद्रशेखर देशपांडे, सातारा**

असंही तो म्हणू शकला असता. पण सामान्यत: असं होत नाही. एकदा अंगात भिनलेला उद्धटपणा मग अंगवळणी पडत जातो. आपल्या स्वभावाचा भाग केव्हा बनतो, हे कळतही नाही आपल्याला!

काही वेळा आपल्या घरची सामान्य आर्थिक स्थिती, आपल्याला मिळणारं सामान्य यश, घरातील काही समस्या अशा एक ना अनेक कारणांनी न्यूनगंड निर्माण होतो. पण परिस्थितीची जाणीव असण्याची संवेदनशीलता असणं, त्यातून एक प्रकारची सहज स्वीकाराची विनम्र वृत्ती असणं आणि त्याबद्दल कमीपणाची भावना मनात बाळगणं यात फरक असतो.



*शाळेत असताना माझी एक मैत्रीण होती. दिलखुलास व्यक्तिमत्त्वाची मनीषा - स्वभाव तसा बडबड्या म्हणावा असा. समोरच्या माणसाला चटकन विश्वासात घ्यायची. वर्गातल्या सगळ्या मुलींची ती लाडकी; सगळ्या कार्यक्रमांत पुढे असायची. शक्यतो मिळून-मिसळून वागायची; पण तिला एखादी गोष्ट जमणार नसेल तर तेही स्पष्टपणे सांगायची. मात्र, कुणाला बोचणार नाही अशा प्रकारे! घरची तशी गरिबीच असावी; पण आम्हाला ते कधी जाणवायचं नाही. खूप मोकळी असली ना तरी आम्हा मैत्रिणींना घरी बोलवायचं शिताफीनं हसतहसत टाळायची. आमची समजूत तिच्या घरी किती छान, सुखी कुटुंब असेल अशीच होती. एकदा मनीषा खूप आजारी पडली; आठ दिवस शाळेतच आली नाही. मग तिचा पत्ता शोधून मी तिच्या घरी गेले. अगदी गचाळ वस्तीतलं घर. मनीषा अंथरुणावर पडली होती. तिची मोठी बहीण थोडी अपंग म्हणून तिचं लग्न झालं नसावं. तिच्या पाठचा भाऊ घरात आला; त्याचा अवतार बघून तर मी धास्तावलेच. आईही परिस्थितीनं गांजलेलीच वाटली. यापैकी मनीषानं आम्हाला कधीच काही सांगितलं नव्हतं. नंतर मी तिला एकदा छेडल्यावर ती म्हणाली, ''अगं, प्रत्येकाला काहीतरी दु:ख असतंच, काही दु:खं अशी असतात की, ती स्वत:जवळच ठेवावीत. आपला स्वाभिमान आपणच जपायचा असतो ना! सगळ्यांना सांगत सुटलं तर आपलं असं काय राहिलं? मी रोज माझी रडकथा तुम्हाला सांगत बसले तर तुम्ही माझी चेष्टाच कराल ना!''*

घरच्या परिस्थितीबद्दल कमीपणा न बाळगता नम्रपणे वागणाऱ्या, बोलणाऱ्या, पुरेसा आत्मविश्वास असणाऱ्या मनिषाला त्या कुमारवयात परिस्थितीनं जे शिकवलं, ते तिने किती सकारात्मक पद्धतीनं घेतलं होतं. वयानं मोठ्या माणसांनाही ते जमतंच असं नाही. त्यावेळी जाणवलं, तिच्या सदैव हसऱ्या-खेळकर, मोकळ्या स्वभावामागेही आपल्या भावनांचा संयत आविष्कार करण्याची समज होती. भावनांच्या आविष्कारातील सीमारेषा तिला किती छान समजली होती...

– शैलजा देशमुख
*सी -१०२, पाटे संस्कृती, सहकारनगर क्र. २, पुणे -९*
sgdeshmukh50@gmail.com
*चित्रकार : ऋजुता घाटे*

*उठा, उठा तर बसू नका, होईल कैसे म्हणू नका।*
*कशाही विघ्ना भिऊ नका, मार्गक्रमणा सोडू नका।।*
शुभेच्छुक– सौ. अनुराधा विनायक आफळे, सातारा

**(पान क्रमांक १७ वरून पुढे चालू.)**

मेंदूचं काम संदेशलहरी पाठवून चालतं. अशा संदेशलहरीही त्यांनी *डिजिटल* स्वरूपात आणल्या आणि या दोन्हींचा उपयोग करून त्यांनी बारा *चिप* बनवल्या. *त्यात ही माहिती सेव्ह होती. त्या चिपवर* असणारे बारक्या सुईसारखे *नोड्स* शरीरात रोवले की, मेंदूच्या ज्या भागात आकलनक्षमता, स्मरणशक्ती असते, ते भाग उद्दीपित होत असत.

डॉ. सोहोनींवर सूड उगवण्याच्या हेतूने त्यांचे हे उपद्व्याप चालू होते. सोहोनींमुळे झालेली मानहानी ते विसरले नव्हते. म्हणून त्यांनी भयंकर कट बनवला. वाघांच्या आकलनक्षमतेत, स्मरणशक्तीत वाढ करणाऱ्या या *चिप* चक्रवर्तींनी गेल्या आठवड्यात त्या- त्या वाघाला लावलेल्या कॉलरमध्ये बसवल्या. आठवडाभर स्वत: वाघांशी खेळीमेळीने वागले. वाघांना खाणं नेऊन दे, त्यांच्याशी खेळ, लाड कर असं चक्रवर्ती करत होते. जेणेकरून त्या वाघांच्या डोक्यात, आपलं भलं चिंतणारा माणूस अशी चक्रवर्तींची प्रतिमा तयार व्हावी.

...आज या कटाचा निर्णायक दिवस होता. सुट्टीचा दिवस म्हणून डॉ. सोहोनी *लॅबमध्ये* एकटे थांबणार हे त्यांनी ताडलं. पण नेमकं आजच मुलाखतीचं निमित्त झालं आणि ती *चॅनेलची* दोन माणसं, *लॅबमधले* सहकारी तिथे आले. तरी चक्रवर्तींची योजना



म्हंजे म्हंजे वाघाचे पंजे ऽऽ

बदलणार नव्हती.

दुपारी लॅबमधल्या टेलिफोनच्या ताराच त्यांनी तोडल्या. सगळ्या *वॉकी-टॉकीमधली सर्कीट* काढून फेकून दिली; त्यामुळे काही काळापुरता *लॅबचा* बाहेरच्या जगाशी संबंध तुटणार होता.

संध्याकाळच्या सुमारास हॉब्सचे लाड करताना, ठरवल्याप्रमाणे त्यांनी हॉब्सच्या नकळत त्याच्या पंजावर जखम केली. जखमेवर रुमाल बांधत त्यांनी सोहोनींना हाक मारली. तेव्हाच वाघांना बोलवायची शिट्टी वापरून त्यांनी इतर सर्व वाघांना तिथे बोलावलं. सोहोनी हॉब्सवर मलमपट्टी करताना, साहजिकच थोड्या वेदनांनी तो गुरगुरला. पण तिथे जमलेल्या वाघांना वाटलं, सोहोनीच हॉब्सला इजा करत आहेत. सोहोनी लॅबकडे पळाले, तसं ते वाघ सोहोनींवर हल्ला करण्यासाठी तिथे जाऊ लागले.

तिथे गेल्यावर आतमधून चक्रवर्तींचा किंचाळण्याचा आवाज आला तेव्हा वाघांची खात्री पटली की, या जागेत जमलेली माणसं त्यांच्या मित्रांना त्रास देत आहेत. आधी हॉब्ज आणि नंतर चक्रवर्ती. म्हणूनच ते रागारागाने दारांवर धडका देत होते. दरवाजा उघडून आतल्या सगळ्यांवर हल्ला करायचं त्यांनी ठरवलं.

''हे मी तुम्हाला का सांगतो आहे असं वाटत असेल ना? कारण थोड्याच वेळात तुम्ही कोणीच या जगात राहाणार नाही आहात. तुम्ही अडकला आहात या लॅबमध्ये. बाहेर संपर्क तर तुम्ही करूच शकत नाही. गस्तीची सिक्युरिटी जीप उद्या येईल की येणारच नाही, कोण जाणे ! पण खालचा दरवाजा तर तासाभरात निखळून पडेल.'' चक्रवर्तींच्या चेहऱ्यावर खुनशी हास्य विलसत होतं.

खाली इमारतीभोवती फिरत वाघ पहारा देत होते. आळीपाळीने दरवाजावर धडका मारत होते. दार उघडू नये म्हणून या लोकांनी जरी टेबलं, खुर्च्या लावल्या तरी वाघांच्या ताकदीपुढे त्या काय टिकाव धरणार?

''कोणी नाही अडकलेलं!'' डॉ. सोहोनी म्हणाले. ''किशोर जा, *ट्रँक्विलायझर* आण.'' एका सहकाऱ्याला त्यांनी आज्ञा केली.

वन्यप्राण्यांना पकडताना, त्यांना दुखापत होऊ नये आणि पकडणंही सोपं व्हावं म्हणून *ट्रँक्विलायझर* बंदूक वापरतात. त्याने प्राणी काही काळ बेशुद्ध होतात. सोहोनींचा



**क्रांतिकारी शोध : लुई पाश्चर** - (१८६०)
सूक्ष्म जीवाणूंमुळे होणारे रोग
**शुभेच्छुक – श्री. कृ. भा. वाळिंबे, सातारा**

उपाय समजताच अनेकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसला; पण किशोर हताश होता.

''सर, *ट्रँक्विलायझर* तर *मेडिकल किटमध्ये* होता ना !'' तो म्हणाला.

''अरेरे !'' सोहोनीही हताश झाले. संध्याकाळी हॉब्सला मलमपट्टी करताना *किट* तिथेच राहिलं होतं.

''तुमच्या बंदुका कुठे आहेत?'' त्यांनी शांत्या आणि पंडितला विचारलं. त्यांच्या बंदुका लोखंडी गेटजवळच्या सुरक्षा चौकीत राहिल्याचं त्यांनी सांगितलं.

''वा ! सोहोनी.. शेवटी तूसुद्धा आलासच ना बंदुकांवर!'' चक्रवर्ती म्हणाले. खुर्चीत बांधल्या बांधल्या बोलत होते ते.

सोहोनींनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं. वाघांना मारायला नाही, तर त्या आवाजाने वाघांना घाबरवायला हवी होती त्यांना बंदूक. तो आवाज जर जवळच्या कोणत्या *सिक्युरिटी पोस्टला* ऐकू गेला तर मदतही मिळाली असती त्यांची.

''या वाघांना पुढे कोण ना कोण मारणाच ना, सर. असे *इन्टेलिजंट* वाघ मानवाला धोकाच ठरणार.'' सहकारी श्वेता म्हणाली.

''काळजी करू नका मिस श्वेता...'' चक्रवर्ती तिला म्हणाले. ''तुम्हा सगळ्यांना वाघांनी संपवलं ना की, मी *चिपवरचा स्विच* बंद करीन. त्यांच्या शरीरात रोवलेले नोड्स बाहेर आले की, पुन्हा पहिल्याप्रमाणे होतील ते आणि मग मी हा जीवघेणा प्रयोग सोहोनींनीच केला होता असं जगाला सांगेन.''

''कोणीतरी यांचं तोंड बंद करा रे'' सोहोनी वैतागले. शांत्याने चक्रवर्तींच्या तोंडात रुमालाचा बोळा कोंबून त्यावर एक फडकं बांधलं.

''डॉक्टर,'' हुसेनचा कॅमेरामन विश्वास म्हणाला, ''वाघांना *कॉलर ट्रॅकर* आहे ना... मग त्यांचा *ट्रॅकर* कोणी *सिक्युरिटीवाल्यांनी* कॉम्प्युटरवर पाहिल्यावर त्यांच्या लक्षात येईल की, एकाच वेळी सगळे वाघ लॅबजवळ काय करताहेत?''

''तेच तर ! हा प्रयोग खूपच मर्यादित लोकांना माहीत होता सुरुवातीला. म्हणून त्यांचे *ट्रॅकर* बाहेर कोणाला दिलेलेच नाहीत. फक्त लॅबमधल्या कॉम्प्युटरमध्येच त्याची नोंद व्हायची,'' सोहोनींनी समजावलं.

*लॅबमध्ये* सर्वांवर अवकळा पसरली होती. खाली दारावर धडका चालूच होत्या. बिजागऱ्या खिळखिळ्या झाल्याचा आवाज येत होता. तेवढ्यात हुसेनच्या खिशात मोबाईल वाजू लागला. सगळ्यांनी चमकून त्याच्याकडे पाहिलं.

''रेंज आली मोबाईलला?'' विश्वासने खूश होत विचारलं. सर्वांचे चेहरे खुलले होते.

''नाही यार !'' हुसेन मोबाईल पाहात म्हणाला. ''मीच लावलेला *रिमाइंडर* आहे हा. उद्याच्या परिसंवादाचा. 'चित्रपट व टेलिव्हिजनचा समाजावर परिणाम!' आपणसुद्धा ना... उद्याचा दिवस पाहू की नाही ही खात्री नसताना भले भले *रिमाइंडर* लावून ठेवतो.''

त्याच्या अशा बोलण्याने बाकीचे सगळे खिन्न झाले. पण एक सहकारी मुलगी सोडून... ऐश्वर्या. ती कोणत्या तरी विचारात गुंतलेली दिसत होती.

''कसला परिसंवाद म्हणालात?'' तिने पुन्हा विचारलं.

''चित्रपट व टेलिव्हिजनचा समाजावर परिणाम !'' हुसेन उत्तरला.

*''दॅट्स इट !''* ती आनंदाने उडी मारत उद्गारली.

''काय झालं?'' सोहोनींनी तिला विचारलं.

''सर, समोर काय चालू आहे हे वाघांना समजतं... मग त्यांना व्हिडिओसुद्धा समजू शकेल ना?'' तिने असं विचारल्यावर इतरांना थोडासा अंदाज आला.

''सर, पण *प्लीज सस्पेंड* करू नका मला. मी परवानगीशिवाय मोबाईलमध्ये इथल्या वाघांबरोबर शूटिंग केलेलं आहे...''

''अर्थातच नाही करणार !'' सोहोनी म्हणाले.

''ग्रेट ! पंडित, रूममधला हा *प्रोजेक्टर* खाली काढ. किशोर, माझ्या बॅगेतला तो दुसरा मोबाईल काढून दे...'' ऐश्वर्याने तिची योजना सांगायला सुरुवात केली. तिच्यासह सर्वजण कामाला लागले.

खाली पहारा देणारे वाघ वैतागून जास्तच चिडले होते. इतका वेळ प्रयत्न करूनही दार उघडत नव्हतं. पण त्यांच्या मित्रांना इजा

*प्रकाश मंडळाच्या 'अमृत महोत्सवी 'वर्षानिमित्त*
*छात्र प्रबोधनला हार्दिक शुभेच्छा !*

**शुभेच्छुक – मा. अध्यक्ष, प्रकाश मंडळ, सातारा.**

***Soft-brained men, weak minded,***
***chicken hearted cannot find the truth.***
***So be brave, bold and powerful***
***- Swami Vivekanand***

With Best Compliments *from*

Shri. Harish Mangaokar

# GURUVAYUR LOGISTICS

Survey No. 37/1, Pisoli,
Pune - 411060
Ph.: 020 26930887

**क्रांतिकारी शोध : अल्बर्ट आइनस्टाइन -** (१९०५)
थिअरी ऑफ रिलेटीव्हिटी (सापेक्षता)

**शुभेच्छुक – श्री. सारंग विष्णू देवधर, मिनिया पोलिस, यु. एस्. ए.**

पोहोचवणाऱ्या माणसांना शिक्षा करायचीच, हे वाघांच्या डोक्यात पक्कं होतं.

''ते बघा,'' खिडकीपाशी उभ्या असलेल्या ऐश्वर्यानि बाकीच्यांना खुणावलं. वाघांनी तिच्याच खिडकीखाली येऊन गर्दी केली. मग दुसऱ्या खिडकीतून प्रोजेक्टर खाली लटकवला गेला.

हळूहळू तिथे सगळे वाघ त्या खिडकीखाली जमून व्हिडिओ पाहू लागले. काही वाघ खाली बसून, तर काही फक्त मागचे दोन पाय टेकवून; पण एकटक. ते मोठं विलक्षण दृश्य होतं. मोबाईलमधल्या मोजक्याच *क्लिप* पुन्हा पुन्हा लावल्या जात होत्या. त्यामध्ये या सर्व वाघांना खाऊ घालण्याची, प्रेमाने वागण्याची दृश्ये होती. ती दृश्ये पाहून सर्व वाघ खूश झाले. दारावरच्या धडका तर बंद झाल्या होत्या.

आता ऐश्वर्यानि जीव मुठीत धरून इमारतीचं दार उघडलं. तिला खाली पाठवणं सर्वांनाच खूप अवघड गेलं होतं; पण ती खंबीर होती. आता खाली आल्यानंतर तिलाही भीती वाटू लागली. वाघ *व्हिडिओ क्लिप* पाहात होते, तिथे ऐश्वर्या आली. वाघ *क्लिप* बघण्यातच गुंग होते. काही वाघांना वास आला ऐश्वर्याचा. त्यांनी वळून पाहिलं तिच्याकडे. त्यातली ऑर्कीड दबकत दबकत शेपटी उंचावून तिच्या दिशेने येऊ लागली. ऐश्वर्याच्या छातीतली धडधड वाढली. ऑर्कीड एकदम पुढच्या दोन पंजांचं वजन तिच्या अंगावर टाकत उभी राहिली आणि लाडाने तिला चाटू लागली. कारण ती ऐश्वर्याला ओळखत होती. ऑर्कीडसारखेच इतर सर्व वाघही तिच्या जवळ येऊन आदरभाव दाखवू लागले.

वरच्या खिडकीतून हे दृश्य पाहात असलेल्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

आता थोडं महत्त्वाचं काम होतं. तिने ऑर्कीडची कॉलर चाचपडली. तिला *चिप* सापडली. त्यावरचा *स्विच* फिरवला. ऐश्वर्याला वाटलं, ऑर्कीड मटकन् खाली बसेल. पण तसं झालं नाही. तिच्यात फरक पडला की नाही हे कळायला मार्ग नव्हता. पण ऐश्वर्यानि इतर सर्व वाघांच्या कॉलरमधल्या *चिप* तशाचप्रकारे निकामी केल्या.

एव्हाना पूर्वेला फिकट प्रकाश पसरला होता. वाघ आळसावल्यासारखे दिसत होते. दरवाजावर धडका मारायचं तर ते साफ विसरले होते. काही वाघ बाहेर पडू लागले. काही वाघ आतमध्ये उगीच फिरत होते. सूर्य जसा वर येऊ लागला, तसं एकएक करून सगळे वाघ हळूहळू बाहेर



पडले. शेवटचा कब्या बाहेर पडण्याची वाटच पाहात असलेल्या ऐश्वर्यानि खटका ओढला. लोखंडी गेट त्वरित बंद झालं !

तिच्या डोळ्यांतले आनंदाश्रू आणि वर सर्वांकडून होणारा टाळ्यांचा कडकडाट आता थांबणार नव्हता.



*चित्रकार : कुंडल हिरेमठ*

**– क्षितिज देसाई**
*तिसरा मजला, देसाई सदन, सानपाडा रस्ता, कस्तुरी प्लाझाजवळ, डोंबिवली (पूर्व), ठाणे.*

*प्रयोगांच्या वाटे, विज्ञान पारखून घ्यावे।*
*ज्ञानाच्या शिखरावरूनी, क्षितिज जे पादाक्रांत करीत जावे।।*
**शुभेच्छुक – सौ. शैलजा किशोर ब्रह्मे, सातारा**

Happy Diwali

**Vishal Engineers Pvt. Ltd.**

Manufacturers of
Specified Turned Components

**Regd. Office :**
A/15, Amar Ashiyana, Behind Tatya Tope Hsg.
Society, Wanwari, Pune 13

**Works & Admn. Office :**
S.No. 19, Gondhale Nagar,
Pune Saswad Road, Pune 28
Ph. : 91-20-26990426 Telefax: 91-20-26992751
e-mail : vishal@veplindia.com

*With best compliments from*

**Premier Seals (India) Pvt. Ltd.**

Reedvalves, Oil Seals
& Metal to Rubber Bonded Items

**Works & Office**
17/8, D-1 Block, M.I.D.C., Chinchwad, Pune-411019.
Ph. (020) 27458848/4111951/2/3/27441329/30960072
Fax : 27477408, E-mail : pseals@vsnl.net
visit us at: www.premiersealsindia.com

जिंकत अथवा हरतानाही, अनुदिन नव विश्वास।
नवीन किरणांपरी कुठुनसा, रोज नवा उल्हास।।

**।। शुभ दीपावली ।।**

**विद्यानंद शंकर देवधर**

१७६४, ए-वॉर्ड, ब्रह्मेश्वर पार्क, साकोली, कोल्हापूर- ४१६ ०१२
दूरभाष : ०२३१-२६२५०५०



घे भरारी अंतरी, जा मुक्त दिगंतरी।
कर्तृत्वाचा आलेख, पसरू दे दिशांतरी।।

शुभेच्छुक - सौ. स्नेहल थोरात, सातारा



Happy Diwali
On the auspicious day of Diwali
SQS wishes all the readers of 'Chhatra Prabodhan'
Success, Happiness & Prosperity...
Address:
Plot No. 25/1, Rajiv Gandhi Infotech Park
Phase III,Hinjewadi, Pune 411057, India.
www.sqs.com | www.sqs-india.com




परीक्षा जवळ आली या दिवाळीला अभ्यासाचा श्रीगणेशा करा
'सप्रे मल्टिपर्पज स्टडी टेबल'च्या संगे!
अभ्यास मनापासून करा. पाठीला त्रास न होता भरपूर वेळ
अभ्यास करण्यासाठी उपयुक्त.
एकाच टेबलचे विविध उपयोग व पोझिशन करता येतात.
फुल इम्पिरियल साईज टेबल इंजिनिअरिंगसाठी
गृहपाठासाठी
लॅपटॉपकरिता
मल्टीपर्पज ब्लॅकबोर्ड टेबल
12" x 24" - ₹ 1200/-
15" x 24" - ₹ 1400/-
18" x 24" - ₹ 1600/-
रेग्युलर मल्टिपर्पज टेबल ३ साईजेस मध्ये उपलब्ध!
मिडियम - ₹ 1400/-
जंबो - ₹ 1600/-
सुप्रीम - ₹ 2000/-
फुल इम्पिरियल साईज टेबल
24" x 32" ₹ 3500
सप्रे बोर्डस्
पहिला मजला, चित्रशाळा भवन, भानुविलास चौक, विजय टॉकिजच्या अलिकडे,
लक्ष्मी रोड, पुणे 30. फोन : 020 - 2445 9149, 93710 15193, 93728 50944
वेळ : सकाळी 10.30 ते 2 दुपारी 4.30 ते 8 I www.saprepune.com
परगावच्या ग्राहकांनी कुरियरचे ₹ 350/- जास्तीचे पाठवावे.







*राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्रशासकीय सेवेत कार्यक्षम, समाजाभिमुख व शुद्ध आचाराच्या व्यक्ती जाव्यात यासाठीचे प्रशिक्षण केंद्र- स्पर्धा परीक्षा केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे*

संग्रही ठेवा - **'त्रिमितीची किमया'**, ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन, किं. ₹ ८०/-




CHAVARE
ENGINEERING
Chavare Engineering Pvt. Ltd.
Unit No. 2: Plot No. TS-19, M.I.D.C., Phase-II, Dombivli (E) - 421 204, Dist.: Thane, INDIA
Telefax: +91 251 2870 531 / 32, 2871 737 Email: chavareengg@vsnl.com www.chavare.com
Happy Diwali

*शैक्षणिक क्षेत्राची गुणवत्ता वाढावी यासाठी विद्यार्थी, शिक्षकांसाठी*
*विविध शिबिरांचे आयोजन - शैक्षणिक उपक्रम संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी, पुणे*

संग्रही ठेवा - **'आश्वासक पालकत्व'**, छात्र प्रबोधन प्रकाशन, किं. ₹ ८०/-




Pumps | Valves | Hydro Turbine | Turnkey Projects

Water Resource Management | Irrigation | Power | Industry | Gas Oil And Defence | Building & Construction | Distribution | Customer Service & Spares

**KIRLOSKAR BROTHERS LIMITED**

Registered Office : Udyog Bhavan, Tilak Road, Pune 411 002. Tel : +91(20)2444 0770
Global Headquarters : Yamuna, Survey No. 98/(3-7), Baner, Pune 411 045, Tel : +91 20 2721 4444
E.mail : kblin@kbl.co.in | Website : www.kirloskarpumps.com

Scan this code with your Smart phone to know more about KBL



*पंचकोष विकास व स्पर्धात्मक खेळांमधील कौशल्यप्राप्तीसाठी*
*शिक्षणातले अभिनव प्रयोग – गुरुकुल व क्रीडाकुल, निगडी*

संग्रही ठेवा - **'कल्पक बनूया'**, ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन, किं. ₹ ८०/-

कथा



# एक नूर आदमी...!

मंगला गोडबोले

आजी रोजच्याप्रमाणे मन लावून टि.व्ही. बघत होती. अचानक फाटकाचा आवाज आला. त्याचबरोबर कानावर पुकारा आला, ''आजी, लवकर ऊठ, मला आवरून परत बाहेर जायचं आहे.''

''टेबलावर खायचं काहीतरी असेल. ते घे आणि जा,'' आजीनं उलट हाकारा दिला. टि.व्ही. बघण्यात व्यत्यय आलेला तिला अजिबात आवडत नसे. मग तो तिच्या लाडक्या *'हाफ तिकीट'*-कडून का असेना ! तिचा *'हाफ तिकीट' (एच. टी.)* ऊर्फ नीहार धडपडत घरात आला. त्या नादात त्यानं फाटकाचा, सायकल आत आणण्याचा, ती *स्टॅण्डवर* लावण्याचा, किल्लीनं दार उघडण्याचा असा एकामागून एक आवाजाचा धूमधडाका सुरू केला होता. तेव्हा आजीनं तिच्या दूरदर्शन संचाचा आवाज मोठा केला. नीहारनं वाऱ्याच्या वेगानं तिच्या खोलीत शिरत स्वत: टि.व्ही.समोर उभं राहून एका परीने टि.व्ही. झाकला आणि आवाजाची वरची पट्टी धरली,

''चार वाजता स्पर्धा सुरू होणार आहे. मला आदर्श ॲकॅडमीत जायचं आहे.''

एवढ्या गोंगाटातही आजीला 'स्पर्धा' हा शब्द बरोबर ऐकू आला आणि तिनं पटकन टि.व्ही.चा आवाज कमी करून चौकशी सुरू केली, ''कुठली स्पर्धा? अशी अचानक कशी काय? आणि तू एकटाच जाणार आहेस ?''

''गाण्याची स्पर्धा आहे. आंतरशालेय. खूप आधी जाहीर झालेली. त्यावेळी अंतुरकरने नाव दिलं होतं. तो नाही का?... कधीकधी आपल्या घरी येतो... तो... ढापण्या अंतुरकर... त्याला फार हौस होती राष्ट्रभक्तीपर गाणंबिणं म्हणायची... ऐनवेळी आजारी पडला... आता गाण्याचे

*नीहार व्यासपीठावर गेला. बटण तुटलेला, थोडासा घट्ट असा झब्बा त्याने नाईलाजाने घातला होता. त्याने झब्बा थोडा खाली ओढला तशी एकदम त्याची बटणपट्टी फाकली... बटण नसलेला भाग उघडाच राहिला. नीहार बावरला... श्रोत्यांमधल्या टारगट पोरांनी त्याची टर उडवायला सुरुवात केली...*

*काही क्षणांनी नीहारचा सुरेल आवाज सभागृहभर घुमला... 'जयोस्तुते श्री महन्मंगले...' च्या सुरात अवघा श्रोतृगण भिजून गेला. नीहार स्पर्धा जिंकून घरी परतला. या प्रसंगाच्या आगेमागे नीहार कोणत्या भाव–आंदोलनातून गेला, ते वाचूया मंगला गोडबोले यांच्या खुसखुशीत शैलीत ! कदाचित 'नीहार'मध्ये तुम्हाला तुमचंच प्रतिबिंब दिसेल.*

*करण्यासारखे खूप आहे, उमेद मात्र हवी।*
*मिळण्यासारखं ध्येय आहे, जिद्द मात्र हवी।।*

**शुभेच्छुक – श्री. राजेंद्र सेठिया, पुणे**



सर मला म्हणतात, ''तू जा. आपल्या शाळेनं 'भाग घेतो,' म्हणून कळवलं आहे... ऐनवेळी माघार नको... शाळेचं नाव खराब होतं म्हणे अशानं...''

''जायचं मग आपण...जयोस्तुते, सागरा प्राण तळमळला, गर्जा जयजयकार...छान म्हणतोस की तू ही गाणी... मागे आपल्या कॉलनीच्या स्पर्धेत बक्षीसही मिळवलंस तू त्यातलं.''

''तेच सांगतो आहे केव्हापासून. मागे मिळवलेलं... मागे ना?... तेव्हा आपण लहान होतो. आवडायचं कुठेही जाऊन काहीही घडाघडा म्हणायला! आता आपल्याएवढ्या *बिग बॉईजनी* काय असले 'चिल्ले-पिल्ले' उद्योग करायचे का?... मी सरांना किती जीव तोडून सांगितलं, पण ते ऐकायलाच तयार नाहीत...''

नीहार फारच उसळला होता. हल्ली 'अर्ध्या' तिकिटातून 'पूर्ण' तिकिटात आल्यापासून, आपण फार मोठे झालो, आता आपण पूर्वीसारखं पोरकट वागणं बरं दिसणार नाही, असं काहीबाही त्याला वाटत राहायचं; पण लोकांना तसं वाटायचं नाही. सरांना त्याला स्पर्धेत ढकलावंसं वाटायचं... आजीला त्याचा गालगुच्चा काय घ्यावासा वाटायचा...

''जाऊ द्या *एच.टी.* बाबू. सरांनी फार कठीण काही सांगितलं आहे का आपल्याला? एक गाणं तर म्हणायचंय ना? टाका म्हणून. या जिंकून. एक मात्र करायचं. पेटीवाल्याने पहिली ओळ नीट पूर्ण वाजवली की, मग आपण सूर पकडायचा. घाई करायची नाही... त्या गेल्या वर्षीच्या गणेशोत्सवाच्या स्पर्धेत केली होती तशी...''

आजीने नीहारची समजूत घातली. आत्तापर्यंत स्पर्धांच्या संदर्भात नीहारची सगळी भिस्त आजीवरच असायची. आत्ता-आत्तापर्यंत त्या दोघांचं याबाबतीत छान जमायचं. पण जसजसे नीहारला कान फुटायला लागले तसतसे या स्पर्धांना फाटे फुटायला लागले.

''तिथे काय जायचं यार?, आता काय बाईंचं बोट धरून दुसऱ्यांसमोर भाषणबिषण करणार का मी? मला लाज वाटते पोपटपंचीची,'' असं म्हणून नीहार टाळाटाळ करायला लागला. आणि आज स्पर्धेसाठी जाणं भागच आहे म्हटल्यावर त्याची चिडचिड चालू होती.

**क्रांतिकारी शोध : विल्हेम रोएन्टगेन -** (१८९५)
क्ष-किरण (एक्सरे)
**शुभेच्छुक – सौ. विद्याताई चितळे, बोरीवली**



नीहार आजीवर खेकसला,

''आता आधी मला माझा झब्बा-सुरवार दे कपाटातून काढून. तोवर मी पटकन तोंड धुऊन येतो.''

''अगोबाईऽऽ गाण्यासाठी *फॅन्सी ड्रेस?*'' आजीला हसू आवरेना तेव्हा नीहार आणखी उसळला.

''सरांनी सांगितलंय जरा वीररसाला शोभणारे कपडे घालून जा म्हणून. नाहीतर मला काही नाही पडली कपडेबिपडे बदलायची हौस! मी 'अस्सा'पण जाऊ शकतो, कळलं?''

आत्तापर्यंत आपला *एच.टी.*, जो गबाळ्यासारखा राहायचा, केस-कपडे यांची जराही कदर करायचा नाही, तो आता जरा जास्तच वेळ पुनःपुन्हा आरशात बघून भांग पाडतो, हे आजीला चांगलंच कळलं होतं. पण फारसं काही न बोलता तिनं त्याच्या कपाटातला हवा तो पोशाख काढून पलंगावर ठेवला. आदर्श ॲकॅडमी अगदी पाचच मिनिटांच्या अंतरावर होती. नीट खाऊन-पिऊन, नटून-सजून *हाफ तिकीट* तिथे वेळेत जाऊ शकत होता.

पण आज एकूणच त्याची वेळ बरी नसावी. पाच-दहा मिनिटांमध्ये पुन्हा त्याचा आरडाओरडा सुरू झाला.

''आजीऽ इकडे बघ काय झालं?''

''काय झालं एवढं?''

''झब्ब्याचं मधलं बटण तुटलं आहे.''

''असू दे. आपण दुसरं लावू हं.'' आजीनं नेहमीप्रमाणेच त्याला शांत करायला बघितलं आणि आपला शिवणाचा डबा उघडला. पण डब्यामध्ये त्या झब्ब्याच्या रंगीत बटणांसारखं बटण नव्हतं. एकच बटण वेगळ्या आकाराचं, रंगाचं लावणं अगदीच शोभणार नव्हतं. नीहारजवळ तेवढा एकच झब्बा होता. सुरवार जराशी लांडीच होती. *एच.टी.* बाबू सध्या महिन्या-महिन्याला अर्धा-अर्धा इंच उंच होत असल्याने त्यांना सगळेच कपडे तोकडे व्हायचे. पण थोडी तोकडी तर तोकडी, सुरवार निदान होत होती. आता झब्बाच धड नसेल तर सुरवारीचा काय उपयोग?

नीहारने खूप चिडचिड केली. त्यानं तेवढ्यापुरता दादाचा झब्बा घालावा असं ठरलं; पण दादाचे सगळे चांगले कपडे त्याच्याबरोबर *हॉस्टेलवर* गेले होते.

''मी सरळ गणवेशच घालून जातो स्पर्धेला,'' नीहारनं त्रागा केला. ''का जाऊच नको? नंतर सांगेन सरांना, पोट फार दुखू लागलं म्हणून...''

''छे छे ! शाळेचं नाव राखणार का खोटारडेपणा करून स्वतःचं नाव घालवणार तुम्ही *एच.टी.* बाबू? तेसुद्धा एक झब्बा मनासारखा नाही म्हणून ?''

''*सॉरी* आजी. मी तसा विचार करायला नको होता.''

''मला मुळात हेच कळत नाही, स्पर्धा गाण्याची आहे का नटण्याची?''

''हल्ली सगळेजण छान तयार होतात बरं का आजी.''

*चालण्यासाठी वाट असते, वाटेसाठी चालणं नसतं।*
*उंच भरारी घेणाऱ्याला, आभाळाचं भय नसतं ।।*

**शुभेच्छुक – श्री. सुभाष गावडे, बोरीवली**

''छान म्हणजे?''

''गाण्याला शोभतील असे. पोरीबिरी तर जामच नटतात. राधेचं गाणं म्हणायचं असलं की राधेचा पोशाख..., कोळीगीताला कोळणीचा *ड्रेस...''*

''काहीतरीच काय...?''

''जाऊन बघ. म्हणजे कळेल.''

''मी कशाला बघेन? आता ना तू पूर्वीसारखा शाळेच्या स्पर्धांमध्ये भाग घेत...ना मी तुझ्याबरोबर आलेलं तुला आवडत... आता काय बुवा, आमचा *एच.टी.* झाला *एफ.टी... फुल तिकीट...''*

''तरीही असला झब्बा घालून या स्पर्धेला जावं लागतं आहे. थांब आता. कसातरी जातो आणि काहीतरी म्हणून टाकतो.''

''का?''

''नाहीतरी स्पर्धेमध्ये माझ्या असल्या कपड्यांनी कोणावर काय *इम्प्रेशन* पडणार आहे?''

''फक्त कपड्यांवर असतं का ते तुमचं.. *इम्प्रेशन?''*

''कपड्यांवर असतं... जोड्यांवर, घड्याळावर, मोबाईलवर पण असतं...आणि त्यातलं आपल्याकडे काही नसतं, ओके?'' नीहार चिडून म्हणाला.

अलीकडेच नीहारने आपल्या डॅडींकडे नव्या मोबाईलची मागणी केली होती आणि डॅडींनी ती साफ फेटाळून लावली होती. तेव्हापासून अधूनमधून त्याची धुसफुस चालू होती. आजची ही अचानक अंगावर आलेली स्पर्धा हा सगळ्या वैतागाचा कळसच होता जसा काही ! शेवटी नीहारनं तो बटण तुटलेला झब्बाच कसातरी अंगावर घातला आणि पाय आपटत-आपटत तो दरवाजाकडे निघाला.  नीहारची ती सगळी घुसमट आजीला अगदी बघवत नव्हती.

वेडं पोर ! उगाच छोट्याछोट्या गोष्टींचं अवडंबर माजवतं. जिवाला त्रास करून घेतं. 'नीहारला ऐनवेळी शांत ठेवायला आपणच तिथे हजर हवं.' आजीनं मनोमन ठरवलं आणि हळूहळू पावलं टाकत का होईना, पण आदर्श ॲकॅडमी गाठली.

आदर्श ॲकॅडमीचा स्पर्धेचा हॉल नुसता फुलून आला होता. तेथील रंगीबेरंगी वातावरणात उत्साह भरून राहिला होता. त्या गर्दीत, त्या उत्साहात आजी नकळतपणे सामावून गेली. गर्दीत एका कोपऱ्यात नीहार बसला होता. अगदी कंटाळलेल्या चेहऱ्याने ! हाताने शर्टाच्या बटणाच्या रिकाम्या जागेशी खेळत होता खरा; पण त्यातही पठ्ठ्याचं मन नसावं. आजीला त्याची दया आली. वाटलं, त्याच्या जवळ जाऊन बसावं, त्याला समजवावं. पुन्हा वाटलं, नको. एखाद्या लहान मुलाबरोबर गेल्यासारखी आपली आजी टपकली म्हणून आणखी फिरायचं डोकं नीहारचं. आजी स्वस्थ बसून राहिली, एका हातानं दुखरा पाय हलकेच चोळत !

स्पर्धा सुरू झाली. छान पाश्चात्य वेशात आलेल्या एका मुलीनं ऑपेरामधला काही भाग म्हणून दाखवला. अगदी नखशिखान्त वारकरी वाटावा असा एक मुलगा छानसं भजन म्हणून गेला. स्पर्धा रंगू लागली. एका उमेदवारानं 'गाणं आठवत नाही' म्हणून निम्म्यातच स्पर्धा सोडली. तर आणखी एकजण स्पर्धेचा कालावधी संपण्याची घंटा वाजल्यावरही गात बसला. अशा सगळ्या एकेकाच्या तऱ्हा. पण सगळेच अगदी *टिपटॉप,* सजूनधजून आलेले. मुली तर नटल्या होत्याच; पण मुलंही त्यांच्या फार मागे नव्हती. बघावं तिथे चकचकाट आणि झगमगाट. गात असताना आपापल्या विद्यार्थ्यांचे, अपत्यांचे मोबाईलवर फोटो घेण्याची मोठ्यांची लगबग. 'आपणही उगाच घरच्या साडीमध्ये इथे आलो की काय, जरासा वेळ घालवून चांगली साडी नेसायला हवी होती,' असा विचार आजीच्या मनात आला. तोच नीहारचं नाव पुकारलं गेलं आणि ती एकदम सावध झाली. जागीच ताठ बसून, मान लांबवून त्याच्याकडे बघायला लागली.

नीहार व्यासपीठावर गेला. त्यानं क्षणभर उभं राहून चौफेर नजर टाकली. हातानं झब्बा खाली ओढला तशी एकदम त्याची बटणपट्टी फाकली. बटण नसलेला मधला थोडा भाग उघडला. उघडाच राहिला. नीहारच्या ते लक्षात  आलं. क्षणभर तो बावरला. श्रोत्यांमधल्या मागच्या रांगेतल्या कोणीतरी पोरानं तोंडानं 'चुक् चुक् चुक्' असा आवाज काढला. हशा पिकला. नीहार आणखी गोंधळला. त्यानं झब्ब्याचं खालचं टोक एका हातात घट्ट धरलं. एकदा हात



**क्रांतिकारी शोध : लीझ माईटनर व ऑटो हान -** (१९३८)
अणूकेंद्र भंजनाचा शोध (Nuclear Fission)
**शुभेच्छुक – श्री. प्रकाश मुंढे, सांगली**

बदलला; एकदा टोक बदललं. तिकडे पेटीवाल्यानं दोन-तीनदा पेटीचा सूर लावला. थांबवला. हे असं फार वेळ अजिबातच चालणार नव्हतं. आजीनं क्षणभर चौफेर पाहिलं आणि बसल्याजागी उभं राहून मोठ्यांदा आवाज दिला.

''*कमॉन* नीहार... दणक्यात होऊन जाऊ दे. एकऽ दोनऽ तीन...'' असं म्हणताना तिनं उजव्या हाताचा अंगठा ऐटीत वर धरला आणि डोळ्यांनी *ऑल वेलचा* इशाराही केला. नीहारनं तिच्याकडे पाहिलं आणि 'तीन'चा उच्चार संपताच सुरुवात केली, ''जयोस्तुते श्री महन्मंगले....''

नीहारचा आवाज सभागृहभर घुमला. त्याच्यापुढे इतर आवाज विरले, पुसले गेले. पहिल्या ओळीनंतर नीहारचा गेलेला आत्मविश्वास परत आला, वाढलाही. गाणं त्याला पाठ होतंच. सूर लागला, साथ मिळाली; गाणं रंगू लागलं 'गालावरच्या कुसुमी किंवा कुसुमांच्या गालीऽ' या पुढच्या ओळी म्हणताना झब्ब्याच्या बटणावरचा त्याचा हात दूर झाला. 'मोक्ष, मुक्ती ही तुझीच रूपे तुलाच वेदांतीऽ' असं म्हणताना बटण, झब्बा विसरलं जाऊन तो अर्थानुसार हातवारे करू लागला. 'हे अधमरक्तरंजिते'....हा तुकडा म्हणताना तर त्याचा आवाज छप्पर फाडून गगनाला भिडला.

गाण संपलं, श्रोत्यांनी टाळ्यांचा गजर केला. तोवर आजी उभीच होती. मग मात्र, तिला एकदम दमल्यासारखं वाटलं आणि ती खाली बसली. अजून बरीच स्पर्धा उरलेली होती. तेवढा वेळ आपण इथे थांबू शकू असं तिला वाटेना. गर्दीत मागच्या मागे अंग काढून ती घरी परतली.

संध्याकाळी नीहार घरी आला तो ऐटबाज बक्षीस घेऊनच! आजीला त्याची कल्पना नव्हे, खात्रीच होती. आजीनं केलेला शिरा खाऊन झाल्यावर आजी हळूच म्हणाली, ''मग काय *एच.टी.,* झब्बा नीट नसूनही बक्षीस मिळालं, असं म्हटल्यावर काय वाटलं तुला?''

''ठीक आहे ग. *ऑपल्यॉलॉ त्यॉचं एवढं कॉही नव्हतंच...''*

''एवढं काही नव्हतं? मग एवढी चिडचिड का चालू होती?''

''कोणाची चिडचिड? शिरा घाल अजून.''

''मी नव्हते का त्रागा करत? शंभरदा बटणाच्या जागी हात फिरवत? तू नाही रेऽ ती मीच तर होते, पाय आपटत स्पर्धेला गेलेली...''

''कळलं बरं का ! तेव्हा जरा गेलेला माझा मूड. पण एकदा गाणं जमायला लागल्यावर काही आठवणच राहिली नाही त्या बटणाची... झब्ब्याची...कशाचीच.''

''तसंच असतं सोन्या. या सगळ्या वरवरच्या गोष्टी असतात. आपण उगाच त्यात फार अडकतो त्यामध्ये. तु सुद्धा घेतलास ना अनुभव; पण शेवटी माणसानं काय केलं, कसं केलं हेच पुरतं, उरतं, टिकतं... विचार कर''

''हं''

''एक नूर आदमी म्हणजे माणूस अव्वल, एक नंबरी हवा असंसुद्धा म्हणता येईल आपल्याला. तुझं गाणं छान झालं, त्यामुळे टाळ्या मिळाल्या; बक्षीस पटकावलं. खूप कडक सैनिकी वेशात येऊन, नेमका गाण्यात चुकला असतास, गाणं विसरला असतास तर काय झालं असतं? ...काय? पटतंय का मी म्हणते ते?''

यावर नीहार काही बोलला नाही. खाली मान घालून, मन लावून खात बसला. आजीनं कौतुकानं त्याच्या पाठीवर थोपटत म्हटलं, ''पोटात थोडी जागा शिल्लक ठेव बरं का *एच.टी !* रात्री डॅडीला सांगून मस्तपैकी आइस्क्रीम पार्टी वसूल करू. बक्षीस साजरं नको करायला ममा-डॅडींनी ? छानपैकी हॉटेलात जाऊ.

''बघू'' नीहार निरिच्छपणाचा आव आणून म्हणाला. जसा काही तो त्या गावचा नव्हताच. आजी उठली आणि आत जाऊ लागली.

''आत काय करायचं आहे?'' नीहारनं खुणेनं विचारलं.

आजी रुबाबात म्हणाली, ''सिल्कची साडी, *मॅचिंग* ब्लाउज सगळं बघून ठेवते वेळीच. रात्री पार्टीला जायचं ना? आम्हाला पण नटायला आवडतं बरं का? टिपटॉप नातवाची टापटिपीची आजी शोभायला नको...!''

**- मंगला गोडबोले**
*७, गीताली, पी.वाय.सी. कॉलनी,*
*जिमखाना रस्ता, पुणे - ४*

*चित्रकार : ऋजुता घाटे*

*सप्त सुरांना प्राप्त कराया, करू आज आराधना।*
*जीवन होई सफल, करून गीत-संगीत साधना।।*

**शुभेच्छुक - श्री. अतुल निवसरकर, पुणे**

# फुलदाणी



**साहित्य -** जुना वर्तमानपत्राचा कागद, फेव्हिकॉल, पाणी, फुगा, ग्लासच्या आकाराचा दिसणारा कोणताही प्लॅस्टिकचा दह्याचा / श्रीखंडाचा *पॅकेजिंगचा* डबा, कार्डशिट पेपर, रंग, पुठ्ठा, कटर

**कृती -** प्लास्टिकचा डबा किंवा कार्डशीटचा रोल बनवून त्याला पुठ्ठ्याचा बेस बनवून डब्याचा आकार तयार करून घ्या. अर्धा फुगा डब्याच्यावर राहील, अशा पद्धतीने डब्याच्या तोंडाशी घट्ट बसवून घ्या. आता जुन्या वर्तमानपत्राच्या १६ मि.मि. रुंदीच्या लांबट पट्ट्या हाताने फाडून घ्या. एका ताटलीत थोडे पाणी घालून फेव्हिकॉल पातळ करून घ्या. आता कागदाच्या पट्ट्या फेव्हिकॉलमध्ये बुडवून त्या डब्यावर व फुग्यावर चिकटवा. असे कागदी पट्ट्यांचे ४-५ थर चिकटवा. कागद पूर्ण वाळू द्या. आता डब्याच्या वर तयार झालेल्या गोलाकार भागावर मध्यभागी १.५ सेमी. त्रिज्येचे वर्तुळ काढा. कटरच्या मदतीने हा गोल कापा, आतील फुगा आता फुटलेला असेल, तो बाहेर काढून टाका. आता आपला डबा आणि त्यावरील घुमटाकार भाग एकसंध, कडक तयार झाला. कार्डशीटचा तिरक्या आकाराचा रोल करून लहान पेल्याचा आकार तयार करा. हा लहान पेला कापलेल्या वर्तुळात घट्ट बसवा. आता यावर वर्तमानपत्राच्या पट्ट्या वरीलप्रमाणे चिकटवा आणि पूर्ण वाळू द्या. ही तुमची फुलदाणी तयार झाली.









आता ही फुलदाणी तुमच्या आवडीप्रमाणे सजवा. यासाठी तुम्ही विविध रंग वापरून नक्षी काढू शकता किंवा रंगीत कागद चिकटवू शकता किंवा क्विलिंगचा वापर करूनही चिकटवू शकता, रांगोळी, दोरा, सुतळी , लोकर यांद्वारे ही फुलदाणी सजवता येईल.

**– रोहित कोकीळ**
*फ्लॅट नं. ५, प्लॉट नं. ३५०,*
*म्हसोबा चौकाजवळ,*
*दत्तवाडी, पुणे 411030*

**जरूर पाहा : भारतातील भौगोलिक आश्चर्य : लोणार तळे** (लोणार, जि. बुलढाणा)
उल्कापाताने तयार झालेले तळे.
**शुभेच्छुक – सौ. स्नेहा भंडारे, पुणे**

ललित

# आली दिवाळी दिवाळी...

डॉ. नीलिमा गुंडी



**बा**लवयात कानी पडलेल्या कवितांमधल्या दोन ओळी आजही आठवतात. त्या अशा

*'दिन दिन दिवाळी,*
*गाई म्हशी ओवाळी.'*

या ओळीतूनच कळतं की, दिवाळी हा कृषिसंस्कृतीशी निगडित सण आहे. सुगीचे दिवस आल्यामुळे, झालेली खुशी साजरी करायचा हा सण आहे. लहानपणापासून या सणामधले अनेक पैलू जाणवतात. त्यात निसर्ग-ऋतू यांची पार्श्वभूमी, (आश्विन महिन्याचे शेवटचे दोन दिवस आणि कार्तिक महिन्याचे पहिले दोन दिवस असा हा काळ), धनधान्य समृद्धीमुळे आलेली तृप्ती आणि नातेसंबंध राखण्याची वृत्ती हे ठळक पैलू आहेत.

**बाळ कोल्हटकरांच्या** एका नाट्यगीतात म्हटलंय,

*आली दिवाळी दिवाळी,*
*पहाटेच्या त्या अंघोळी।*
*घरोघरी जागविते,*
*माय मुले झोपलेली ।।*

पहाटे-पहाटे अभ्यंगस्नानाला उठण्यासाठी मुलांनीही तयार व्हावं,

*सणासुदींचे दिवस सांगती, महती गहिऱ्या नात्याची।*
*सृष्टी-मानव अतूट बंधन, गरज भासते जपण्याची ।।*

शुभेच्छुक - श्री. सुहास विष्णूपंत म्हसकर, पुणे

*दिवाळी – रंग, गंध, नाद, स्पर्श, रस अशा सर्व संवेदनांना सुखावणारा सण ! प्रकाशाचा, उत्साहाचा, आनंदाचा सण ! या दिवसात वातावरणात भरून राहणाऱ्या आनंदाने अनेक कवींना भुरळ घातली आणि त्या सुरावटीवर अनेक आनंदी गीतांची निर्मिती झाली. अशाच दिवाळीच्या संदर्भातील काही कवितांचा हा रसास्वादात्मक धावता परिचय !*

असं काय बरं असतं? एक म्हणजे भुईनळे, चंद्रज्योती, फुलबाज्या आणि दुसरे म्हणजे लाडू, चिवडा, करंज्या! या गमतीशीर अनुभवाबाबत एका बालगीतात मी लिहिलंय

*दिवाळीच्या दिवशी*
*अंगाला लावले उटणे*
*आणि कसे कोण जाणे*
*एकदम सुचले गाणे!*

कवी **माधवानुज** यांनी त्यांच्या 'दिवाळीचा सण' या कवितेत मुलांच्या नजरेतून दिवाळीचे वर्णन केले आहे. दिवाळीत नवे कपडे, खाऊ, रोषणाई आणि किल्ले या साऱ्या गोष्टींमधल्या आनंदाचं वर्णन करताना ते लिहितात.

*मौजेने न्हाऊ*
*कपाळी लाल गंध लावू ।*
*अलंकार लेवू*
*करूनी थाटमाट जेवू ।*
*लाडू,करंजी अन् शंकरपाळे*
*खाऊ कडबोळी ।*
*आली दीपवाळी !*

आधुनिक कवितेचे जनक असलेल्या **केशवसुतांची** - 'दिवाळी' ही कविता वीस कडव्यांची आहे. त्यात दिवाळीचं समग्र वर्णन येते. हिरवा शालू नेसलेली धरित्री, दिवाळीमुळे घरोघरी होणारी स्वच्छता, रोषणाई, खरेदी, रांगोळ्या, खमंग पदार्थ, लक्ष्मीपूजन, भाऊबीज, माहेरवाशिणींचा सण... हे सारे चित्र यात ठसठशीतपणे येते आणि मग कवी मिश्कीलपणे लिहितो,

*आता भार नसे कुणास, पण तो*
*शिंक्यास भारी असे!*
*हातां काम नसे, परंतु*
*पडते तोंडास ते फारसे!*
*कोणा मार नसे, तरी पण*
*शिरी तो सोंगट्यांच्या बसे !*
*कोणा त्रास नसे,*
*परंतु नयना तो जागरे होतसे!*

आज 'शिंके' म्हणजे काय? असा प्रश्न तुम्हाला पडेल ! पण पूर्वी दूध-दुभते मांजरापासून सुरक्षित राहाण्यासाठी शिंक्यात टांगून ठेवत. तेव्हा 'शिंक्यास (म्हणजे दोरीने विणलेल्या जाळ्यात) भार म्हणजेच समृद्धी' असा अर्थ येथे सुचवायचा आहे.

कवी *गोविंदाग्रजांना* दिवाळीतला पाडवा म्हणजे नव्या वर्षाचा (संवत्सराचा) दिवस विशेष भावतो. ते 'दिवाळी' या त्यांच्या कवितेत लिहितात,

*धडाधडा भोवती*
*तोच फटाके उडति*
*मी जागा होऊनि*
*पाहात बसलो पुढति।*
*तो कळे उगवला*
*आज दिवस वर्षाचा*
*वर्षाव जगावर*
*करीत जो हर्षाचा ।।*

जगण्याला नवी झळाळी देणाऱ्या या सणाविषयी ते लिहितात-

*या नव्या-जुन्याच्या*
*मंगल संगमकाली*
*जगी आनंदीआनंद*
*झूल जणू घाली*
*चहूकडे दिवे हे;*
*दिवेच वरती खाली*
*स्वर्गीय अग्नितेजाने*
*जगती न्हाली*

दिवाळी हा दिव्यांचा सण. हा सण भारतभर साजरा होतो. थंडी आणि काळोख या निसर्गाच्या दोन संवेदना या सणाला अधिक श्रीमंत करतात. त्या पार्श्वभूमीवर दिव्यांची आरास खुलते. *शांताराम आठवले* यांनी 'कुंकू' चित्रपटातील आपल्या 'अहा भारत विराजे' या गीतात दिव्यांचे सौंदर्यही वर्णन केले आहे. स्वर्गालाही कमीपणा वाटावा असे ते अलौकिक दृश्य-

*आली दिवाळी, भुवन उजळी,*
*आनंद घे अवतार*
*दीपक नभीचे भूवरी येती*
*दाविती शोभा अपार ।*
*मुदित हृदय जगती*
*करिती सकल जन विहार*
*माला तोरणे फुलांची,*
*वसने भूषणे जनांची*
*शोभा पाहुनी धरेची,*
*मनी स्वर्गही लाजे*

**जरूर पाहा : भारतातील भौगोलिक आश्चर्य : रांजण खळगे** (निघोज, जि. अहमदनगर)
काळ्या खडकांची नैसर्गिक कारणांनी झीज होऊन तयार झालेली खळगी
**शुभेच्छुक – सौ. मिहिका काळे, पुणे**

*अहा भारत विराजे,*
*जगा दीपवीत तेजे!'*

दिवाळी हा सण 'आनंदोत्सव' असतो, हेच खरे! हा आनंद लहान लहान कृतीतून व्यक्त होतो. सडासंमार्जन आणि रांगोळी हे स्वागताचे उपचार तर मनामनांत अवतार घेणाऱ्या आनंदासाठीच असतात. तसेच पतीने पत्नीला, भावाने बहिणीला दिलेली भेट ही त्या आनंदाचीच खूण असते. (हल्ली विवाहित बहिणीही भावाला भेट देतात. त्यांचा आनंद व्यक्त करण्यासाठी!)

आनंद ही गोष्ट अशी असते, जी 'अमोल' असते. **इंदिरा संतांच्या** 'अक्कूबक्कूची दिवाळी' या कवितेत गरीब घरातल्या मुलांच्या भावना व्यक्त झाल्या आहेत. तेही आपल्याकडचे वास्तव आहे.

अनंत काणेकरांच्या 'दिवाळी, तो आणि मी' या कवितेतही भोवतालच्या उत्साही वातावरणात एकाकी असणाऱ्या एका माणसाची व्यथा कवीनं हळुवारपणे टिपली आहे. म्हणूनच आपण या सणात सर्वांना सहभागी करायला हवे. आनंद हा दिवाळीचा प्राण आहे आणि आनंद ही एक मनोवृत्ती आहे. ती स्वीकारली की, दिवाळी साजरी करणे कोणालाही शक्य होते. म्हणूनच आपण सर्वांना दिवाळीची शुभेच्छापत्रे देतो!

खरे तर, आनंद हा स्वत:पुरता ठेवायचाच नसतो. दिव्याने दिवा पेटवावा, तसा एकाने दुसऱ्याला आनंद वाटायचा असतो. मग



दिवाळीचा सण अद्‌भुत- सर्वांना भारून टाकणारा होऊन जातो. कवयित्री **अरुणा ढेरे** यांनी 'यक्षरात्र' या कवितासंग्रहात म्हटले आहे की, वात्स्यायनाने दिवाळीला 'यक्षरात्र' म्हटले आहे. कारण त्या काळात रात्रींचा अंधार स्वत:च प्रकाशमान असतो. अशा काळातल्या सणांचे वर्णन करताना कवयित्री लिहिते.

*आता दिवाळीचा दिवा।*
*तिच्या लागेल दारात।।*
*आणि उजेड येईल।*
*थोडा माझ्याही घरात।।*

अशी ही दिवाळी ! एकीकडे रंग, गंध, नाद, स्पर्श, रस अशा पंचेंद्रियांचा उत्सव आणि दुसरीकडे भोवतालचा परिसर उजळण्याचा वसा! आनंदाची दिवेलागण करणारा हा सण म्हणूनच सगळ्या सणांचा मुकुटमणी ठरतो. कारण अंधाराला नाहीसा करणारा दिव्यांचा तो प्रकाश मनामनाला अंधारावर स्वप्ने रेखण्याची उमेद देतो.

**– डॉ. नीलिमा गुंडी**
*३, अन्नपूर्णा, १२५९, शुक्रवार पेठ, पुणे 411002*

*चित्रकार : सचिन जोशी*

*दीपावलीचा प्रकाश मनोमनी उजळावा।*
*स्नेहसमृद्धीचा तारा, क्षणोक्षणी तळपावा।।*
**शुभेच्छुक – श्री. आर टी. हांडे, पुणे**

कविता

# मी कुमार होतो



मी नागरिकाचा अर्थ समजूनी घेतो
मी कुमार होतो... ।।ध्रु.।।
मी लिहितो काही... कळतच नाही
मी बोलत काही... सुचतच नाही
मी मला पुस्तकांतून समजून घेतो
मी कुमार होतो... ।।१।।
मी चालत असता... वळतो
मी बदलीत रस्ता ... पळतो
मी धावत जाऊन आजीला वाचवतो
मी कुमार होतो... ।।२।।
मी रंगत जातो... रंगी नाहतो
मी पक्षी होतो... उडू पाहतो
मी उंच भरारी आकाशात घेतो
मी कुमार होतो...।।३।।
मी वाढत जाईन ... म्हणोत काही
मी असे जगावे ... म्हणो कुणीही
मी स्वच्छंदाचे स्वप्न जागवीत जातो
मी कुमार होतो...।।४।।
मी म्हणतो मित्रा... शतक पाहू या
मी निसर्ग जपतो... हरित होऊ या
मी आसमंत हा अवघा सुंदर करतो
मी कुमार होतो... ।।५।।
मी छात्र युगांचा... म्हणतो होईन
मी उघड्या डोळी ... जगास पाहीन
मी प्रबोधनाचे सुवर्ण अक्षर लिहितो
मी कुमार होतो... ।।६।।

- **किशोर पाठक**
गौतमाई, राधे रो-हाऊस, राजसारथीमागे,
इंदिरानगर, नाशिक - ९.

*चित्रकार : अंजली पुरंदरे*

**जरूर पाहा : भारतातील भौगोलिक आश्चर्य : गरम पाण्याचे झरे** (मनिकारन, हि. प्रदेश)
रेडिओ ॲक्टिव्ह लहरींमुळे तयार झालेले गरम पाण्याचे झरे.

**शुभेच्छुक – श्री. अमित शेंडे, सांगली**

# दगड

– श्रीनिवास शारंगपाणी

आपल्याला दगडाची यत्किंचितही किंमत नसते. एखाद्या मठ्ठ माणसाला आपण खुशाल 'दगडोबा' म्हणून मोकळे होतो. आपल्या दृष्टीनं दगड म्हणजे मूल्यहीन वस्तू आहे. पण गंमत पाहा. हाच दगड तहानलेल्या कावळ्याला किती उपयोगी पडला, ते आपल्याला लहानपणी वाचलेल्या गोष्टीतून माहीत झालेलं आहे.

दगड नसेल, तर आपण क्षणभरही जगू शकणार नाही. पृथ्वी दगडाचीच बनली आहे आणि तीच आपला आधारही आहे. आपण राहतो ते घरसुद्धा दगडाविना उभं राहू शकणार नाही. आपण पितो ते पाणी धरणात साठविलेलं किंवा विहिरीतून येतं आणि त्यांची बांधणी दगडाशिवाय अशक्य आहे.

पूर्वी म्हणे जेव्हा मुलं जन्मल्यानंतर लवकर मरण्याचं प्रमाण खूप होतं. तेव्हा दुष्ट शक्तीचं त्यांच्याकडे लक्ष जाऊ नये म्हणून त्यांची नावं दगडू, धोंडू किंवा दगडाबाई, धोंडाबाई अशी ठेवीत असत. अर्थात, आजही दगडे किंवा *Stone* अशी आडनावं आढळून येतातच. मौजेची गोष्ट ही की, जगाच्या इतिहासात सर्वांत बुद्धिमान समजल्या जाणाऱ्या *Einstein* च्या जर्मन नावाचं मराठीत भाषांतर केलं तर ते श्री. एकदगडे असं होईल कारण जर्मनमध्ये *ein* म्हणजे एक आणि *stein* म्हणजे चक्क दगड! पत्त्यांमध्ये जोकरला जे महत्त्व आहे; ते दगडाला काही देशी खेळांमध्ये आहे. कारण खेळाडूंची संख्या पूर्ण करण्यासाठी जो काल्पनिक सवंगडी घेतात त्याला 'दगड्या' असंच म्हणतात.



*शब्दांच्या काठावररुनी, शब्दांच्या देही जावे।*
*शब्दांमधले अप्रूप, शब्दांच्या ओठी यावे ।।*
शुभेच्छुक – श्रीमती विमल विनायक खरे, डोंबिवली

*With best compliments...*

**Envirotech**

*B. S. Joshi*

- Environmental Consultants
- NH Approach Permissions
- High Explosives Clearances
- Solutions to Revenue Matters

M-94/773, Swami Samarth Soc.,
Opp. Saubhagya Karyalaya,
Maharshinagar, Pune-37.
Phone : 020-24264685 Fax : 020-24264685
Mobile : 9422000890

*Don't limit your challenge*
*but challenge your limit.*

**YOGA**
**ENTERPRISES**

**Medical Equipments**
**Surgical Disposables**

1194/6, Jitendra Villa, off. Ghole Rd.
Nr. Ramchandra Sabha Mandap
Shivajinagar Pune-5
Tel. : (0) 25530063 / 64

*Happy Diwali*

**।।शुभ दीपावली।।**

घर असावे घरासारखे नकोत नुसत्या भिंती।
तिथे असावा प्रेम जिव्हाळा नकोत नुसती नाती।।

**Everything in Real Estate**

**परांजपे इस्टेट्स**

फ्लॅट नं-८, प्लॉट नं.१५,
युनायटेड वेस्टर्न को. ऑप. सोसा.,
कर्वेनगर, पुणे- ४११ ०५२.
फोन : २५४४८४२४, मोबाईल : ९८२२०९६५७०

**जरूर पाहा : भारतातील भौगोलिक आश्चर्य :** बॅरन आयलंड व्होल्कॅनो (अंदमान)
जिवंत ज्वालामुखीसाठी प्रसिद्ध

शुभेच्छुक - देव मेडिकल्स, पुणे

गणेश चतुर्थीला पूर्वी काही ठिकाणी 'दगडी चौथ' म्हणत कारण म्हणे त्या दिवशी चंद्र पाहणाऱ्या माणसावर चोरीचा आळ यायचा आणि लोक त्याला दगडांनी मारायचे. घाणेरडे काम करणाऱ्याचीसुद्धा पूर्वी 'दगडघाशा' अशी संभावना केली जात असे. दगडाला किती हीन मानलं जात होतं, हे यावरून दिसून येईल. कठीण गुणधर्माच्या वस्तूंनाही आपोआप दगडी सुपारी, दगडी लिंबू अशा उपाधी मिळाल्या.

कदाचित दगड खूप प्रमाणात मिळत असल्यामुळं त्याचं अवमूल्यन झालं असावं. जे दगड मौल्यवान असतात म्हणजे उदाहरणार्थ - ग्रॅनाइट किंवा संगमरवर; त्यांची नावं मुलांना ठेवलेली आढळून येत नाहीत. ग्रॅनाइटोबा किंवा संगमरवरीबाई अशी नावं काही ऐकिवात नाहीत.

दगड नसता तर सुंदर सुंदर मूर्ती आणि हो - ताजमहालासारख्या जगप्रसिद्ध रेखीव इमारती अथवा शत्रूंपासून संरक्षण करणारे अभेद्य किल्ले तयार झाले असते का? दगडामुळे किती गोष्टी साध्य होतात ते पाहा.

मी केरळमधल्या एका मंदिरात एकसारख्या आकाराचे काही दगडी खांब पाहिले. तिथल्या माहीतगार माणसाने प्रत्येक खांबावर हाताने थाप मारायला सांगितली. प्रत्येक खांबातून वेगवेगळ्या वाद्यांचा ध्वनी आला. दगडाची अशी किमया मी प्रथमच पाहिली.

पाटा आणि वरवंटा दगडापासूनच करतात आणि आपल्याला चटणीसारखे पदार्थ सेवन करायला मिळतात. मैलाचा दगड प्रवासातील प्रगती दाखवतोच; पण जीवनातल्या परिणामकारक घटनांनासुद्धा आपण मैलाचा दगड म्हणतो. 'एका दगडात दोन पक्षी', 'दगडापेक्षा वीट मऊ' अशा म्हणीदेखील आपल्याला दगडाचे गुणधर्म सांगतात. हृदय दगडासारखं असणं हे जसं मानसिक शक्तीचं द्योतक आहे; तसं भावनाशून्यतेचंही आहे. *'पत्थरके सनम'* किंवा *'पत्थरदिल है ये जगवाले'* ही गाणी हेच सुचवितात की नाही? दगडाला पाझर फुटतो हेही विसरून चालणार नाही. 'दगडावरची रेघ' किंवा 'काळ्या दगडावरची पांढरी रेघ' असा वाक्प्रचार रूढ झाला तो दगडाच्या शाश्वत रूपामुळेच. याच गुणामुळे शिल्पदेखील पाषाणापासून बनविण्यास सुरुवात झाली. डोंगर-गुहांमध्ये खोदलेली शिल्पे, आपण लेणी म्हणून पाहतो. ती तर हजारो वर्षे अबाधित राहतात कारण ती ऊन, वारा आणि पाऊस यांसारख्या नैसर्गिक बाधकांपासून अलिप्त असतात.

दगडाला पाषाण, धोंडा, फत्तर असे अनेक प्रतिशब्द आहेत. खुद्द दगड हा शब्द कानडी 'दक्कुड' (म्हणजे कठीण किंवा मजबूत) या विशेषणापासून तयार झालेला आहे, तर फत्तर हा अरबी भाषेतील 'पत्थर' या शब्दापासून अपभ्रंशित झाला आहे.

दगडाला वाङ्मयात कुठे ना कुठेतरी महत्त्व दिलं गेलं आहे हे बघून जरा बरं वाटतं. गोविंदाग्रजांनी महाराष्ट्राला 'दगडांच्या देशा' असं संबोधित केलं आहे ते उगीच का? पण सर्वांत मजेशीर उल्लेख आला आहे तो डेव्हिड लिव्हिंगस्टोन या सुप्रसिद्ध भौगोलिक संशोधकाच्या कबरीवरील फलकावर (epitaph)!

He needs no epitaph to guard a name
Which men shall prize
while worthy work is known;
He lived and died for good-be that his fame:
Let marble crumble; this is Living-stone.

(आपलं नाव राखण्यासाठी त्याला
स्मारक-फलकाची गरज नाही.
ज्याची अभिलाषा लोक
आपल्या कार्याची प्रसिद्धी व्हावी म्हणून धरतात
तो भल्यासाठी जगला आणि मेला
अशीच त्याची प्रसिद्धी होवो
मग संगमरवराचाही भुगा होऊ दे (कारण)
हा 'जीवित-पाषाण' आहे (Living-stone) आहे !)

**– श्रीनिवास शारंगपाणी**
*७१४/१ नारायण पेठ,*
*लक्ष्मी रस्ता, पुणे 411030*

*चित्रकार : सचिन जोशी*

*एका शब्दातून अनेक प्रतिमा उमटतील ।*
*अर्थाच्या अनेक लहरी मनामध्ये स्मरतील ।।*
**शुभेच्छुक – कु. शलाका बेलवलकर, सांगली**

# समस्या परिहार

लहानपणापासून वेगवेगळ्या समस्यांमधून आपण जात असतो; पण नेहमीच त्या आपल्याला दिसतात, समजतात असे नाही.

मोठ्या वयातही समस्येचं आकलन न होणं ही 'समस्या' असतेच. कधी तडजोड करण्याची वृत्ती, कधी 'चलता है' अशा वृत्तीतून येणारी असंतुष्टता, कधी समस्येपासून दूर पळणं... यामुळे येणाऱ्या समस्या दूर कराव्यात असंही वाटेनासं होतं. अशाप्रकारे आपल्या जाणिवा बोथट होऊ नयेत यासाठी समस्या परिहाराचा विचार करण्याची वृत्ती शालेय वयातच रुजायला हवी.

आपल्या व्यक्तिगत आयुष्यात तसंच सामाजिक जीवनातही अनेक समस्या येतात; येणार आहेत. त्यासाठी आपलं स्वत:चं व्यक्तिमत्त्व, भोवतालचा समाज, वस्तू, परिस्थिती, घटना यातील उणिवा, अडचणी– म्हणजेच समस्या ओळखता आल्या तर त्या दूर करण्यासाठी कोणकोणते उपाय करता येतील याचा विचार सुरू होतो. त्यातूनच पुढे नवनिर्मितीची, प्रतिभा विकसनाची प्रक्रिया सुरू होते.

जेव्हा समस्या चारी दिशांनी घेरून टाकते त्यावेळी वाट हरवल्यासारखी वाटते. मन हताश होतं. बुद्धी सबबी शोधू लागते... पण या सर्वांमागे 'खरी समस्या' कोणती याचा काव्यात्मक वेध घेतलाय रामभाऊ डिंबळे यांनी !

समस्या म्हणजे नेमकं काय, समस्या सोडवण्याचे तंत्र आणि मंत्र याची डॉ. उर्मिला सडोलीकर यांनी अतिशय सोप्या शब्दात, उदाहरणांच्या साहाय्याने मांडणी केली आहे.

केवळ साहसाने युद्धे जिंकता येत नाहीत. त्यातील समस्यांची, उपलब्ध साधनांची योग्य जाणीव असली तर आपल्या पराक्रमाने, कष्टाने व प्रतिभा वापरून युद्ध जिंकता येते. इतिहासातील अशी युद्धनाट्ये ही समस्या परिहाराची उत्तम उदाहरणे असतात. १९४७–४८ साली झालेल्या झोजिला खिंडीतील लढाईत भारतीय सैन्याने मिळवलेल्या विजयाची यशोगाथा राहुल कोकीळ यांनी शब्दबद्ध केली आहे.



एकदा समस्या ओळखता आली की, तिचे निवारण करताना येऊ शकणारे अडथळे विविध प्रकारचे असतात. कधी शारीरिक, कधी सामाजिक तर कधी भावनिक वा मानसिक ! समस्या सोडवताना संभाव्य अडथळे व त्यावर कशी मात करावी याची तंत्रशुद्ध मांडणी डॉ. वसुधा कुलकर्णी यांनी केली आहे.

समस्येचं उत्तर शोधताना कल्पनाशक्तीचा वापर, समस्येच्या मूळाशी जाणं, उत्तराच्या दिशेने योग्य प्रवास करणं यातून समस्या तर सुटतेच व काही नवनिर्माणाची शक्यता निर्माण होते; याचं अतिशय लालित्यपूर्ण विवेचन म्हणजे मल्हार अरणकल्ले यांचा 'उत्तरांची दिशा' हा लेख!

एकूण, तुमच्या समोरच्या समस्या सोडवण्याचा तुम्ही डोळसपणाने प्रयत्न करावा, हा या लेखांमागचा हेतू ! दिवाळी अंकानंतरदेखील प्रत्येक महिन्याला छात्र प्रबोधनमध्ये ही लेखमाला चालूच राहील. जरूर वाचा... अन् कृतीही करा.



**जरूर पाहा : भारतातील भौगोलिक आश्चर्य : लवणस्तंभ** (वडगावदर्या, जि. अहमदनगर)
कॅल्शियमचे क्षार विरघळलेले पाण्याचे थेंब साठून त्याच्या कांड्या तयार झाल्या आहेत.

शुभेच्छुक – कु. अनुजा कुलकर्णी, सांगली

# हिच खरी समस्या...!!

आसमंत भरता अपयश भय चिंतांनी
संघर्ष शिगेला पेच चहू अंगांनी
कोठूनहि उपाय निघतच नाही
तेव्हाच आतली जिद्द उफाळुन येई
कमकुवतच केवळ परिस्थितीचा बंदी
जेवढी समस्या कठिण तेवढी संधी ।।१ ।।

जाहलो निरुत्तर सुचतच नाही काही
मी अथक प्रयत्नांनीही तरलो नाही
जे ठाउक होते तितुके केले यत्न
या रुळल्या वाटे गवसत नाही रत्न
या चाकोरीचा आडसर तोडून जाई
जर जुनी समस्या, तोड नवी फलदायी ।।२ ।।

मी अपुरा, दुबळा म्हणून अपयश येते
की बलाढ्य स्पर्धा म्हणून हातचे जाते
असहाय एकटा मित्रहीन एकाकी
की कुवतीपेक्षा झेप थोरली माझी
मी स्थगित, पुराणा, आहे तितुका राहे
ना वाढ, न शिक्षण ही समस्या आहे ।।३ ।।

**– रामचंद्र डिंबळे**
*१०६, शुक्रतारा अपार्टमेंट,*
*सिंहगड रस्ता, पुणे 411030*



*चित्रकार : अंजली पुरंदरे*

*With Best Compliment from*
**Hydrolinks**
*Care is to express and not to impress people.*
*When care is expressed truly*
*people will be automatically impressed*

*प्रबोधनाचे गीत आज हे, मुक्त स्वरांनी गाऊ।*
*पिढ्यापिढ्यांची दृढ चाकोरी, ओलांडूनिया जाऊ।।*

**शुभेच्छुक – श्रीमती अश्विनी साने, डोंबिवली**

## दीपस्तंभ... शिक्षणातील दुसरी क्रांती... गुणवत्तेची!

**१२ वी नंतर ३ वर्षांचे अभ्यासक्रम**

- **ॲडमिनीस्ट्रेटीव्ह लिडरशीप कोर्स** (२०१४ पासून सुरु)
  पदवी + UPSC, MPSC परीक्षा अभ्यासक्रम + नेतृत्व विकसन
- **पॉलीटिकल लिडरशीप कोर्स** (२०१५ पासून)
  राजकारणात करिअर करु इच्छिनाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पदवी + १५ विविध विषयांचा अभ्यास + फिल्ड वर्क + नेतृत्व विकसन
- **एज्युकेशनल लिडरशीप कोर्स** (२०१५ पासून)
  पदवी + शिक्षणक्षेत्रासाठी आवश्यक वृत्ती, कौशल्य व ज्ञान यावर आधारीत कृतीशील अभ्यासक्रम + नेतृत्व विकसन
- जागा - प्रत्येकी ६०, प्रवेश परीक्षा - मे व जुन

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र**
UPSC, MPSC, PSI/STI/Asst, Banking, D.Ed.-CET व इतर
- २० जिल्ह्यातून विद्यार्थी
- ४५०+ विद्यार्थी अधिकारी पदावर

**दीपस्तंभ आत्मविश्वास व प्रेरणा वाचन अभियान**
शालेय स्तरातील विद्यार्थी व शिक्षकांमध्ये वाचन संस्कार रुजविण्यासाठी महाराष्ट्रातील सर्वात मोठा उपक्रम.
- आजपर्यंत ८०,०००+ विद्यार्थी, पालक व शिक्षकांचा सहभाग

**दीपस्तंभ स्पर्धा परीक्षा शिष्यवृत्ती अभियान २०१४**
- २०० गरीब व होतकरु पदवीधर तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना नि:शुल्क स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, निवास व भोजन.
  परीक्षा फॉर्म सर्व महाविद्यालयात तसेच दीपस्तंभ येथे उपलब्ध.
  अंतिम मुदत : दि.१० नोव्हे. २०१४ संपर्क : ८२३७५०९८३९, ०२५७-२२४२२९९ www.deepstambh.org
- **विनम्र आवाहन :** २०० गरीब व होतकरु पदवीधर विद्यार्थ्यांच्या नि:शुल्क प्रशिक्षण, निवास, भोजनासाठी वसतिगृह प्रकल्पाचे बांधकाम सुरु करण्यात आले आहे. सामाजिक जबाबदारीचे भान असणाऱ्या नागरिकांनी यासाठी आर्थिक योगदान देण्याचे विनम्र आवाहन.

**दीपस्तंभ प्रकाशन**
- स्पर्धा परीक्षा तसेच शैक्षणिक २५ पुस्तकांचे प्रकाशन
- सर्वाधिक खपाचा विक्रम करणारी १० पुस्तके

**विविध उपक्रम**
- शिक्षक प्रशिक्षण, पालक प्रबोधन, करीअर कौन्सिलींग, व्यक्तिमत्त्व विकास, ग्रामिण ग्रंथालय.

मुख्य कार्यालय : 42, हौसिंग सोसा; सहयोग क्रिटीकल हॉस्पि. जवळ, जळगाव.
फोन : 0257-2242299, 99 22 00 4191

सामाहीक शाखा व उपक्रम : धुळे, नंदूरबार, बारामती, आनंदवन (वरोरा), बहादरपूर, पिंपळनेर, अहमदनगर, नागपूर, चोपडा.



चांगला माणुस व चांगले नेतृत्व घडविणारी संस्था

दीपस्तंभ®

www.deepstambh.org




**जरूर पाहा : भारतातील भौगोलिक आश्चर्य : गुळंचवाडीचा शिलासेतू** (गुळंचवाडी, जि. पुणे)
दरीतून वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाने अग्निजन्य खडकात दगडी कमान निर्माण झाली आहे.

**शुभेच्छुक – श्री. अरविंद मेढेकर, ठाणे**

# समस्या आणि समस्या-परिहार

- डॉ. उर्मिला सडोलीकर

लहानपणापासून आपण तहानलेल्या कावळ्याची गोष्ट ऐकत आलो आहोत.

पण मध्यंतरी मी एक जाहिरात पाहिली. त्यात एका चित्रात कावळा चोचीने खडे आणून पाण्याच्या भांड्यात टाकताना तर दुसऱ्या चित्रात तो *'स्ट्रॉ'ने* तळाशी गेलेले पाणी शांतपणे पिताना दाखवला होता. स्ट्रॉ हा आपण *स्मार्ट* पर्याय म्हणू शकतो. कारण उपलब्ध आधुनिक साधने आणि वेळेची बचत या दोन्ही गोष्टी कावळ्याने विचारात घेतल्या होत्या.

या कावळ्याच्या गोष्टीतून आपल्याला समस्या व समस्या-परिहार या संकल्पना समजतील. कावळ्याला तहान भागवण्यासाठी पाणी समोर दिसतं, पण... ते कसं मिळवायचं हे समजत नाही ही समस्या झाली. त्याप्रमाणे, ध्येय समोर दिसत असतं; पण ते मिळवायचं कसं हे समजत नाही; तेव्हा समस्या निर्माण होते. उदा. परीक्षेत यश मिळवायचं हे माहीत असतं; पण 'कसं' ते कळत नाही. तेव्हा परीक्षा हीच मोठ्ठी समस्या वाटू लागते, मित्र-मैत्रिणींशी बोलून गैरसमज दूर करायचा हे कळते; पण संवाद कसा साधायचा हे कळत नाही... ही झाली समस्या!

समस्या निर्माण झाल्यावर त्यासाठी जी उपाययोजना केली जाते, त्यास **समस्या-परिहार** असं म्हणतात. जसं गोष्टीतल्या कावळ्याला पाणी खूप खाली आहे, असं कळल्यावर, तो त्यात एक-एक खडा टाकत राहिला. पाण्याची पातळी आवश्यक तेवढी वर आल्यावर पाणी प्यायला. त्या कावळ्याचा समस्या-परिहार झाला !

आपण अनेकदा वाचतो, की समस्येकडे संधी म्हणून पाहा वगैरे वगैरे. हे सारे ऐकायला, बोलायला, वाचायला खूप छान वाटतं; पण प्रत्यक्ष समस्या समोर आल्यावर मात्र आपले हातपाय गळतात... असं का होतं?

त्यासाठी आपण समस्येकडे पाहाण्याचा आपला दृष्टिकोन तपासायला हवा. आपल्याला जेव्हा समस्येचा मोठेपणा अन् आपल्यातला कमीपणा भासतो तेव्हा समस्या अधिक बिकट वाटू लागते. समस्येकडे पाहाण्याचा हा नकारात्मक दृष्टिकोन बदला. तो सकारात्मक करा.

त्यासाठी तुम्हाला जाणवलेली एखादी समस्या आठवा. उदा. अभ्यासाची चांगली तयारी करूनही परीक्षेत ऐनवेळी आठवतच नाही. आता या समस्येवर तुम्ही शोधलेला उपाय कोणता? तर तुम्ही तुमचे उजळणीचे तंत्र बदलले. त्याचा



*तसे पाहिले तर, गोष्ट साधीच असते ।*
*तरीही जिवाला तिचे, फार अप्रूप वाटते ।।*

**शुभेच्छुक - श्री. अनिरुद्ध साने, पुणे**

तुम्हाला परीक्षेच्यावेळी चांगला उपयोग झाला.

थोडक्यात, तुमच्या क्षमता, कौशल्ये तुम्हाला कशामुळे कळली? समस्येला सामोरं गेल्यामुळेच ना! यासाठी समस्येकडे तुम्ही 'स्वतःला ओळखण्याची संधी' म्हणून पाहा. तुमच्याकडे खूप क्षमता आहेत, त्यांचे अशा प्रसंगी प्रकटीकरण होऊ द्या. त्यामुळे सक्षमता, स्वावलंबन, स्व-आदराची भावना अशा कितीतरी गोष्टींचा समस्या परिहाराबरोबर तुम्हाला अगदी सहजपणे लाभ होईल. समस्येची सोडवणूक करणं, त्यास सामोरं जाणं हे आपल्यातले एक सुप्त कौशल्य आहे. हे कौशल्य दृढ करण्यासाठी नवनवीन अनुभव घेत राहाणं, आव्हानं स्वीकारत राहणं, परिस्थितीला सामोरं जात राहणं आणि या सगळ्यांतून स्वतःमधील क्षमता ओळखत राहणं, त्यांचा विकास करत राहणं अत्यंत महत्त्वाचं असतं. हे सर्व आपल्याच हातात असतं अन् ते आपल्यालाच करावं लागतं.

आता तुम्ही एक प्रयोग करून पाहा. दिवसाच्या शेवटी... आज कोणते नवीन प्रसंग जाणवले? किती प्रसंगांना सामोरं गेलात? किती प्रसंगांतून पळ काढण्याचा प्रयत्न केला? कोणत्या समस्या सोडवताना यश मिळाले? का? अपयश आले असल्यास, का? त्याच्या नोंदी ठेवा. काही दिवस ह्या नोंदी सातत्यानं करत राहा. एकत्रित नोंदी वाचून मग परिस्थिती कशी हाताळायला हवी होती, ते तुमच्याही लक्षात येईल.

गणितं किंवा कोडी सोडवण्याच्या जशा काही पद्धती असतात, काही तंत्रं असतात तशाच समस्या सोडवण्याच्याही काही पद्धती, तंत्रं आहेत. त्यांचा आपण विचार करू या-

**समस्या सोडविण्याचे तंत्र आणि मंत्र -**

**१. प्रयत्न - प्रमाद** : एखाद्या प्रश्नाचे उत्तर शोधताना विविध मार्गांनी प्रयत्न करायचे. चुका झाल्यास, पुन्हा वेगळ्या मार्गाने प्रयत्न करायचा. असे करताकरता कधीतरी उत्तर मिळून जाते. पुढच्या वेळी तशीच समस्या आल्यास कोणतेही इतर मार्ग न अवलंबता आपण 'त्यावेळी योग्य ठरलेला' मार्गच अवलंबतो. उदा. कुलूप नवीन असेल तर किल्ल्यांच्या जुडग्यातून आपण त्याची किल्ली कशी ओळखतो?

**२. मर्मदृष्टी** : कधीकधी परिस्थितीचे नीट निरीक्षण करून त्यातील मर्म लक्षात घेतले जाते. उदा. कोव्हर या मानस-शास्त्रज्ञांनी सुलतान नावाच्या माकडावर प्रयोग केला. एका पिंजऱ्यात सुलतानला ठेवले अन् हात पोहोचणार नाही अशा तऱ्हेनं पिंजऱ्याच्या छताच्या मध्यभागी केळी टांगली. सुलतान क्षणभर हात पुढे करून थांबला अन् एकदम काहीतरी सुचल्यासारखे त्याने पिंजऱ्यात पडलेली खोकी एकावर एक रचली; त्यावर चढला अन् केळी मिळवली.

**३. यांत्रिक पद्धत** : गणिते सोडवताना नेमक्या चिन्हांचा वापर करणे. त्यानुसारच उत्तरं देणं.

**४. अलगोल तंत्र** : विविध पर्यायांचा स्वैरपणे शोध घेणे. उदा. जसं आपली एखादी वस्तू सापडत नसेल तर वेगवेगळ्या ठिकाणी आपण त्याचा शोध घेतो.

**५. नवगामी तंत्र** : यात नवीन पद्धतीचा वापर केला जातो. उदा. घरात मोबाईल सापडत नसेल तर दुसऱ्याच्या फोनवरून आपल्या नंबरला फोन लावणे.

समस्या सोडवण्याचे एक छान तंत्र आहे. समस्या जाणवल्याबरोबर मनात एक प्रश्नचिन्ह उभं राहातं. 'आता काय?' 'कसे?' '?' या चिन्हातूनच आपण उत्तराचे टप्पेही पाहू या.

**समस्या सोडविण्याचे टप्पे -**

**१. समस्येचे आकलन** : समस्या नेमकी काय आहे? ती का/कोणत्या परिस्थितीत निर्माण झाली? तिचे स्वरूप कसे? हे समजून घेताना समस्येच्या कारणाच्या मुळापर्यंत






सेंट्रल पेन्शनवर मोफत सल्ला (सायंकाळी)
दूरभाष - २४४५१३१९
**वार्षिक पान प्रायोजक – श्री. शैलेंद्र केशव म्हसकर,** पुरोहित, ज्ञान प्रबोधिनी , पुणे

जाण्याचा प्रयत्न करावा.

**२. नियोजन :** कोणत्या मार्गाने समस्या सोडवू शकतो? त्याचे मार्ग मनात आखावेत.

**३. तर काय होईल? :** एकेका मार्गाचा अवलंब केल्यास काय होईल? कोणते संभाव्य परिणाम होऊ शकतील याचा विचार करायचा.

**४. करून पाहा :** ज्या मार्गाचा विचार केला तो एक-एक मार्ग प्रत्यक्ष अवलंबून पाहायचा आणि कोणता मार्ग कामी येतो, ते पाहायचे.

**५. यशापयश जोखणे :** आपला मार्ग योग्य ठरला तर समस्या सुटली! अन्यथा परत दुसऱ्या टप्प्यावर जायचे आणि दुसरा मार्ग निवडायचा.

आपल्या कोणत्याही समस्येचा या टप्प्यांनी विचार करा. समस्या सोडवताना काय मजा येते आणि समस्या परिहारातून मिळणारा कार्यनिष्पत्तीचा काय अनुभव असतो, हे ज्याचे त्यानेच अनुभवावे!

काही समस्या सोप्या असतात; तशाच काही अवघडही असतात. अवघड समस्यांसाठी दीर्घ काळ जावा लागतो. उदा. उद्ध्वस्त कुटुंब, जवळच्या व्यक्तीचा मृत्यू, आर्थिक समस्या, पूर, भूकंप यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे उद्ध्वस्त झालेले आयुष्य, दीर्घ आजार, या आणि अशा कितीतरी...! समस्या कोणतीही असो त्यातून बाहेर पडायचा मार्गच नाही असं कधीच होत नाही. त्यासाठी मनाची तयारी मात्र हवी. समस्येला सामोरं कसं जायचं? अपयशात स्वतःला सावरायचं कसं? कधी झपाटल्यासारखे प्रयत्न करायचे? कधी थांबायचं? काय सोडायचं? हे सारे धडे प्रत्येक परिस्थितीतून जातानाच घेण्याचं कौशल्य तुम्ही संपादन करा.

**– डॉ. उर्मिला सडोलीकर**
*ए-३, सोबा गार्डन, ५४/८ महात्मा सोसायटी, कोथरुड, पुणे 411038*



# 'झोजिला'चे युद्धनाट्य !

*– राहुल कोकीळ*

"Yes...!" "We will take tanks up to Zoji La" जनरल थिमय्यांचं हे वाक्य बैठकीत शांतता निर्माण करून गेलं. भारताचे तत्कालीन संरक्षणमंत्री बलदेवसिंह, पंतप्रधान पंडित नेहरू, सैन्यप्रमुख फिल्ड मार्शल करिअप्पा, गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल आणि अनेक महत्त्वाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मेजर जनरल थिमय्या झोजिला खिंड जिंकण्यासाठीची योजना मांडत होते.

गेले अनेक दिवस झोजिला हा काश्मिर युद्धातला एक चिघळणारा प्रश्न बनत चालला होता. लवकरात लवकर झोजिला खिंड जिंकणं, हे काश्मिरच्या सुरक्षेसाठी आवश्यक होतं. यासाठीच बोलावलेल्या महत्त्वाच्या बैठकीत झोजिला खिंडीत रणगाडे वापरण्याच्या योजनेला राजकीय नेतृत्वाची परवानगी मिळावी म्हणून जनरल थिमय्या बोलत होते. सगळ्यांच्या मनात एकच प्रश्न होता रणगाडा १३,००० फूट उंचीवर, तोही हिवाळ्यात हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरांमध्ये अन् नेणार कसा? अनेकांच्या मनातला हा 'पण' लक्षात घेऊन प्रश्नाच्या गांभीर्याची व माणसांची नेमकी जाण असलेल्या सरदार पटेलांनी शांतताभंग केला, पटेलांचे शब्द होते, "This military man, Thimayya knows his job very well. Then why are we discussing this..." सरदार पटेल यांनी निर्णायक शब्दांत थिमय्यांच्या योजनेपेक्षाही त्यांच्या कर्तृत्वावर अधिक विश्वास दाखवला. बैठक संपली. योजना मंजूर झाली. जनरल थिमय्या

*दया मरगळ झटकून, दिशांना दाही।*
*हा काळोखाचा रस्ता, अपुला नाही।।*
**शुभेच्छुक – श्री. धनंजय भट, डोंबिवली**




**जरूर पाहा : भारतातील भौगोलिक आश्चर्य : मॅग्नेटीक हिल ऑफ लडाख** - (लेह, काश्मिर)

चुंबकीय गुणधर्म असणारे डोंगर

**शुभेच्छुक – श्री. आशिश फडके, पुणे** – कै. अविनाश रघुनाथ फडके स्मरणार्थ




आपल्या सहकाऱ्यांसमवेत दिल्लीवरून श्रीनगरला जायला निघाले. भारतीय इतिहासात एका नव्या साहसाच्या अध्यायाची सुरुवात होत होती.

असा कोणता गंभीर प्रश्न होता ज्यामुळे सगळेजण काळजीत होते? हे समजून घ्यायला आपल्याला एक वर्ष मागे जावं लागेल.

१९४७ सालचा ऑक्टोबर महिना; स्वातंत्र्य मिळून फक्त दोन महिने होण्याच्या आत युद्धाला सुरुवात झाली. पाकिस्तानने आपले सैन्य आणि टोळीवाले यांना काश्मिरमध्ये घुसवलं (२२ ऑक्टोबर). जम्मू व काश्मिर हे संस्थान जनतेची आणि नेत्यांची इच्छा नसताना पाकिस्तानला जोडायचं हा मुख्य हेतू. टोळीवाले व सैन्य फक्त काश्मिरचा भूभाग जिंकून थांबले नव्हते तर त्यांनी काश्मीरमध्ये जाळपोळ, लुटालूट आणि अत्याचारांचं सत्र सुरू केलं. फक्त बारामुल्लामध्ये काही हजार लोकांची हत्या झाली. काश्मिरचे राजा हरिसिंह यांनी भारतात विलीन व्हायचं ठरवलं. विलीनीकरणाच्या करारनाम्यावर सह्या झाल्या (२६ ऑक्टोबर). आता भारतापुढे एक मोठं आव्हान उभं राहिलं, ते म्हणजे जम्मू व काश्मिरमध्ये सैन्य पोहोचवण्याचं. १९४७ साली काश्मीर खोऱ्यात जाणारे सर्व रस्ते पाकिस्तानमधून जाणारे होते. पाकिस्तानी सैन्य पुढे सरकत होतं. अन् भारतीय सैन्याला त्यांना रोखण्यासाठी काश्मिरमध्ये पोहोचण्यासाठी फारच कमी अवधी होता. सरदार वल्लभभाई पटेल व सैन्यप्रमुख करिअप्पा यांनी निर्णय घेतला हवाईमार्गे मदत पोहोचवण्याचा. परंतु नुकत्याच स्वतंत्र झालेल्या भारताकडे कोणतीही सुसज्ज विमानं नव्हती... चांगल्या रडार यंत्रणा नव्हत्या... श्रीनगरला विमानासाठी चांगली धावपट्टी नव्हती... वाटेत येणाऱ्या बर्फाच्छादित पर्वतरांगा ओलांडून जाण्यासाठी वातावरण चांगलं नव्हतं... जमेची बाजू एवढीच की, आमच्याकडे माणसं होती. स्वप्नं बघणारी आणि ते सत्यात उतरवण्यासाठी कोणत्याही समस्यांना तोंड देणारी...

दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिशांनी वापरलेले 'डॅकोटा' नावाचे विमान भारतीय हवाई दलाने १९४७ साली काश्मिरमध्ये वापरायचं ठरलं; पण पुरेशा संख्येत भारतीय हवाई दलाकडे ही विमानं उपलब्ध नव्हती. शेवटी काही विमानं खासगी कंपन्यांकडून भाडेतत्त्वावर घेण्यात आली. सगळी तजवीज होऊन श्रीनगरच्या हवाई धावपट्टीवर भारतीय सैन्याची विमानं उतरायला सुरुवात झाली. पहिलं विमान उतरवण्यापूर्वी वैमानिकाला श्रीनगरच्या धावपट्टीबद्दल माहीत नव्हतं; तिथे बर्फ साचलं आहे का? तिथपर्यंत घुसखोर पोहोचले आहेत का? अर्थात जिवावर उदार होऊन केलेले *लॅण्डिग* यशस्वी झाले. तो दिवस होता २७ ऑक्टोबर १९४७ ! म्हणजे विलीनीकरणाचा तह झाल्यावर दोन दिवसांत भारतीय सैन्य श्रीनगरमध्ये उतरायला सुरुवात झाली होती. अजून धोका पुरता टळला नव्हता. पाकिस्तानी

*निश्चय, निष्ठा, श्रम, विद्या यांचेल, कंकण बांधून हाती।*
*व्रतस्थ होऊनी व्यापू आम्ही, विश्वाच्याही मिती।।*

**शुभेच्छुक – श्री. शरद श्रीपाद पालकर, पुणे**






सैन्यदेखील श्रीनगरमध्ये पोहोचले आणि भारतीय सैन्य श्रीनगरमध्ये पोहोचू नये म्हणून त्यांनी हवाईतळ ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. भारत-पाकिस्तान यांच्या पहिल्या लढाईतल्या धुमश्चक्रीला सुरुवात झाली. युद्धातील एका निर्णायक टप्प्यावर भारतीय सैन्य होते. श्रीनगरची धावपट्टी राखू शकलो तर काश्मिर व लेह राखता येईल, असं सरळसरळ गणित होतं.

पहिल्या काही तासांतली लढाई पुढचा रंग ठरवणार होती. पाकिस्तानच्या सैन्याचा जोर वाढत चालला होता. पुढचे काही तास शत्रूला कोणत्याही परिस्थितीत रोखायचं ही अटकळ बांधून लेफ्टनंट कर्नल रणजीत राय व मेजर सोमनाथ शर्मा आपल्या एक शीख आणि चार कुमाऊं या रेजिमेंटसह कामाला लागले. श्रीनगरच्या हवाईपट्टीपासून काही अंतरावर संरक्षणरेषा मजबूत केली गेली. छोटे व तात्पुरते उभारलेले *बंकर्स, मॉर्टर* (छोट्या तोफा) *मशीनगन* यांसह भारतीय जवान लढत होते. कॅ. सोमनाथ शर्मा शत्रूच्या हालचालींनुसार आपल्या हल्ल्याची दिशा ठरवत होते. भारतीय विमानांचं धावपट्टीवर अव्याहत *लँडिंग* चालू होतं. वेळ पुढे सरकत होती तशी येणारी नवीन कुमक भारतीय सैन्याचं बळ वाढवत होती. काही तास निघून गेले. पुरेसं सैन्य पोहोचलं, आता हवाईपट्टी निर्धोक झाली असं वाटत असताना कॅ. सोमनाथ शर्मा यांच्या समोर एक छोटा तोफगोळा पडला आणि त्यांना हौतात्म्य आलं. स्वतंत्र भारताचे सर्वोच्च सन्मानाचे परमवीर चक्र हे पदक त्यांना मरणोत्तर बहाल करण्यात आले.

भारतीय सैन्याने श्रीनगरमध्ये प्रवेश मिळवला; पण समस्या येथे थांबत नाही. काश्मिरच्या उर्वरित भागातून पाकिस्तानी सैन्याला मागे रेटणं महत्त्वाचं होतं. १९४७च्या ऑक्टोबरपासून जम्मू व काश्मिरच्या वेगवेगळ्या भागांत यासाठी मोहिमा चालू झाल्या होत्या; त्यात हळूहळू यशही मिळत गेलं. पण पाकिस्तानने जिंकलेल्या या प्रदेशापैकी सैन्य आणि सुरक्षा या गोष्टींचा विचार करता धोरणात्मकदृष्ट्या सर्वांत महत्त्वाची होती, ती झोजिला खिंड !!

जम्मू व काश्मिर या राज्याचे पाच महत्त्वाचे भाग पडतात. सगळ्यात दक्षिणेकडे असलेले जम्मू खोरे, त्याहून उत्तरेकडे असलेले काश्मिर खोरे, काश्मिर खोऱ्याच्या पूर्व दिशेला असलेले लेह व लडाख, सगळ्यात उत्तर-पश्चिमेला असलेले गिलगीट व स्कर्दू आणि सगळ्यात उत्तर पूर्वेला असलेला निर्मनुष्य भाग अक्साई - चीन (नकाशात दाखवल्याप्रमाणे).

१९४७ साली पाकिस्तानचा हल्ला मुख्यत: तीन आघाड्यांवर झाला. पहिली आघाडी गिलगीट व स्कर्दू, दुसरी आघाडी डोमेल बारामुल्ला श्रीनगर आणि तिसरी आघाडी राजौरी - पूंछ. यातील गिलगीट व स्कर्दूवर पाकिस्तानने पूर्ण वर्चस्व मिळवले. राजौरी - पूंछ भागातून पाकिस्तानी मागे लोटले गेले होते. श्रीनगर-बारामुल्ला येथील भागही भारतीय सैन्याने आपल्या नियंत्रणाखाली आणला. परंतु गिलगीटमधून येणाऱ्या पाकिस्तानी सैन्याने झोजिला खिंड ताब्यात घेतली. झोजिला खिंड हा श्रीनगरकडून जसा लेह-लडाखकडे जाणारा एकमेव रस्ता होता. तसाच पाकिस्तानसाठी तो काश्मीर व लेहवर वर्चस्व ठेवण्यासाठीचा एक मार्ग होता. ज्याच्या ताब्यात झोजिला खिंड त्याचे श्रीनगर व लेह-लडाखवर वर्चस्व राहणार होते. आजही लेह-लडाख आणि सियाचीनकडे जाणारा एकमेव रस्ता, राष्ट्रीय महामार्ग १-अ हा झोजिला खिंडीतून जातो.

धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या या ठिकाणावर



**जरूर पाहा : भारतातील भौगोलिक आश्चर्य :** नॅशनल फॉसिल वुड पार्क -(तिरुवक्कराय, तमिळनाडू)
शेकडो वर्षांपूर्वीच्या लाकडी बुंध्यांचे अश्मीभूत अवशेष

**शुभेच्छुक – श्री. विश्वास प्रभाकर हर्षे, पुणे**

ताबा मिळवण्यासाठी भारताचे प्रयत्न चालू होते; पण हल्ल्यांना फारसे यश मिळाले नाही. कारण शत्रू उंचावर होता. लढाईच्या शास्त्रानुसार उंचावर असलेल्या शत्रूचा पराभव करणे अवघड असते. शत्रू आपल्या सर्व हालचाली टिपू शकतो. झोजिला खिंडीतही हेच झालं होतं. पाकिस्तानी सैन्याचं बळ हे उंचावर असलेल्या ठिकाणामुळे होतं. पाकिस्तानी सैन्यावर अनेक हल्ले केले गेले; पण भारताला त्यात फारसे यश मिळाले नाही. म्हणूनच मेजर जनरल थिमय्या वेगळा उपाय मांडत होते. तो झोजिला खिंडीत रणगाडे नेण्याचा! सैन्यात यावर बरीच चर्चा झाली. आजपर्यंत जगाच्या इतिहासात रणगाडा हे शस्त्र एवढ्या उंचीवर कोणीही वापरलं नव्हतं. रणगाडाच कशासाठी? भारताकडे तेव्हाही अनेक छोट्या तोफा, चिलखती गाड्या (armoured vehicle) अशी मारा करू शकणारी काही शस्त्रं होती; पण सरळ रेषेत मारा करून नेमकं लक्ष्य भेदण्याची क्षमता रणगाड्यातच असते. भारतीय सैन्याकडे त्यावेळी दुसऱ्या महायुद्धात वापरले गेलेले 'स्ट्यूअर्ट' बनावटीचे रणगाडे होते. हे 'स्ट्यूअर्ट' रणगाडे वापरण्याचा निर्णय झाला आणि त्याला मंत्रिमंडळाची मान्यताही मिळाली.



एखादी समस्या सुटली तर नवीन समस्या पुढे उभी राहत होती. शस्त्रं ठरलं; पण त्यासाठी रस्ते, युद्धभूमी हे काहीच अनुकूल नव्हतं. झोजिला खिंड बालाथल या ठिकाणापासून सुरू होते. श्रीनगर ते बालाथल हे अंतर जवळजवळ १०० कि.मी. या रस्त्यावर अनेक पूल होते. पण यातील काही पुलांची क्षमता रणगाड्यांचं वजन पेलण्याइतकी नव्हती. बालाथलपर्यंत रस्ता तरी होता. त्यापुढे मात्र, रणगाडा नेण्याजोगा रस्ता तयार करावा लागणार होता. ७ कॅव्हलरीचे प्रमुख कर्नल राजिंदरसिंह यांनी बालाथलपर्यंत रणगाडे नेण्याची जबाबदारी घेतली. राजिंदरसिंह हे एक धडाडीचे अधिकारी म्हणून प्रसिद्ध होते. कोणत्याही समस्येला थेट भिडणं हा त्यांचा स्वभाव होता. बालाथलपर्यंत रणगाडे नेण्यासाठी राजिंदरसिंह यांनी रणगाड्याचे काही भाग सुटे करायचं ठरवलं. त्यानुसार रणगाड्यावर बसवलेली *टरेट* आणि *गन* (फिरणारी तोफ) वेगळी काढण्यात आली आणि अन्य वाहनांमधून रणगाड्याची तोफ व टरेट वाहून नेण्यात आले. बालाथलजवळ हे सुटे भाग जोडून परत रणगाडा सुसज्ज करण्यात आला.

बालाथल ते झोजिला, रणगाडा जाऊ शकेल असा रस्ता तयार नव्हता. मद्रास सॅपर्स या सैन्याच्या तांत्रिक काम करणाऱ्या कंपनीने हा रस्ता करायला सुरुवात केली. मेजर थांगाराजू या अधिकाऱ्याने याची अंमलबजावणी सुरू केली. एका बाजूला कडा व दुसऱ्या बाजूला असलेल्या खोल दरीतून रस्ता तयार करायचा होता. हिवाळा सुरू होताच शत्रू खिंड अडवून वर उभा होता. अन् बालाथल ते झोजिला ७ किलोमीटर अंतराच्या रस्त्याचे काम वेगात चालू होते. वर असलेल्या शत्रूला त्याचा फारसा सुगावा लागू नये अशी रस्त्याची आखणी व रचना होती. रणगाडे बालाथलपर्यंत आले. रस्त्याचं काम तीन आठवड्यांच्या आत पूर्ण झालं. नंतर मेजर थांगाराजू यांना या कामगिरीसाठी परमवीर चक्र बहाल केलं गेलं. हल्ल्याची तारीख ठरली २७ ऑक्टोबर! सैन्याला सुसज्जतेचे आदेश देण्यात आले. २७ तारखेला हवामान खूप खराब होते. त्यामुळे १ नोव्हेंबर हा हल्ल्याच्या चढाईचा दिवस ठरला. हवामान तरीही फारसे अनुकूल नव्हते; बालाथलला स्वत: जनरल थिमय्या हजर होते; पण आता वाट पाहाण्यास वेळ नव्हता. भारत सरकार काश्मिर प्रश्न राष्ट्रसंघात नेण्याच्या बेतात होते. त्यापूर्वी श्रीनगर आणि लेह-लडाख निर्धोक करण्यासाठी झोजिला खिंड ताब्यात घेणं महत्त्वाचं होतं. मेजर जनरल थिमय्यांना दिसत होतं, 'आता नाही तर कधीच नाही'; साहजिकच हवामानामुळे माघार न घेता थिमय्यांनी हल्ला करण्याचा निर्णय घेतला.

*अनंत अमुची ध्येयासक्ती, अनंत अन् आशा।*
*गिरिशिखरा तुला पामराला ।।*

**शुभेच्छुक – श्री. प्रमोद चिंतामण पेठे, पुणे – २९**

Action is the foundational key to success.

*Happy Diwali !*

**Swastik Oil Products Mfg. Co. Navsari.**

*Manufacturers of:*
GLYCOL ETHERS, OTHER ETHOXYLATES &
HYDRAULIC BRAKE FLUID HEAVY DUTY DOT-3. DOT-4
& DOT-5 IMPORTERS & EXPORTERS

MUMBAI OFFICE : HIRJI GOVINDJI COMPOUND, TOKARSHI JIVRAJ RD.,
SEWREE. MUMBAI - 400015.
NAVSARI OFFICE : 2/810, HAEGOVAN MARG, NAVSARI, GUJRAT-396445.

*Happy Diwali*

**Anupam Enterprises**

Manufacturers of VSAT Antenna Mounts,
Transformer / Machinery Spares, Fabrications

Office and Works
B-25, Salim Compound,
Marol Naka, Andheri (East), Mumbai - 400 059.
(M) 9820104492, Email : anuengin@rediffmail.com



**जरूर पाहा : भारतातील भौगोलिक आश्चर्य : बामणघळ -** (हेदवी, जि. रत्नागिरी)
पाण्याच्या प्रवाहाने निर्माण झालेली खडकामधील मोठी भेग

**शुभेच्छुक – कॅ. चंद्रशेखर चितळे, पुणे** –उठा, जागे व्हा, आपल्या ध्येयाप्रत पाहोचेपर्यंत थांबू नका

भारतीय रणगाडे झोजिला खिंडीपुढे सरकायला लागले. रणगाडे पुढे आणि त्यामागे पायदळाचे सैनिक अशी आगेकूच सुरू झाली.

आता सैन्याला झोजिला तर जिंकायची होतीच; पण त्यापुढे लेह-लडाखही मोकळं करायची गरज होती. पहिल्या काही अंतरापर्यंतची सैन्याची चढाई पाकिस्तानच्या नजरेत नव्हती. खिंडीच्या एका टप्प्यावर भारतीय सैन्याच्या आघाडीवर पाकिस्तानी *बंकर्समधून* हल्ला सुरू झाला. भारतीय रणगाड्यांची तोफ धडधडायला लागली. झोजिला खिंड रणगाड्याच्या आवाजाने दणाणून गेली. या साध्या तोफा नाहीत, हे पाकिस्तानी सैन्याच्या लक्षात आलं. भारतीय सैन्य रणगाडे झोजिलात आणू शकतील याची पकिस्तानी सैन्याला बिलकूल अपेक्षा नव्हती. रणगाड्यावर हल्ला करता येईल यासाठी पाकिस्तानी सैन्य सुसज्ज नव्हते. पाकिस्तानी नेतृत्वाचाही यावर विश्वास बसणं शक्य नव्हतं. पाकिस्तानी सैन्याचं मनोधैर्य खचू लागलं.

कारण भारतीय सैन्यानं अशक्य ते शक्य करून दाखवलं होतं. आता झोजिलातून पाकिस्तानला माघार घेण्यावाचून पर्याय उरला नाही. थिमय्यांनी भारतीय सैन्याला शिथिल न पडू देता आगेकूच करण्याची आज्ञा दिली. झोजिला खिंडीतून पुढे सरकत द्रास, कारगिलवर ताबा मिळवत दि. २४ नोव्हेंबर रोजी भारतीय सैन्य लेहला पोहोचले. त्यानंतर केवळ ८ दिवसांनी म्हणजे १ जानेवारी १९४९ रोजी भारत-पाकिस्तान यांच्यातील या युद्धावर संयुक्त राष्ट्रसंघ या जागतिक संघटनेकडून युद्धबंदी जाहीर केली गेली.

१९४७-४८ साली झालेल्या या युद्धात भारतीय सैन्याने पराक्रम गाजवला. पण केवळ साहसाने युद्ध जिंकता येत नाहीत. त्याबरोबर समस्येची, साधनांची योग्य जाण असावी लागते, तरच त्यावर वेगळा काहीतरी उपाय काढणे शक्य होते. खरंतर स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्या वर्षात भारतीय सैन्याकडे अत्यंत कमी साधने होती. शत्रूपेक्षा भारतीय सैन्याचे भौगोलिक स्थान अत्यंत दुबळं होतं. प्रत्येक समस्या ही अशक्य कोटीतली होती. जगाने अशक्य ठरवलेल्या अनेक गोष्टी भारतीय सैन्याने शक्य केल्या.

भारतीय सैन्य नेतृत्वाला, यातल्या एखाद्या क्षणी समस्या उग्र आहेत म्हणून माघारीची भूमिका घेता आली नसती का? त्याबद्दल त्यांना कोणी दोष दिला असता का? नाही. नक्कीच नाही. जरा विचार करू या! भारतीय सैन्याने संपर्क यंत्रणा व धावपट्टीची खात्री नसताना विमाने उतरवली, झोझिला खिंडीतल्या बर्फात माणूस जगू शकेल का नाही अशी परिस्थिती असताना हल्ला केला. या सगळ्यांमध्ये ध्येयनिष्ठा होती. म्हणजे सोप्या शब्दांत नेमकं काय घडवून आणायचं हे माहीत होतंच; पण त्याचबरोबर ते कशासाठी घडवायचं आहे याचीही चांगली जाण होती. यातूनच समस्येशी संघर्ष करण्यातला हट्ट तयार झाला व त्यातूनच प्रयत्नांची पराकाष्ठा झाली. पण नुसतं समस्यांशी सर्व ताकदीनिशी भिडून चालत नाही. १९४७-४८ साली विमान नसताना युद्धासाठी विमाने भाड्याने घेतली, रणगाड्यासारखे सपाट मैदानातले शस्त्र हे १३००० फूटावर चढवले, त्यासाठी रस्ता तयार केला. म्हणजे नवीन प्रकारच्या समस्या सोडवण्यासाठी नवीन पद्धती व नवीन साधने तयार करावी लागतात. वरील सर्व उदाहरणांमधली ध्येयनिष्ठा, देशनिष्ठा अथवा देशभक्ती मनामध्ये असावी लागते. त्या ध्येयनिष्ठेच्या हट्टातूनच तयार झालेली कल्पकताही या सर्व रणनितीमध्ये दिसून येते.

जी गोष्ट या मोठ्या उदाहरणाबद्दल तीच आपल्या नेहमीच्या जगण्यावागण्यातल्या समस्येला तोंड देतानाची. काय करायचं याचा स्वत:शी आग्रह असला की, प्रयत्नातून पर्याय तयार होतात अन् आपण समस्यांचं भांडवल न करता पर्याय राबवायला सुरुवातही करून टाकतो. नाहीतर मग 'आम्हाला हे करायचं होतं; पण... अमुकतमुक नव्हतं ना!' असे संवाद ऐकायला मिळतात. आपण असं कारण सांगणारे पलायनवादी होऊ नये यासाठी सर्व प्रकारच्या अशक्य समस्या आपल्या पराक्रमाने, कष्टाने व प्रतिभा वापरून सोडवायच्या असतात, हा धडा भारतीय सैन्याने स्वातंत्र्याच्या उष:काली दिला.

**– राहुल कोकीळ**
rahulkokil@gmail.com

*आकाशाकडे डोळे लावले, तर उत्तुंगाची जाणीव होईल।*
*उंच उंच होत गेले, तर क्षितिज विस्तारत जाईल ।।*
**शुभेच्छुक – श्री. रमाकांत शिवनारायण भुतडा, पुणे** – वाचाल तर वाचाल.

*With best compliments from ...*

# CUBE POWER CARE PVT. LTD.

15, MUKTANGAN COMMERCIAL COMPLEX
OPP. SARANG SOCIETY
SAHAKARNAGAR NO. 2, PUNE 411009
TELE/FAX : 91 20 2422 44 45, 2422 29 20
EMAIL : CUBEGEN@DATAONE.IN




**Service Offered :**

♦ Latest Hair Cuts & Styling ♦ Purming, Straitening, Rebounding, Smoothing
♦ Global Colouring & Highlighting ♦ Body Massage, Body Spa, Hair Spa
♦ Ear Piercing ♦ Skin Peeling, Lighting, Whitening & All Skin Treatment

*Timings : 10 A.M. to 7 P.M. Sunday Closed. Only open every month last Sunday*
Shop No. 4 & 5, Govind Smruti , Ashok Chakravarti Road,
Kandivli (E), Mumbai - 400 101, PARLOUR : 022 2887 7237


**जरूर पाहा : भारतातील भौगोलिक आश्चर्य : बोरा गुहा -** (विशाखापट्टनम्, आंध्रप्रदेश)
कॅल्शियम कार्बोनेट (चुनखडी) चा थर जमा होऊन गुहेमध्ये शंकूचे आकार तयार झाले आहेत.

**शुभेच्छुक – श्री. नितीन पटवर्धन, पुणे**



# समस्या परिहारातील अडथळे

डॉ. वसुधा कुलकर्णी

काही वेळेस विद्यार्थ्यांना ध्येय अथवा उद्दिष्ट ज्ञात असते, पण त्याच्यापर्यंत पोहोचण्याचा मार्ग माहीत नसतो. कधी कधी तो मार्ग गोंधळात टाकणारासुद्धा असतो. अशा अनेक समस्या यशाचा मार्ग रोखत असतात. प्रतिमा, संकल्पना आणि पूर्वानुभवांच्या आधारे मानसिक पातळीवर उत्तर शोधण्याचा विद्यार्थी प्रयत्न करतच असतात. पण मार्गातील अनेक प्रकारचे अडथळे, समस्या सोडविण्याचा मार्ग सातत्याने रोखत असतात. हे अडथळे शारीरिक, सामाजिक, भावनिक अथवा मानसिक अशा अनेक प्रकारचे असतात.

आजारी, अशक्त, शारीरिक अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासात अनेक अडथळे येतात; पण जिद्द व परिश्रमाने त्यावर मात करता येते.

बऱ्याच मुलांना लहान वयापासूनच सामाजिक जाण असते. आश्विन हा त्यातलाच एक! बसने शाळेला जाताना, सिग्नलच्या चौकात खेळणी विकणाऱ्या छोट्या अनाथ मुलांसाठी काहीतरी करावे, असे त्याला मनापासून वाटते. समाजकार्य करण्याची त्याची ही ऊर्मी त्याच्या आई-बाबांना अजिबात पसंत नाही. आता आश्विनने फक्त अभ्यासच करायला हवा, असा त्यांचा हट्ट ! म्हणूनच आश्विनला ते विरोध करतात. किशोरवयीन मुलांच्या ध्येयपूर्तीपुढील हा सामाजिक अडथळाच म्हणावा लागेल.

समस्या सोडविताना भावनांच्या आहारी जाणाऱ्या मुलांच्या बाबतीत काही अडचणी निर्माण होतात त्यांच्यातील भावनिकता, भावनांच्या आहारी जाण्यामुळे येणारा मनाचा कमकुवतपणा हा तर्कशुद्ध विचार करण्यात अडथळे निर्माण करतो.

समस्या परिहारातील सर्वांत मोठे अडथळे हे मानसशास्त्रीय असतात. त्यांची आपण विस्ताराने चर्चा करूया.

समस्या सोडविताना विद्यार्थी ज्यावेळी स्वत:तील क्षमता, श्रद्धा, विश्वास यांवर मर्यादा घालून घेतात तेव्हाच उद्दिष्टांपर्यंत जाण्यात अडथळे निर्माण होतात. मनाची जडण-घडण अशी तयार होते की, काही वेळा आत्मविश्वासही डळमळू लागतो आणि अडथळे पार करताना कार्यक्षमतेचा कस लागतो. विद्यार्थ्यांपुढे येणारे मानसशास्त्रीय अडथळे सामान्यत: पाच प्रकारचे असतात.

**१) ठामपणाबाबतचा पूर्वग्रह (Conformation bias)** : शास्त्रीय पद्धतीत मांडलेली अनुमाने पूर्णपणे सत्यतेवर आधारलेली, शास्त्रीय निरीक्षणांवर आणि प्रायोगिक तत्त्वांवर प्रमाणित केलेली अशी असतात. तथापि विद्यार्थी अजाणतेपणे शास्त्रीय पद्धत



*आज पडे हे, पाऊल पहिले, यशोपथाच्या वरती।*
*वाट चालणे जलद गतीने, सातत्याने पुढती।।*

**शुभेच्छुक – श्री. अभय कुलकर्णी, डोंबिवली**

न वापरता चुकीच्या पद्धतीने जातात. उदाहरणार्थ, समस्येचे नेमके स्वरूप लक्षात आल्यावर त्याविषयीची माहिती औपचारिक आणि अनौपचारिक पद्धतीने गोळा करतात. परंतु शास्त्रीय पद्धत वापरून समस्येचे उत्तर शोधताना, आपल्याला अपेक्षित असे उत्तरच, समस्येचे उत्तर असेल अशी काळजी ते घेतात. अशा उत्तरांना अर्थातच शास्त्रीय बैठक तर नसतेच; त्यामुळे त्यांची वैधता आणि विश्वसनीयताही कमी होते. *फिजिक्स, केमेस्ट्रीची* प्रात्यक्षिके करताना विद्यार्थ्यांना प्रयोगाची फलिते काय येणे अपेक्षित आहे हे माहीत असल्याने तशाच पद्धतीने ते प्रयोग करतात. वस्तुतः ही स्वतःची शुद्ध फसवणूक आहे. स्पर्धेच्या जगात अशाप्रकारे ठामपणाबाबतचा आपला पूर्वग्रह - 'मी केलेले आहे तेच बरोबर.' असं म्हणणं हे फार काळ टिकून राहणार नाही. त्याचे परिणाम विद्यार्थ्याला नंतरच्या आयुष्यात भोगावे लागतील. त्यामुळे समस्या सोडविताना व्यक्तिगत ठामपणा बाजूला ठेवून शास्त्रीय पद्धतीनेच समस्या सोडवायची असते हे विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवायला हवे.

**२) मानसिकता (Mental set)** : अब्राहम ल्युचिन्स यांनी १९४० मध्ये ही संकल्पना मांडली. मानसिकता म्हणजे मनाची विशिष्ट अशी धारणा.

मानसिकता व्यक्तीला विशिष्ट चाकोरीबद्ध विचार करायला भाग पाडते. अशी व्यक्ती मग अधिक व्यापक, वेगळा विचार करूच शकत नाही.

पूर्वी समस्या सोडविताना ज्या पायऱ्या योग्य आणि यशस्वी ठरल्या, त्याच आताही पुनःपुन्हा वापरण्याची व्यक्तीची मनोधारणा तयार होते.

उदा. अजय नववीमध्ये शिकणारा हुशार मुलगा. पण गणिते सोडविताना तो गोंधळून जायचा. उदा. अंकगणितातील उदाहरणसंग्रह सोडविताना तो खूश असायचा कारण एकदा त्या गणिताची पद्धत कळली की, उरलेली सर्व गणिते भराभर सोडविता यायची. मात्र, गणिताची मांडणी अगर भाषा बदलली की, तीच गणिते अजयला अवघड वाटायची. त्याची नेहमीची सराव पद्धत वेगळ्या स्वरूपाच्या गणितांसाठी उपयुक्त ठरत नसे.

याचाच अर्थ असा की, विशिष्ट स्वरूपाच्या बऱ्याच समस्या जर लागोपाठ सोडविल्या तर सवयीमुळे एक विशिष्ट अशी मानसिकता तयार होते. मनाच्या अशा धारणेचा अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम समस्या सोडविताना होतो. म्हणजेच एकाच प्रकारच्या समस्येसाठी मानसिकता अनुकूल ठरते तर वेगळ्या पद्धतीच्या समस्या सोडविताना अडचणी येतात. मानसिकता किंवा विशिष्ट अशी मनोधारणा विद्यार्थ्यांच्या संवेदनांवरही परिणाम करते. त्यानुसारच समस्येकडे पाहिले जाते व समस्या सोडविण्यासाठी त्याच नियमांचा उपयोग केला जातो.

या दोषावर मात करायची झाल्यास विद्यार्थ्यांनी एकदिशीय विचार बाजूला ठेवून समस्या सोडविण्यासाठी बहुदिशीय विचारांचा, अनेकविध पर्यायांचा अथवा मार्गांचा अवलंब करायला शिकले पाहिजे.

**३) चाकोरीबद्ध विचार (Functional fixedness)** : नम्रताची १०वीची परीक्षा जवळ आली होती. प्रश्नोत्तरांचा अभ्यास पूर्ण झाला; आता आकृत्या काढण्याचा सराव करायचा होता. आकृत्या काढण्यासाठी पट्टीची आवश्यकता होती. पण पट्टी कुठे सापडेना. नम्रताची चिडचिड सुरू झाली. वास्तविक पाहता नम्रताच्या कंपासपेटीत दोन पेन्सिली होत्या. त्यांपैकी एका पेन्सिलीचा पट्टीसारखा उपयोग करून ती आकृत्या काढू शकली असती. तथापि विशिष्ट वस्तूचा विशिष्ट पारंपरिक वापर करण्याची एक मानवी वृत्ती असते. त्या वस्तूचा उपयोग इतरही अनेक प्रकारांनी करता येतो याचा विचारच तिच्या डोक्यात आला नाही. जसे चमच्याचा उपयोग खाण्यासाठी तर होतोच; पण त्याचा मागील भाग स्क्रू-ड्रायव्हर म्हणूनही वापरता येतो. पण व्यक्ती जेव्हा फक्त चाकोरीबद्ध विचार करते तेव्हा तिच्यात जी मानसिकता आढळते त्याला 'कार्यात्मक ताठरता' म्हणतात. दैनंदिन जीवनातही अशा व्यक्ती अगदी चाकोरीबद्धपणे वागतात. वेगळ्या, नावीन्यपूर्ण कल्पना त्यांच्या डोक्यात येतच नाहीत. शैक्षणिक क्षेत्रात अशी कार्यात्मक ताठरता अधिक आढळते.

विद्यार्थी जीवनात याचे दुष्परिणाम भोगावे



**जरूर पाहा: भारतातील भौगोलिक आश्चर्य : कॉलम्नार बेसाल्टिक लाव्हा -** (सेंट मेरीज आयलंड, कर्नाटक)
बेसाल्टीक लाव्हारसाने तयार झालेले स्तंभ

**शुभेच्छुक - श्री. सचिन प्रमोद सहस्रबुद्धे, पुणे**

लागतात. विद्यार्थ्यांची विचारसरणी अधिकाधिक संकुचित होत जाते. विविध संकल्पना शिकताना हे विशेषत्वाने जाणवते. दुसरे असे की, विशिष्ट पद्धतीनेच विचार करण्याची सवय लागल्याने समस्या सोडविण्यास वेळ तर लागतोच; पण प्रयत्नही जास्त प्रमाणात करावे लागतात. आंतरदृष्टी विकसित न झाल्याने योग्य उत्तराच्या दिशेने जाण्याची वाट रोखली जाते.

**४) अनावश्यक दडपण (Unnecessary constraints)** : समस्या 'आ' वासून समोर उभी ठाकली की, नकळतपणे मनावर एक प्रकारचा ताण येतो. ताणाखाली काम करत असताना व्यक्ती स्वत:वर निष्कारण काही बंधने घालून घेते. विशेषत: विद्यार्थी जेव्हा एकाच पर्यायाला चिकटून राहातात आणि फिरूनफिरून परत त्याच त्या चुकीच्या उत्तरापाशी येतात; तेव्हा हे दडपण अधिकच वाढत जाते. एखादी समस्या जेव्हा गटाला दिली जाते, तेव्हा गटातील विद्यार्थीही एकाच प्रकारे विचार करताना आढळल्यास समस्येच्या उत्तरासाठी तीच ती प्रतिक्रिया आणि त्याच त्या चुकीच्या निर्णयाप्रत येण्याची समूहवृत्तीही आढळते.

समस्या सोडविताना विशिष्ट आंतरदृष्टी निर्माण झाली की, 'आ हा!' ही उत्स्फूर्त प्रतिक्रिया बाहेर पडून दडपण क्षणातच नाहीसे होईल. भूमितीच्या समस्या सोडविताना असे अनावश्यक दडपण येणे आणि तत्त्वांच्या आधारे समस्या सुटली की, 'आहा!' ही प्रतिक्रिया असा अनुभव विद्यार्थ्यांना नेहमीच येतो. मात्र, त्यासाठी आंतरदृष्टी विकसित करणे गरजेचे आहे.

**५) असंबंधित माहिती (Irrelevant information) -** बऱ्याच वेळा समस्या सोडविण्याच्या दृष्टीने उपलब्ध असलेली माहिती चुकीची, फुटकळ किंवा असंबंधित असते. तिचा समस्या सोडविण्यासाठी काहीच उपयोग होत नाही. किंबहुना सोपी समस्या कठीण वाटू लागते. चुकीची, दिशाभूल करणारी माहिती समस्येचे स्वरूप अधिकच क्लिष्ट करते. यासाठी उपलब्ध माहितीची नीट शहानिशा करणे गरजेचे आहे हे विद्यार्थ्यांनी ध्यानात घ्यावे.

याव्यतिरिक्त काही विद्यार्थी समस्या सोडवायला नाखूषच असतात. खरेतर त्यांना समस्या सोडवायचीच नसते. असे म्हणून प्रयत्नच करत नाहीत. तर काही विद्यार्थी इतरांनाच दोषी ठरवितात. उदा. शिक्षकांनी नीट शिकवले नाही, ऐन परीक्षेच्या वेळी पाहुणे आले; म्हणून मला चांगले गुण मिळण्यात अडचणी आल्या.

वरील सर्व मुद्द्यांच्याआधारे अडथळ्यांची शर्यत पार करून उद्भवलेल्या समस्येवर मात करा. आणि यशस्वी व्हा. यासाठी तुम्हाला शुभेच्छा!


**– डॉ. वसुधा कुलकर्णी**

*१०१/ए २, धवलगिरी, रामबाग कॉलनी, एमआयटी कॉलेज रस्ता, कोथरूड, पुणे 411038.*


***चित्रकार : अंजली पुरंदरे***








*ज्ञानपालखी उचला, चला निघायाचे आहे ।*
*नवे प्रश्न, नव्या समस्या, खूप शिकायचे आहे ।।*

**शुभेच्छुक – कु. मुक्ता अभिजीत साठे, खारघर, मुंबई**

**PAN INDIA - FULL SERVICE - GLOBAL LOGISTICS**
**A.T.C. (CLEARING & SHIPPING) PVT. LTD.**

**Corporate Office :** 901 Peninsula Towers, Ganpatrao Kadam Marg,
Lower Parel (West), Mumbai-400 013. India,
Tel : 91-22-6651 3000 (1000 Lines) Fax : 91-22-6654 1556 / 57,
Email:atc@atc.co.in/www.atc.co.in

# A.T.C. GROUP AT A GLANCE

**20 Offices In 15 Indian Cities**
**One Overseas Office - Dallas, U.S.A.**
**Group Staff Strength : 300 + Employees**
**Established : 1957**

## SALIENT FEATURES

- Licensed Custom House Agent
- IATA Air Cargo Agent
- ICEGATE Registered
- FMC (USA) Registered NVOCC & OTI
- On the Approved List of Leading Banks
- Licensed Multimodal Transport Operator
- Custom Approved Air & Ocean Consolidator
- Advance Manifest Filing
- Joint Stock Company With All Working Directors
- Illustratious Clientele

## REPERTOIRE OF SERVICES

- Custom House Agent
- International Freight Forwarder
- NVOCC : Service Contracts - Rate Agreements
- Over Dimension Cargo
- Road Transport / Own Trucks
- Forklift & Crane Hire
- Air Cargo Agent
- Groupage / Consolidation : Air - Sea
- MTO : DDP / DDU
- Warehousing & Distribution
- Packing & Palletisation
- FCL Consolidation For Single Supplier

## Branch Offices

**Pune I - City, Pune II - Pimpri, Panvel, Nashik, Aurangabad, Ahmedabad, New Delhi, Chennai, Kolkata, Bengaluru, Indore, Tuticorin & Gandhidham**

# GLOBAL LOGISTICS SOLUTIONS

**अभिमानास्पद : रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते भारतीय**
**विनोबा भावे** (१९५८) - सामाजिक नेतृत्व

**शुभेच्छुक - डॉ. संदीप श्रोत्री, सातारा**



# उत्तरांची दिशा

मल्हार अरणकल्ले

'तुम्ही मला प्रश्न सांगा, मी त्यांची उत्तरं देतो,' अशा शीर्षकाची जाहिरात वाचून मी काहीसा हबकलो. चौकशी केल्यावर समजलं ती एका कार्यशाळेची जाहिरात होती. प्रश्न कसे सोडवावेत, उत्तराच्या दिशेनं कसं जावं, हे तिथं शिकवणार होते. कितीतरी छोटे-मोठे प्रश्न रोज आपला पराभव करीत असतात. हा अनुभव जमेला धरून म्हटलं, 'ही संधी उत्तम आहे'! म्हणून तातडीनं कार्यशाळेत नाव नोंदवलं. 'प्रश्नांची उत्तरं शोधण्याची जादूची कांडी' हस्तगत करण्याच्या ओढीनं ठरलेल्या दिवशी कार्यशाळेसाठी हजर झालो. तिथं आलेल्या सगळ्यांच्याच चेहऱ्यावर केवळ उत्सुकता आणि अधीरता यांचंच अस्तित्व. प्रत्येक खुर्चीत जणू आश्चर्याचा पूर दाटून आलेला.

परस्पर परिचय झाला. प्रास्ताविकात कार्यशाळेचा उद्देश सांगितला गेला. प्रशिक्षक थेट विषयाकडे वळलं. तीन ओळींत प्रत्येकी तीन बिंदू याप्रमाणं त्यांनी नऊ बिंदू काढले. हे सगळे बिंदू रेषांनी जोडायचे होते, त्यासाठी काही अटी होत्या. रेषा काढताना पेन-पेन्सिल उचलायची नाही, सगळे बिंदू चारच रेषांत जोडायचे, रेषा छेदू शकता; पण त्याच रेषेवरून मागं फिरायचं नाही.




प्रशिक्षकांनी स्वतःच एक प्रयत्न करून दाखवला. टोकाचे चार बिंदू जोडून त्यांनी एक चौरसाकृती आखली. चार रेषांची अट पूर्ण झाली; पण एक बिंदू जोडायचा राहिला.

आता आमचे प्रयत्न वेगवेगळे आकार घेऊ लागले. उभ्या, आडव्या, तिरप्या रेषांना धरून कल्पनाशक्ती धावू लागली. कुणाचा एक बिंदू बाजूला राहिला. कुणाला दोन बिंदूंनी चुकवलं; तर कुणाला रिकाम्या राहिलेल्या चार बिंदूंनी वाकुल्या दाखवल्या. आम्ही सामूहिक शरणागती स्वीकारली.

आता प्रशिक्षकांची परीक्षा होती. पहिल्या क्रमांकाच्या बिंदूवर त्यांनी खडू ठेवला आणि दोन व तीन बिंदू जोडून तीच रेषा वाढवीत नेली. तिथून चार व आठ बिंदू जोडून रेषा पुन्हा पहिल्यासारखीच वाढवली. तिथून सहा व सात बिंदूंना जोडून ते पुन्हा एक क्रमांकावर आले. पुढची रेषा स्पष्ट दिसू लागली. पहिल्या क्रमांकापासून निघून पाच व नऊ या बिंदूतून किंचित पुढं जाणारी. सगळ्या अटी तंतोतंत पाळल्या गेल्या होत्या आणि आधी अशक्य वाटलेल्या कोड्याचं नेमकं उत्तर आमच्या समोर विजयी मुद्रेनं उभं होतं.




आधी अवघड वाटणारं हे कोडं मुळात किती सोपं होतं! मग ते आम्हाला का सुचलं नसावं? आमच्या मनातला प्रश्न ओळखून प्रशिक्षकांनीच उत्तर दिलं. तुम्ही सारं लक्ष केवळ प्रश्नावरच केंद्रित केलंत, उत्तरावर नाही. म्हणून तुम्ही प्रश्नाभोवती फिरत राहिलात. फेरे वाढत गेले आणि गुंता कठीण होत गेला. तुमचे विचारही बांधले गेले आणि नव्या कल्पनांचे दरवाजे बंद झाले. कोडं नीट समजून न घेतल्यामुळे तुम्ही चौरसाकृतीतच अडकून पडलात; त्यामुळे रेषा वाढवण्याची कल्पना तुम्हाला सुचली नाही. *'आऊट ऑफ द बॉक्स'* विचार करण्याची क्षमता तुम्ही विकसित केलीच नाही. कल्पनाशक्तीच्या उपयोगाशिवाय कुणीही नवनिर्मिती करू शकत नाही. माणसाच्या मनामधून निघालेलं अत्यंत फायदेशीर उत्पादन म्हणजे 'नवकल्पना' आणि त्याची निर्मिती कल्पनाशक्तीतून होते.

*विद्या आमुची यशदायी ही व्हावी जगती खरोखरी।*
*द्वेषबुद्धि ती मनी नसावी राष्ट्राचा जी ऱ्हास करी।*

**शुभेच्छुक – श्री. अजित व सौ. उमा बापट, पुणे**

जपाननं विकसित केलेल्या *'काईझेन'* या व्यवस्थापन प्रणालीत *'फाईव्ह व्हाय'* हे अत्यंत प्रभावी तंत्र आहे. समस्येच्या मूळ कारणांपर्यंत जाण्यासाठी त्याचा हमखास उपयोग होतो.

बंद पडलेलं मशीन बघून व्यवस्थापकानं सहकारी ऑपरेटरला विचारलं,

''मशीन का बंद पडलं?''

*''मशीनचा शाफ्ट तुटून अपघात झाला.''*

''*शाफ्ट* का तुटला?''

''*शाफ्टच्या बेअरिंगला* लागणारं ग्रीस घट्ट झाल्यामुळे ती *जॅम* झाली होती.

''ग्रीस घट्ट का झालं?''

*''त्यात ग्राइंडिंगचा कचरा गेल्यामुळे.''*

मग ते घट्ट ग्रीस का बदललं नाही?

- खरं उत्तर मिळालं : *बेअरिंग कव्हर उघडायला लागणारा 'ॲलन-की-पाना' जागेवर नव्हता !* मशीनच्या देखभालीसाठी आवश्यक असणारी सामग्री जागेवर ठेवली जाणं हे उत्तर इथं मिळालं.

समस्येवर मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला तर नवी आणि प्रभावी कल्पना हमखास सुचते. एका दुकानात जुना, न खपलेला खूप माल पडून होता. मालकानं तो फेकून देण्याचा निर्णय घेतला. त्याच्या एका *सेल्समननं* कल्पना मांडली. हा सर्व माल आपण टेबलांवर ठेवू आणि सगळ्या वस्तू पाच-दहा सेंटला देऊन टाकू. हा प्रयोग यशस्वी ठरला आणि त्यातून अमेरिकेत अशा दुकानांची एक साखळी उभी राहिली.

'पिग्ली विग्ली सुपर मार्केट'ची कल्पना राबवणारे ''क्लॉरेन्स साउंडर'' यांना एका कॉफी *शॉपमधील* कार्यपद्धतीवरून सुचली. माणसं रांगेत उभी राहून अन्न वाढून घेताहेत आणि त्यांच्यासाठी खूपच कमी *वेटर्सची* गरज असते, असं त्यांनी पाहिलं आणि हीच कल्पना किराणा मालाच्या दुकानात वापरली. या कल्पनेनं 'साउंडर'ना कोट्यधीश बनवलं.

विजेच्या दिव्याची कल्पना नवीन कधीच नव्हती. तारेतून वीजप्रवाह गेल्यास ती तापते आणि पांढरी होते; पण तार अति तापवली आणि पांढरा प्रकाश घेण्याचा प्रयत्न केला की, ती वितळून तुटायची. तारेच्या



उष्णतेवर नियंत्रण ठेवण्याचा मार्ग कुणीच शोधून काढला नव्हता. एडिसननी 'कोळसा कसा जाळतात', यावर लक्ष केंद्रित केले आणि विद्युतऊर्जा मिळालेल्या तारेची उष्णता नियंत्रित करण्याचा मार्ग त्यांना सापडला. कोळसा तयार करण्यासाठी लाकडांना लावलेली आग भडकू नये, म्हणून तर माती-कचरा टाकून आगीला प्राणवायू मिळू दिला जात नाही. हे लक्षात घेऊन एडिसन प्रयोगशाळेत गेले. त्यांनी ती तार निर्वात पोकळी असलेल्या नळीत ठेवली आणि वीजप्रवाह सुरू केला आणि या कल्पनेतून विजेच्या दिव्याचा शोध लागला.

कितीही मोठ्या प्रवासाचा प्रारंभ एका पावलानंच होतो. समस्येच्या उत्तराचा शोध घेण्यासाठी अशा टप्प्याटप्प्याच्या प्रवासाचीच गरज असते आणि ते कुणालाही सहज शक्य असतं.

कार्यशाळेच्या अखेरीस असे आढळले की, प्रशिक्षकांना प्रश्न सांगून उत्तरं घेण्याऐवजी आता आम्हीच ती शोधू लागलो होतो. उत्तरांकडे जाण्याची दिशा आमच्या हातात आली होती.


**मल्हार अरणकल्ले**

*१०/२, गुरुजन सोसायटी,कोथरुड, पुणे 411038*

*चित्रकार : अंजली पुरंदरे*



**अभिमानास्पद : रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते भारतीय**
**चिंतामणराव देशमुख** (१९५९) - प्रशासकीय सेवा
**शुभेच्छुक – श्री. नितीन गोडबोले, पुणे** – कै. श्री. शंकर दत्तात्रय गोडबोले स्मृतिप्रीत्यर्थ



**सफर समुद्रविश्वाची**
(संदर्भ अंकातील पृ. क्र. ३३)




*ज्ञान प्रबोधिनी भविष्यातील कामाचे सूत्र – नेतृत्वगुण विकसन करणारी*
*ज्ञान प्रबोधिनीची मनुष्यघडणीची प्रक्रिया शालेय वयोगटाच्यापुढे विस्तारित करणे.*

**संग्रही ठेवा - माहितीपर : 'छंद आकाशदर्शनाचा',** छात्र प्रबोधन प्रकाशन, ₹ ८०/-






*१८ ते ३५ वयोगटातील युवक-युवतींसाठी प्रशासकीय व सामाजिक क्षेत्रातील नेतृत्वाची पायाभरणी व संवर्धन करणारे केंद्र - नेतृत्व संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे.*

**संग्रही ठेवा - व्यक्तिविकसनपर : 'तरंग मनाचे'**, छात्र प्रबोधन प्रकाशन, ₹ ५०/-



कथा

# भूक मायेची

अनु. अंजनी नरवणे

अभ्यासाची वह्या-पुस्तकं त्याच्या समोरच्या टेबलावर पडली होती आणि विमनस्क मनानं हरितोष खिडकीबाहेरच्या आकाशाकडे बघत बसला होता. आई गेल्याला सहा महिने झाले तरी, तो अजून मन लावून अभ्यास करूच शकत नव्हता. एकाएकी चार दिवसांच्या दुखण्यानं, काय झालं हे धड कळायच्या आधी आई गेलीच; तेव्हा तो आठवीत होता. पहिल्या टर्मच्या परीक्षेत त्याला छान गुण मिळाले होते. दिवाळी मजेत गेली आणि शाळा पुन्हा सुरू झाल्याबरोबर अचानक आईच्या अशा जाण्यानं हरितोष अन् त्याचे बाबा फारच खचले होते. तिघांचं छोटंसं, मध्यम वर्गातलं, सुखी कुटुंब होतं. कशाचा हव्यास नव्हता. छान अभ्यास करून, स्वकष्टानं मिळवलेले पैसे साठवून एकेक वस्तू घ्यायची, त्यातच आनंद असतो, हे आई-बाबांनी त्याला पटवून दिलं होतं. कधीतरी

*एकाएकी चार दिवसांच्या दुखण्यानं, काय झालंय हे धड कळायच्या आधी हरितोषची आई गेलीच; त्याचं अवघं विश्व कोलमडलं... एक दिवस त्याच्या आयुष्यात नवी आई आली. आपल्याला आई असावी म्हणून झुरणारा हरितोष आणि मनात मायेची भूक असणारी त्याची नवी आई यांचं मनोमिलन नकळत कसं झालं, हे सांगणारी ही कथा !*

*महिलांचा आत्मविश्वास वाढविणारा व नेतृत्व विकसन करणारा ज्ञान प्रबोधिनीचा प्रकल्प संवादिनी- समतोल द्वैमासिक, मासिक बैठक, उमलत्या वयाशी जुळवून घेताना इ. उपक्रम.*

**संग्रही ठेवा - प्रेरणादायी, अनुभवपर : आयुष्यातील वादळलाटा,** छात्र प्रबोधन प्रकाशन, ₹ ७०/-







ज्ञान प्रबोधिनीच्या कार्याचा विस्तार समाजातील विविध वयोगट व समाजगटांपर्यंत पोहोचविणारी ज्ञान प्रबोधिनीची विस्तार केंद्रे-अंबाजोगाई, डोंबिवली, बोरीवली, सांगली.

**संग्रही ठेवा - विचार व कृतिप्रवर्तक : हरित संदेश -** छात्र प्रबोधन प्रकाशन, ₹ १५/-

सिनेमाला जायचं, कधी चांगली पुस्तकं आणायची. मजेत चाललं होतं आयुष्य. आणि मग आईचं हे असं...

काही दिवस काहीच समजत, सुचत नव्हतं. जमलेले नातेवाईक हळूहळू परत गेले. उरले होते बाबा, तो आणि बापुडवाणं, भकास दिसणारं घर. आयुष्य तर पुन्हा सुरू करायला हवंच होतं. त्या वयात खूप मुलांना असतो, तसा हरितोषला लवकर उठायचा कंटाळा होता. आईनं चारदा हाका मारल्या की, उशीर झाला हे लक्षात येऊन भराभरा उठून, तोंड धुवून तो दूध प्यायला टेबलाशी येऊन बसायचा. आईकडून कप हातात घेऊन तो हटकून टेबलाच्या कोपऱ्यावर ठेवायचा. मग आई म्हणायची, ''अरे कप जरा आत घे बाळा. दूध सांडेल ना, कप फुटेल..., जरासा धक्का लागला तरी !''

कप जवळ ओढून तो मग भराभरा दूध पिऊन टाकायचा आणि आंघोळीला जायचा. घाईघाईत हटकून टॉवेल न्यायला विसरायचा. आई मग *बाथरूमच्या* दारावर टक टक करायची अन म्हणायची, ''टॉवेल लावला आहे रे कडीला !''

आता टॉवेल विसरला तर बाबा मुकाट्यानं तो कडीला अडकवून दुसरी कामं करायला जायचे. आधीच फारसे बोलके नसलेले बाबा, आता फारच कमी बोलायचे. त्याच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊ नये म्हणून आता शाळेच्या आधी क्लास लावला होता. क्लास, मग शाळा सुटली की, तो घरी यायचा, तेव्हा बाबा घरी आलेले नसायचे. कारण ऑफिस सुटल्यावर ते भाजी किंवा इतर काही सामान घेऊन मग घरी यायचे. हरितोष हातपाय धुवून, *युनिफॉर्म* बदलून *होमवर्कला* बसलेला असायचा. बाबा हातपाय धुवून, कपडे बदलून चहा प्यायचे (घोटभर हरितोषलाही मिळायचा) आणि आमटी किंवा पिठलं-भात नाहीतर खिचडी करायचे. जेवताना त्याच्या अभ्यासाची वगैरे चौकशी करायचे; पण हरितोषला वाटायचं, 'मी यांना काय विचारणार? किती एकटं वाटत असेल त्यांना !' जेवणं झाली की, आतल्या खोलीत दोन गाद्या पसरून दोघं झोपायचे. त्याच्या डोक्यावरून हात फिरवून बाबा म्हणायचे 'झोप हं बाळ आता.' थकलेले दोन जीव हळूहळू झोपून जायचे.

...आणि आता ही कशी का होईना बसलेली घडी पुन्हा विस्कटणार असं दिसत होतं म्हणून हरितोष पुन्हा अस्वस्थ, खिन्न झाला होता. काही दिवसांपूर्वी काका-काकू आणि मामा-मामी भेटायला आले होते. तो झोपायला गेल्यावर बाहेरच्या खोलीत हलक्या आवाजात बराच वेळ बोलत होते. त्यांच्या दोघांच्या हडकलेल्या तब्येतींबद्दलचं बोलणं त्याला पुसटसं ऐकू आलं होतं. अंथरुणावर पडल्यापडल्या मळलेले पडदे, धूळ बसलेली दारं, खिडक्या, भिंतींच्या कोपऱ्यातली जळमटं, धूळ बसलेली ट्यूबलाइट सगळ्याकडे बघून त्याला खूप उदास वाटत होतं. वार्षिक परीक्षेचे पेपर चांगले गेले नव्हते, याचं रडूही येत होतं...

ती सगळी हळू आवाजात बाबांना दुसरं लग्न करायला सुचवत होती; याचाही अंदाज आला असल्यानं आणखी एका अनामिक भीतीनंही त्याला ग्रासलं होतं. बाबांचं दुसरं लग्न - म्हणजे त्याला दुसरी आई? सावत्र? 'पण बेचाळीस वर्षांचे बाबा एकट्यानं त्याला कसं वाढवतील, घर कसं चालवतील? तो मोठा झाल्यावर एकट्यानं कसं आयुष्य काढतील?' हे प्रश्न विचारता विचारता मामांचा आवाज जरा चढल्याचं त्याला ऐकू आलं होतं. त्यांचं म्हणणं खरं नव्हतं?

आणि मग एक दिवस बाबांनी त्याला जवळ बसवून घेऊन, समजावून सांगितलं होतं की, ते दुसरं लग्न करणार आहेत. कारण त्यांच्या दोघांच्याही दृष्टीनं ते चांगलं होईल असं त्यांना वाटत होतं. ते जिच्याशी लग्न करणार होते, तिला बाबा भेटून आले होते. ती अगदी शांत, समजूतदार वाटली होती. तिला छोटी नोकरी होती; पण कायम भावाकडे राहाणं शक्य नव्हतं. हरितोषला सगळं पटलं होतं; पण सावत्र आई? कशी वागेल आपल्याशी ? रागावेल? नावं ठेवेल? सगळी भीती मनात दडपत त्यानं बाबांकडे बघितलं. त्याच्या पाठिंब्याची, मदतीची अपेक्षा उघड दिसत होती. व्याकूळ चेहऱ्यावर

समजूतदारपणा दाखवत त्यानं मानेनंच होकार दिला.

अगदी साधेपणानं लग्न करून बाबा नव्या आईला घरी घेऊन आले, तेव्हा तिची वहिनी आणि हरितोषची मामी बरोबर आल्या होत्या. मामीनं हरितोषची ओळख करून दिली. तो सर्वांच्या पाया पडून लांब जाऊन बसणार एवढ्यात नव्या आईनं - सुनंदा तिचं नाव - हात धरून त्याला आपल्या जवळच्या खुर्चीवर बसवून घेतलं. ''बस ना इथं हरितोष,'' ती म्हणाली.

मामीनं तिला घर दाखवलं, स्वयंपाकघरातलं सगळं सांगितलं आणि त्याची शाळा वगैरे बोलणं झालं. चहा झाला अन् मग सुनंदाला बाहेरच्या खोलीत बाबा आणि हरितोषजवळ सोडून दोघी गेल्या. तिला काय नावानं हाक मारावी हेच त्याला कळत नव्हतं. माई? मावशी? त्याच्या आईसारखी छान नव्हती ती दिसायला; पण शांत आणि जराशी गंभीर ! चेहऱ्यावरचे डोळे मायाळू होते. त्या रात्री बाबांनी त्याचं अंथरुण बाहेरच्या खोलीत घातलं. दोन मिनिटं त्याच्या जवळ बसून त्याचा चेहरा, डोकं कुरवाळलं आणि उठताना एवढंच म्हणाले, ''हरितोष, कसलीही काळजी करू नको, सगळं काही ठीक होईल, झोप स्वस्थ हं !'' विचार करता करता केव्हातरी तो झोपून गेला.

त्याला जाग आली तेव्हा उजाडलं होतं. स्वयंपाकघरात बाबांचा अन 'तिचा' आवाज ऐकू येत होता. क्लास-शाळा, लवकर तयार व्हायला हवं होतं. या वर्षी खूप अभ्यास करायचं ठरवलं होतं त्यानं. तो उठला, तोंड धुवून स्वयंपाकघरात आला अन् त्याच्या नेहमीच्या खुर्चीवर बसत होता, तेवढ्यात ती दुधाचा कप घेऊन आली. त्यानं तिच्याकडून कप घेऊन नेहमीच्या सवयीनं टेबलाच्या कडेवर ठेवला.

''जरा आत सरकवून ठेवावा कप - जाता येता कोणाचा धक्का लागला तर --''

'ऑ ? हे कोण बोललं ? ही नवी आई ?' 'माझी' आई पण अस्संच म्हणायची. जरा नवल करत त्यानं कप जवळ घेतला आणि साखर घातलेलं गरम दूध पिऊन टाकलं. छान वाटलं; पण हिला कसं माहीत मला गरम, साखरवालं दूध आवडतं ते? मग भराभरा अंघोळीला जाताना टॉवेल खूपदा विसरायचा तसा तो विसरतच होता, पण तो दार लावणार एवढ्यात तिनं विचारलं, 'टॉवेल घेतलास का?' त्याला नवल वाटलं- सगळ्या 'आया' सारख्याच असतात? पण ही तर आपली खरी आई नाही अन् तशी तर.. कोणाचीच आई नाही! मग असं कसं झालं? त्याला तेव्हा कुठे माहीत होतं की, सगळ्याच स्त्रियांच्या मनात एक 'आई' असते!

अंघोळ करून, येऊन तो जेवायला बसला. आई गेल्यापासून बाबा सकाळी पोळी-भाजी करायचे आणि मधल्या सुट्टीत तो ग्लुकोजची चार बिस्किटं आणि एक केळं खायचा. रोज कॅन्टीनमध्ये खाणं कसं परवडणार? आज बघतो तर ताटात गरम वरण-भात, तूप, लिंबू! त्याला खूप छान वाटलं. जेवण होता होता नव्या आईनं एक केळं ठेवलं पुढे. ''मी केळं तर मधल्या सुट्टीत ....''

''आत्ताच खा ना. मधल्या सुट्टीत खायला पोळीचे लाडू करून दिलेत बघ या डब्यात, ते घेऊन जा हं!''

त्यानं डबा शाळेच्या दप्तरात टाकला अन बाहेरच्या दाराकडे वळत हळूच 'येतो' म्हणाला.

''जरा एक मिनिट,'' ती म्हणाली.

''बाबा पूजा करून गेलेत, देवाला नमस्कार करावा बाहेर पडताना.''

पूजा? आई गेल्यावर पूजा बंदच झाली होती. आज फळीवरचा लहानसा देव्हारा स्वच्छ झाला होता, एक निरांजन तेवत होतं. नमस्कार करून त्यानं सॅन्डल्समध्ये पाय अडकवले अन सायकल बाहेर काढली.

''साडेपाच होतील ना यायला? मी वाट बघते, जपून, सावकाश जा हं !'' आई रोज असंच म्हणायची आणि ही आई पण? आलेला आवंढा गिळत, भरून आलेले डोळे लपवायला मान फिरवत तो कसाबसा 'हो' म्हणत बाहेर पडला.

संध्याकाळी तो घरी आला तेव्हा ती बाहेरच्या खोलीत खिडकीशी बसून काहीतरी वाचत



**श्रद्धांजली : सुचित्रा सेन** (१७ जानेवारी २०१४)
प्रसिद्ध सिनेअभिनेत्री

**संग्रही ठेवा - काव्यपंक्ती संग्रह : 'शब्दांची रत्ने'**, छात्र प्रबोधन प्रकाशन, **₹ ६०/-**



होती. त्याला बघून हसली. त्याला एकदम वाटलं, आपल्या आईसारखी दिसायला छान नसली तरी हसली की, छान, प्रसन्न दिसते.

''ये, वाटच बघत होते. दमला असशील ना? हातपाय धुवून घे, आज दूध पिणार की चहा माझ्याबरोबर? एखादे दिवशीच हं पण!'' किती सहज, मोकळेपणानं बोलत होती ही !

''चहा आवडेल आज'' तो म्हणाला.

आणि मग दप्तर ठेवून येताना त्याला एकदम जाणवलं की, जळमटं साफ झाली होती, दारं-खिडक्या स्वच्छ, त्यांच्या कड्याही चमकत होत्या. त्याचं लक्ष आईच्या फोटोकडे गेलं - तोही स्वच्छ! त्याच्या खूश झालेल्या चेहऱ्याकडे बघत ती म्हणाली, ''आज घर स्वच्छ केलं आपलं. हा आठवडा रजाच घेतली आहे मी.''

ती 'आपलं' म्हणाली होती?

''रजा? नोकरी करता तुम्ही?''

''तुम्ही नाही -तूच म्हण हरितोष -किती छान नाव आहे तुझं! दिसतोसही छान तुझ्या आईसारखा आणि मला आई म्हण, असा माझा आग्रह नाही - माई, मावशी - काहीही म्हण आणि नोकरी ना, इथं जवळच्या बालकमंदिरात सकाळी दहा ते दोन जाते मी. बस. तू जाशील, येशील तेव्हा घरीच असेन मी, हं!''

हरितोषचं कोमेजलेलं मन बघताबघता पुन्हा टवटवीत झालं. आशेची नवी पालवी फुटत होती जणू. तो चहा पितापिता हळूच तिच्याकडे बघत म्हणाला, ''रात्री जेवायला काय करणार आई?''

''तू म्हणशील ते ! '' त्याच्या डोक्यावरून हात फिरवत ती प्रसन्न हसली. त्याला अन् तिलाही जाणवलं, आपल्याला आई असावी म्हणून झुरणारा तो आणि आपल्याला मूल असावं म्हणून आसुसलेली ती, दोघांच्या मनांचा ओलावा खरा होता म्हणून इतक्या लवकर जवळ आली होती ती ! दोघांचीही मायेची भूक भागली होती म्हणून!

(मूळ लेखक विजय शास्त्री यांच्या 'आवागमन' या गुजराथी कथेवर आधारित)

**अनुवाद – अंजनी नरवणे**

*एफ १/१, 'नेस्ट', चिंचवड (पू.), पुणे 411019*

*चित्रकार : राहुल देशपांडे*

*आई उन्हाची सावली, आई सुखाचे आगर।*
*निळ्या आकाशाएवढा, तिच्या मायेचा पदर।।*

**संग्रही ठेवा - कवितासंग्रह : अक्षरबोली, कवितेच्या गावा,** छात्र प्रबोधन प्रकाशन, ₹ ३०/-

## दि लक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि., सोलापूर

मुख्य कार्यालय : ३१९, दक्षिण कसबा, सोलापूर

।। दीपावलीच्या शुभेच्छा ।।

ही दीपावली व नववर्ष आपणांस सुखसमृद्धीचे भरभराटीचे जावो हीच शुभकामना !

**सर्वसामान्य जनतेच्या विश्वासास पात्र ठरलेली सोलापूर जिल्ह्यातील अग्रगण्य बँक**

**१४ शाखा व २ विस्तारीत कक्षांसह जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर**

| बसवराज कृ. बोडा | प्रा. डॉ. राजकुमार ज. मोहरकर | ॲड. लक्ष्मीकांत वि. कोंडा |
| --- | --- | --- |
| सरव्यवस्थापक | व्हाईस चेअरमन | चेअरमन |

**आणि समस्त संचालक मंडळ**





**श्रद्धांजली : खुशवंत सिंग** (२० मार्च २०१४)
प्रसिद्ध वकील, पत्रकार व लेखक, पद्मविभूषण विजेते

**संग्रही ठेवा - ललित लेख 'अलगुज'**, छात्र प्रबोधन प्रकाशन, किं. ₹ ५०/-

ललित



# वक्तृत्वाची पहिली पाठशाळा

प्रवीण दवणे

वडिलांचं बोट धरून व्याख्यानमालांना जाणं, ही माझी वक्तृत्वाची पहिली पाठशाळा होती. जेव्हा 'वक्तृत्व' म्हणजे काय तेही माहीत नव्हतं अशा माझ्या अजाणत्या वयात वडिलांनी मला आचार्य प्र. के. अत्रे, म. म. दत्तो वामन पोतदार असे उत्तुंग वक्ते आणि अनेक प्रवचनकार ऐकवले. 'गायकाला जसा गळ्याचा रियाज करावा लागतो, त्याप्रमाणे श्रोत्यालाही कानाचा रियाज करावा लागतो.' असं वडील नेहमी म्हणत. त्या शाळकरी वयात त्यांच्या या वाक्याचा अर्थ कळला नाही; पण वयाबरोबर 'कान' मोठे होऊ लागले आणि पुढे महाविद्यालयीन वयात मी स्वतंत्रपणे, आवडीनं भाषणं ऐकायला जाऊ लागलो. तेव्हा त्या काळातले जवळजवळ सगळे दिग्गज पहिल्या रांगेत बसून ऐकले. त्यात नरहर कुरुंदकर, दुर्गाबाई भागवत, शिवाजीराव भोसले, पु. भा. भावे, राम शेवाळकर, पु. ल. देशपांडे असे अनेक शब्दप्रभू मनाचं मंदिर करून ऐकले आणि पाहिले. व्याख्यान ऐकताना वही व लेखणी घेऊन टिपण काढण्याची माझी सवय होती. 'वक्तृत्व केवळ वाक्चातुर्यामुळे न भावता, वक्त्याच्या स्वतंत्र चिंतनामुळे परिणामकारक होते', हे विविध प्रकारचे वक्ते ऐकल्यामुळे कळलं.

गंमत म्हणजे भाषण ऐकताना वक्त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे, त्याच्या विशिष्ट लकबीचे मी निरीक्षण करीत असे. प्रखर मुद्दा मांडताना रोखून बोलणाऱ्या दुर्गाबाई भागवत, बोलताना अर्थपूर्ण विराम घेऊन मध्येच फुलपात्रातील पाणी पिणारे प्राचार्य राम शेवाळकर तर आखलेल्या पट्टीवर सुवाच्य अक्षरे रेखाटावीत असे एका संथ लयीत बोलणारे प्राचार्य शिवाजीराव भोसले, हशा-टाळ्यांच्या मस्त मैफलीत एका हाताची बाही मध्येच मागे

*ध्येय आमुचे यशकीर्तीचे, कर्तव्याचे परिपूर्तीचे।*
*अभ्यासाने, व्यायामाने, देहमनाला घडविण्याचे।।*
**शुभेच्छुक – डॉ. रवींद्र सेठिया, पुणे**

घेणारे भाई (आपले पु. ल.) अशा अनेक जणांच्या लकबी मला वेधक वाटत. प्रत्येकाचे वैशिष्ट्य वेगळे; आनंद वेगळा !

गाजलेल्या विविध ग्रंथांचे वाचन आणि व्याख्यानमालांतून प्रत्यक्ष वक्त्यांच्या वक्तृत्वाचे श्रवण, या किशोरवयीन वाटेवरच्या माझ्या जागरूक पाठशाळाच होत्या.

त्यातून वक्तृत्व स्पर्धा साद घालू लागल्या. स्पर्धेची सूचना आली की, नाव देण्यात माझा पहिला क्रमांक असे. प्रारंभी मी संपूर्ण भाषण लिहून काढत असे आणि मग रात्र-रात्रभर पाठ करीत असे. गंमत अशी व्हायची, स्पर्धेत माझा क्रमांक जसजसा जवळ यायचा तसतसे एकेक मुद्दे काढता पाय घेऊन पळ काढायचे. व्यासपीठावर पाय ठेवेपर्यंत माझ्याजवळ 'माननीय परीक्षक आणि मित्र-मैत्रिणींनो' एवढेच शिल्लक असायचे. त्यानंतर हवेत विरलेले मुद्‌दे शोधताना मन उंच-उंच जाऊन हात-पाय, विशेषतः तळवे-तळहात गारेगार पडत. पुढे व्यासपीठावरून उतरण्यावाचून माझ्या हातात काहीही उरत नसे. बरोबरची मुले संपूर्ण भाषण मुद्राभिनयासह घडाघडा म्हणत, तेव्हा त्यांचा मला खूप हेवा वाटत असे. हे असं आपल्याला केव्हा जमणार? की नाहीच जमणार? असं वाटून आतून रडू फुटे. दुःख याचं वाटे की, सभागृहात नीट रडताही येत नसे. दप्तरातील चुरगळलेले कागद पुन्हा वाचताना वाटे, 'अरे कमाल आहे. सगळं पाठ आहे; पण हे मघाशी का नाही आठवलं? सोपं होतं अगदी!'

'यापुढे स्पर्धेत भागच घ्यायचा नाही.' हा माझा निश्चय फक्त पाच-सहा दिवस टिकत असे. पुन्हा नव्या स्पर्धेची सूचना आली की, आधीचे सारे विसरून मी त्यात भाग घेत असे. पोहताना जसं आरंभी नाका-तोंडात पाणी जाऊन श्वास गुदमरतो; सायकल शिकताना प्रत्येकजण पाच-सात वेळा पडतोच, गुडघे खरचटतातच; तसंच कुठल्याही कलासाधनेचं आहे. स्पर्धेत वारंवार भाग घेऊन मी संपूर्ण भाषण म्हणण्यापर्यंत मजल मारली.

वक्तृत्वाचा पहिला खरा आनंद मला स्पर्धेत मिळाला नाही. शाळेत अकरावीला शिक्षकदिनी विद्यार्थी 'शिक्षक' होत असत; त्यावेळी मी नववीच्या मुलांना कविता शिकवली. माझी भंबेरी उडवायला टपलेली मुलं चाळीस मिनिटं माझं कवितेचं रसग्रहण एकाग्रपणे ऐकत होती आणि यापुढे 'याच विद्यार्थ्याला मराठी शिकवायला पाठवा' म्हणून खऱ्या मुख्याध्यापकांकडे गेली.

वक्तृत्व आणि अध्यापन यांचं फांदी अन फुलासारखं नातं आहे. एकमेकांचा ती प्राण आहेत. अकरावीच्या त्या उपक्रमात सर्वांत लोकप्रिय विद्यार्थी शिक्षकाचं बक्षीस अर्थातच मला मिळालं; पण त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे आपण सलग बोलू शकतो, हा आत्मविश्वास मिळाला.

त्या उपक्रमामुळे एक कळलं, भाषण पाठ करायचं नसतं; मुद्‌दे मनात टिपायचे असतात. मुद्द्यांचा विकास, त्या विषयाचा विस्तार ऐनवेळी सुचूनच होतो; त्यात उत्स्फूर्तता आवश्यक असते. हा वक्ता 'आठवत-आठवत' बोलतो आहे, हे हुशार श्रोत्यांच्या लक्षात येतं. वक्त्याचा धीर खचतो. एकदा का वक्तृत्वाची सायकल डगमगू लागली की, भाषण अन वक्ता दोन्ही एकदम पडतं.

पुढे, मिळेल त्या विषयावर, संधी असेल तेथे मी भाषण देत गेलो. वयाच्या विशी-एकविशीतच मी व्यावसायिकदृष्ट्या भाषण स्वीकारत गेलो. परंतु तेव्हापासून आतापर्यंत विषयाचा अभ्यास करून, मुद्‌दे काढून, गृहपाठ करूनच मी बोललो आहे. 'ऐनवेळी उरकून टाकू' हे मला अजिबातच मान्य नाही. व्यासपीठ हे महर्षी व्यासांचे स्थान आहे.

श्री सरस्वती, वाक्‌देवता यांच्या अस्तित्वाने भारलेले ते स्थान आहे. तेथे साधनेशिवाय, अभ्यासाशिवाय जाणे मला तेव्हाही मंजूर नव्हते. आज जसजशी माझ्या व्याख्यानांची संख्या वाढते आहे तसतशी विषयाची तयारी, मांडणी, आरंभ, अखेर याबाबत मी पूर्वीहून अधिक सजग झालो आहे. वाणी आणि लेखणी सरस्वतीचा प्रसाद आहे. आचार-विचार-उच्चार यात चारित्र्य-पावित्र्य असेल तरच या कला आपल्यावर कृपाछत्र धरतात ही माझी केवळ श्रद्धा नाही; खात्री आहे.

वक्तृत्वाच्या निमित्ताने भारत



**श्रद्धांजली : गोपीनाथ मुंडे** (३ जून २०१४)
माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र
**शुभेच्छुक – मे. सी. व्ही. कांड, कन्सल्टंटस्. प्रा. लि., पुणे**

आणि भारताबाहेर अनेक ठिकाणी मी गेलो. प्रत्येक ठिकाणचं आव्हान वेगळं असतं. सगळ्याच घटना इथे मांडता येणार नाहीत. एका खेड्यात माझ्या विषयापुढे 'ह. भ. प. दवणेबुवांचे कीर्तन' असं लिहिलं होतं. मी संयोजकांना चमकून विचारलं, ''हे काय, बुवा? कीर्तन? छे छे, मला शक्यच नाही !''

संयोजक म्हणाले, ''आमच्या ग्रामीण भागात कीर्तन लिहिल्याशिवाय लोक येतच नाहीत.''

मग काय? केली नवी तयारी. बालपणी ऐकलेली ठाण्याच्या कौपणेश्वर मंदिरातील कीर्तनं-प्रवचनं धावून आली. मग केले दणकून कीर्तन!

माझं 'व्याख्यान कम कीर्तन' असं रंगलं म्हणता राव! कार्यक्रम संपताच ते ग्रामीण, भोळेभाबडे रसिक श्रोते संयोजकांना भेटले; जणू घेरावच घातला त्यांनी. म्हणू लागले,

''म्होरच्या साली याच बुवांना बोलवा !''



एकदा मराठी श्रोत्यांसाठी व्याख्यान दिल्यावर तेवढेच लोक संयोजकांना भेटले. ते म्हणाले, ''आजचं दुसरं व्याख्यान 'हिंदी'त करायला सांगा. खूपशा अमराठी लोकांनी विनंती केली आहे.''

मला हिंदी अर्थातच येते; पण दीड तास सलग बोलण्याइतकी सहजता अशक्य !

पण खूपच आग्रह झाला. मी आव्हान स्वीकारलं. आरंभीच म्हटलं, '*मेरी हिंदी आपके मराठी जैसी है। बीचबीचमें यदि कुछ शब्द याद नही आऐंगे तो कृपा करके आप मदद करो।*''

झालं, हशात टाळ्या मिसळल्या. अर्थात व्याख्यान खूपच रंगलं.

परदेशातले अनुभव आणखी निराळे. टिपणाऱ्या, वेचणाऱ्या वक्त्याला वक्तृत्वासारखी संधी नसते. मला लेखनाला असंख्य विषय मिळाले, ते वक्तृत्वाच्या मुशाफिरीतच. लेखनाला वक्तृत्वाने विषय पुरवले अन् पुढे तेच विषय वक्तृत्वही समृद्ध करणारे ठरले. एका हाती लेखणी अन् दुसऱ्या हाती वाणी, मध्ये मी; अशी आम्हा तिघांची दृढ मैत्री आहे, जी शेवटच्या श्वासापर्यंत बहरत राहील.

**– प्रवीण दवणे**

*ब/३०३/राजहंस,*
*लुईसवाडी, ठाणे (पश्चिम)*

*चित्रकार : प्रियाल मोटे*

*जे जे असेल अज्ञात, घेता करुनिया ज्ञात।*
*पाठीवरी मात्र हवा, कुण्या प्रेमळाचा हात।।*

**शुभेच्छुक – सौ. सोनल जांभेकर, डोंबिवली**

## जनसेवा सहकारी बँक (बोरिवली) लि.

प्रशासकीय कार्यालय गिरीराज, डॉ. डी.जी.पालकर मार्ग,
बोरिवली (पश्चिम), मुंबई - ४०००९२.
दूरध्वनी - २८३३८००४ फॅक्स - २८९९८८४२, ई-मेल
jssbl@mtnl.net.in वेबसाइट -
www.janasevabank.in

**आमच्या शाखा**

१) बोरिवली (पश्चिम), २) दहिसर(पूर्व)
३) कांदिवली (पश्चिम), ४) बोरिवली (पूर्व),
५) चारकोप, ६) मालाड(पश्चिम),
७) कांदिवली (पूर्व), ८) भाईंदर (पूर्व), ९) गोरेगाव (पूर्व)
१०) गोरेगाव (पश्चिम), ११) अंधेरी (पश्चिम) शाखा,

| पंकज व. गोरडिया | अरविंद भा. रेगे | जया सी.पुजारी |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | महाव्यवस्थापक |










**श्रद्धांजली : स्मिता तळवलकर** (६ ऑगस्ट २०१४)
प्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री व निर्माती

**संग्रही ठेवा - ललित लेखसंग्रह 'बकुळफुलं'**, छात्र प्रबोधन प्रकाशन, किंमत रु. ६०/-

कथा

# जादू की झप्पी !

डॉ. प्रदीप आवटे



जयभवानी चौकात ते दोघे उतरले. बस ट्रॅफिकमधून रस्ता काढत निघून गेली. समोरच *बोर्ड* चमकत होता, 'देशपांडे हॉस्पिटल.'

समोरचा तो *बोर्ड* बघून रमेश खरं म्हणजे स्वप्नात हरवला होता. त्याला भविष्यातला भला थोरला *बोर्ड* दिसत होता- 'रमेश बनसोडे हॉस्पिटल !' 'खरंच आपणही एवढे मोठे डॉक्टर होऊ ? देशपांडे काकांएवढे?...'

निलेश त्याच्या मनातले विचार ओळखून म्हणाला, ''एक दिवस तुझंही मोठ्ठं हॉस्पिटल असेल...!''

रमेशला आतून गोड गुदगुल्या झाल्या; पण तो लटकेच म्हणाला, ''गप रे निल्या, उगीच खेचू नको माझी..!''

रमेश मूळचा सोलापूर जिल्ह्यातील धानोऱ्याचा. वडील शेतकरी. गावाकडे दोन-चार एकर जिराईत जमीन. रमेशचे आई-वडील शेतात भरपूर राबायचे. रमेशला अभ्यासात छान गती होती. 'डॉक्टर व्हायचे,' असे त्याच्या मनाने नकळत्या वयापासून घेतले होते. आबांची म्हणजे त्याच्या वडिलांचीही हीच इच्छा होती. आबांनी पोटाला चिमटा घेऊन रमेशला सातवीपासूनच पुण्यात शिकायला ठेवले होते. 'या विद्येच्या माहेरघरात पोरगं कायतरी नावं काढंल' अशी आशा घरच्या सगळ्यांनाच होती.

देशपांडे डॉक्टर मूळचे सोलापूरचे. आबांच्या ओळखीचे. पाच-सात वर्षांपूर्वी ज्ञानदेव जरांडेच्या बैलानं आबांना चांगलंच मारलं होतं. लहान आतड्याला इजा झाली, तेव्हा डॉ. देशपांड्यांनीच त्यांना वाचविले होते. तेव्हापासून आबा डॉक्टरांच्या प्रेमातच होते. डॉक्टरचा विषय निघाला की, आबांचे ठरलेले वाक्य असे, 'डॉक्टर असावा तर देशपांडे डॉक्टरसारखा..!' आजही त्यांचे अधूनमधून डॉक्टरांना फोन चालूच असतात. हुरड्याच्या हंगामातही डॉक्टरांची शेतावरली सहल कधी चुकली नाही.

परवा फोनवर बोलताना आबा डॉक्टरांना म्हणाले, ''पोरगा तुमच्यावानी डॉक्टर व्हायचं म्हनतोय. कसं जमतंय ठाव नाय?''

''अरे वा ! न जमायला काय झालं? रमेश इथं पुण्यातच असतो तर त्याला एकदा पाठवा माझ्याकडं... गप्पा मारायला.''

''डॉक्टर अगदी माझ्या मनातलं बोललात तुम्ही. अहो, मला तेच वाटत हुतं. त्याला तुमचा *गायडन्स* पायजेलच एकवेळ..! डॉक्टर होनं म्हंजी काय तोंडचा घास नाय. कशी तयारी करावी, अभ्यास कसा करावा; एकदा सांगा त्याला.''

''दशरथराव, अहो, ही नवीन पिढी खूप *स्मार्ट* आहे. नका काळजी करू. *गायडन्स* कसला घेऊन बसलात ? पाठवा असंच .. मला मजा येते या नव्या पिढीच्या पोरांशी गप्पा मारायला...!''

आणि म्हणून रमेश आणि त्याचा मित्र निलेश डॉक्टर देशपांडे यांना भेटायला आले होते.

दोघे *हॉस्पिटलच्या गेटजवळ* पोहोचले. बाहेर डॉक्टरांची नवी कोरी आलिशान कार उभी होती. त्या कारवरून हलकेच हात फिरवायचा मोह रमेशला आवरला नाही. 'आपण डॉक्टर झाल्यावर चिक्कार पैसा कमवू आणि मग ही काय, हिच्यापेक्षाही भारी कार घेऊ.' रमेश जागेपणी स्वप्न पाहत होता.

''अरे बच्चे लोग, काय करता तिथं कारजवळ ?'' कोणाचा तरी मृदू आवाज आला आणि रमेश एकदम भानावर आला. निलेशनं समोर पाहिलं, तर हॉस्पिटलच्या दारात एक उंचपुरे गृहस्थ उभे होते.

''अरे, कोणा पेशंटला भेटायला आलात का? काय हवं तुम्हाला?'' त्यांनी परत विचारले.

*झेप गरुडाची अंगी, शस्त्र विज्ञानाचे हाती।*
*श्रम शास्त्राच्या युतीने, करू मंगलमय धरती।।*

**शुभेच्छुक – सौ. स्मिता चावरे, डोंबिवली**

''आबांनी पाठवलं आहे; रमेशला काय बोलावं ते सुचलंच नाही.''

''कोण आबा?''

''आबा...म्हंजे माझे वडील... दशरथ भीमा बनसोडे.''

''अरे, दशरथ बनसोडेंचा मुलगा तू..? ये, ये आत ये...! अरे किती लाजतोस?'' ते दोघंही डॉक्टरांपाठोपाठ आत त्यांच्या कन्सल्टिंग रूममध्ये गेले.

''हं बसा ...!'' डॉक्टरांनी हसतहसत त्यांना बसण्याची खूण केली आणि स्वतःही त्यांच्या *रिव्हॉल्व्हिंग चेअरमध्ये* विसावले. निलेश आणि रमेशचा परिचय करून घेतल्यावर त्यांनी सर्वांसाठी सॅण्डविच आणि कॉफीची ऑर्डर दिली.

''...तर मग रमेश तुला डॉक्टर व्हायचं आहे.''

''अगदी... दुसरा कुठलाच विचार नाही मनात...!'' रमेश म्हणाला.

''खूपच छान..! *पॅशनेटली* करावं असंच *प्रोफेशन* आहे हे !''

रमेश नुसताच ऐकत राहिला. डॉक्टर पुढे म्हणाले, ''पण तुला डॉक्टर का व्हावंसं वाटतं याचा कधी विचार केलायंस ?''

रमेशला काय बोलावं, ते सुचेना; पण मग रमेश धाडस करून म्हणाला, ''मला खूप मोठं व्हायचं आहे तुमच्यासारखं !''

''पण मोठ्ठं म्हणजे काय रे?'' डॉक्टरांनी गुगली टाकला.

तो अडखळतच म्हणाला, ''मोठं म्हणजे असं तुमच्यासारखं?''

''मी कसा काय मोठा बुवा?



मला काय शिंग बिंग फुटलं की काय रे?'' असं म्हणत डॉक्टरांनी स्वतःच्या डोक्यावरून हात फिरवला. ''आरशात बघायलाही वेळ होत नाही रे आजकाल..!''

रमेश स्वतःला सावरत तो म्हणाला, ''नाही नाही... मला पण तुमच्यासारखं खूप श्रीमंत व्हायचं आहे. भरपूर पैसा कमवायचा आहे. मस्त गाडी, मोठं हॉस्पिटल; घर सर्वकाही..!''

''अरे, मग डॉक्टरच का? एखादा छान चालणारा धंदा टाकलास, तरी तुझ्या या इच्छा पूर्ण होतील, निश्चित !'' डॉक्टरांच्या आवाजातील निराशा लपत नव्हती.

''पण डॉक्टरला जो मान मिळतो तो इतर धंद्यात कुठे आहे?'' रमेश त्याच्याही नकळत बोलून गेला.

''व्वा! फारच छान ! म्हणजे पैसाही हवा आणि मानही ...!''

रमेश आणि निलेश पुतळ्यासारखे शांत झाले. डॉक्टरांना आपलं बोलणं आवडलेलं नाही, हे रमेशच्या लक्षात आलं; पण रमेश त्याच्या मनातलं बोलत होता.

''मी मेडिकलला आलो, तेव्हा गावातले लोक माझ्या वडिलांना म्हणायचे, आता काय, पोरगा डॉक्टर होणार म्हणजे पैसाच पैसा. मला वाटे, डॉक्टर म्हणजे पैसाच पैसा हे कसं काय? मला वाटत असे डॉक्टर असा रस्त्यानं चालला की, लोक काय त्याच्यावर पैशाचा वर्षाव करतात की काय?'' असं म्हणत डॉक्टर हसले.

तेवढ्यात डॉक्टरांच्या हॉस्पिटलमधील एक नर्स आत आल्या.

''सर, आपला आजचा श्रद्धांजलीचा कार्यक्रम दुपारी चार वाजता निश्चित केला आहे. डॉ. हिंगमिरेंशी बोलले मी, त्यांनाही हीच वेळ जमतेय...''

''हं... दीपकजवळ डॉक्टरांचा फोटो दिला आहे मी *एन्लार्ज* करायला! फक्त तो वेळेत येईल एवढं पाहा.''

''डॉक्टरकाका, कसला कार्यक्रम आहे? कुणाला श्रद्धांजली?'' रमेशला त्याची जिज्ञासा कधीच गप्प बसू देत नसे.

''इबोला हे नाव ऐकलं आहेस?''

''हो... म्हणजे थोडंफार ऐकलं आहे. सध्या पेपरमध्ये, टी.व्ही.वर सारखं त्याबद्दल काही ना काही सुरूच असतं!'' रमेश म्हणाला.

हो सध्या आफ्रिकेतल्या काही देशांत या रोगाची मोठी साथ सुरू आहे म्हणे. हजारो लोकांचा मृत्यू झाला आहे, निलेशनं पण आपलं सामान्यज्ञान पाजळलं.



**श्रद्धांजली : बी. के. एस. अय्यंगार** (२० ऑगस्ट २०१४)
प्रसिद्ध योगगुरू
**शुभेच्छुक – अमिता सहस्रबुद्धे, सांगली**



*''गुड...,* चला म्हणजे तुम्ही पोरं पेपर पण वाचता तर..!'' डॉक्टरांनी पोरांना हलकेच टपली मारली आणि बोलू लागले,

''इबोला हा एक विषाणूजन्य आजार आहे. आपल्याला माहीत असलेल्या विषाणूंमध्ये हा सर्वात जास्त घातक विषाणू आहे. निलेश म्हणाला ते एकदम बरोबर आहे. सध्या पश्चिम आफ्रिका खंडात या रोगाची मोठी लागण झाली आहे. या आजारात मत्यूचं प्रमाण ६० ते ७० टक्के एवढं प्रचंड आहे.''

''बाप रे, म्हणजे प्रत्येक दहा रुग्णांपैकी ६ ते ७ रुग्ण दगावतात. पण हा महाभयंकर आजार पसरतो तरी कसा? आणि त्याच्यावर काही औषध असेलच ना?'' रमेश एकदम घाबरून म्हणाला.

''नो औषध, नो *व्हॅक्सीन..!* हा आजार रुग्णाच्या रक्त आणि शरीर द्रव्यावाटे पसरतो.''

''म्हणजे या रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉक्टर, नर्स यांना या आजाराचा धोका असणारच,'' निलेशनं नेमका मुद्दा मांडला.

''अगदी बरोबर. अरे, म्हणून तर नायजेरियात काम करणाऱ्या काही डॉक्टरांनी तेथून चक्क पळ काढला.'' डॉक्टरांनी माहिती पुरवली. निलेश मोठ्यानं हसला.

''त्यात हसण्यासारखे काय आहे निलेश?'' डॉक्टरही माणूसच आहे. त्यालाही आपल्या जीवाची भीती वाटणारच की,'' रमेश जरासा रागानंच बोलला.

तसा निलेश तावातावानं म्हणाला, ''अरे, सैन्यातला जवानच जर बंदुकीच्या गोळीच्या आवाजानं घाबरू लागला तर लढणार कसा? ज्याला आपल्या जीवाची भीती आहे, त्यानं कशाला डॉक्टर व्हावं ?''

निलेश भांडणाच्या मूडमध्ये आल्याचं पाहून रमेश एकदम शांत झाला आणि म्हणाला, ''अरे, आपण काय बोलत बसलो आहोत? आज संध्याकाळी कसला कार्यक्रम आहे, याची चौकशी करताकरता आपण एकदम इबोलावर कसे काय घसरलो?''

''हो आणि इबोलावरून बोलताबोलता तुम्हा दोघांत अबोला व्हायची वेळ आली.'' डॉक्टरांनी पुन्हा अचूक *टायमिंग* साधलं.

''हो, आम्ही जरा जास्तच उत्तेजित झालो; पण डॉक्टर आजचा कार्यक्रम कसला आहे?'' निलेशनं विचारले.

''श्रद्धांजली कार्यक्रम आहे. डॉक्टर शेख उमर खान यांना.'' डॉक्टर एकदम गंभीर झाले.

''कुठले डॉक्टर आहेत हे? यांचं नाव कधी ऐकलं नाही. कधी आणि कसे गेले ते?'' रमेशनं कुतूहलानं विचारलं.

''सिएरा लिओन हा पश्चिम आफ्रिकेतला एक छोटा देश. तिथल्या केनेमा शहरातील सरकारी रुग्णालयात ते काम करायचे,''

*या जन्माचे व्रत ऐसे की, दीप उजळता मनी राहावा।*
*चौबाजूंच्या अंधारातून, आपण आपुला मार्ग पाहावा।।*

**शुभेच्छुक – श्री. समीर संजय चावरे, डोंबिवली**

डॉक्टरांनी सांगितले.

''पण मग त्यांना श्रद्धांजली इथे, इतक्या दूर...?''

''तू म्हणालास ना रमेश तुला खूप मोठ्ठा डॉक्टर व्हायचं आहे. डॉ.शेख खरोखरच मोठ्ठे डॉक्टर होते''

''असं काय केलं त्यांनी?'' रमेश कोड्यातच पडला.

''रमेश, डॉ. शेख उमर खान गेली दहा वर्षे इबोलावर उपचार करत होते. जवळपास शंभरांहून अधिक इबोला रुग्णांवर त्यांनी उपचार केले. यात त्यांना स्वतःलाही इबोलाचा संसर्ग झाला आणि त्यातच २९ जुलै २०१४ रोजी त्यांचा मृत्यू झाला. अवघ्या ३९ वर्षांच्या या डॉक्टरनं इबोलाशी लढता-लढता जिवाची बाजी लावली.''

''त्यांना मरणाची भीती वाटत नव्हती?'' निलेश म्हणाला.

''मरणाची भीती कुणाला वाटत नाही, निलेश?'' आपल्या मरणापूर्वी दिलेल्या अखेरच्या मुलाखतीत ते म्हणाले होते, ''माझं माझ्या जगण्यावर खूप प्रेम आहे. मला माझ्या जीवनाचं खूप अप्रूप वाटतं; म्हणून तर इबोला रुग्णांवर उपचार करताना तो संसर्ग मला होऊ नये, म्हणून मी सर्वतोपरी काळजी घेतो. पण इबोलाच्या रुग्णांवर उपचार करण्यातला आनंद माझ्या जीवनातला सगळ्यांत मोठा आनंद आहे.''

इबोला रुग्णांवर उपचार करणं ही निष्ठा होती त्यांची. हे सांगताना डॉक्टरांच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या.

''तुम्हाला माहीत आहे, विषाणू विज्ञान विषयातील ते खूप मोठे तज्ज्ञ होते. त्यांना अनेक युरोपीय देशांतील विद्यापीठातून बोलावणं येत होतं; पण त्यांनी विनम्रपणे नकार दिला. त्यांचा भाऊ, इतर कुटुंबीय सारे त्यांना इबोला संदर्भातील काम सोडण्याची विनंती करत होते; पण ते अजिबात तयार झाले नाहीत कारण तेच त्यांचे जीवितकार्य होते.''

*''सिंपली ग्रेट...!''*

''अरे, इबोला हा असा जीवघेणा आजार असल्यानं त्यातून बरा होऊन घरी परतणाऱ्या रुग्णालाही त्याचे नातेवाईक आणि मित्र नीट वागवीत नाहीत.''

''एड्सच्या रुग्णांसारखीच अवस्था...!'' रमेश म्हणाला.

''इबोला रुग्णांना मिळणारी ही अस्पृश्यतेची वागणूक संपावी म्हणून डॉ. शेख उमर खान त्यांच्या रुग्णालयातून बरा होऊन घरी परतणाऱ्या इबोला रुग्णाला त्याच्या सर्व नातेवाईकांसमोर चक्क 'जादू की झप्पी' देऊन निरोप द्यायचे. त्यांच्या प्रेमळ मिठीनं मृत्यूला शिवून आलेला रुग्ण नवचैतन्याने भारून जायचा.'' डॉक्टरांचा आवाज कातर झाला होता.

''पण त्यांना स्वतःलाच इबोला व्हायला नको होता आणि झाला तरी ते त्यातून वाचायला हवे होते,'' रमेशच्या डोळ्यांतून पाणी येत होतं.

''रमेश, प्रत्येकाला तेच तर वाटत होतं. अरे, सिएरा लिओनच्या आरोग्यमंत्री म्हणाल्या, 'आज आम्ही आमचा *नॅशनल हीरो* गमावला.' आपल्या अवघ्या एकोणचाळीस वर्षांच्या आयुष्यात किती मोठा धडा शिकवून गेला हा माणूस. डॉक्टरच्या 'मोठे' पणाचा *'थर्मामीटरच'* वेगळा असतो रे ! तो भल्याभल्यांना वाचता येत नाही. साक्षात मृत्यूलाही 'जादू की झप्पी' देणं सोपं नसतं मित्रा !''

निलेश आणि रमेशला काय बोलावं तेच कळत नव्हतं.

''नाही पोरांनो, डॉ. शेख उमर खान यांचं बलिदान वाया नाही जाणार. प्रत्येक डॉक्टर हा मानव जातीचं दुःख आणि वेदनांचा निचरा करण्यासाठी घराबाहेर पडलेला गौतम बुद्धच असतो. ज्ञान, कौशल्य सारं काही लागतं डॉक्टरला; पण याहून महत्त्वाचं म्हणजे त्याला माणसाचं हृदय लागतं, नवजात लेकराच्या आईसारखं ! त्यांच्या जगण्याने आणि जाण्याने हीच गोष्ट आपल्याला पुन्हा एकदा सांगितली आहे.''

तेवढ्यात डॉ. शेख उमर खान यांचा *एन्लार्ज* केलेला फोटो घेऊन दीपक आत आला. डॉ. देशपांडे यांनी तो फोटो आपल्या हातात घेतला आणि त्या प्रसन्न, हसऱ्या छायाचित्रावर हात फिरवीत ते स्वतःशीच पुटपुटले, 'डॉक्टर असा असतो राजा, डॉक्टर असा असतो...!'

**डॉ. प्रदीप आवटे**
*सी-१०४, सुवर्णरत्न गार्डन सोसायटी, कर्वेनगर, पुणे 411052*
*चित्रकार : प्रियाल मोटे*

**श्रद्धांजली : माया राव** (१ सप्टेंबर २०१४)
प्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना व नृत्य दिग्दर्शिका


**संग्रही ठेवा- 'गंध मोहवी काव्याचा, भाग १ व भाग २'**, छात्र प्रबोधन प्रकाशन, प्रत्येकी ₹ ७०/-

कृतिपर



## चौफुला सुशोभन

या सुशोभनासाठी आपण ऑरगंडीचे निळे, लाल, पिवळे कापड वापरणार आहोत. सजावटीसाठी मणी, मोती, टिकल्या, लेस वापरले आहे. ऑरगंडीचे कापड पातळ असल्यामुळे ते दुहेरी वापरावे.

**१.** ५ सेंमी. लांबी-रुंदीचा चौकोनी कागद घ्यावा. कोपरे जुळवून कर्णरेषेच्या खुणा करून घ्याव्या. मिळालेल्या मध्यबिंदूपर्यंत चारी कोपरे दुमडावे. **२.** मध्यबिंदूपर्यंत दुमडलेल्या घडीचे चारी कोपरे पुन्हा मागील बाजूला मध्यबिंदूपर्यंत दुमडावे. **३.** तयार घडीचे कोपरे जुळवून घडीच्या कर्णरेषेच्या खुणा घ्याव्या. मागील बाजूने टोके जुळवून चौफुला उघडावा. ✻ **सजावट -** दुहेरी ऑरगंडी कापडाचे रंगीबेरंगी २ निळे, २ लाल, २ पिवळे असे सहा चौफुले वरीलप्रमाणे तयार करून घ्यावेत. चारी बाजूला चार, एक खाली आणि एक वर याप्रमाणे हे चौफुले फेविकॉलने चिकटवावेत. अडकवण्यासाठी सोनेरी दोरा व मणी-मोती-टिकली लावून हे सुशोभन सजवावे. (रंगीत चित्र पृ. क्र. १०५)

*- **जयश्री मांडके,** १० सई गार्डन, पर्वती पायथा, पुणे - ९*

## दिवाळी भेट 'पणती स्टॅन्ड' – नवीन कल्पना

(मलपृष्ठाच्या आतील पानावर)

या स्टॅन्डच्या मध्यभागी जुनी वाया गेलेली सी.डी. ठेवून त्यावर पणती ठेवून बघा आणि त्यातून दिसणारे प्रकाशाच्या कवडशांची मजा पाहा. ✻ कलाकृतीचे भित्तिशोभनही बनवता येईल. या कलाकृतीच्या मध्यभागी एखादा फोटो चिकटवून बनवलेले भित्तिशोभन सुंदर दिसते.

## ट्रेसिंग पेपरची फुले

**साहित्य :** बारीक तार, मणी/मोती, फेव्हिकॉल, ट्रेसिंग पेपर

**कृती :** १) प्रथम ट्रेसिंग पेपरवर फुलाचे चित्र काढून घेणे व कापून घेणे. २) त्याच आकारावरून आणखीन फुले कापून घेणे. ३) तारेचे हव्या त्या छोट्या–मोठ्या लांबीचे तुकडे कापून घेणे. ४) तारेच्या पुढे फूल टोचणे. तारेला मणी/मोती फेविकॉलने चिकटवून घेणे. ५) सर्व तयार फुले फुलदाणीत छानपैकी रचून घ्यावीत. (रंगीत चित्र पृ. क्र. १०५) **- अपर्णा म्हात्रे,** डोंबिवली


ORYZANOL

Pitambari
AGRICARE DIVISION

अरिशक्ती
राइसब्रान ऑइल

औषध नव्हे खाद्यतेल !
पितांबरीचे 'राईस ब्रान ऑईल'

शुद्ध आरोग्यासाठी सर्वोत्तम युक्ती, पितांबरीचं राईस ब्रान ऑईल - 'अरिशक्ती' !

सर्व वाचकांची दिवाळी 'स्नेहमयी' होवो, अशा पितांबरी उद्योग समूहाच्या वतीने हार्दिक शुभेच्छा !

वेबसाईट : www.pitambari.com
फेसबुक - https://www.facebook.com/PitambariGroup


*तुझं माझं नातं, कसं रेशमी पोताचं।*
*नाजूक, मुलायम, तरीही घट्ट विणीचं।।*

**शुभेच्छुक – डॉ. सतीशचंद्र गोरे, पुणे**






**श्रद्धांजली : शंकर वैद्य** (२३ सप्टेंबर २०१४)
प्रसिद्ध मराठी कवी

**संग्रही ठेवा - 'प्रेरक कथा'**, छात्र प्रबोधन प्रकाशन, **₹ ४०/-**

## छात्र प्रबोधन दीपावली विशेषांक
## सहा दिवाळी अंकांची मिळून प्रकाशनपूर्व ४५,००० अंकांची नोंदणी
### स्वयंसेवी वृत्तीने विशेष नोंदणी करणाऱ्या खालील सर्व केंद्रप्रमुखांचे हार्दिक अभिनंदन !!!

**सर्वात जास्त नोंदणी** (२ केंद्रे) **-** ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे (४०३७ अंक), रचना विद्यालय, नाशिक (२१५० अंक)

**१००१ ते २,००० अंकांची नोंदणी** (७ केंद्रे) **-** श्री. नाथाराव हसबनीस (३२ शिराळा), ज्ञान प्रबोधिनी, नवनगर विद्यालय (निगडी), डॉ. अंजली फडके (कोपरगाव), सौ. दीपाली हिंगणे (डोंबिवली), श्री. प्रसाद काणे (चिपळूण), श्री. मिलिंद चिंदरकर (बांद्रा), सौ. स्मिता मनोरे (कल्याण)

**५०१ ते १००० अंकांची नोंदणी** (१० केंद्रे) श्री. अरुण फाळके (खंडाळा), श्रीमती स्वरूपा देवरे (देऊर बु.।।), सौ. प्रतिभा प्रभुदेसाई (रत्नागिरी), श्री सतीश कुलकर्णी (सातारा), सौ. सुमिता पांढरे (बोरीवली), श्री. सतीश पै (दादर), सौ. शीतल सामंत (पावस), श्री. अनिल दंडगव्हाळ (नाशिक), श्री. राम जोशी (अलिबाग), ज्ञान प्रबोधिनी (अंबाजोगाई)

**३०१ ते ५०० अंकांची नोंदणी** (८ केंद्रे) **-** जनकल्याण निवासी विद्यालय (हरंगुळ), ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर(सोलापूर), डॉ. प्रबोध जोशी (शिर्डी), श्री. दत्तात्रय कुलकर्णी (कराड), श्री. शैलेंद्र केळकर (सांगली), सौ. अश्विनी कुलकर्णी, (अंबरनाथ), ग्राम प्रबोधिनी विद्यालय (साळुंब्रे), ज्ञान प्रबोधिनी (हराळी)

**२०१ ते ३०० अंकांची नोंदणी** (१७ केंद्रे) **-** श्री. वाघचौरे (अकोले), सौ. कुमुद पटवर्धन (बदलापूर), सौ. शुभदा कोकीळ (रसायनी), श्री. पवन लाठी (चोपडा), डॉ. मिलिंद शहा (कोरेगाव), सौ. सुलभा गोखले (नागोठणे), सौ. सुप्रिया बर्वे (ठाणे), दादासाहेब नाटेकर गुरुकुल (चिखली), श्री. दत्तात्रय सोनावणे (अमळनेर), श्री. डी. एस. सावंत (महाड), श्री. अनिल भोळे (जळगाव), श्रीमती मीरा साठे (गुहागर), श्री. मोहन आमशेकर (फोंडा-गोवा), प्रा. वैशाली पाटील-देवरे (शिरपूर), डॉ. श्रीकांत कुलकर्णी (मिरज), श्री. विनायक गद्रे (इचलकरंजी), सौ. विजयालक्ष्मी पाटगावकर (वाशी)

याशिवाय **२३ केंद्रांनी** १०१ ते २०० अंकांची तर **२२ केंद्रांनी** ५० ते १०० अंकांची नोंदणी केलेली आहे.

### (इ. ७ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी, प्रवेश नि:शुल्क)
### सफर दिवाळी विशेषांकाची – वैयक्तिक स्पर्धा

तुमच्या आवडत्या 'छात्र प्रबोधन' दिवाळी विशेषांकावर आधारित स्पर्धा ! या अंकावर आधारित प्रश्न खाली देत आहोत. त्या प्रश्नांची उत्तरे लिहून **छात्र प्रबोधन**कडे पाठवा आणि बक्षीस जिंका. **बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी !**

**स्पर्धेसाठीचे प्रश्न – १.** 'न मळलेली वाट' या लेखातील 'यश'ला कोणत्या क्षेत्रात करिअर करायचं आहे? **२.** 'जोडीने केलेला ध्येयप्रवास' या लेखमालेतील प्रत्येक जोडीत कोणते समान गुण तुम्हाला जाणवतात? **३.** निसर्गातील कोणत्या चार मूलभूत बलांविषयीची माहिती लेखात सांगितली आहे? **४.** कठीण परिस्थितीत घेतलेल्या धाडसी निर्णयाबाबतची आंदोलनं आपण 'निर्णयाच्या अवघड वळणावर' या लेखातून जाणून घेतली; अशाप्रकारे कठीण परिस्थितीत तुम्ही घेतलेला एक निर्णय १० ते १५ ओळीत लिहा. **५.** 'समस्या परिहारातील कोणते अडथळे' लेखात मांडले आहेत? **६.** 'म्हंजे म्हंजे वाघाचे पंजे' या कथेत डॉ. चक्रवर्तींनी वाघांवर केलेल्या प्रयोगामुळे चवताळलेल्या वाघांना पूर्ववत शांत करण्यासाठी ऐश्वर्यानं कोणती योजना आखली? **७.** 'प्रवासाच्या खिडकीतून' या कवितेत केलेल्या निसर्गचित्रणाचे वर्णन करा. **८.** सुशोभनाच्या कृतीत दिलेल्या चौफुल्यांचा वापर करून करता येतील अशा अन्य कलाकृतींची नावे पाठवा. **९.** 'भूक मायेची' या अनुवादित कथेच्या मूळ लेखकाचे नाव काय? **१०.** या विशेषांकाबद्दलचा काय आवडलं, काय नाही आवडलं, काय पाहिजे इ. बद्दलचा अभिप्राय कळविण्यासाठी संपादकांना पत्र लिहा.

*समर्पणाची हाक जयांच्या हृदयाला कळली। अजिंक्य झाले राष्ट्र तयांचे अभेद्य बलशाली।।*

सर्व वाचक, लेखक, चित्रकार, जाहिरातदार, प्रायोजक व केंद्रप्रमुखांना
**छात्र प्रबोधनतर्फे दिवाळीच्या मनापासून शुभेच्छा !**

## छात्र प्रबोधनतर्फे नावीन्यपूर्ण राज्यस्तरीय सांघिक स्पर्धा : २०१४-१५

(इ. ७वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी) स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क नाही.

**दिवाळीचा सुट्टीचा स्पर्धांच्या तयारीसाठी पुरेपूर वापर करा.**
**एकाच अथवा वेगवेगळ्या शाळांतील मित्र-मैत्रिणींचा गट करून या स्पर्धांमध्ये सहभागी व्हा.**
**तुमच्यातल्या कल्पकतेला व विविध कला गुणांना व्यक्त होण्याची संधी द्या...**

* **ध्वनिफीत स्पर्धा** (३० मिनिटांची, ४ ते ६ जणांचा गट) – **स्पर्धेचे तपशील** – • 'छात्र प्रबोधन'च्या अंकांतील साहित्याचा वापर यामध्ये करावा. • या स्पर्धेमध्ये आवाज विद्यार्थ्यांचा असावा. • फक्त समुहगीते किंवा नाटक असा एकच प्रकार न वापरता सादरीकरणाच्या विविध प्रकारांचे योग्य मिश्रण हवे. • ध्वनिफितीस योग्य शीर्षक व शीर्षक गीत असावे. • संगीताचा अतिरेक टाळावा. योग्य ठिकाणी योग्य प्रकारे संगीत द्यावे. संगीतही विद्यार्थ्यांनी दिलेले असावे. • आशयातील वैविध्य,कल्पनांचे नावीन्य, आवाजाची स्पष्टता, मांडणी, संगीत, सहभागी विद्यार्थी संख्या या गोष्टींना महत्त्व दिले जाईल. • ध्वनिफीत तयार करण्यासाठी मोठ्यांचे मार्गदर्शन घेण्यास हरकत नाही.

* **व्हिडिओ क्लिप स्पर्धा** (३ ते ४ जणांचा गट) – **स्पर्धेचे तपशील** – • आपल्या गावातील कोणत्याही एका प्रश्नावर (उदा. सांडपाणी व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा व्यवस्थापन) १० ते १५ मि.ची व्हिडिओ क्लिप तयार करावी. • व्हिडिओ क्लिप ही मराठी भाषेत असावी. • आवाज विद्यार्थ्यांचाच असावा. • प्रश्नांची मांडणी मुद्देसूद असावी. तुम्ही निवडलेल्या प्रश्नाला तुम्हाला सुचलेल्या उत्तरांचाही व्हिडिओ क्लिपमध्ये समावेश असावा. • प्रश्नांची निवड, वापरलेले संदर्भ, एकत्रित परिणाम, व्हिडिओची गुणवत्ता, संपादन यांद्वारे गुणांकन केले जाईल. • शाळेतील शिक्षक व पालकांचे मार्गदर्शन घेण्यास हरकत नाही.

**वरील दोन्ही स्पर्धांचे साहित्य सीडी/डीव्हीडी च्या रूपात छात्र प्रबोधनच्या मुख्य कार्यालयात पाठवावे.**
**दोन्ही स्पर्धांची बक्षिसे – प्रथम ₹ ७००/-, द्वितीय ₹ ५००/-, तृतीय ₹ ४००/-**

### * 'तुम्हीच संपादक व्हा !' हस्तलिखित स्पर्धा - (५ ते ८ जणांचा गट)

• हस्तलिखित ५० ते ५५ पृष्ठसंख्येचे असावे • हस्तलिखितातील २५ पानांचा एक भाग कोणत्याही एका विषयावर लिहिलेला असावा. विविध लेखन प्रकारांचा त्यामध्ये समावेश असावा. • दुसरा भाग संमिश्र असावा. त्याला विषयाचे बंधन नाही. वैविध्यपूर्ण लेखन विषय व लेखन प्रकार यात असावेत.

**दोन्ही पैकी कोणत्याही एका भागात खालील गोष्टींचा समावेश करावा – १.** आत्मवृत्त – कोणत्याही एका निर्जीव वस्तूचे आत्मवृत्त.**२.** नाट्यछटा. **३.** कल्पक विचार – गटामध्ये कल्पना स्फोटाचे तंत्र वापरून खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर २५ कल्पना लिहा. (कल्पना स्फोटाचे तंत्र छात्र प्रबोधनच्या वेबसाईटवर पाहायला मिळेल.) ♦ माणसाला पाण्याखाली वस्ती करून राहाता आले तर ♦ जगातील सर्व फुले पिवळी झाली तर काय होईल? ♦ जगात नेहमी युद्धे होतच राहतात कारण ♦ आपल्या मोठ्या शहरात अलिशान इमारतींच्या जोडीने झोपडपट्ट्याही दिसतात कारण...

**४.** आपल्या परिसरातील सार्वजनिक स्वच्छतेचे सर्वेक्षण करून त्यावर उपाय सुचवा. **५.** एखादी भावना व्यक्त करणारी १० ते १५ वाक्ये लिहा. **६.** 'छात्र प्रबोधन'च्या कोणत्याही एका अंकाचे रसग्रहण/परीक्षण करणारा लेख

**बक्षिसे – प्रथम ₹ १०००/-, द्वितीय ₹ ८००/-, तृतीय ₹ ६०० , उत्तेजनार्थ ₹ ४००/-**

**विशेष संधी –** क्रमांक प्राप्त हस्तलिखितातील सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना परस्पर सोयीनुसार मे व जून महिन्यातील 'छात्र प्रबोधनच्या' संपादकीय कामाचा ४ दिवस अनुभव घेण्याची संधी मिळेल. पहिल्या ३ क्रमांकांना पुस्तके व सीडी रूपाने बक्षिसे दिली जातील. विशेष गुणवत्ता प्राप्त सर्वांना प्रशस्तीपत्रके !

सर्व स्पर्धांची नोंदणी छात्र प्रबोधनच्या ईमेलवर अथवा पत्राद्वारे **३१ डिसें. २०१४** पूर्वी करणे आवश्यक.

**सर्व स्पर्धांसाठीचे साहित्य पाठविण्याचा अंतिम दिनांक ३१ जानेवारी २०१५**



हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १८ आश्विन, शके १९३६, १० ऑक्टोबर २०१४ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे -२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.